05-07-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A

SKK/ 12:00

05-07-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A-1

SKK/ MHM/ SBT/ 12:00

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

**पृ.शी. व मु.शी.** : तोंडी उत्तरे

**<u>तारांकित प्रश्न क्रमांक 17331</u>**

(श्री.राजेश टोपे, श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता)

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, मी उत्तरातील विसंगती निदर्शनास आणून देतो. उप प्रश्न क्रमांक 1 चे उत्तर "नाही" असे दिलेले आहे. पण उपप्रश्न क्रमांक 5 (अ) मध्ये "एकूण पात्र निवासी 2292 प्रकल्पग्रस्तांपैकी 2163 प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्यात आले आहे,"असे म्हटलेले आहे. या माहितीवरुन असे दिसते की, 129 लोकांचे अद्याप पुनर्वसन झालेले नाही. माझा प्रश्न असा आहे की, प्रकल्पग्रस्तांना अपात्र ठरविण्याचे प्रमुख कारण काय आहे ? दुसरा प्रश्न असा आहे की, काही अनिवासी प्रकल्पग्रस्तधारकांनी ताबापत्र स्वीकारण्यास नकार दिलेला आहे, त्याचे काय कारण आहे ?

श्री.राजेश टोपे : त्या ठिकाणच्या 3600 लोकांचा सर्व्हे झालेला होता. सर्व्हेप्रमाणे 3600 लोकांपैकी 2700 लोक पात्र ठरले. दिनांक 1-1-2000 च्या अगोदर त्या ठिकाणचे रहिवाशी असले पाहिजेत,अशी पात्रतेची व्याख्या आहे. याचा अर्थ 900 लोक अपात्र ठरलेले आहेत. अपात्रतेच्या कारणामुळे त्या ठिकाणी त्यांचे पुनर्वसन करता येणार नाही. त्या ठिकाणी 2700 रहिवाशी असले तरी प्रत्यक्षात पात्र रहिवाशी 2292 आहेत. म्हणजे अंदाजित 2300 रहिवाशांची घरे होती. यामध्ये रेरिडेन्स आणि कमर्शियल मिळून एकूण 333 लोकांचे अलॉटमेंट करण्याचे राहिलेले आहे. त्यांना ताबा दिलेला नाही, याचे कारण असे की, बांद्रा-कुर्ला कॉम्पेक्समील मोतीलाल नेहरु नगरमध्ये अलॉटमेंट पाहिजे अशी त्यांची मागणी आहे, त्यामुळे साधरणत: 100 लोकांनी अद्याप ताबा घेतलेला नाही. त्याचबरोबर 200 लोक कमर्शियल आहेत, त्यांनी ताबा घेतलेला नाही. पात्र अनिवासी प्रकल्पग्रस्तांचे मंडाले, टाटानगर, मानखुर्द व माहुल येथे पुनवर्सन करण्यात येत आहे परंतु त्या ठिकाणी बिझनेस प्रोटेन्शियल नसल्यामुळे तेथे लोक जायला तयार नाहीत.

श्री.अरविंद सावंत : कालही हा प्रश्न चर्चेला आलेला होता. असे सांगण्यात आले की, 3600 लोकांचा सर्व्हे केला. त्यामध्ये रेशिडेन्शीयल आणि कमर्शियल असे दोन्ही लोक आहेत. त्यामध्ये 2700 लोक पात्र ठरले. यामध्ये पात्र निवासी असलेल्या 2292 लोकांचे पुनर्वसन करण्यात आले.

(यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 17331..... श्री. अरविंद सावंत ....

माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर देत असताना असे सांगितले की, सन 2000 पूर्वी जे राहात होते त्यांचे पुनर्वसन केलेले आहे. यापूर्वी सुध्दा माननीय मुख्यमंत्र्यांनी या सदनामध्ये उत्तर दिले होते. त्यावेळी मी असा प्रश्न विचारला होता की, 1995 पूर्वीच्या झोपड्या अधिकृत धरण्यात आल्या आणि समजा प्रत्यक्षात त्या ठिकाणी श्री. अरविंद सावंत एका झोपडीत राहात असतील आणि कालांतराने अपरिहार्य कारणामुळे ती झोपडी त्यांनी विकली किंवा परिस्थितीनुसार ते सोडून गेले आणि त्या ठिकाणी दुसरी व्यक्ती राहावयास आलेली असेल तर अशा व्यक्तीला आपण घर देणार काय ? कारण ती झोपडी 1995 पूर्वीची आहे आणि अधिकृत आहे. याबाबतीत त्यावेळी उत्तर देण्यात आले नव्हते. आम्हाला याबाबतीतील उत्तर हवे आहे. याबाबतीत माननीय मंत्रिमहोदयांनी खुलासेवार उत्तर द्यावे. दुसरा प्रश्न असा की, मिठी नदीकाठचे संपूर्ण सर्वेक्षण शासनाने केले आहे काय ? की केवळ काही टप्प्याचेच सर्वेक्षण झालेले आहे ? पूर्ण सर्वेक्षण करावयाचे असेल तर ते केव्हा करणार ? त्याची यादी केव्हा जाहीर करणार ? पूर्ण सर्वेक्षणातील हे 3600 लोक आहेत असे म्हणावयाचे आहे काय ? शासकीय धोरणाप्रमाणे बांधकाम किंवा झोपडीची जागा कितीही असली तरी पुनर्वसन करताना त्यांना 225 चौरस फूट जागा मिळेल काय ?

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांना सांगू इच्छितो की, आपण हा पाचवा उपप्रश्न विचारत आहात. त्यामुळे यापैकी आपल्या कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे माननीय मंत्रिमहोदय देतील.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, 225 चौ.फूट जागा देण्याचे अधिकृत धोरण आहे. व्यावसायिकांना सुध्दा 225 चौरस फूट जागा देणार काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, त्या ठिकाणी व्यावसायिकांच्या बाबतीत जो नियम आहे तो असा की, ज्याची व्यवसाय करण्याची जागा 226 ते 1 हजार चौरस फूट आहे ते 250 चौरस फूट जागेसाठी पात्र आहेत. ज्यांची व्यवसाय करण्याची जागा 1 हजार ते 2 हजार चौरस फूट आहे ते 500 चौरस फूट जागेसाठी पात्र आहेत. ज्यांची व्यवसाय करण्याची जागा 2 हजार ते 3 हजार चौरस फूट आहे ते 750 चौरस फूट जागेसाठी पात्र आहेत. ज्यांची व्यवसाय करण्याची जागा 3 हजार चौरस फुटापेक्षा जास्त असेल ते 1 हजार चौरस फूट जागेसाठी पात्र आहेत.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM/

ता.प्र.क्र. 17331..... श्री. राजेश टोपे ...

अनिवासी आणि व्यवसाय करणाऱ्यांच्या दृष्टीकोनातून मी ही माहिती दिलेली आहे. आपण त्या ठिकाणी पहिल्या फेजचे सर्वेक्षण केलेले आहे. पहिल्या टप्प्याचे जे सर्वेक्षण करण्यात आले होते त्यामध्ये 3600 लोक काढले होते. दुसरे व्यापक सर्वेक्षण घेणार आहोत. ते सर्वेक्षण झालेले नाही. हे जे 3600 लोक आहेत ते पहिल्या सर्वेक्षणातील आहेत.

श्री. गोविंदराव आदिक : सभापती महोदय, या ठिकाणी पहिला प्रश्न असा विचारलेला आहे की, अजूनही अनेक कुटुंबियांचे पुनर्वसन करण्यात आले नाही हे खरे आहे काय ? या प्रश्नाला माननीय मंत्रिमहोदयांनी असे "नाही" असे उत्तर दिले आहे. आजच वर्तमानपत्रामध्ये अशी बातमी आलेली आहे की, काल जो पाऊस झाला त्या पावसामुळे ज्या कुटुंबांना त्या ठिकाणाहून हलविण्यात आले नव्हते अशा 4000 कुटुंबांना काल हलविण्यात आले. मिठी नदीच्या परिसरातील जवळपास 4 हजार लोकांना काल हलविण्यात आलेले आहे अशी बातमी वर्तमानपत्रात आलेली आहे. राज्याचे जबाबदार माननीय मंत्रिमहोदय श्री. गणेश नाईक यांच्या नावाने एक बातमी आलेली आहे. त्यामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, त्या ठिकाणी जे अतिक्रमण आहे ते आम्ही काढू. म्हणजे त्या ठिकाणी अतिक्रमण आहे हे त्यांनी मान्य केले आहे. या ठिकाणी उत्तर देत असताना कोणाचेही पुनर्वसन करण्याचे शिल्लक राहिलेले नाही असे जे उत्तर दिलेले आहे ते संपूर्णपणे चुकीचे उत्तर आहे. हे चुकीचे उत्तर माननीय मंत्रिमहोदय दुरुस्त करतील काय ? सभापती महोदय, प्रकल्पग्रस्ताना ज्या ठिकाणी पर्यायी जागा देण्यात आलेली आहे त्या पर्यायी जागा काही लोकांनी स्वीकारलेल्या नाहीत असे माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर देत असताना सांगितले. त्याची वेगवेगळी कारणे आहेत परंतु प्रमुख कारण असे आहे की, ज्या जागा दिल्या होत्या त्या ठिकाणी पाण्याची सोय नाही. त्या ठिकाणी विजेची सोय नाही. त्या ठिकाणी शौचालयाची तसेच सांडपाण्याची सोय नाही.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MHM/ SBT/ पूर्वी श्री. बरवड 12:10

(ता.प्र.क्र. 17331.... (श्री.गोविंदराव आदिक...

त्याठिकाणी सोयी-सुविधा उपलब्ध नसल्याने लोक राहावयास कसे जाणार ? याबाबतीत शासनाने, महानगरपालिकेने कोणती कारवाई केलेली आहे, यासंबंधीचा खुलासा होणे आवश्यक आहे.

श्री. राजेश टोपे : प्रश्नोत्तराच्या यादीतील प्रश्नभाग 1ला "नाही" असे उत्तर दिलेले आहे. एकूण 2300 लोकांचे पुनर्वसन करण्याची आवश्यकता होती. त्यापैकी 2171 लोकांचे पुनर्वसन केलेले आहे. 121 लोकांचे पुनर्वसन करण्याचे राहिलेले आहे. त्याठिकाणच्या लोकांनी अतिक्रमण काढू दिले. तसेच ब्रान्द्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, मोतीलाल नेहरु नगर याठिकाणी शिफ्ट होण्यास त्यांनी मान्यता दिलेली आहे. जवळ जवळ सर्व लोकांचे पुनर्वसन झालेले आहे.

श्री. गोविंदराव आदिक : आज वर्तमानपत्रामध्ये 4 हजार लोकांना हलविण्यात आले अशी बातमी प्रसिध्द झालेली आहे. हे 4 हजार लोक कोणत्या ठिकाणचे आहेत ?

श्री. राजेश टोपे : वर्तमानपत्रामध्ये आलेले वृत्त खरे आहे. काही भागामध्ये पाणी साचले होते. क्रांतीनगर, कुर्ला (पश्चिम) याठिकाणी पाणी साचल्यामुळे आणि पाण्याची पातळी वाढत असल्यामुळे तेथील 500 कुटुंबांना शाळेमध्ये हलविण्यात आले होते. आज ते लोक परत आपल्या राहात्या ठिकाणी गेलेले आहे. आता शाळेमध्ये फक्त 150 लोक आहेत. तो सखल भाग असल्यामुळे त्या लोकांना तेथून हलविण्याची कारवाई करण्यात आलेली होती.

श्री. विनोद तावडे : माननीय सदस्य श्री. गोविंदराव आदिक यांनी सांगितल्या प्रमाणे पाणी आणि शौचालयाची सुविधा नसल्यामुळे लोक पुनर्वसन केलेल्या ठिकाणी जात नाहीत. केवळ कोर्टाला दाखविण्यासाठी हे नमुने दाखल पुनर्वसन केलेले आहे. कमर्शियल लोकांना मानखुर्द, मंडाले येथे प्लॉट दिल्याचे माननीय राज्यमंत्री महोदयांनी सांगितले आहे. त्याठिकाणी सीआरझेड नियम लागू होतो काय ? तो लागू होत असेल तर त्याठिकाणी त्या लोकांना बांधकाम करता येईल काय ? न्यायमूर्ती श्री. लोढा आणि न्यायमूर्ती श्री. बग्गा यांनी दिलेल्या निर्णयामध्ये असे स्पष्टपणे म्हटलेले आहे की, ज्या लोकांचे अतिक्रमण काढलेले आहे त्या लोकांनी पुन्हा त्याठिकाणी अतिक्रमण केलेले आहे. तेव्हा ही वस्तुस्थिती खरी आहे काय ?

श्री. राजेश टोपे : ज्या निवासी लोकांची घरे पाडली होती त्या निवासी लोकांना गाळे दिलेले आहेत. कमर्शियल लोकांसाठी तुर्भे, मंडाले, टाटानगर याठिकाणी प्लॉट दिलेले आहेत. त्याठिकाणी सीआरझेडचे नियम लागू होत नाहीत. त्या प्लॉटवर बांधकाम करता येईल.

..2.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 17331....

श्री. दिवाकर रावते : गेल्यावर्षी 27 जुलैला मिठी नदीने हाहाकार उडविला. त्यासंदर्भात शासन काय काय करीत आहे हे वर्तमानपत्रे आणि इलेक्ट्रानिक्स मिडियाच्या माध्यमातून लोकांना सतत सांगितले जात होते. परंतु आता पुनश्च मागील वेळे सारखीच परिस्थिती निर्माण झालेली आहे. हे सभागृह देखील बंद पडण्याची वेळ आली. आता एका प्रश्नाला उत्तर देताना "एकही अनधिकृत बांधकाम नाही" असे माननीय राज्यमंत्री महोदयांनी ठामपणे सांगितले.

...नंतर श्री. भोगले..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ SBT/ MHM/ पूर्वी श्री.शिगम 12:15

ता.प्र.क्र.17331............ श्री.दिवाकर रावते...

सगळी बांधकामे काढली आहेत. आज अनेकांचे पुनर्वसन व्हायचे राहिले आहे हे मंत्रीमहोदय मान्य करतात. सन्माननीय सदस्य श्री.गोविंदराव आदिक यांनी सांगितल्याप्रमाणे उत्तरामध्ये दुरुस्ती केली नाही. ही पूर्णपणे विसंगती आहे. वृत्तपत्रातील अधिकृत माहिती आणि शासनाची अधिकृत माहिती विचारात घेता अनधिकृत बांधकामांचे पुनर्वसन होत असताना एक ते दीड हजार लोकांनी बेकायदेशीर गाळे घेतले आणि त्यांना निष्कासित करण्याचे काम सुरु आहे असे म्हाडाचे उपाध्यक्ष यांनी सांगितले. बेकायदेशीर लोक याचा फायदा घेतात, त्यांना निष्कासित करण्याचे काम सुरु होते. शासन या संदर्भात किती बेकायदेशीर लोकांनी पुनर्वसन करुन घेतले आणि त्यापैकी किती लोकांना निष्कासित केले याचा अहवाल सादर करणार का? 200 ते 250 हा आकडा जाहीर केला आहे आणि या संदर्भात कोणती कारवाई करणार आहात?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, हा महत्वाचा प्रश्न आहे. निश्चितपणे काही प्रमाणात बेकायदेशीर गोष्टी झाल्या आहेत, त्या संदर्भात पोलीस केसीस देखील करण्यात आल्या व पोलीस कारवाई निश्चितपणे पूर्ण केली जाणार आहे. त्यामध्ये मिठी नदी विकास प्राधिकरणाने सुध्दा आणखी काळजी घेण्याची आवश्यकता आहे, तशा सूचना दिल्या जाणार आहेत. फॅमिली आयडेन्टिटी कार्ड दिले जाणार आहे, ते देत असताना या सगळया बाबी पुन्हा तपासल्या जाणार आहेत. 1.1.2000 पूर्वी ते तेथे राहणारे आहेत की नाही हे पाहिले जाईल. डेप्युटी कलेक्टर यांच्याकडून छाननी होत असताना किंवा ते अपात्र असताना चुका केल्या असतील तर निश्चितपणे त्या संदर्भात उचित कारवाई केली जाईल. मी सुरुवातीलाच सांगितले,हा महत्वाचा मुद्दा आहे. अशा प्रकारे बोगस डॉक्युमेंटच्या माध्यमातून जे लोक पात्र होतात आणि घर किंवा कमर्शिअल प्लॉट मिळवितात, याबाबत शासन अत्यंत गांभीर्याने कारवाई करणार आहे. पोलीस केसीस केल्या आहेत. यापुढे फॅमिली आयडेन्टिटी कार्ड देताना कायदेशीर बाबी तपासल्या जातात. सर्चमध्ये जे काही बेकायदेशीर निदर्शनास येईल त्याबाबत कारवाई करण्यास शासन मागेपुढे पाहणार नाही.

श्री.दिवाकर रावते : या संदर्भातील अहवाल पटलावर ठेवण्यात येईल काय?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, या संदर्भातील अहवाल पटलावर ठेवण्यात येईल.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.17331............

श्रीमती सुधा जोशी : सभापती महोदय, कुर्ला (पश्चिम) येथील इंदिरानगरमधील सुमारे 100 लोकांना अद्याप पर्यायी जागा दिली नाही हेही खरे आहे काय या उपप्रश्न क्रमांक-2ला शासनाने "नाही" असे उत्तर दिले आहे. मग खरे काय आहे आणि पर्यायी जागा का दिली नाही? सुरुवातीला 300 लोकांचे पुनर्वसन व्हायचे आहे असे म्हटले आहे. त्यामध्ये कमर्शिअल किती आणि रेसिडेन्शियल किती?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, दुसरा प्रश्न कुर्ला (पश्चिम) येथील इंदिरानगरमधील 100 लोकांना अद्याप पर्यायी जागा दिली नाही, याचे कारण ते अपात्र असले तर त्यांना पर्यायी जागा दिली नाही. पात्र लोक आहेत त्यांना 100 टक्के पर्यायी जागा देण्याच्या दृष्टीकोनातून शासनाने निर्णय घेतला आहे.

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. :17331** .......

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मिठी नदीच्या काठावर असलेल्या लोकांचे पुनर्वसन व्हावे यासाठी केंद्रसरकारने तसेच राज्यसरकारने किती निधी उपलब्ध करुन दिलेला आहे? मिठी नदीच्या काठावरील जी अतिक्रमणे काढण्यात आली होती त्या ठिकाणी पुन्हा नव्याने अतिक्रमण झ ालेले आहेत. या ठिकाणी झालेल्या अतिक्रमणाच्या संदर्भात माझ्याकडे फोटोग्राफस् देखील आहेत. त्यामुळे मिठी नदीवर जे अतिक्रमण झालेले आहेत ते केव्हा काढण्यात येतील? तसेच मिठी नदीवर वसलेल्या लोकांचे पुनर्वसन व्हावे यासाठी केंद्रसरकारने 30 कोटी रुपये व राज्य सरकारने 21 कोटी रुपये दिलेले आहे हे खरे आहे काय?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मिठी नदीवरील लोकांचे पुनर्वसन करण्यासाठी केंद्रसरकारने काहीही पैसे दिलेले नाहीत. या ठिकाणी जे काही पैसे खर्च करण्यात आलेले आहेत ते राज्यसरकारनेच केलेले आहेत. या ठिकाणी 32 कोटी बीएमसी कडून तसेच 20-21 कोटी रुपये एमएमआरडीएने खर्च केलेला आहे. तसेच सन्माननीय सदस्यांच्या दुस-या प्रश्नाच्या संदर्भात सांगू इच्छितो की, पहिल्या फेजमध्ये जी अतिक्रमणे काढणे आवश्यक होती ती सर्व अतिक्रमणे काढण्यात आलेली आहेत. यामध्ये पात्र असलेल्या 2700 लोकांचे पुनर्वसन करण्याच्या दृष्टीने जी काही कार्यवाही करण्याची आवश्यकता होती त्यासंदर्भात पुनर्वसन करण्याच्या दृष्टीने 2300 लोकांना गाळे देण्यात आलेले आहेत. मी पुन्हा एकदा सांगू इच्छितो की, मिठी नदीवरील अतिक्रमणे खपवून घेतले जाणार नाही. जर या ठिकाणी अतिक्रमणे झाले असेल ते त्वरीत काढण्यात येतील.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, या प्रश्नाच्या बाबतीत दोन गोष्टी अतिशय महत्वाच्या आहेत. सन्माननीय मंत्रीमहोदय या प्रश्नाचे उत्तर देण्यामध्ये गल्लत करीत आहेत. त्यामुळे माझे प्रश्न असे आहेत की, 1995 पर्यंत मिठी नदीवर किती अतिक्रमणे होती? सन 2000 मध्ये किती अतिक्रमणे काढून त्यांना पर्यायी जागा देण्यात आली? मी या भागातील रहिवासी आहे त्यामुळे या ठिकाणी काय चालले आहे याची मला माहिती आहे. आपण जर माझ्या बरोबर आलात तर मिठी नदीवर नव्याने किती अतिक्रमणे झालेली आहेत हे मी आपणास दाखवून देऊ शकेन. या प्रश्नाच्या संदर्भात माननीय मंत्रीमहोदय उत्तर देऊन सभागृहाची दिशाभूल करीत आहेत. माननीय मंत्रीमहोदय सांगत आहेत की, या ठिकाणी अतिक्रमणे झालेली नाहीत.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. :17331** .......

श्री. मधुकर सरपोतदार.....

काल माननीय मंत्री श्री. गणेश नाईक यांनी सांगितले होते की, जर या ठिकाणी अतिक्रमणे झाली असतील तर ती त्वरीत काढण्यात येतील. या ठिकाणी रोजच्या रोज अतिक्रमणे होत आहेत व या लोकांना पैसे घेऊन पर्यायी जागा देण्यात आपली मंडळी तरबेज आहेत हे वेगळे सांगावयास नको. या ठिकाणच्या संदर्भात लपवाछपवी, काळाबाजार चालला आहे. मिठी नदीचा जो मुळ प्रश्न आहे तो तसाच राहून गेलेला आहे त्यामुळे मिठी नदीची समस्या आपण सोडविणार आहात काय? तसेच 1995 पर्यंतची किती अतिक्रमणे काढलीत व त्यांना पर्यायी जागा दिली? सन 2000 सालापर्यंत या ठिकाणची किती अतिक्रमणे काढलीत व त्यांना पर्यायी जागा दिलीत? तसेच आज या ठिकाणी जी काही अतिक्रमणे झालेली आहेत त्याची वस्तुस्थिती दर्शक माहिती द्यावी.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र..17331...

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, मी सुरुवातीलाच सांगितले की, दिनांक 1.1.1995 पूर्वी त्याठिकाणी किती झोपडपट्टया होत्या याची माहिती आज उपलब्ध नाही. असे असले तरी मी आपणास नियम सांगितला की, दिनांक 1.1.2000 पूर्वी राहत असलेल्या रहिवाशांना पात्र समजले जाऊन ते रहिवाशी पुनर्वसनासाठी पात्र असतील. .....

( अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळ बोलण्याचा प्रयत्न करतात. )

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, आपण स्ट्रक्चर रेग्युलराईज करीत नाही. आपण जर नियम बदलले तर ती धोरणात्मक बाब होईल. त्याबाबतीत काय करता येईल याचा शासन विचार करेल. परंतु आज नियम असा आहे की, दिनांक 1.1.2000 पूर्वीच्या ज्या झोपडपट्टी असतील.......

( अनेक सन्मानीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करतात. )

**सभापती** : माझी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी कृपया खाली बसावे. मी आता या निर्णयाप्रत आलो आहे की, या प्रश्नावर आपण दोन तास चर्चा केली तरी ती चर्चा अपुरी राहण्याची शक्यता आहे. तेव्हा दोन्ही बाजूच्या सदस्यांनी या विषयावर अडीच तासाच्या चर्चेची मागणी केल्यास ती मान्य करण्याची माझी तयारी आहे. मी या प्रश्नावर अडीच तास चर्चेची परवानगी देत आहे. आता मी पुढील प्रश्न पुकारीत आहे.

------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.18558.**

**( श्री. सुरेश शेट्टी, श्री. मनोहर नाईक यांच्याकरिता )**

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, माझी छापील उत्तराला हरकत आहे. पहिल्या प्रश्नाचे उत्तर "नाही" असे देण्यात आलेले आहे. तर दुसऱ्या आणि तिसऱ्या प्रश्नाच्या बाबतीत असे उत्तर देण्यात आलेले आहे की, "पोलीस निरीक्षक, हदगाव यांचेमार्फत तपास सुरु आहे. सदरील प्रकरण आरोपिंचे हस्ताक्षर नमुना तपासणी,, ज्या आरोपिंनी जामिनाकरिता अर्ज केलेला असून जामीन मंजूर झालेला नाही अशा आरोपिंचे जामीन रद्द झाल्यानंतर त्यांना गुन्ह्यात अटक करुन अधिक पुरावा हस्तगत करणे... " असे देण्यात आलेले आहे. मला या वाक्याचा अर्थ समजलेला नाही.

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, या प्रकरणात एकूण 34 जणांचा समावेश आहे. त्यातील 11 जणांना अटक करण्यात आली असून त्यांनी ॲन्टी सिपेटरी बेल घेतली आहे. 8 जणांनी उच्च न्यायालयात ॲन्टी सिपेटरी बेलसाठी अर्ज केलेला आहे. ॲन्टी सिपेटरी बेलवर अजून उच्च न्यायालयात निर्णय व्हावयाचा असल्यामुळे 8 जणांना अटक करण्यात आलेली नाही.

**सभापती** : 11 जणांना ॲन्टी सिपेटरी बेल मंजूर झालेला आहे. 8 जणांना ॲन्टी सिपेटरी बेल मंजूर झालेला नाही. म्हणून ते उच्च न्यायालयात गेले. याचा अर्थ त्यांना ॲन्टीसिपेटरी बेल मिळेपर्यंत या 8 जणांना पोलिसांना अटक करणे शक्य होते.

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मला पोलीस निरीक्षक, हदगाव यांचेकडून माहिती मिळाली की, या 8 जणांना अटक करण्यापूर्वी त्यांनी औरंगाबाद न्यायालयात जामीन अर्ज केला असून त्या अर्जावर निर्णय झालेला नाही म्हणून त्यांना अटक करण्यात आलेली नाही.

**सभापती** : मी मंत्रिमहोदयांना सांगू इच्छितो की, त्यांनी उत्तरामध्ये दुरुस्ती करावी. 8 जणांना अटकपूर्व जामीन मिळाला नाही म्हणून ते उच्च न्यायालयात गेले असे समजते. जोपर्यंत जामीन मंजूर होत नाही तोपर्यंत पोलीस त्यांचेवर कार्यवाही करु शकतात.

यानंतर श्री.पुरी..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.18558....

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, याठिकाणी मान्य करण्यात येते की, ते अरेस्ट करण्यास पात्र होते. याबाबतीत तशा प्रकारचे आदेश संबंधित इन्व्हेस्टीगेशन ऑफीसरना देण्यात येतील व उत्तरामध्ये दुरुस्ती करुन घेण्यात येईल.

**सभापती** : मी याठिकाणी माननीय राज्यमंत्री महोदयांना असे सांगू इच्छितो की, आपले उत्तर थोडेसे चुकीचे असून ते उत्तर दुरुस्त करण्याकरिता मी हा प्रश्न राखून ठेवतो.

------

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( ता.प्र.क्र.17335)**

**(श्री.धर्मरावबाबा अत्राम, श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता)**

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, याठिकाणी प्रश्न विचारण्याचा हेतू असा आहे की, शासनाने भूमिका घेऊन जेष्ठ नागरिकांना सवलत देण्याचे ठरविले. परंतु त्याची अंमलबजावणी होत नाही. याठिकाणी प्रश्न विचारण्यात आला आहे की, "अद्याप कोणतीही कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?" याबाबतीत माननीय मंत्रिमहोदयांनी "हे खरे नाही" असे उत्तर दिले आहे. मग, आपल्या मतानुसार कशी कार्यवाही झाली आहे ? आज अनेक रुटस्वर महामंडळाच्या लाल गाडया धावत नाहीत. लाल गाडयांचे प्रमाण आता खूप कमी झालेले आहे. सोलापूर, सांगली, कोल्हापूर वरुन पुणे-मुंबई महामार्गावर येणाऱ्या लाल गाडयांची संख्या खपूच कमी झालेली आहे. अशावेळी महामंडळाच्या निमआरामी गाडयांमध्ये जेष्ठ महिला नागरिकांना सवलत मिळत नसेल तर आपण याबाबतीत अपवाद करुन त्याची व्याप्ती वाढवावी व जेष्ठ महिलांना निमआराम गाडयांमध्ये सवलत द्यावी. त्यामुळे माझा असा प्रश्न आहे की, ज्या मार्गावर लाल गाडया उपलब्ध नाहीत अशा ठिकाणी आपण निमआराम गाडयांमध्ये जेष्ठ नागरिक महिलांना सवलत द्याल का ?

श्री.धर्मरावबाबा अत्राम : सभापती महोदय, जे जेष्ठ नागरिक असतात त्यांना आपण सवलत देतो. सन्माननीय सदस्या श्रीमती नीलम गो-हे यांनी सांगितल्याप्रमाणे, पुणे-मुंबई मार्गावर महामंडळाच्या साध्या गाडया येत नसतील तर त्या गाडया त्याठिकाणाहून सुरु करण्याच्या दृष्टीने परिवहन महामंडळामार्फत विचार करण्यात येईल व त्यांना सवलत देण्यात येईल. परंतु सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे, निमआराम गाडयांमध्ये अशा प्रकारची सवलत देता येणार नाही. कारण, त्यामुळे महामंडळावर फार मोठा बोजा पडणार आहे. या दृष्टीकोनातून पाहिले तर सन 2005 मध्ये आपण 372 कोटी रुपयांची सवलत दिली असून जेष्ठ नागरिकांना सन 2005-2006 मध्ये जवळपास 136 कोटी रुपयांची सवलत दिली आहे. त्यामुळे ही मागणी मान्य करता येणार नाही. परंतु त्याठिकाणी जास्त प्रमाणात लाल गाडया सुरु करण्यात येतील.

..3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.17335....

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, याठिकाणी प्रश्नामध्ये असे म्हटले आहे की, एस.टी. प्रवास भाडयात जेष्ठ महिला नागरिकांना 50 टक्के सवलत देण्याची अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली आहे. याठिकाणी मला अशी माहिती पाहिजे की, जेष्ठ महिला नागरिक आणि जेष्ठ पुरुष नागरिक यांची व्याख्या काय ? व त्यांच्या सवलतीसंदर्भात माहिती द्यावी.

श्री.धर्मरावबाबा अत्राम : सभापती महोदय, 65 वर्षावरील जेष्ठ महिला व पुरुष नागरिकांना सवलत देण्यात येते.

श्रीमती कांता नलावडे : सभापती महोदय, ज्या मार्गावर लाल गाडया चालत नसतील त्या बाबतीत आपण निमआराम गाडयांमध्ये तशा प्रकारची सवलत द्यावी, ती आपण देणार काय ?

श्री.धर्मरावबाबा अत्राम : सभापती महोदय, जेथे साध्या गाडया चालत नाहीत, त्याठिकाणी त्या गाडया सुरु करण्याच्या दृष्टीने महामंडळामार्फत विचार करण्यात येईल. त्या गाडया उद्यापासूनच सुरु करण्यास आमची हरकत नाही.

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**ता.प्र.क्रमांक 17335 पुढे सुरु................**

**सभापती** : सन्माननीय सदस्या, डॉ.निलम गो-हे व एकूणच सभागृहाचे मत असे आहे की, ज्येष्ठ नागरिकांना 50 टक्के सुविधा-सवलती देण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. हा निर्णय घेत असतांना ज्या मार्गावर महामंडळाच्या सामान्य गाडया नसतील त्या मार्गावरील निमआराम गाडयांमध्ये ज्येष्ठ नागरिकांना सवलत द्यावी किंवा महत्वाच्या मार्गांवरील निमआराम गाडयांमध्ये सवलत द्यावी. जर निमआराम गाडयांमध्ये सवलत देणे शक्य नसेल तर त्या मार्गावर सामान्य गाडयांच्या फे-या सुरु कराव्यात. यापैकी नेमका कोणता निर्णय शासन घेणार आहे ?

श्री.धर्मराव बाबा आत्राम : सभापती महोदय, सामान्य गाडया उद्यापासूनच सुरु करणार आहोत.

------------------

..2.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.19137**

**(श्री.बाबा सिध्दिकी, श्री.मनोहर नाईक यांच्याकरिता)**

श्री.वसंतराव चव्हाण : सभापती महोदय, लेखी उत्तरामध्ये प्रश्न क्रमांक 1 ला असे उत्तर देण्यात आले आहे की, सर्व मंडयांची तपासणी पूर्ण झालेली नाही. माझा प्रश्न असा आहे की, राज्यातील सर्व मंडयांची तपासणी किती दिवसात पूर्ण करण्यात येईल ? तसेच, तपासणी अहवालानुसार 5 नमुन्यांत रंग आढळून आल्यामुळे हे नमुने अप्रमाणित घोषित करण्यात आलेले आहेत. हे 5 नमुने कोणत्या मंडईमधील होते ? त्यांची नांवे काय ?

श्री.बाबा सिध्दिकी :सभापति महोदय, जितनी भी मंडियाँ हैं, उनकी रॅण्डम चेकिंग का कार्यक्रम तीन महीने के अंदर

पूरा हो जाएगा. मैं दूसरे प्रश्न के संबंध में यह कहना चाहूंगा कि पाँच मंडियों के नाम इस प्रकार हैं-(1) श्री रविंद्र तुकाराम राऊत, जीजामाता भाजी मार्केट, महाड, जिला, रायगड़ (2) श्री दत्तात्रय महादेव शेलार, नगरपालिका के पास, रोहा, जिला रायगड़ (3) श्री चंद्रकांत श्रीपति गायकवाड़, गाला नं. 1039, महात्मा फुले मंडई, पुणे (4) मेसर्स धमाले एंड ब्रदर्स, छत्रपति शिवाजी मार्केट, पुणे (5) मेसर्स दत्तात्रय भाऊसाहेब ढोकरे, गाला नं. 1913,महात्मा फुले मार्केट, पुणे.

डॉ.दिपक सावंत : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी या ठिकाणी नांवे सांगितली आहेत. माझा प्रश्न असा आहे की, क्रॉफर्ड मार्केटची तपासणी करण्यात आली आहे काय ? त्याचप्रमाणे ज्या 5 नमुन्यात रंग आढळून आले आहेत ते रंग प्राणघातक होते काय ?

श्री.बाबा सिध्दिकी :सभापति महोदय, मैंने यह नहीं कहा है कि पाँच मंडियों की जांच की गई है. जिन पाँच मंडियों पर केस दर्ज किए गए हैं, उन मंडियों के नाम मैंने बताए हैं.

श्री.श्रीकांत जोशी : सभापती महोदय, 228 नमुने तपासणीसाठी दि.12 एप्रिल, 2006 रोजी देण्यात आले होते. त्यापैकी 173 तपासणी अहवाल प्राप्त झाले आहेत. 4 महिने होऊनदेखील अद्याप 55 अहवाल प्राप्त झालेले नाहीत. तपासणी अहवालास विलंब झाल्याची कारणे काय ? तसेच, दिरंगाई करणा-या अधिका-यांवर कारवाई करण्यात येईल काय ?

..3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.19137 पुढे सुरु.........**

श्री.बाबा सिध्दिकी : सभापति महोदय, जो भी सेम्पल लिए जाते हैं, वे जून और जुलाई में लिए जाते हैं. ये सेम्पल प्रयोगशाला में जांच के लिए भेजे जाते हैं.जांच के लिए 45 दिन का समय दिया जाता है. जिन 55 मामलों की रिपोर्ट प्राप्त नहीं हुई है, वे मामले पिछले दो महीनों के हैं.प्रयोगशाला से हमें सेम्पल की रिपोर्ट प्राप्त होने के बाद कार्रवाई की जाएगी.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, शासनाने मागील अधिवेशनामध्ये अन्न भेसळ कायद्याप्रमाणेच दूध भेसळीसंबंधी कठोर कायदा करण्यासाठी विधेयक आणले. भाज्यांना कृत्रिम रंग देण्याचे प्रकार मुंबई शहरात मोठया प्रमाणावर होत आहेत. वर्तमानपत्रांनी पुराव्यानिशी हे सिध्द केले आहे. भाज्या ही जीवनावश्यक कमोडिटी आहे, असे असतांना काही लोक बेशरमपणे भेसळ करीत आहेत. या लोकांविरुध्द सक्षमपणे कारवाई करता यावी म्हणून कठोर कायदा करण्याची आवश्यकता आहे. सध्या कायद्यात जी तरतूद आहे त्यानुसार हा गुन्हा बेलेबल ऑफेन्स म्हणून दाखविण्यात आला आहे. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, आहे त्या कायद्यात दुरुस्ती करण्यात येईल का ? किंवा नवीन कायदा तयार करण्यात येईल काय ?

श्री.बाबा सिध्दिकी : सभापति महोदय, सम्माननीय सदस्यों की सहमति से इस विषय से संबंधित विधेयक पिछले अधिवेशन में पास हो चुका है. यह विधेयक माननीय राष्ट्रपति जी की स्वीकृति हेतु 16.5.2006 को भेजा गया है. इस विधेयक को माननीय राष्ट्रपति जी से स्वीकृति मिलने के बाद अमल में लाया जाएगा.

यानंतर श्री.बोरले..........

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**ता.प्र.क्र.19137**..........

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, राज्यातील सर्व मंडयांच्या तपासणी बाबतचा हा प्रश्न आहे. काही मंडयांची तपासणी करण्यात आलेली आहे. माझा प्रश्न असा आहे की, उर्वरित मंडयांची तपासणी माननीय मंत्री महोदय किती दिवसात पूर्ण करणार आहेत ? तसेच, जे नमुने प्राप्त झालेले आहेत त्यापैकी किती नमुन्यांमध्ये फळभाज्यांना रंग देण्याचे दोष आढळून आलेले आहेत ? आणि त्यांच्यावर जे खटले दाखल करण्यात आलेले आहेत ते कोणत्या कलमान्वये दाखल करण्यात आलेले आहेत ?

श्री.बाबा सिद्दीकी : सभापती महोदय, नियम का भंग हुआ है इसलिए पीएफए एक्ट,1954 के तहत सेक्शन 7, 27,29 एवं 55 के अनुसार कारवाई की गई है.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी जो प्रश्न विचारला त्याचे उत्तर आले नाही. माननीय मंत्री महोदयांना मला असा प्रश्न विचारावयाचा आहे की, फळभाज्यांवर जे रंग वापरण्यात आले ते प्रकृतीला अपायकारक आहेत काय ? आणि असतील तर संपूर्ण राज्यातील फळभाजी मार्केटवर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने शासनातर्फे विशेष प्रयत्न केले जाणार आहेत काय ?

श्री.बाबा सिद्दीकी : सभापती महोदय, इन मामलों में दो प्रकार की मिलावट पायी गई है.इसमें से एक मिलावट एडीबल होती है और दूसरी जो किसी किसी चीज़ में पायी जाती है, जो कि नहीं पायी जानी चाहिए. जब मिलावट पायी जाती है तो यह माना जाता है कि नियम का भंग हुआ है. चूंकि कुछ सेम्पल में रंग पाया गया है जो कि अपायकारक है, इसलिए वे सेम्पल अप्रमाणित घोषित किए गए हैं.

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...2/-

**ता.प्र.क्र.17361.**

**(श्री.राजेश टोपे, श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता.)**

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, नवी मुंबई प्रकल्पासाठी पनवेल, उरण आणि नवी मुंबईतील 95 गावांमधील शेतक-यांच्या जमिनी सिडकोने 1970 साली संपादित केल्या. त्या प्रश्नासाठी आज लोकांना आदोलने आणि मोर्चे काढावे लागत आहेत. महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री माननीय श्री.शरद पवार यांनी ज्या शेतक-यांच्या जमिनी संपादित करण्यात आल्या होत्या त्या शेतक-यांना 12.5 टक्के भूखंड मिळावा यासाठी कायदा केला होता. परंतु आज 22 वर्षे होऊन सुध्दा अनेक प्रकल्पग्रस्तांना भूखंड दिले गेलेले नाहीत. माझा प्रश्न असा आहे की, आता पर्यंत किती प्रकल्पग्रस्तांना भूखंड दिले गेले आहेत ? ज्या प्रकल्पग्रस्तांना भूखंड मिळालेले नाहीत त्यांना ते का मिळाले नाहीत ? ज्या प्रकल्पग्रस्तांनी भूखंड दिले नव्हते त्यांनी आपल्या शेतामध्ये गरजेपोटी घरे बांधली आहेत, ती घरे कधी कायम स्वरुपी केली जातील आणि त्यांचा दर काय असेल ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, मला असे वाटते की, हा प्रश्न जे.एन.पी.टी.चा आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांनी ठाणे, पनवेल आणि उरणसंबंधी प्रश्न विचारलेला आहे. पहिला प्रश्न असा विचारण्यात आला की, 12.5 टक्क्यामध्ये लोकांना ही जमीन द्यावयाची आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री.सुंबरे .........

श्री. राजेश टोपे (पुढे चालू...) ता.प्र.क्र.17361...

सभापती महोदय, एकंदर 1005 हेक्टर जमीन ही साडेबारा टक्के योजनेनुसार वाटप करावयाची आहे आणि आतापर्यंत 368.79 हेक्टर जमिनीचे वाटप केलेले आहे. हे 36 टक्के काम झालेले आहे. याचा अर्थ जे न झालेले काम आहे ते निश्चितपणे लवकर होण्याची गरज आहे. हे काम लवकर न होण्यामागे जी कारणे आहेत त्यातील एक कारण म्हणजे जे काही मृत भूधारक आहेत त्यांचे वारस दिवाणी कोर्टामध्ये जाऊन ठरवावे लागतात आणि त्यामुळे यामध्ये अधिक विलंब होतो...

( काही सन्माननीय सदस्य एकदम उठून बोलतात ...)

सभापती महोदय, आपण कृपया मला संरक्षण द्यावे, मला माझे उत्तर पूर्ण करू द्यावे. हे काम लवकर न होण्याचे जी कारणे आहेत ती मी येथे सांगत आहे ...

**सभापती** : सर्व सन्माननीय सदस्यांनी प्रथमत: शांत बसावे. माननीय राज्यमंत्र्यांना मी सांगू इच्छितो की, हा प्रश्न जवळ जवळ गेली 22 वर्षे प्रलंबित आहे. म्हणजे मी जेव्हा राज्यमंत्री होतो त्यावेळेस खऱ्या अर्थाने सन्माननीय श्री.दि.बा.पाटील यांच्या वेळचा हा प्रश्न आहे. त्यावेळेस या प्रकल्पग्रस्तांना साडेबारा टक्के जमीन देण्याचे कमिटमेंट केलेले होते. असे असताना गेल्या 22 वर्षांमध्ये यातील केवळ 36 टक्केच प्रश्न सुटला असेल तर मग कठीणच आहे. दुसरे म्हणजे वारस ठरविण्यासाठी दिवाणी कोर्टामध्ये जावे लागते हे बरोबर आहे पण तरीही एका ठराविक काळामध्ये ही सारी प्रोसिजर संपली पाहिजे. त्या अनुषंगाने आपल्याकडून उत्तराची अपेक्षा आहे.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मला आपल्याकडून एका गोष्टीच्या संदर्भात संरक्षण पाहिजे. मला माझे उत्तर येथे पूर्ण करू द्यावे. यापूर्वी देखील पहिल्या प्रश्नाला उत्तर देताना न्याय देण्यासाठी मी त्या विषयी अडीच तासांची चर्चा मान्य करण्यास माझी काही हरकत नाही असे सांगितले आहे. वास्तविक त्याबाबतची सगळी माहिती माझ्याकडे उपलब्ध होती तरीही मी हरकत घेतली नाही. आता देखील यामध्ये जी काही दोन तीन कारणे आहेत ती मी येथे सांगत होतो. सभापती महोदय, मी येथे अगोदरच मान्य केले आहे की, यामध्ये 36 टक्के काम झालेले आहे आणि हे प्रमाण अतिशय कमी आहे. हे काम मोठ्या प्रमाणात व्हायला पाहिजे होते हे मी मान्यच केले आहे. या कामामध्ये गती प्राप्त करण्याच्या दृष्टीने शासनाने सिडकोतर्फे लॉटरी पद्धतीने गावनिहाय काम सुरू केलेले आहे. त्यामध्ये ओसवी आणि द्रोणागिरीची लॉटरी ताबडतोबीने होऊ

..... के 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शकते आणि त्यातून 70 हेक्टर जमीन देता येऊ शकणार आहे. माननीय मुख्यमंत्र्यांकडून या लॉटरीचे उद्घाटन करून आपण हे काम सुरू करणार आहोत. तेव्हा या संदर्भात शासनाने वारंवार बैठका घेऊन, मी स्वत: देखील सिडकोमध्ये जाऊन याबाबतीत बैठका घेतल्या आहेत. हे काम लौकर व्हावे, लॉटरीदेखील फास्ट व्हावी म्हणून मीही अपेक्षा व्यक्त केलेली आहे आणि या साऱ्या गोष्टी गांभीर्याने आणि तातडीने कशा होतील यादृष्टीने आपण प्रयत्न करू. तेव्हा यामध्ये लॉटरी होईल आणि हे काम गतीमान होईल असा मला विश्वास आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, या प्रकल्पग्रस्तांसाठी येरवडा तुरूंगामध्ये 1-1, 2-2 महिने राहिलेला मी एक कार्यकर्ता आहे. या ठिकाणी माननीय राज्यमंत्री वेगळ्या प्रकारे उत्तर देत आहेत. मृत प्रकल्पग्रस्तांचे वारस ठरविण्यात विलंब झालेला आहे असे ते म्हणाले, तर असे किती प्रकल्पग्रस्त मृत आहेत की त्यांचे वारसाचे दाखले नाहीत ? सभापती महोदय, चार वर्षापूर्वी द्रोणागिरी येथे पुंडे गावाजवळ माननीय मुख्यमंत्र्यांच्या हस्ते 5 प्रकल्पग्रस्तांना वाटप केले होते पण त्या जमिनीचा ताबा खरोखरी त्यांना मिळालेला आहे काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी त्यांच्याकडे असलेल्या माहितीच्या आधारे प्रश्न विचारलेला आहे, तो या मूळ प्रश्नाशी संबंधित नाही. त्यांनी द्रोणागिरीच्या बाबतीतील माहिती विचारली आहे. ती आता माझ्याकडे नाही, पण ती मी जरूर सभागृहाच्या पटलावर ठेवीन. हा प्रश्न जेएनपीटीशी संबंधित असल्याने तेवढीच माहिती माझ्याकडे आता आहे.

( यानंतर श्री. सरफरे ..... के 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 17361...

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, राज्यमंत्री महोदय चुकीचे उत्तर देत आहेत. जे.एन.पी.टी.ला सिडकोनेच जमीन दिलेली आहे. त्याठिकाणी झालेल्या समारंभाला मी देखील हजर होतो, पालक मंत्री देखील हजर होते. त्या प्रकल्पग्रस्तांना अजून जमिनीचा ताबा मिळालेला नाही...

**सभापती** : माननीय सदस्य श्री. जयंत पाटील आपण खाली बसा...

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, माझ्यावर अन्याय होत आहे. माननीय राज्यमंत्री यांचेकडून चुकीचे उत्तर दिले जात आहे. मी या ठिकाणी नम्रपणे सांगतो की, गेल्या 20 वर्षापासून तेथील प्रकल्पग्रस्तांना अजून जमीन मिळत नाही. त्यामुळे त्यांनी न्याय कुणाकडे मागावयाचा?

**सभापती** : आपण व्यक्त केलेल्या मताशी मी सहमत आहे असे म्हणण्यापेक्षा या प्रश्नाची जाण जेवढी आपल्याला आहे तिच्या निम्मी जाण मला देखील आहे. मी 22 वर्षापूर्वी कै. वसंतदादा पाटील यांच्या मंत्रिमंडळामध्ये शासनाचा प्रतिनिधी म्हणून काम केले आहे. त्यावेळेपासून त्यांच्यावर हा अन्याय होत आहे. म्हणून माझी अशी इच्छा आहे की, एखाद्या प्रश्नाच्या बाबतीत एखादी गोष्ट राहून गेली तर तुम्ही....

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मला नम्रपणे असे म्हटले पाहिजे की, माननीय सदस्य श्री. जयंत पाटील हे म्हणतात त्याप्रमाणे....

**सभापती** : माननीय सदस्य श्री. विनोदजी तावडे हा प्रश्न फार महत्वाचा आहे, अत्यंत तीव्र भावना निर्माण करणारा आहे. गेल्या 22 वर्षापूर्वी या लोकांनी आपल्या जमिनी दिल्या आहेत त्यांचे पुनर्वसन करता आले नाही. त्यांना साडे बारा टक्के जमिनी न दिल्यामुळे त्यांचे जीवन आपण उभे करु शकलो नाही. ही जशी तुमची भावना आहे तशी माझीही भावना आहे व त्यांचीही भावना आहे...

(विरोधी पक्षाकडील अनेक माननीय सदस्य उभे राहून एकाच वेळी बोलू लागतात.)

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, आपण व्यक्त केलेल्या भावनेशी आणि सभागृहाच्या भावनेशी मी 100 टक्के सहमत आहे. या प्रश्नाच्या सोडवणुकीमध्ये दिरंगाई झाली आहे. म्हणून नवी मुंबईमधील ज्यांच्या ज्यांच्या जमिनी अधिग्रहीत करण्यात आल्या आहेत त्यांना साडे बारा टक्के जमिनीचा मोबदला लवकरात लवकर मिळावा यासाठी व्हीलेजवाईज लॉटरी...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 17361...

(गोंधळ)

श्री. राजेश टोपे....

सभापती महोदय, यामध्ये लॉटरी सिस्टीम आणून पारदर्शक पध्दतीने त्याला गती देण्यासाठी शासनाच्या वतीने अजून काही करण्याची आवश्यकता असेल तर त्या संदर्भात हे अधिवेशन संपल्यानंतर ताबडतोब पुढील महिन्यात सिडकोबरोबर माझ्या दालनामध्ये बैठक घेऊ...

(विरोधी पक्षाचे माननीय सदस्य घोषणा देतात.)

सभापती महोदय, जे.एन.पी.टी. च्या जमिनीसाठी साडे बारा टक्केची योजना चालू करणार काय? हा मुख्य हेतू या प्रश्नामध्ये आहे...

(गोंधळ)

सभापती महोदय, जे.एन.पी.टी. करीता ज्या जमिनी दिल्या गेल्या, त्याकरीता साडे बारा टक्केची योजना लागू करावी असा देखील या प्रश्नातील बहुतांशी भाग आहे. त्यामुळे या प्रश्नामध्ये दोन भाग आहेत...

(गोंधळ)

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्री यांचेकडून समाधानकारक उत्तर मिळत नाही म्हणून या शासनाचा निषेध करुन आम्ही सभात्याग करीत आहोत.

(विरोधी पक्षाचे माननीय सदस्य सभात्याग करतात.)

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MAP/ KGS/ MHM/ पूर्वी श्री.सरफरे.... 12:55

**तारांकित प्रश्न क्रमांक : 18409**

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय,राज्यातील पोल्ट्री व्यवसायावर मोठयाप्रमाणात संकट आले. त्यामध्ये करोडो रुपयाचे पोल्ट्री व्यवसायिकांचे नुकसान झाले. राज्य शासनाने मंत्रीमंडळामध्ये निर्णय घेऊन या पोल्ट्री व्यवसायिकांना मदत करण्यासाठी निधी उपलब्ध करुन दिला. परंतु दुर्दैवाने या सांगली जिल्ह्यातील 38 पोल्ट्रीधारकांसाठी अनुदान मिळायला पाहिजे होते ते मिळालेले नाही. सांगली जिल्ह्यासाठी राज्य शासनाने अनुदानाची तरतूद करुन दिलेली होती, परंतु अनुदानाचे वाटप केलेले नाही. त्यासाठी या पोल्ट्रीधारकांनी 28 एप्रिल 2006 रोजी आत्मदहन करण्याचा शेवटचा इशारा दिलेला आहे, ही अत्यंत गंभीर बाब आहे. कशाप्रकारे शासकीय यंत्रणा काम करीत आहे, हे यावरुन दिसून येते. माझा प्रश्न असा आहे की, एकूण त्या ठिकाणी किती निधी उपलब्ध करुन दिलेला होता आणि तो निधी वितरित न करण्याचे कारण काय आहे ? दुसरा प्रश्न असा आहे की, ज्या अधिकाऱ्यांनी जाणूनबुजून निधी वितरित केला नाही त्यांच्यावर शासन काय कारवाई करणार आहे ?

श्री अनिस अहमद : सभापति महोदय, यह बात सही है कि महाराष्ट्र में मुर्गियों में बर्ड फ्लू बीमारी फैल गई थी जिससे पोल्ट्री घारकों को बहुत नुकसान हुआ था. इसलिए नवापुर और जलगांव के पोल्ट्री धारकों को मदद की गई थी. लेकिन पूरे महाराष्ट्र में ही बर्ड फ्लू बीमारी की हवा फैल गई थी जिसकी वजह से लोगों ने मुर्गी खाना बंद कर दिया था और इसी वजह से पोल्ट्री धारकों को नुकसान उठाना पड़ा था. पोल्ट्री धारकों को मदद करने के लिए सरकार ने 29 अप्रैल को निर्णय लिया था कि जिन पोल्ट्री धारकों का नुकसान हुआ है उनको 20 रुपये प्रति मुर्गी के हिसाब से मदद दी जाएगी. सांगली में 38 पोल्ट्री धारकों को मदद करने के लिए 50-60 हजार रुपये देना तय हुआ था. 29 अप्रैल को जो बैठक हुई थी, उस बैठक में कमिश्नर को बताया गया था कि जिन पोल्ट्री धारकों का नुकसान हुआ है, उन सब को मदद दी जानी चाहिए. लेकिन "A" कंडीशन पूरी करने पर फिर "B" कंडीशन पूरी करने के लिए कहा, "B" कंडीशन पूरी करने के बाद "C" कंडीशन पूरी करने के लिए कहा गया था, जिसके कारण सांगली में पोल्ट्री धारकों को हम पैसे नहीं दे सके. लेकिन जल्द से जल्द सांगली के पोल्ट्री धारकों नुकसान भरपायी दी जाएगी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MAP/ KGS/ MHM/ पूर्वी श्री.सरफरे.... 12:55

तारांकित प्रश्न क्रमांक : 18409....

श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील : सभापती महोदय, आतापर्यन्त सरकारने जी मदत जाहीर केलेली आहे, त्यापैकी प्रती ब्रॉयलर पक्षाकरिता आणि लेअर पक्षाकरिता किती मदत देण्यात आली ? आतापर्यन्त सरकारने किती मदत दिलेली आहे ? सांगली जिल्हयामध्ये खाजगी प्रोल्ट्री व्यवसायिक आणि सहकारी संस्थांमार्फत चालविण्यात येत असलेले पोल्ट्री फॉर्म किती आहेत ? त्यांना लवकरात लवकर मदत देण्यात येईल, असे मंत्री महोदयांनी सांगितले. चार-सहा महिने झाले हा उद्योग नुकसानीमध्ये आहे, पुढे अजून सहा महिने तो नुकसानीमध्ये राहील, अशी परिस्थिती आहे. तेव्हा त्यांना किती दिवसात मदत करणार आहात ? ज्या अधिकाऱ्यांनी सांगली जिल्ह्यातील पोल्ट्री व्यवसायिकांना मदत दिली नाही त्यांच्यावर काय कारवाई करणार आहात ?

श्री अनिस अहमद : सभापति महोदय, जिन अधिकारियों ने आदेश का पालन नहीं किया है, केबिनेट के निर्णय का पालन नहीं किया है, उनके खिलाफ विभागीय जांच की जाएगी. जिन अधिकारियों को मंत्रालय में बुलाकर कोऑर्डिनेशन करने के लिए कहा गया था लेकिन उन्होंने कोऑर्डिनेशन नहीं किया, उनके खिलाफ भी विभागीय जांच करके कार्रवाई की जाएगी. दूसरी बात यह है कि सांगली के पोल्ट्री धारकों को एक सप्ताह के अन्दर काम्पेनसेशन मिलेगा.

श्री.भास्कर जाधव : सन्माननीय सभापती महोदय, हा प्रश्न स्पेसिफिक सांगली जिल्ह्यापुरता विचारलेला होता, परंतु मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये महाराष्ट्राचा आढावा घेतलेला आहे. म्हणून माझ ा प्रश्न असा आहे की, सांगली जिल्ह्यातील अधिकाऱ्यांच्या अडवणुकीच्या धोरणामुळे तेथील पोल्ट्री व्यवसायिकांना नुकसान सहन करावे लागलेले आहे...

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 18409 ...... श्री. भास्कर जाधव ....

म्हणून सन्माननीय मंत्रिमहोदय अधिकाऱ्यांवर कारवाई करणार आहेत आणि पोल्ट्रीधारकांना नुकसानभरपाई देणार आहेत. याच पध्दतीने महाराष्ट्रातील अन्य कोणकोणत्या जिल्ह्यांमध्ये याच धोरणानुसार तेथील पोल्ट्री धारकांना मदत मिळाली नाही याची माहिती शासनाकडे आहे काय ? असल्यास ती माहिती देण्यात यावी. ती माहिती शासनाकडे असेल आणि त्या ठिकाणी जर अधिकारी असेच वागले असतील तर त्या सर्व अधिकाऱ्यांवर याच पध्दतीने कारवाई करणार काय ?

श्री. अनिस अहमद : सभापति महोदय, मैंने पहले ही कहा है कि एनीमल हसबेंडरी के कमिश्नर का कॉर्डिनेशन ठीक नहीं रहा और उन्होंने बार बार हर कागज के बारे में डिले किया है. "जस्टिस डिलेड, जस्टिस डिनाइड" होता है और सांगली के एक पॉल्ट्री फार्मर ने सुसाइड किया है. इसलिए इस प्रश्न के बारे में सभी आमदार जिस एक्शन के बारे में कहेंगे, वह एक्शन कमिश्नर के ऊपर लिया लाएगा. प्रभावित लोगों को 15 दिन के अन्दर सारे पैसे दिए जाएंगे, यह निर्णय कॅबिनेट ने लिया था. कॅबिनेट के निर्णय का पालन न करते हुए बार बार अलग अलग कन्डीशन लगाकर उसको वापस भेजने वाले कमिश्नर के ऊपर कार्रवाई की जाएगी.

श्री. विनोद तावडे : माननीय मंत्रिमहोदय ही बाब आयुक्तांवर ढकलत आहेत. ही जबाबदारी माननीय मंत्रिमहोदयांनी घेतली पाहिजे.

( काही सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात )

**सभापती** : मी सन्माननीय मंत्रिमहोदयांना सांगू इच्छितो की, आपल्या ज्या अंतर्गत अडचणी असतील त्या शासन म्हणून तुम्हालाच सोडवाव्या लागणार आहेत. कठोर ॲक्शन घ्यावी लागणार आहे. परंतु याशिवाय जे पोल्ट्रीधारक किंवा अन्य लाभधारक असतील त्यांना बिनाविलंब मदत होण्याच्या दृष्टीने आपण प्रयत्न करणे आवश्यक आहे.

-----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ SBT/ MHM/ MAP/

**सभापती** : प्रश्नोत्तराची वेळ संपलेली आहे पण मी दोन मिनिटांकरिता तारांकित प्रश्न क्रमांक 17366 उपस्थित करण्याकरिता सन्माननीय सदस्य श्री. रमेश निकोसे यांना परवानगी देत आहे.

**तारांकित प्रश्न क्रमांक 17366**

( श्री. राजेश टोपे, श्री. विलासराव देशमुख यांच्याकरिता )

श्री. रमेश निकोसे : सभापती महोदय, या ठिकाणी जे उत्तर दिलेले आहे ते समाधानकारक नाही. मी शासनाला विनंती करतो. हा जो प्रकल्प आहे तो किती दिवसांमध्ये, किती महिन्यांमध्ये पूर्ण करणार ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मायनर मॉडिफिकेशनचा प्रस्ताव संचालकांकडून शासनाकडे प्राप्त झालेला आहे. हे अधिवेशन संपण्याच्या आत त्यावर मंजुरी घेतली जाईल. मायनर मॉडिफिकेशनची दुरुस्ती करुन दिली जाईल.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, 15 डिसेंबर, 2004 रोजी 4 महिन्यांमध्ये मॉडिफिकेशन करु असे उत्तर दिलेले होते. 5 एप्रिल, 2006 रोजी 1 महिन्याच्या आत करु असे उत्तर दिले होते. त्याबद्दल माझी तक्रार नाही. अधिवेशन संपण्याच्या आत नोटिफिकेशन काढतो असे माननीय मंत्रिमहोदय म्हणत आहेत. ती माहिती निवेदनाव्दारे सभागृहाला दिली जाईल काय ?

श्री. राजेश टोपे : होय.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ SBT/ MHM/ MAP

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना

**सभापती** : सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, नितीन गडकरी व इतर वि.प.स. यांनी "दिनांक 4 जुलै, 2006 रोजी मुंबई शहर व उपनगरात पडलेल्या मुसळधार पावसामुळे 10 व्यक्तींचा मृत्यू ओढवणे व शहरातील जनजीवन विस्कळीत होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र शासनाने या विषयावर निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते व इतर वि.प.स. यांनी " लोकमान्य मतिमंद मुलांची शाळा, नरखेड, जि.नागपूर या शाळेतील शिक्षक शिक्षकेत्तरांना गेल्या 22 महिन्यांपासून वेतन न मिळाल्यामुळे सुरु केलेले आंदोलन" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र शासनाने या विषयावर निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर चव्हाण व इतर वि. प. स. यांनी "श्री. तळवणेकर या रुग्णावर पोद्दार रुग्णालयात योग्य निदान व उपचार न झाल्यामुळे त्यांना बॉम्बे हॉस्पिटलमध्ये हलविल्यानंतर त्यांचा दि. 19 मे, 2006 रोजी अवयव निकामी पडून झालेला मृत्यू" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र शासनाने या विषयावर निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश शेंडगे यांनी "पुण्यश्लोक अहिल्यादेवी शेळी व मेंढी विकास महामंडळाच्या गैरकारभाराच्या चौकशीबाबत होत असलेली टाळाटाळ" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र शासनाने या विषयावर निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी "दिनांक 3 जुलै, 2006 रोजी वा त्यासुमारास मुंबई-पुणे एक्सप्रेस हायवेवर लोणावळा नजीक कोसळलेली दरड, एम.एस.आर.डी.सी. ने निकृष्ट दर्जाचे काम केल्यामुळे घटना घडणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र शासनाने या विषयावर निवेदन करावे.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

<u>**सभागृहाच्या कामकाजाबाबत**</u>

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आजच्या कामकाजपत्रिकेवर बाब क्रमांक 6 वर म.वि.प. नियम 260 अन्वये दाखविण्यात आलेला प्रस्ताव प्रथम चर्चेसाठी घेण्यात यावा.

**सभापती** : आजच्या कामकाजपत्रिकेवरील बाब क्रमांक सातवर दाखविण्यात आलेला म.वि.प. नियम 106 अन्वयेचा प्रस्ताव तसेच म. वि.प. नियम 260 अन्वयेचा प्रस्ताव हे दोन्ही प्रस्ताव प्रथम चर्चेस घेण्यात येतील आणि त्यानंतर लक्षवेधी सूचना घेण्यात येतील.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, 2 क्रमांकाच्या लक्षवेधी सूचनेचे निवेदन प्राप्त झालेले नाही.

**सभापती** : 2 क्रमांकाच्या लक्षवेधी सूचने संबंधी माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांच्याशी चर्चा झालेली असल्याचे मला सांगण्यात आलेले आहे. तसेच त्यासंदर्भात मला देखील पत्र आलेले आहे. तेव्हा 2 क्रमांकावरील लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात आलेली आहे.

---

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: लोकप्रतिनिधीत्व अधिनियम, 1951मध्ये सुधारणा करण्याबाबत

**मु.शी.**: लोकप्रतिनिधीत्व अधिनियम, 1951 मध्ये सुधारणा करण्याबाबत नियम 106 अन्वये माननीय मुख्यमंत्र्यांचा ठराव

श्री. राजेश टोपे (सामान्य प्रशासन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 106 अन्वये पुढील ठराव मांडतो :-

"ज्याअर्थी, लोकप्रतिनिधीत्व अधिनियम, 1951 च्या कलम 59 मध्ये संसदेने सुधारणा केली असून विधानसभेतून राज्यसभेवर निवडून पाठवावयाच्या सभासदांच्या बाबतीत खुले मतदान (ओपन बॅलट) ही पध्दत स्वीकारली आहे ;

आणि ज्याअर्थी, राज्यातील विधानसभेतून तसेच स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघातून विधानपरिषदेवर निवडून द्यावयाच्या सभासदांच्या बाबतीत देखील खुले मतदान पध्दतीचा स्वीकार करणे, निवड पध्दतीत पारदर्शकता आणून लोकशाही अधिक सुदृढ होण्याच्या दृष्टीने योग्य ठरणार आहे.

त्याअर्थी, आता ह्या राज्यातील 'विधानसभेतून' तसेच 'स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघातून' राज्यातील विधानपरिषदेवर सभासद निवडून पाठविताना वरीलप्रमाणे 'खुले मतदान' (ओपन बॅलट) पध्दती स्वीकारण्याच्या दृष्टीने लोकप्रतिनिधीत्व अधिनियम, 1951 मध्ये योग्य ती सुधारणा करण्यात यावी अशी शिफारस केंद्र शासनाला करण्यात यावी, असा महाराष्ट्र विधानपरिषद याद्वारे ठराव करीत आहे".

सभापती महोदय, या सभागृहामध्ये सन्माननीय सदस्य श्री. गुरुमुख जगवानी हे स्थानिक प्राधिकारी संस्थेतून निवडून आलेले आहेत. अशी अनेक उदाहरणे आहेत. मला हे सांगावयाचे आहे की, स्थानिक स्वराज्य मतदार संघातून किंवा विधानसभेच्या सन्माननीय सदस्यांनी मतदान करुन विधानपरिषदेवर सदस्यांना निवडून पाठवित असताना जी पध्दत अवलंबिली जाते त्यामध्ये मोठया प्रमाणावर घोडेबाजार होत असल्याचे चित्र पहावयास मिळते. अशा प्रकारचे चित्र लोकप्रतिनिधी म्हणून तुम्हा आम्हाला आणि कोणालाही शोभा देणारे नाही.

...नंतर श्री.भोगले..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ MAP/ पूर्वी श्री.शिगम 13:10

श्री.राजेश टोपे.......

सभापती महोदय, याठिकाणी सध्याच्या परिस्थितीनुसार धनदांडग्यांच्या किंवा ज्यांच्याजवळ पैसा आहे त्यांनाच फक्त संधी मिळावी अशा प्रकारची देखील परिस्थिती निर्माण झाली आहे आणि अनेक होतकरु, लोकाभिमुख, विकासाभिमुख काम करणारे जे कार्यकर्ते आहेत ते कोणत्याही पक्षाचे असोत, त्यांना त्याठिकाणी संधी मिळणे दुरापास्त झाले आहे. अलिकडे निवड करीत असताना उमेदवार चांगला आहे का ही गोष्ट पहात असताना त्याच्याकडे पैसे किती आहेत हे पाहिले जाते, तोच उमेदवार दिला जातो ही परिस्थिती आपल्याला पहावयास मिळते. त्यामुळे जी आज आपल्या देशात संसदीय लोकशाही प्रणाली आहे त्या प्रणालीच्या मुख्य तत्वालाच कदाचित मूठमाती मिळते की काय अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. एक विशेष सर्कल या सगळया कारणामुळे निर्माण होते. या ठिकाणी जर खूप मोठा खर्च करुन एखादा उमेदवार विधानपरिषदेवर निवडून येणार असेल तर निश्चितच तो पैसा कसा वसूल करायचा हा विषय निर्माण होतो. त्या विशेष सर्कलमधून करप्शन सुरु होते. म्हणून याठिकाणी सर्वसामान्य माणसाला न्याय मिळावा, सामान्य काम करणाऱ्या, विकासाभिमुख काम करणा-या, विकासाची आवड असणाऱ्या लोकांना न्याय मिळावा यादृष्टीकोनातून हा ठराव खूप चांगला निर्णय घेणारा, चांगला आधार देणारा असणार आहे. सभापती महोदय, आज राजकारणामध्ये आपण पाहतो, राजकारणी मंडळींकडे पाहण्याचा दृष्टीकोन समाजामध्ये अत्यंत वाईट झाला आहे. पूर्वीच्या काळात एखाद्या वेळी आमदार, खासदार किंवा जिल्हा परिषद सदस्य म्हणून निवडून आल्यास त्यांच्याकडे आदरपूर्वक पाहिले जात होते. आज खऱ्याअर्थाने राजकारणी मंडळींचे समाजामध्ये जे चित्र निर्माण झाले ते या सगळया परिस्थितीमुळे दुर्दैवाने निर्माण झालेले आहे. त्यामुळे हा ठराव मांडत असताना चांगला चांगुलपणा राजकारणात निर्माण व्हावा, चांगल्या लोकांना संधी मिळावी यादृष्टीने शासनाने हा ठराव मांडला आहे. अलिकडे अनेक गोष्टी शासनाला देखील कायदे करुनच समाजामध्ये राजकारणी मंडळींचे किंवा लोकप्रतिनिधींचे चित्र चांगले निर्माण व्हावे यासाठी अनेक कायदे करण्याची पध्दत आपण पहात आहोत. ज्यामध्ये पक्षांतर बंदी कायदा जाणीवपूर्वक त्याच उद्देशाने आलेला आहे. निवडणुकीला खर्च कमी करावा यादृष्टीने देखील जो कायदा आहे आणि आपल्या लोकप्रतिनिधींनी किंवा उमेदवारांनी निवडणुकीचा अर्ज भरत असताना आपली मालमत्ता जाहीर केली पाहिजे हे जे चांगले नवनवीन नियम निवडणूक आयोगाने आणले त्याचा देखील अर्थ हाच

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे........

आहे की, लोकप्रतिनिधींचे चारित्र्य दूषित असू नये, त्याच्यावर कोणताही वाईट ठपका असू नये यादृष्टीने आपण कायदे करीत आहोत. या निमित्ताने हा जो ठराव केला जात आहे आणि आपल्याकडून शिफारस केली जाणार आहे, यामधून केंद्र शासनाने हा निर्णय घेतल्यानंतर निश्चितपणे चांगले परिणाम पुढील काळात पहावयास मिळतील म्हणून हा ठराव शासनाने आणला आहे एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

ठराव प्रस्तुत झाला.

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रमोद नवलकर : सभापती महोदय, माननीय मंत्रीमहोदयांनी भाषण करीत असताना "घोडेबाजार" असा शब्द वापरला आहे तो कृपा करुन कामकाजातून काढून टाकावा. एका इमानी प्राण्यावर आपण अन्याय करीत आहात. रेसमध्ये धावणारा घोडा आपल्या धन्यासाठी धावतो. त्याला पैसे दिले तरी तो दुसऱ्या धन्यासाठी धावणार नाही. त्यामुळे असल्या बाजाराला घोडेबाजार म्हणणे म्हणजे आपल्या धन्यासाठी प्रामाणिकपणे धावणाऱ्या घोडयावर अन्याय केल्यासारखे होईल. त्याला कितीही पैसा दिला तरी तो दुसऱ्या धन्यासाठी धावणार नाही. आपल्या धन्यासाठीच धावणार. याठिकाणी विकले जातात त्या घोडेबाजारातील प्राणी वेगळे आहेत. तो प्राणी बिचारा वेगळा आहे. कृपा करुन त्या घोडयांना बदनाम करु नये.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.नवलकर यांचे एवढेच मत आहे की, त्या मुक्या जनावराचा कशाकरीता वापर करीत आहात.

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाडुंरग फुंडकर ( विरोधीपक्ष नेता ) : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय मंत्रीमहोदयांनी विधान परिषद नियम क्रमांक 106 अन्वये जो ठराव आणलेला आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. मला असे वाटते की हा ठराव आणण्यास थोडा विलंब झालेला आहे. ज्यावेळेला या देशाचे पंतप्रधानपदी माननीय अटलबिहारी वाजपेयी होते त्यावेळी राज्यसभेच्या निवडणूका झाल्या होत्या व त्या निवडणूकीमध्ये एका एका सदस्याचा भाव एक-एक कोटी रुपये होता, एवढया मोठया प्रमाणात त्यावेळी पैशाची देवाण घेवान झाली होती त्यामुळे राजकारणामध्ये पारदर्शकता आणली पाहिजे या चांगल्या उद्देशाने हा ठराव केंद्राने त्यावेळेस आणला होता. ज्यावेळेस हा ठराव ज्यावेळेस आला होता त्यावेळेस या प्रस्तावाचे सर्वांनी स्वागत केले होते. परंतु पुरोगामी म्हणविणा-या महाराष्ट्राने हा ठराव त्याच वेळेस आणला असता तर अधिक बरे झाले असते. परंतु "देर आए, दुरुस्त आए" असे म्हटले तरी हरकत नाही. या ठिकाणी जो ठराव आणलेला आहे तो अतिशय चांगल्या उद्देशाने आणलेला आहे. आताच झालेल्या विधानपरिषदेच्या निवडणुका आणि त्यामध्ये आलेला अनुभव लक्षात घेता या ठरवाची आवश्यकता आहे अशा प्रकारची भावना सत्ताधारी पक्षात निर्माण झाली ही चांगली गोष्ट आहे. हा ठराव आता सीमित आहे. विधानसभेतून राज्यसभेवर जाण्यासाठी होणारे मतदान, स्थानिक स्वराज्य मतदारसंघ आणि विधानसभेतून विधानपरिषदेवर निवडून येण्यासाठी हा कायदा लागू होणार आहे. खरे म्हणजे राजकारणातील पारदर्शता ही खालपर्यंत जावयास पाहिजे. जिल्हापरिषदेची निवडणूक असो, पंचायत समितीच्या सभापतीची निवडणूक असो त्या ठिकाणी सुध्दा अशाच पध्दतीची देवाणघेवाण चालते. त्यामुळे ही पारदर्शकता अधिक खाली आणली पाहिजे. या देशाची घटना 26 जानेवारी 1950 पासून सुरु झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घटना लिहितांना त्यांनी या देशातील प्रत्येक माणसाला समान अधिकार, समान स्वातंत्र्य, समान हक्क दिले. या देशातील राष्ट्रपतीला एक मत देण्याचा अधिकार आहे तसाच अधिकार झोपडीत राहणा-या शेतमजुरालाही आहे. अशा प्रकारची समानता डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी आणली. आपल्या देशातील लोकशाही प्रगल्भ व्हावी यासाठी त्यांनी प्रयत्न केलेले आहेत. परंतु काही वर्षे ही लोकशाही प्रगल्भ राहिली. काही काळापर्यंत विधानपरिषद, राज्यसभेत अशा प्रकारची पारदर्शकता टिकली होती. परंतु आता काही काळापासून वातावरण बिघडत चालले आहे. आमदार-खासदारांकडे लोकांचा बघण्याचा दृष्टीकोन बदलत चालला आहे. ज्यावेळी विघानपरिषदेच्या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाडुंरग फुंडकर........

निवडणूका जाहीर होतात त्यावेळी लोक आमदारांना विचारतात की, "आता तुमचा भाव काय लागणार आहे? आता स्थानिक स्वराज्य संस्थाच्या ज्या निवडणूका झाल्या त्या मतदारसंघाचे मी नाव घेत नाही परंतु त्या ठिकाणी राष्ट्रवादीचा उमेदवार डिफीट झालेला आहे. त्या ठिकाणच्या निवडणूकीसाठी एकूण 3 उमेदवार उभे होते. या तिघा उमेदवारांकडून मत देणा-यांनी पैसे घेतले परंतु ज्यांनी जास्त पैसे दिले त्या उमेदवाराला पहिल्या पसंतीचे मत दिले, ज्याने पहिल्या पेक्षा कमी पैसे दिले त्याला दुस-या पसंतीचे मत दिले आणि ज्याने दोघांपेक्षा कमी पैसे दिले त्याला तिस-या पसंतीचे मत दिले होते. या निवडूकीमध्ये ज्याने जास्त पैसे दिले त्याला त्या प्रमाणे प्रामाणिकपणा दाखवून निवडून देण्यात आले. हे जें लोन आहे तेच लोन आता वरपर्यंत पसरलेले आहे. या सार्वभौम सभागृहात सुध्दा अशाच प्रकारचे प्रकार होतात ही एक लज्जास्पद बाब आहे. त्यामुळे ही जी पध्दत सुरु आहे तिला रोखण्याचे मी समर्थन करीत आहे.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.............

तेव्हा या पुरोगामी महाराष्ट्रामध्ये जो महाराष्ट्र डॉ.बाबासाहेब आंबडेकर, शाहू महाराज, महात्मा जोतिबा फुले यांचा म्हणविता त्या महाराष्ट्रामध्ये अशाप्रकारचा ठराव आणून किमान राजकारणात पारदर्शकता आणली आहे अशाप्रकारचे चित्र सभागृहात उमटू द्यावे एवढे बोलून मी माझे दोन शब्द पुरे करतो.

------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी नियम 106 अन्वये जो शासकीय ठराव आणलेला आहे त्या ठरावाचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, लोकशाहीच्या संपूर्ण प्रक्रियेमध्ये, एकूण निवडणुकीमध्ये होत असलेल्या घडामोडींमुळे दुर्दैवाने समाजामध्ये लोकप्रतिनिधींबद्दल चांगले मत नाही. बहुतेक प्रतिनिधी आचारसंहितेचे पूर्णपणे पालन करणारे असताना काही मोजक्या लोकप्रतिनिधींमुळे आणि त्या अनुषंगाने वृत्तपत्रात येणाऱ्या बातम्यांमुळे, माध्यमांमुळे संपूर्ण लोकप्रतिनिधींची समाजातील प्रतिमा दुर्दैवाने डागाळली गेली आहे.

सभापती महोदय, कै.माधवराव शिंदे यांचे स्मरण मी यासाठी करीत आहे की, राज्यसभेसाठी होणाऱ्या निवडणुकीमध्ये त्यावेळी होत असलेल्या गैरव्यवहारासंबंधी त्यांनी प्रथम आवाज उठविला होता. या देशामध्ये ज्यांचा समाजकारणाशी आणि राजकारणाशी दुरान्वयाने देखील संबंध नाही असे लोक राज्यसभेत येत आहेत. ज्यांना गरिबांबद्दल कोणतीही काळकळ नाही असे मोठे उद्योगपती संपत्तीच्या जोरावर राजकारणात येत आहेत. सर्वच उद्योगपती समाजदक्ष नाहीत असे मला म्हणावयाचे नाही. परंतु दुर्दैवाने समाजकारणाशी, राजकारणाशी दुरान्वयाने संबंध नाही असे काही लोक राज्यसभेमध्ये पोहोचले आहेत. आपणास ही गोष्ट सर्व राज्यांमध्ये पहावयास मिळते. विधानपरिषद निवडणुकीच्या बाबतीतही हीच परिस्थिती निर्माण झालेली आहे. पैसेवाले आपल्या प्रंचड पैशाचा वापर करुन, तर काही ठिकाणी पैसे आणि गुंडगिरीचा वापर करुन विधानपरिषद सभागृहात पोहोचले आहेत हे देखील आपण पाहिले आहे. माननीय विरोधी पक्ष नेता श्री.पांडुरंग फुंडकर यांनी परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाचा उल्लेख केला. परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबडेकरांनी सर्वांना घटनेच्या माध्यमातून अनेक अधिकार दिलेले आहेत. त्यातील एक मतदानाचा अधिकार. One man, one vote and one value. एक माणूस, एकच मत आणि एकच मूल्य. परंतु दुर्दैवाने या मूल्याचा अर्थ काहींनी अर्थकारणामध्ये लावला. त्या अर्थाने सर्वजण त्याकडे पाहू लागले ही अतिशय वाईट गोष्ट आहे हे मला याठिकाणी सांगावयाचे आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार......

सभापती महोदय, माननीय श्री. बाळासाहेब भारदे यांनी लोकप्रतिनिधी कसा असावा याबाबत सुंदर वर्णन केलेले आहे. "लोकांच्या आशाआकांक्षाचे प्रतिबिंब ज्याच्या कर्तृत्वातून प्रतिबिंबीत होते तो लोकप्रतिनिधी" परंतु आता असे लोकप्रतिनिधी फार थोडे आहेत असे दुर्दैवाने म्हणावेसे वाटते. आता घडणाऱ्या घडामोंडीमुळे आजच्या लोकप्रतिनिधींचे माननीय श्री.बाळासाहेब भारदे यांनी सुंदर वर्णन केलेले आहे "लोक, प्रति, निधी". लोक म्हणजे लोकांशी संपर्क नसलेला, प्रति म्हणजे चित्रासारखे भिंतीला लटकलेले व निधी म्हणजे निधीकडे लक्ष असलेले असे "लोकप्रतिनिधी" असे वर्णन केलेले आहे. सर्वच लोकप्रतिनिधी वाईट नसतात, बहुसंख्य लोकप्रतिनिधी चांगले सज्जन असून देखील आम्ही लोकांना कितीही टाहो फोडून सांगितले तरी लोकांचा त्यावर विश्वास बसत नाही. ही वेळ लोकप्रतिनिधींवर येऊ नये म्हणून निवडणुकीमध्ये पारदर्शकता आणणे गरजेचे आहे. पक्षाचा प्रतोद सांगतो त्याप्रमाणे मतदान केले पाहिजे. राज्यसभेच्या निवडणुकीमध्ये प्रतोदास मत दाखविले जाते. त्याप्रमाणे विधानपरिषद आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या होणाऱ्या निवडणुकीमध्येसुध्दा अशातऱ्हेची पध्दत आणली पाहिजे. माझे मित्र सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत रघुवंशी मला म्हणाले की, अशाप्रकारे मतदान झाले तर फार बरे होईल. अनेक लोकप्रतिनिधींची अशी इच्छा आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ज्यांच्या हातात सत्ता एकटवली आहे असे कुणीह असतील, त्याच्या जोरावर मग त्यामध्ये अपक्षाचा गट असेल किंवा अन्य पक्ष असेल त्याचा वापर करुन निवडणुका होतात. तेव्हा हे सर्व पाहिल्यानंतर जो शिफारस करणारा प्रस्ताव आलेला आहे तो अत्यंत महत्वाचा आहे असे मी समजतो. अर्थात पक्षाने कोणत्या उमेदवारास तिकिट द्यावे हे त्या-त्या पक्षाच्या नेत्यांवरच प्रमुखावर अवलंबून आहे. त्यांनी शक्यतो वरील सर्व बाबींचा विचार करावा ही अपेक्षा आहे.

यानंतर श्री.पुरी..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार....

याठिकाणी माननीय बाळासाहेब भारदे यांनी जे म्हटले त्याची मला पुन्हा एकदा आठवण करुन द्यावीशी वाटते. ते म्हणाले की, लोकशाहीमध्ये आता असे झाले आहे की, गुंडगिरीच्या प्रभावामुळे, जाती-जातीच्या प्रभावांमुळे, पैशांच्या प्रभावामुळे सज्जन गुहेमध्ये आणि गुंड-दूर्जन गडावर पोहचले आहेत. अशा प्रकारची अवस्था या सगळया बाजारात झाली आहे. याठिकाणी मघाशी घोडेबाजार असा उल्लेख झाला. याठिकाणी मी घोडयांचा उल्लेख करणार नाही. कारण, माणसांपेक्षा प्राणी खूप प्रामाणिक असतात. त्यामुळे या सर्व गोष्टींना पायबंद घालण्याकरिता हा जो ठराव याठिकाणी आलेला आहे तो एकमताने या सभागृहातून पास होऊन जाईल, असे मला वाटते. मी परत एकदा शासनाचे अभिनंदन करतो की, शासनाने अतिशय चांगल्या प्रकारचा ठराव याठिकाणी आणला आहे.

धन्यवाद !

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांचा ठराव याठिकाणी माननीय नगरविकास राज्यमंत्री श्री.राजेश टोपे यांनी वाचला, त्यावर आपले भाष्यही त्यांनी केले. फार चांगले झाले की, प्रत्यक्ष राज्यकर्त्या पक्षालाच हा ठराव या सदनामध्ये आणावा लागला. यापूर्वीच अशा प्रकारचा ठराव सदनामध्ये येण्याची आवश्यकता होती. परंतु याठिकाणी उशिरा का होईना हा ठराव सभागृहात आला त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, आत्ताच ज्या विधान परिषदेच्या निवडणुका झाल्या त्या निवडणुकांचा प्रश्नसमोर माझ्यासमोर आहे. विधान परिषदेला कालिमा लागावी अशी निवडणूक नुकतीचे होऊन गेली. ज्या पध्दतीने ही निवडणूक झाली, त्या पध्दतीबद्दल आक्षेप घेण्यासारखीच ती झाली. लोकशाहीच्या राजकारणामध्ये पक्षादेश हा अतिशय महत्वाचा मानला जातो. पक्षादेश अमान्य करणाऱ्या माणसांसाठीसुध्दा कायद्यामध्ये तरतूद आहे. असे असतानाही सत्तेचा गैरवापर करुन पक्षादेश मोडणाऱ्यांची प्रवृत्ती जास्त वाढीस लागली आहे आणि दुर्दैवाने त्याला प्रोत्साहन दिले जाते, ही अतिशय भयानक गोष्ट असून ती सहन केली जात आहे. आताच माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर साहेबांचे व माननीय श्री.उल्हास पवार साहेबांचे भाषण मी काळजीपूर्वक ऐकले. आपण उल्लेख करताना सन 1952 पर्यंत मागे गेलात. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला जी घटना दिली आणि ज्या घटनेच्या तरतुदींची आपण चर्चा केली. त्या घटनेच्या विरोधात कृत्य करण्यात धन्यता मानणाऱ्या प्रवृत्ती या देशामध्ये वाढत असून त्याचे कौतुक होत चालले आहे. सगळयात मोठे दु:ख कुठले असेल तर ते अशा सगळया गोष्टींना प्रिंट मिडिया व इलेक्ट्रॉनिक मिडियांकडून फारच प्रतिष्ठा मिळत चालली आहे. या सगळया घटनांना उचलून धरले जात असून त्याचे कौतुक होत आहे. आज समाजामध्ये कायदा मोडणाऱ्या प्रवृत्तींचे कौतुक होत आहे. याबाबतीत असे मानायला हरकत नाही की, आता लोकशाहीचा पराभव होण्याची प्रक्रिया सुरु झाली आहे. तशा प्रकारची आपल्या देशामध्ये आज परिस्थिती निर्माण झाली आहे. याबाबतीत माझी स्वत:ची अशी अपेक्षा होती की, अशा पध्दतीने विधान परिषदेची निवडणूक झाल्यानंतर त्या पध्दतीबाबतीत चर्चा होईल व कुठे तरी या बाबीवर बोट ठेवले जाईल व हे कसे झाले ? याबाबतीत विचार होईल, असे मला वाटते होते. परंतु

..3.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार...

याबाबतीत कुठल्याही प्रकारचा विचार झाला नाही. शिवसेनेची 14 मते फुटली, ताबडतोब ही बाब मिडियाने उचलून धरली. यामध्ये योग असा की, याबाबतचे सौभाग्य सत्तारुढ काँग्रेस पक्षाला, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला व इतर पक्षांनाही लाभले.

नंतर श्री.रोझेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार........

त्यामुळे आता कुणी अपवाद राहिलेला नाही. 'घोडाबाजार' या शब्दाविषयी सन्माननीय सदस्य, श्री.उल्हास पवार यांनी उल्लेख केला, मी त्यांच्या मताशी सहमत आहे. अशा इमानी प्राण्यावर अन्याय करणा-या शब्दासंदर्भात सन्माननीय ज्येष्ठ सदस्य, श्री.प्रमोद नवलकर यांनी हरकत घेतली, त्याविषयीही मी सहमत आहे. घोडयासारखा इमानी प्राणी नाही. परंतु, त्याचा बाजार करणारे जे बेईमानी लोक असतात, हे लोक कोण ? याचा शोध घेण्याची आवश्यकता आहे. या सदनामध्ये असतील, विधानसभेमध्ये असतील. आपल्यातील कोणी आहेत काय ? याचा शोध घेण्याची आवश्यकता आहे. हा शोध घेण्यासाठी एक चौकशी समिती नेमावी लागेल. चौकशी समिती नेमली की, घोडयांना बदनाम करणारी ही माणसे कोण आहेत हे समजू शकेल. गुन्हा करणा-यापेक्षा गुन्हा करण्यास प्रवृत्त करणारा हा खरा गुन्हेगार ठरतो. आणि याच दृष्टीकोनातून त्या प्रसंगाकडे पाहण्याची गरज आहे. आमची 14 मते फुटली. कशी फुटली ? त्याला कोण जबाबदार आहे ? याचीही चौकशी होण्याची आवश्यकता आहे. या दृष्टीने घोडाबाजार कोणी घडवून आणला ? या पवित्र सदनामध्ये लोकशाहीचे नाव घेऊन, त्याबद्दल निष्ठा दाखवून, विश्वास दाखवून गळा घोटण्याचे काम केले जाते, हा लोकशाहीचा एका अर्थाने पराभव आहे. म्हणूनच यासंदर्भात आपण उपाययोजना काय करणार आहोत ? ही उपाययोजना अर्थातच भविष्यकाळात असा प्रसंग घडू नये यासाठी असेल. परंतु, यापूर्वी जे घडले त्याचे काय ? त्याला कोण जबाबदार होते ? त्यांचा शोध कोण घेणार आहे ? कसा घेणार आहे ? ही घटना घडली नसती तर कदाचित हा प्रस्ताव सभागृहात आला नसता. असे काही तरी पुन्हा घडेल, यातून हा प्रस्ताव आलेला आहे. भविष्यकाळात असा धोका कुठल्याही पक्षाला होऊ नये यादृष्टीकोनातून हा प्रस्ताव मांडलेला आहे. भविष्यकाळामध्ये धोका होऊ नये म्हणून प्रतिबंधात्मक उपाययोजना यादृष्टीने हा प्रस्ताव आलेला आहे. ज्याप्रमाणे पूर येईल म्हणून प्रतिबंधात्मक कार्यवाही केली जाते त्याप्रमाणे ही उपाययोजना केलेली आहे. 26, 27 व 28 जुलै, 2005 रोजी महाराष्ट्रात आणि मुख्यत: मुंबईमध्ये एवढा भयानक पाऊस पडला की, मुंबई आणि महाराष्ट्र धोक्यात आला. त्यामुळे यावर्षासाठी उपाययोजना केली गेली व त्याचा जरुर उपयोग झाला आहे हे या पावसाळयात आपण पहातो आहोत. काल संध्याकाळी मी जेंव्हा माझ्या भागाची पाहणी केली तेंव्हा लक्षात आले की,

..2.........

श्री.मधुकर सरपोतदार...........

रस्त्यांवर दुपारी 4 वाजता जे पाणी साचले होते ते काही वेळातच वाहून गेले. गेल्यावर्षी 28 तारखेला रात्री उशिराने पाण्याची पातळी खाली येण्यास सुरुवात झाली होती. परंतु काल पाण्याची पातळी दुपारी 4 नंतर 2 तासामध्ये खाली आली. हे कसे झाले ? त्याचे कारण असे आहे की, प्रिव्हेंटिव्ह ॲक्शन घेतली गेली. महापालिकेने प्रतिबंधात्मक उपाययोजना केली होती. पाणी रस्त्यांवर साचले त्याला मूळ कारण ज्या योजना सुरु करण्यात आल्या आहेत त्या आहेत. मुंबई सुंदर झाली पाहिजे हे आम्हीही मान्य करतो. त्यासाठी नवनवीन प्रकल्प होण्याची आवश्यकता आहे कारण मुंबईची ती गरज आहे, हेही आम्ही मान्य करतो. परंतु, मुंबईचे जनजीवन विस्कळीत होणार नाही, उद्ध्वस्त होणार नाही याची काळजी घेण्याची आवश्यकता आहे. कारण आपण मुंबईचा कारभार थांबावा म्हणून या योजना राबवित नाही तर आहे तो कारभार चालू ठेवून योजना राबविल्या गेल्या पाहिजेत. यादृष्टीकोनातून जी काळजी एमएमआरडीओ घ्यावयास हवी होती ती घेतलीच नाही. मुंबई महानगरपालिकेने जी उपाययोजना केली त्यामुळे काल तरी मोठया प्रमाणावर पाणी साचले नाही. अजून पाऊस सुरु आहे, पुढे काय होते ते पहायचे आहे. "First cause and then consequence" अशा स्वरुपाची मी आपल्याला एक विनंती करणार आहे. सभापती महोदय, आपण या सदनाचे आदरयुक्त सभापती आहात. माझी आपल्याला विनंती आहे की, गेल्यावेळी विधान परिषद निवडणूक ज्या पध्दतीने झाली, त्या पध्दतीची चौकशी करण्याची आवश्यकता आहे. कारण, ते आपल्या सदनामध्ये घडले आहे. ही घडविणारी यंत्रणा मग ती कॅाँग्रेसची असेल, राष्ट्रवादी कॅाँग्रेसची असेल, शिवसेना-भाजपाची असेल, कोणाचीही असेल, ज्यांनी दगाफटका केला, या निवडणुकीव्दारे अनिष्ट प्रथा संपूर्ण लोकशाही प्रक्रियेमध्ये निर्माण केली गेली त्याचा शोध लावून त्यांना या सदनामधून तडीपार करण्याची आवश्यकता आहे. नाही तर ही प्रवृत्ती बळावत जाईल.

यानंतर श्री.बोरले...........

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार ..............

यादृष्टीकोनातून हा ठराव करुन भागणार नाही. जो गुन्हा घडलेला आहे त्याचा शोध घेतला पाहिजे. आपण कायदे तयार करतो. परंतु त्याच्या पळवाटा आधीच तयार असतात. माझ्या मनामध्ये संदेह आहे की, भविष्य काळामध्ये यातून काही तरी मार्ग निघेल आणि या पक्षाचे उमेदवार, त्या पक्षाचे उमेदवार काळया बाजारातून आणलेले पैसे, बिल्डरांकडून आणलेले पैसे किंवा अन्य कोणत्या तरी माध्यमातून आणलेल्या पैशांचे वाटप करुन एका मताची 50 लाख रुपये किंमत मोजून जी मते फोडली गेली त्याचा शोध घेण्याची आवश्यकता आहे. सभापती महोदय, मला दु:ख वाटते. आपण या सभागृहाला वरिष्ठ सभागृह मानतो. येथे येणारी माणसे चांगल्या पात्रतेची असावी अशी आमची अपेक्षा आहे आणि ती अपेक्षा प्रत्येक सदस्याची आहे, जनतेची आहे. ज्यावेळी आम्ही वैधानिक विचार करतो त्यावेळी त्यांची सुध्दा हीच अपेक्षा आहे. येथे येणा-या माणसांमधील किती गुन्हेगार आहेत, यामध्ये किती सत्यता आहे, असत्य किती आहे हे बघण्याचे काम निवडणूक आयोगाचे आहे. सुदैवाने ही यंत्रणा आपल्या अधिपत्याखाली होती आणि त्या अधिपत्याखाली हा कारभार केलेला आहे, हे प्रकरण असेच सोडावे असे मला वाटत नाही. या प्रकरणाकडे लक्ष द्यावे आणि यामध्ये सुधारणा करावी आणि जे प्रकार घडलेले आहेत ते प्रकार करणारे कोणीही असो त्यांना शिक्षा व्हावयास पाहिजे असे मी माझे आणि माझ्या पक्षाचे मत नोंदवितो. सभापती महोदय, याची गंभीरपणे दखल घेतली गेली पाहिजे. या ठरावाचे मी सुरुवातीलाच स्वागत केलेले आहे. या ठरावामुळे अपप्रवृत्तींना पायबंद बसेल. अपप्रवृत्तीमुळे हा ठराव आलेला आहे असे मी मघाशी म्हटले आहे. आज गरज म्हणून आपण हा ठराव आणलेला आहे. ज्यावेळी बोटीमध्ये आपण एकत्र प्रवास करतो त्यावेळी पाणी वर येत आहे याची जाणीव प्रत्येक पक्षाला झाली म्हणून हा ठराव आलेला आहे. एकाच पक्षाची मते फुटली असती तर लोकांनी बाहेर रंगाची उधळण करुन होळी साजरी केली असती. जो प्रकार घडलेला आहे तो लोकशाहीला मारक आहे, तारक नाही. लोकशाहीचे संवर्धन करणे, लोकशाचे संरक्षण करणे, लोकशाही जास्तीत जास्त मजबूत करणे हा त्या मागील प्रधान हेतू आहे. जगामध्ये लोकशाहीचे आकुंचन होत आहे, ते कशा प्रकारे थांबविता येईल हे आपण या ठरावातून स्पष्ट करीत आहोत. हा ठराव मंजूर व्हावा अशी आमची इच्छा आहे. जास्तीत जास्त लवकर या प्रस्तावाला राष्ट्रपतींची, लोकसभेची आणि निवडणूक आयोगाची

...2/-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ MAP/ KGS/ प्रथम श्री.रोझेकर ...... 13:35

श्री.मधुकर सरपोतदार .............

मान्यता मिळून ही प्रक्रिया सुधारली जावी अशी आमची इच्छा आहे आणि त्यादृष्टीने पावले पडावीत अशी मी अपेक्षा व्यक्त करतो आणि ज्या मागणीचा मी उल्लेख केला त्याचा पाठपुरावा व्हावा अशी इच्छा व्यक्त करुन माझे दोन शब्द संपवितो.

----------

यानंतर श्री.सुंबरे ..........

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरूनाथ कुलकर्णी (नामनियुक्त) : सभापती महोदय, माननीय नगरविकास राज्यमंत्री श्री.राजेश टोपे यांनी लोकप्रतिनिधी कायद्यामध्ये बदल सुचविणारा जो ठराव सभागृहामध्ये मांडलेला आहे त्याचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे. सभापती महोदय, स्व.राजीव गांधी जेव्हा देशाचे पंतप्रधान होते त्यावेळी पहिल्या प्रथम या कायद्यात बदल करण्यात आला. एका रात्रीमध्ये सरकारे बदलायची, लोकप्रतिनिधी एका रात्रीत विकले जायचे आणि दुसऱ्या दिवशी मंत्री बनत होते. विशेषत: उत्तर भारतातील जी सरकारे होती ती अशा प्रकारे कोसळत होती. त्याला प्रतिबंध करण्यासाठी पहिल्या प्रथम लोकप्रतिनिधी कायदा 1951 मध्ये बदल करण्यात आला आणि जरी त्या ठिकाणी डिफेक्शन होणार असले तरी ते एक तृतियांश असले पाहिजे असे झाले तरच एका गटाला दुसऱ्या पक्षामध्ये जाता येईल आणि त्याला कायद्याची मान्यता मिळेल अशा प्रकारचा हा बदल कायद्यात तेव्हा करण्यात आला होता. ज्याचा उल्लेख भाऊसाहेबांनी केला. 2003 मध्ये पुन्हा या लोकप्रतिनिधी कायद्यात बदल करण्यात आला आणि त्या अंतर्गत राज्यसभेच्या ज्या निवडणुका होतात त्यामध्ये एक प्रकारे बाजार मांडला गेला होता. कोणीही उठावे, ज्याच्याकडे पैसा आहे, धनदौलत आहे, ज्याचा राजकारणाशी, समाजकारणाशी संबंध नाही अशी मंडळीही यासाठी पैशाच्या थैल्या सोडतात. मोठमोठे बिल्डर्स, कारखानदार असतील ते मग अशा प्रकारातून तेथे जात असतात म्हणून 2003 मध्ये सन्माननीय श्री.अटलबिहारी बाजपेयी हे या देशाचे पंतप्रधान होते त्यावेळी लोकप्रतिनिधी कायद्यात बदल करण्यात आला. राज्यसभेच्या निवडणुका होत असताना त्यामध्ये स्पष्टपणा आणि पारदर्शकता असली पाहिजे यासाठी कायद्यात हा बदल करण्यात आला. आपण महाराष्ट्रात पाहिले, त्या कायद्याची अमलबजावणी राज्यात करू शकलो नाही. कारण राज्यसभेच्या निवडणुका होत असताना राज्यात जे संख्याबळ आहे त्या आधारे तेथे पाठविण्याचे संख्याबळ निश्चित केले जात होते. महाराष्ट्रात त्या अनुषंगाने राज्यसभेसाठी ज्या निवडणुका नुकत्याच झाल्या त्यामध्ये जे विधानसभेचे सदस्य होते त्यांना त्यांच्या त्यांच्या पक्षाने जे आदेश दिले होते त्याप्रमाणेच मतदान करावे लागले. त्यामुळे कोठल्याही पक्षाचा सदस्य असला आणि त्याची लॉयल्टी कोठेही असली तरी प्रत्यक्ष मतदान करीत असताना मात्र त्याला आपण करीत असलेले मतदान दाखवावे लागले आणि पक्षाचा जो काही व्हीप असेल तो त्या मंडळींनाही लागू पडला, मानावा लागला. सभापती महोदय, मघाशी सांगितले गेले की, हा जो ठराव येथे आणला गेला आहे

..... यू 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कुलकर्णी .....

तो आणण्यामध्ये उशीर झालेला आहे. त्याचेही कारण आहे. गेल्या निवडणुकांमध्ये आपण पाहिले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या दरम्यान झाल्या. त्या निमित्ताने मी एका जिल्ह्यात गेलो होतो. तेथील नगरपरिषदेमध्ये गेलो होतो. तेथे 22 मतदार होते, म्हणजे नगराध्यक्षासह 22 नगरसेवक होते. त्यांनी मला सांगितले की, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस, बीजेपी तसेच अपक्ष अशा पक्षांचे आम्ही सदस्य आहोत परंतु आता येथे आम्ही एकत्रित आहोत. तर मग आम्ही काय करावे ? त्यांच्या प्रश्नाचे उत्तर मी लगेच देऊ शकलो नाही. विचारून सांगतो एवढेच मी त्यांना सांगितले. नंतर मी त्यांना सांगितले की, विधान परिषदेच्या निवडणुका होणार आहेत तुम्ही सारे तयारीत रहा व मतदान करा. कोकणामध्ये श्री.भास्कर जाधव हे आमच्या पक्षाचे उमेदवार म्हणून होते. दुसऱ्या पक्षाचा माणूस आणावयाचा असेल तर त्याला आणताना काही देवाणघेवाण झाली तर मी समजू शकतो. परंतु एखाद्या माणसाला पक्षाने जिल्हा परिषदेसाठी, महापालिकेसाठी वा अन्य कोठल्याही निवडणुकीत तिकीट दिले, त्याच्यासाठी प्रचार केला, निधी उपलब्ध करून दिल्या नंतरही ही मंडळी तेथे मतदान करताना आमचा मानमरातब राखला गेला नाही म्हणून दुसरेच काही म्हणू लागली तर ते बरोबर नाही. हे आपण विधान परिषदेच्या निवडणुकीत पाहिले आहे. एखादा कोटा निश्चित केल्यानंतरही पक्षांतर्गत दरोडे पाडले आणि या निवडणुकीत मग जो काही फार्स झाला तो साऱ्या देशाने पाहिला आहे, तो अतिशय निंदनीय आहे. ...

( यानंतर श्री. सरफरे ..... व्ही 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी...

आणि म्हणून हा कायदा 2003 मध्ये कां आला नाही? याचे कारण असे की, ज्यावेळी 2003 मध्ये लोकसभेमध्ये हा कायदा आणण्याचा निर्णय घेण्यात आला, दुरुस्ती करण्यात आली त्यावेळी देशाच्या 5-6 राज्यांमध्ये विधानपरिषद अस्तित्वात होती. त्यावेळी जम्मू काश्मीर,उत्तर प्रदेश, बिहार, महाराष्ट्र, कर्नाटक मध्ये विधानपरिषद अस्तित्वात होती. आता आंध्र प्रदेश व तामिळनाडूमध्ये त्या दिशेने सुरुवात होत आहे. त्यामुळे देशाच्या अनेक राज्यांमध्ये विधानपरिषद नसल्यामुळे एकत्रितपणे हा कायदा येऊ शकलेला नाही. आज त्याची सुरुवात पहिल्या प्रथम आपण करीत आहोत. यामध्ये राज्यसभेच्या निवडणुकीकरीता जी तरतूद होती त्याप्रमाणे विधानसभेच्या सदस्यांव्दारे विधानपरिषदेवर निवडून द्यावयाच्या आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सभासदांव्दारे निवडून द्यावयाच्या सदस्यांकरीता घ्यावा लागणाऱ्या निवडणुकीच्या संदर्भात कायद्यामध्ये सुधारणा करण्यासाठी आपण हा ठराव आणीत आहोत. या ठरावाला माझ्या वतीने आणि माझ्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या वतीने अनुमोदन देतो व समर्थन करतो.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रमोद नवलकर (मुंबई पदवीधर) : सभापती महोदय, आज स्पष्टपणे बोलावयाचे झाले तर या विधानमंडळाच्या इतिहासातील हा काळाकुट्ट असा दिवस आहे असे या दिवसाचे वर्णन करावे लागेल. हा जो ठराव आपल्यासमोर आला आहे, त्याकडे चहूबाजूंनी पाहिल्यानंतर, आपण किती दांभिक आहोत? हा ठराव आणण्याची गरज काय? हा ठराव म्हणजे आपला कबूलीजबाब आहे की, आम्हाला आता सद्सद्विवेकबुध्दी राहिलेली नाही. कायद्याशिवाय, आमच्या छातीवर बंदूक रोखल्याशिवाय, पाठीवर चाबकाचे फटके मारल्याशिवाय, आम्हाला समजणार नाही आणि आम्ही प्रामाणिकपणे वागणार नाही. ही जबाबदारी प्रत्येक सदस्यांना सांगावी लागणे, यासारखी शोकांतिका नाही. मघाशी मी घोडेबाजार या शब्दाबाबत आक्षेप घेतला. त्याचे कारण असे की, घोडा हा शिवकालीन प्रामाणिक प्राणी असून, आपण आपली त्याच्याशी तुलना करु शकत नाही. म्हणून कृपाकरुन त्या प्राण्याला आपण बदनाम करु नका. आपण खूप बदनाम झालो आहोत, त्या घोडयाला कशासाठी आपण बदनाम करता? मला एका गोष्टीचा उल्लेख केला पाहिजे की, मघाशी माननीय सदस्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा उल्लेख केला. त्यांनी या देशाची घटना लिहिली त्यावेळी एक चूक केली. ती कोणती? त्यांनी या देशातील सर्व नागरिक सज्जन आहेत असे गृहीत धरले. सज्जन फार थोडे राहिले आहेत, दुर्जनांची गर्दी झाली आहे. त्यामुळे त्यांची घटना आता कालबाह्य ठरली आहे. त्यामुळे त्यांच्या घटनेला कोणताही अर्थ राहिलेला नाही. ज्या दिवशी या देशामध्ये पक्षांतरबंदीचा कायदा झाला, त्या दिवशीच हा प्रस्ताव यायला हवा होता. मला माझ्या पक्षाच्या आदेशाविरुध्द मतदान करता येत नाही किंवा पैसे घेऊन मला माझे मत बदलता येत नाही. हे कलम त्यामध्ये अंतर्भूत होते तर मग हा वेगळा कायदा आणि वेगळे कलम या ठरावाव्दारे कशासाठी पाहिजे? मी कोठल्याही आमदाराकडे बोट दाखविणार नाही. प्रत्येक लोकप्रतिनिधींने स्वत:कडे बोट दाखविले पाहिजे व आत्मपरीक्षण केले पाहिजे. विशेषत: आपण ज्या सभागृहामध्ये निवडून येतो ते सभागृह आपले मानीत नाही. मी कोणत्याही एका व्यक्तिविषयी बोलत नाही. बाहेर जो पैशाचा खेळ चालत आहे तो थांबणार आहे की नाही? एक काळ असा होता की, 4-5 हजार रुपये खर्च केल्यानंतर मी निवडणुकीला उभा आहे, मी प्रचंड बहुमतांनी निवडून येतो असे लोकांना कळावयाचे. आता ते दिवस, तो काळ राहिलेला नाही. लाखो - कोटयावधी रुपये बाहेर खर्च केल्याशिवाय आणि जी विशिष्ट ठरलेली मते असतात ज्याला आपण "व्होट बँक" म्हणतो, त्यामध्ये ठेव ठेवल्याशिवाय ती मते आपल्याला मिळत नाहीत. असे होत असतांना दूधावरील साय शुध्द



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रमोद नवलकर...

करण्याचा आपण प्रयत्न करीत असलो तरी दूध यापूर्वीच नासलेले आहे त्याला काय करणार? त्याबद्दल कोणता कायदा करणार? त्यासाठी कोणताही कायदा नाही. याठिकाणी आपल्या चारित्र्याचा प्रश्न असला तरी शेवटी कोणत्याही गोष्टीपर्यंत कोणताही कायदा पोहोचत नाही. निसर्गाचा नियम असा आहे की, कोणतीही गोष्ट हरविली तर ती परत मिळते, परंतु चारित्र्य हरविले तर ते परत मिळत नाही. या देशाचे नेमके तेच झाले आहे. चारित्र्य व्यक्तिसापेक्ष नसते. ते कुटुंब आणि समाज सापेक्ष असते आणि राजकारणामध्ये असते. आपण प्रामाणिकपणे कबूल केले पाहिजे की, आपण ते चारित्र्य हरविले आहे. त्यामुळे एखादा प्रस्ताव आणून हरविलेले चारित्र्य कधीही सापडणार नाही. या प्रश्नामध्ये अनेक मार्ग निघतील, घोडेबाजार करण्यापेक्षा पैश्याने वाटेल तशी माणसे विकत घेतली जातील.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/ पूर्वी श्री.सरफरे... 13:50

श्री.प्रमोद नवलकर (पुढे सुरु...

आणि निवडणुकीच्या अगोदरच आदर्श नेते सांगतात आमच्याकडे एवढे आहेत. माझ्या पक्षाकडे 50 लोक असताना 55 लोक आहेत असे सांगितले जाते याचा अर्थ काय ? माझ्याकडे 10 लोक असताना माझ्याकडे 20 लोक आहेत म्हणून सांगताना मला लाज-शरम वाटत नाही. याचा अर्थ कमरेचे सोडून डोक्याला गुंडाळण्याचा प्रकार आहे. आम्ही मोठमोठ्या गप्पा मारतो. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार साहेबांशी गप्पा मारताना मी म्हणालो की, जेलमधील गुन्हेगार आहेत, त्यांनी गुन्हेगारीबाबत प्रस्ताव करण्यासारखा हा प्रकार आहे, असाच अर्थ यातून दिसतो. मी जो घोडेबाजार म्हणतो तो घोडेबाजार सभागृहाच्या बाहेर कोण चालविते ? प्रत्येक आमदाराची किंमत ठरते,प्रत्येक मताची किंमत ठरते याची लाज वाटते, याचा कधी निषेध केला जात नाही, कधी सभात्याग केला जात नाही. धोरणामध्ये बदल करुन, चार ओळीचा प्रस्ताव आणून हरविलेली माणुसकी माणसामध्ये येईल असे वाटते काय ? ही स्वत:ची फसवणूक आहे. हा दांभिकपणा आहे. विशेषत: आपणच आपल्याला ओळखलेले नाही. आपणही सभ्यपणाचा बुरखा पांघरुन फिरतो. सभ्यपणाचा बुरखा निर्लज्जपणे आपण फाडून टाकलेला आहे. दांभिकतेचा ठराव आणलेला आहे. हा ठराव कोणी आणला, का आणला त्याचे समर्थन काय करणार आहोत ? आपल्याकडे इमान राखली जाणारी माणसे पैशाने विकली जाणार असतील व जर डोळ्यांना पट्टी लावून असा गुन्हा करत असतील, तर त्याला प्रतिबंध केला पाहिजे. हा बाजार बंदच झाला पाहिजे. आज जनावरांएवढीही किंमत राहिलेली नाही. या ठरावाला विरोध करता येत नाही परंतु या ठरावाच्याबाबतीत मी माझ्या भावना व्यक्त करतो आणि ठरावाचा निषेध करुन त्याला पाठिंबा देतो. सगळ्या गोष्टी सापडतील, परत मिळतील परंतु चारित्र्य हरवले तर ते परत मिळत नाही, एवढे बोलून माझे दोन शब्द संपवितो. धन्यवाद.

--

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

2...

SKK/ MAP/ KGS/

प्रा.जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, जो शासकीय ठराव आलेला आहे त्या ठरावाला समर्थन देण्यासाठी आणि शासनाचे अभिनदन करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, आमच्या देशाने संसदीय लोकशाही स्वीकारलेली आहे. संसदीय लोकशाहीच्या मंदिरामध्ये ज्यांनी स्वप्न पाहिलेले होते, त्या डॉ.बाबासाहेबांच्या राज्य घटनेचा सर्वजण वारंवार अत्यंत कृतज्ञतापूर्वक उल्लेख करतात. हा उल्लेख करताना संसदीय लोकशाही आपण स्वीकारली. पण दुर्दैवाने सुरुवातीचा काळ सोडला तर त्यानंतरच्या काळामध्ये संसदीय लोकशाहीच्या मंदिराचा ताबा भ्रष्टाचाररुपी राक्षसांनी घेतला की काय, असे वाटायला लागते. जीवनातील कोणतेही क्षेत्र शिल्लक नाही की ज्या ठिकाणी मानवी मूल्यांचे पैशाने माजमाप केले जात नाही, ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. म्हणून आदरणीय सन्माननीय सदस्य श्री. प्रमोद नवलकर साहेबांनी दु:ख व्यक्त केले की, सर्व गोष्टी हरविल्या तर सापडू शकतात, पण चारित्र्य हरविले तर ते पुन्हा सापडत नाही, ते कायमचे हरवून जाते. या त्यांच्या भावनेशी आम्ही सर्वजण सहमत आहोत. हा दांभिकपणा किती दिवस सार्वजनिक जीवनामध्ये आपण ठेवणार आहोत ? आमच्या वैयक्तिक जीवनामध्ये, आमच्या सामाजिक जीवनामध्ये, राजकीय जीवनामध्ये, सर्व प्रकारच्या व्यवहारामध्ये दांभिकपणा किती काळ रहाणार आहे ? तो दूर होणार आहे की, नाही हा महत्वाचा प्रश्न आहे.

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे .....

मोठ्यांचा आदर्श खालची मंडळी घेत असतात. पाणी कधी खालून वर जात नसते. पाणी वरुन खाली झिरपत असते. आदर्शाचे देखील असेच असते. मोठ्यांचे अनुकरण छोटे करीत असतात. मोठे चांगले असले तर खालचे लोक त्यांचे चांगले अनुकरण करतात. मोठे जर अवगुणी असतील तर त्यांच्या अवगुणांचे अनुकरण करण्याची प्रथा अलीकडे सुरु झालेली आहे. ही प्रथा कोठे तरी थांबवली पाहिजे. विधानसभेकडून राज्यसभेमध्ये जे प्रतिनिधी निवडून जातात तसेच स्थानिक स्वराज्य संस्था आणि विधानसभेतून विधान परिषदेमध्ये जे सदस्य निवडून द्यावयाचे असतात त्यांच्या निवडीमध्ये पारदर्शकता यावी, घोडेबाजार या शब्दाला सर्वांचा आक्षेप आहे परंतु त्यामध्ये जो काळाबाजार होतो, जो पैशाचा व्यवहार होतो, सदस्यांची जी किंमत लावली जाते, जे सदस्य स्वत:ला विकण्यास तयार असतात ते थांबविले पाहिजे. जेव्हा लोक स्वत:ला विकण्यास तयार असतात तेव्हा बाजारामध्ये खरेदी करणाऱ्यांची संख्या वाढत असते. म्हणून आम्ही याबाबत ठरविले पाहिजे. आम्ही स्वत:ला विकणार आहोत काय ? तुम्ही स्वत:ला विकणार असाल तर बाजारामध्ये तुमची किंमत लावणारे, तुम्हाला विकत घेणारे अनेक लोक सापडतील. मुळात असा प्रश्न येतो की, आम्ही स्वत:ची मोरॅलिटी, स्वत:ची नीतिमत्ता, स्वत:ची नैतिकता, स्वत:चे चारित्र्य विकणार आहोत काय ? हा प्रश्न या ठरावाच्या माध्यमातून निर्माण होतो. खरे म्हणजे आतापर्यंत लोकप्रतिनिधींचे जे अवमूल्यन झाले ते झाले पण यापुढे लोकप्रतिनिधींचे अवमूल्यन होता कामा नये. लोकप्रतिनिधींबद्दल सर्वसामान्य समाजामध्ये, जनतेमध्ये विश्वासाचे वातावरण निर्माण व्हावे, यामध्ये पारदर्शकता यावी या दृष्टीकोनातून हा जो ठराव मांडण्यात आलेला आहे तो अत्यंत महत्वाचा आहे. स्वातंत्र्य, समानता, बंधुभाव आणि न्याय हे आपल्या राज्यघटनेचे, आपल्या लोकशाहीचे आधारस्तंभ आहेत. परंतु असे दिसून येते की, ज्यांचासमानतेशी संबंध नाही, ज्यांचा विषमतेवर विश्वास आहे, जे लोक स्वातंत्र्याऐवजी धनशक्तीचा बळावर या देशातील गोरगरीब जनतेला, मजुरांना गुलाम करण्याचे स्वप्न बघतात, जे बंधुभावाच्या नावावर सामाजिक तिरस्कार निर्माण करतात, जे न्यायाच्या नावावर सतत अन्याय करीत असतात अशांच्या बाबतीत मग विधान परिषद असेल किंवा राज्यसभा असेल त्या ठिकाणी निवडून देण्याचे प्रकार काल आणि आजपर्यंत होत आले आहेत. हे प्रकार या माध्यमातून थांबावेत अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. सभापती महोदय, खरे पाहिले तर पक्षांतरबंदीचा

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM/

प्रा. जोगेंद्र कवाडे ......

कायदा आहे. एक तर पक्षांतरबंदीचा कायदा करावयाचा आणि त्यामध्ये उंदराच्या बिळासारख्या पळवाटा ठेवावयाच्या अशी परिस्थिती आहे. सन्माननीय सदस्य श्री. प्रमोद नवलकर यांनी दांभिकता असा शब्द वापरला. आपण किती दांभिक आहोत ? कायदा करताना दांभिकतेच्या स्वरुपामध्ये करतो. ज्यांनी पक्षाचा आदेश मानला नाही त्या पक्षाने त्या आमदारांना, खासदारांना बरखास्त केले पाहिजे. त्या कायद्यामध्ये एकतृतियांश, दोनतृतियांश, एकपंचमांश असे नियम लावतो. अशी थातुरमातुर नाटके बंद झाली पाहिजेत. ताकाला जाताना भांडे लपविण्याची गरज नाही असे सांगण्याची गरज निर्माण झाली आहे. पक्षाचा जो आदेश असेल त्याचे पालन करणे एवढेच सदस्याचे काम असते. जे अपक्ष सदस्य असतील त्यांची गोष्ट वेगळी आहे. अपक्षांबद्दल आपल्याला बोलता येत नाही. परंतु जे पक्षाचे सदस्य आहेत त्यांच्याबद्दल सदसदविवेक बुध्दीचा वापर न करता पक्षाच्या बुध्दीचा वापर करुन, पक्षाच्या आदेशाचा वापर करुन, पक्षाच्या शिस्तीचा वापर करुन विचार करण्याची आवश्यकता आहे. या ठरावाचे समर्थन करीत असताना मी सांगू इच्छितो की, उशिरा का होईना पण आमच्या लोकप्रतिनिधींचे, आमच्या लोकशाहीचे जे अवमूल्यन सुरु आहे ते थांबविण्याच्या दृष्टीकोनातून या ठरावाचा, या दुरुस्तीचा काही तरी फायदा व्हावा आणि जनतेमध्ये चांगला संदेश जावा की, कालपर्यंत जे झाले ते झाले पण यापुढे आमचा देश, आमचे राज्य ही बाब खपवून घेणार नाही, असा संदेश, असा संकेत या ठरावाच्या माध्यमातून देशामध्ये आणि राज्यामध्ये जावा अशी मी अपेक्षा व्यक्त करतो आणि पुन्हा एकदा या ठरावाचे समर्थन करतो, सरकारचे अभिनंदन करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

------

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MHM/ पूर्वी श्री. बरवड 14:00

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, महाराष्ट्र विधानपरिषद नियम 106 अन्वये जो शासकीय ठराव याठिकाणी मांडण्यात आलेला आहे त्यावर माझे विचार मी थोडक्यात मांडणार आहे.

सभापती महोदय, देशाच्या अनेक राज्यांच्या विधिमंडळामध्ये जे घडू शकत नाही ते महाराष्ट्राच्या विधिमंडळामध्ये पहिल्यांदाच घडताना दिसले आहे. या प्रती लोकप्रतिनिधी आपल्या भावना व्यक्त करताना दिसतात. या ठरावावर तासनतास बोलण्याची कुणाचीही इच्छा नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या घटनेचा अवमान करणारे आणि घटना पायदळी तुडवून शपथ घेऊन या सभागृहामध्ये येणा-या लोकप्रतिनिधींच्या संदर्भात आत्मचिंतन करायला लावणारा असा हा ठराव आहे. सभापती महोदय, आपण ज्या संस्कारातून आलात, ज्या प्रेरणेतून आलात आणि या लोकशाही परंपरे बद्दल जो काही दृढ विश्वास आपल्या मनात आहे तो पाहता अशा प्रकारे निवडून येणा-या सदस्यांना शपथ देताना आपणाला किती यातना होत असतील याची मला कल्पना आहे. परंतु काही कर्तव्ये ही नाईलाजाने आणि व्यथित अंतकरणाने करावी लागतात. हा ठराव आताच का आला ? हा ठराव यापूर्वीच यावयास पाहिजे होता. मी थोडासा मागे जातो. राज्यसभेवर उमेदवार निवडून देत असताना ज्यांच्या पाठिमागे एकही आमदार नाही आणि ज्याला एकाही आमदाराचे समर्थन मिळालेले नाही अशा दोघांनी नामांकनपत्र भरले होते. ते होते आदरणीय श्री. सुरेश कलमाडी आणि श्री. विजय दर्डा. जेव्हा निकाल लागला त्यावेळी ते प्रथम फेरीतच निवडून आले. त्यांच्या मागे एकही आमदार नव्हता. परंतु आमचे श्री. सतीश प्रधान यांच्यामागे संपूर्ण शिवसेना असून देखील ते जेमतेम अर्ध्या मताने निवडून आले. त्यादिवशी विजयाचा जल्लोष होत होता. तो पाहता बाजार भाव काय असू शकतो त्याची कल्पना आली. आज हा ठराव शासनाने आणलेला आहे. परंतु त्याच वेळी हा ठराव आणावयास पाहिजे होता. जो पर्यन्त माझाच विजय होतोय, माझाच जयजयकार होतोय तोपर्यन्त अशा गोष्टी मला आठवत नाहीत. कालच्या निवडणूकीमध्ये विधानसभेतून 11 उमेदवार विधानपरिषदेवर निवडून देण्यात आले. त्या निवडणुकीमध्ये जो काही प्रकार घडला त्यामूधन हा ठराव याठिकाणी आलेला आहे. निवडणुकीच्या निकालानंतर विधानभवनाच्या पायरीवर अनेक जण होते. त्यामध्ये एक विजयी झालेला चेहरा दु:खी दिसत होता. तो चेहरा होता सन्मानीय सदस्य श्री. गोविंदराव आदिक यांचा. त्यांना याबाबतीत आत्मचिंतन

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते...)

करावयास लावले गेले. माननीय सदस्य श्री. गोविंदराव आदिक यांचे काम मला माहीत आहे. आम्ही ज्याप्रमाणे रात्रंदिवस पक्षाचे काम करतो त्याप्रमाणे तेही काम करतात. ते जेव्हा काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष होते त्यावेळी ते कधी कार्यालयात बसलेले दिसले नाहीत. तर संपूर्ण महाराष्ट्र भर फिरुन आपला पक्ष कसा मोठा होईल, कार्यकर्ता कसा क्रियाशील राहील यासाठी सतत प्रयत्न करीत राहिले. ते जेव्हा पासून राजकारणामध्ये आले तेव्हा पासून त्यांनी आपले सारे आयुष्य पक्षाचे निष्ठेने काम करण्यात घालवलेले आहे. अशा मोठ्या नेतृत्वाचा आदर न करता त्या नेतृत्वालाही हात दाखविण्यात आला. निवडणुकीच्या निकालानंतर ते जेव्हा त्यांच्या घरी गेले त्यावेळी त्यांच्या पत्नीने त्यांना विचारले की, तुमच्या मागे कसला डाग लागलेला आहे ?

...नंतर श्री. भोगले..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MHM/ SBT/ पूर्वी श्री.शिगम 14:05

श्री.दिवाकर रावते............

तेव्हा त्यांना कळले की, या निवडणुकीने आपल्या पार्श्वभागावर कसला तरी काळा डाग निघाला. तेव्हा हा ठराव आला. ही लाजीरवाणी गोष्ट आहे. याचे लोण कुठपर्यंत पोहोचले आहे? मी माझ्‍या पक्षापुरते बोलू शकतो. इतरांबाबत बोलत नाही. तो माझ्या जीवनातील अनुभव आहे. आमचे आदरणीय शिवसेनाप्रमुख, त्यांना व्यक्तिगत काय मिळवायचे असते? 8-8 तास, रात्रीचा दिवस करुन, चार-चार सभा, सकाळचे जेवण दुपारी 4.00 वाजता, संध्याकाळचे जेवण पहाटे 3.00 वाजता, अंगामध्ये शक्ती असो, सामर्थ्य असो वा नसो, तुम्हाला विजयी करण्याकरीता पक्षाचे नेते, कार्यकर्ते रात्रंदिवस झटतात, अन्नपाणी विसरतात, घरदार विसरतात आणि आपला झेंडा विजयी व्हावा, तुम्ही विजयी व्हावे यासाठी रात्रंदिवस राबत असतात. त्यांनी केलेल्या एवढ्या सगळया श्रमातून आपण याठिकाणी बसतो आणि नोटा मोजून घरी जातो. घरी भाग्यलक्ष्मीला काय सांगितले? कसला पैसा आणला. मला अजून ती मानसिकता कळलेली नाही. घरामध्ये त्या नोटांचे स्वागत कसे होते? एवढे विकावू तुम्ही झालात, एवढे सगळे विसरलात? सभापती महोदय, मी सुध्दा माझे घरदार विकून कशासाठी राबतो? याला निवडून आणा, त्याला निवडून आणा सांगितल्यानंतर सगळे विसरुन जातो. आपल्या पक्षाचा माणूस निवडून आल्यानंतर जो आनंद असतो तो अवर्णनीय असतो. कशासाठी तुम्ही हे सगळे केले? सभापती महोदय, ही विधानपरिषद आहे. आम्ही राजकीय पक्षाचे कार्यकर्ते या विधानपरिषदेत येऊन बसल्यानंतर आम्हाला वेगळया जबाबदारीने काम करावे लागते. हे संस्कार तुमच्यासारख्या ज्येष्ठ मंडळीकडून आमच्यावर घडत असतात. आमच्या काही चुका होत असतात, त्या चुका झाल्यानंतर सुधारण्याचा आम्ही प्रयत्न करतो. आमच्याकडून काही कळत-नकळत घडते तेव्हा आम्ही येऊन आपली माफी मागत असतो. हा एक जीवनातील अभ्यास असतो. या सदनामध्ये निवडून आलात. मला आश्चर्य वाटते. काय हो! मला सांगा, राष्ट्रवादी पक्षाचे प्रमुख आमचे आदरणीय श्री.शरद पवार, तुम्ही त्यांच्याबरोबर असलात काय आणि नसलात काय, त्यांच्या राजकीय जीवनामध्ये काहीही फरक पडणार नाही. एवढे सामर्थ्य त्यांनी स्वत:च्या ताकदीवर निर्माण केले आहे. बारामतीमधून कधीही पडणार नाही अशी परिस्थिती त्यांनी निर्माण केली आहे. देशामधील विविध राजकीय पक्षाच्या सामर्थ्यवान मंडळींशी त्यांचा संबंध आहे. केवळ शिवसेना प्रमुखांच्या आशीर्वादाने आम्ही घडलो. तसे त्यांच्या सामर्थ्याने तुम्ही आमदार घडलात, असे असताना त्यांना दिलेला शब्द मोडलात. श्रीमती उषाताई दराडे या

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.......

सभागृहात पुढच्या अधिवेशनात येतील, तेराव्या फेरीत धापा टाकत त्यांना निवडून यावे लागते. त्यांच्या शब्दाला काहीच किंमत नाही का हो? श्री.जामा निवडणुकीला उभे होते. विदर्भातील आहेत. माईनिंग एरियामध्ये काम करतात. मी त्यांना म्हटले, कशासाठी तुम्ही विधानपरिषदेवर येता? त्यांनी माझ्याजवळ असे शब्द उच्चारले, पक्षाचा आदेश आहे म्हणून मी उभा राहिलो. परंतु मला मंत्रीपद दिले तरी मी राज्यात येणार नाही. मला केंद्रामध्ये जायची इच्छा आहे. खासदार व्हायची इच्छा आहे. माझ्या मायनिंग युनियनचे काम केंद्राशी संबंधित आहे. लाखो कामगारांच्या कुटुंबाला आधार देणारी युनियन, तरी सुध्दा ते जामा निवडणुकीला उभे राहिले. ज्यांची प्रतिष्ठा केंद्रात असावी असे त्यांना त्यांच्या कर्तृत्वाने वाटते, त्यांना अप्रतिष्ठित करुन उद्या या सभागृहात शपथविधीसाठी यावे लागेल. जोपर्यंत शिवसेनेची मते फुटतात तोपर्यंत आनंदाच्या उकळया फुटत होत्या त्यांना या निवडणुकीने धडा शिकविला आहे. एक असूरी शक्ती तुम्ही जवळ करता. त्या असूरी शक्तीने सांगितले की, मी पाऊल ठेवीन तेथे राख करीन. हा भस्मासूर तुम्ही महाराष्ट्रात उदयाला घातला आहे. परिणामी आमच्या माथ्यावर पाय ठेवून आमचे भस्म होत होते तोपर्यंत तुम्हाला आनंद वाटत होता......

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते.....

परंतु हाच भस्मासूर जेव्हा तुमच्या डोक्यावर पाय ठेवायला लागला तेव्हा तुम्हाला हा ठराव आणण्याचे सूचले. दिल्लीपर्यंत सर्व पक्षाचे ठरले होते की, अशा प्रकारे ही लोकशाही कलंकित होता कामा नये, खरेदी विक्रीचे व्यवहार होता कामा नयेत, आमदार विकले जातात अशी परिस्थिती निर्माण होता कामा नये. त्यावेळेस सर्व पक्षानेही ठरवले होते की, आपण जेवढयास तेवढेच उमेदवार द्यावयाचे, वर्तमानपत्रातून सुध्दा यासंदर्भात सर्व पक्षाची भूमिका येत होती. परंतु एका भस्मासुराने आग्रह धरला की, मी माझ्या ताकदीवर चौथा उमेदवार निवडून आणीन मला तुमची मते नकोत. यामुळे आमच्या या बांधवाना आनंद झाला. त्यांना वाटू लागले की, हा भस्मासूर आपल्या तीन लोकांना सांभाळून चौथा उमेदवार निवडून आणेल आणि समोरच्याचे वाटोळे करेल आणि आपली संख्या वाढेल. आपण सर्व जाणते आहात. 100 वर्षाच्या काँगेस पक्षाचे तुम्ही पाईक आहात ना? मग तुम्हाला हे कसे आकलन झाले नाही? देशभर पसरलेल्या काँग्रेसला, देशावर राज्य करणा-या काँग्रेसला, ज्या पक्षाला पंडीत जवाहरलाल नेहरुंचा वारसा आहे त्यांना हे समजावयास नको? खरे म्हणजे आमदारापेक्षा खासदाराला महत्व असते. खासदार निवडून आला तर दिल्लीमध्ये वट असते. गल्लीमधील आमदाराला देशाच्या राजकारणात काही महत्व नसते. राष्ट्रवादी पक्षाचे लोक काँग्रेस पक्षाला म्हणत होते की, तुमची खासदारकी आहे त्यामुळे इकडच्या आमदारकीमध्ये पडू नका, तुमचा उमेदवार मागे घ्या. परंतु त्या भस्मासुराच्या असुरी शक्तीला शरण गेलेल्या आमच्या काही ज्येष्ठांना वाटले की, हा भस्मासूर समोरच्यांचा सत्यानाश करतो आहे ना मग ते बरे आहे, आनंद आहे. निकल लागल्यानंतर लक्षात आले की, त्याने आपल्यासहीत सर्वांनाच साफ करुन टाकले, आपल्यासहीत सर्वांच्याच डोक्यावर पाय ठेवले. आज टाच आमच्या डोक्यावर असेल तर आंगठयाची बोटे आता आपल्या पक्षावर आलेली आहेत, आता हा आपलेही वाटोळे करेल म्हणून हा प्रस्ताव या ठिकाणी आलेला आहे. या घोडेबाजाराने मिळवले काय तर खासदारकी गमावली आणि आमदारकी आणली. खालच्या सदनातील कोल्हापूरचे एक अपक्ष आमदार या आमदराकीमुळे बोलते झाले की, त्यांना अटक करण्यासाठी 200 लोक घेऊन मी तिकडे गेलो होतो आणि आता आमदार म्हणून त्यांच्याजवळ बसण्याची पाळी माझ्यावर येत आहे. या ठिकाणी मी जे काही बोलत आहे ते माझ्या मनाचे बोलत नाही तर प्रत्येक उमेदवाराला उभे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

राहतांना आपल्या संपत्तीचे आणि कारवायाचे शपथपत्र लिहून द्यावे लागते. शपथपत्रामध्ये उमेदवाराला लिहून द्यावे लागते की, माझ्यावर 302 कलमाचे आरोप आहेत, खटला चालू आहे. माझ्यावर खुनाचा आरोप आहे व त्यासंदर्भात खटला चालू आहे तरी मला निवडून द्या, मला आमदारकीचे कवच द्या. परंतु ज्याच्या करिता आपली संपूर्ण राजकीय प्रतिष्ठा पणाला लावली , आमच्या कार्यकर्त्याचा झालेल्या खुनाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी आपली सर्व प्रतिष्ठा पणाला लावली त्या गुरुनाथ कुलर्णींवर त्याच्या बाजूला बसण्याची पाळी येईल. अजून या विधानसभेचे तुम्हाला कोणते वैभव हवे आहे? एका भस्मासुराच्या असुरी शक्ती करता एक पक्ष एवढे लोटांगण घालतो, शरण जातो तेव्हा त्याला कोणत्या यातना होत असतील, कशासाठी हे सर्व करीत आहेत . कालपर्यंत जात्यामध्ये असणा-यांना हसत होता आता तुम्हाला सुध्दा सुपातून जात्यात जावे लागत आहे. या पध्दतीमध्ये सर्व भरडले गेले. याचे परिणाम किती गंभीर आहेत हे मी आपल्याला सांगणार आहे. आमदार विकले जातात तर आम्हाला कशाला सांगता असे आता ग्रामपंचायतीचे व पंचायतीचे कार्यकर्ते सांगायला लागले आहेत. तुम्ही देवाण घेवाण करता आणि आम्हाला कशाला थांबविता? कालच एका पंचायत समितीमध्ये पक्षविरोधी मतदान केले म्हणून त्यांची हकालपट्टी करुन मी येथे आलेलो आहे. मस्तवालपणा कोठपर्यंत गेला आहे याचा सुध्दा विचार करण्याची गरज आहे. माननीय सरपोतदार साहेबांनी आणि माननीय नवलकर साहेबांनी सांगितल्या प्रमाणे आता निवडणूक साध्या राहिलेल्या नाहीत. जर एखादा उमेदवार मत मागण्यासाठी गावात गेला तर आमच्या गावाला किती पैसे देता ते सांगा असे लोक बोलायला लागले आहेत.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.........

त्यांनी आम्हाला एक लाख रुपये देण्याचे मान्य केलेले आहे,तुम्ही आम्हाला दीड लाख रुपये देणार आहात काय ? अशाप्रकारचे लोण खालपर्यंत गेलेले आहे. या पध्दतीमुळे सर्वच अगतिक झालेले आहेत. लोकशाही अगतिक झालेली आहे. विधिमंडळाच्या दरवाजावर लोकशाही विवस्त्र होण्याची वेळ आलेली आहे, तेव्हा तिला वस्त्र देण्याची गरज आहे. माननीय राज्यमंत्री श्री.राजेश टोपे यांनी अशाप्रकारचा ठराव आणून लोकशाहीची अब्रू वाचविण्याचे काम केलेले आहे. अशाप्रकारचा ठराव आणल्यामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना एक प्रकारे आदरांजली ठरणार आहे. विधान परिषदेच्या निवडणुकीमध्ये नुकताच जो प्रकार घडला, त्याची जाण असेल तर माझी आपल्यामार्फत माननीय विधानसभा अध्यक्षांना विनंती आहे की, आम्ही गद्दारां विरुध्द रिट पिटीशन दिलेला आहे, त्याबाबत लवकरात लवकर निर्णय देण्यात यावा अशी विनंती करतो आणि या ठरावाला पाठिंबा देऊन माझे दोन शब्द पूरे करतो. जय हिंद ! जय महाराष्ट्र !

-------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव ( रायगड तथा रत्नागिरी तथा सिंधुदुर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, म.वि.प.नियम 106 अन्वये माननीय राज्यमंत्री श्री.राजेश टोपे यांनी जो शासकीय ठराव मांडलेला आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी आणि त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपण सर्वांनी संसदीय लोकशाही प्रणाली स्वीकारली. या लोकशाहीमध्ये चार प्रमुख स्तंभ आहेत. या चार प्रमुख स्तंभामध्ये "लोकप्रतिनिधी" हा एक प्रमुख स्तंभ आहे. या लोकशाहीमध्ये लोकप्रतिनिधीला अनन्य साधारण महत्व आहे.लोकप्रतिनिधीच्या निवड पध्दतीत पारदर्शकता यावी यादृष्टीने या ठरावाद्वारे बंधन घालण्यात येत आहे. विधानसभेतून आणि स्थानिक स्वराज्य संस्थांतून जे उमेदवार विधानपरिषदेवर निवडून जातात, त्या निवड पध्दतीमध्ये होणारे मतदान हे खुल्या पध्दतीने व्हावे, अशा त्या ठरावाचा आशय आहे. माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी सांगितल्याप्रमाणे या ठरावाची व्याप्ती अजून वाढविता आली असती. जिल्हापरिषदेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, जिल्हापरिषदेचे सभापती यांची होणारी निवडणूक आणि त्याही पुढे जाऊन नगरपालिकेचे नगराध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांची होणारी निवडणूक हे विषय देखील या ठरावामध्ये आणता येईल किंवा कसे हे पाहणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, नुकतीच विधानपरिषदेची निवडणूक झाली. त्याबद्दल याठिकाणी काही सन्माननीय सदस्यांनी त्याबद्दल आपले विचार मांडले. गेली 20 वर्षे मी एका राजकीय पक्षामध्ये काम करीत होतो. सभापती महोदय, मी विधानसभेचा 10 वर्षे सदस्य होतो. त्यावेळी गुप्त मतदानाची पध्दत होती. पण आपणास अभिमानाने सांगतो की, माझ्या 10 वर्षाच्या आमदारकीच्या कालावधीत निवडणुकीसाठी उभे राहणारे उमेदवार आमच्याकडे लक्ष ठेवा असे सांगावयास आलेला नाही. कारण आम्ही पक्षाचे आदेश मानणारे आहोत. म्हणून मी याठिकाणी कोणत्याही चर्चेत भाग घेण्याचे धाडस करु शकतो. मी नैतिकता विसरलेलो नाही. किंबहुना माझे आजही ठाम मत आहे की, लोकशाहीमध्ये पक्षाला महत्व दिले पाहिजे. पक्ष प्रमुखाला महत्व दिले पाहिजे. पक्षाच्या निर्णयाला महत्व दिले पाहिजे, हे मानणारा मी कार्यकर्ता आहे.

सभापती महोदय, मी एक आठवण सांगतो. मागे झालेल्या राज्यसभेच्या निवडणुकीच्यावेळी आमच्या पक्षाचा एक उमेदवार उभा राहिला होता. पक्ष सांगेल त्याप्रमाणे काम करणारे माझ्यासारखे कार्यकर्ते होते. त्या उमेदवाराने आम्हाला एक भेट दिली होती.

यानंतर श्री.पुरी......

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव...

ती भेट म्हणजे आमच्या पक्षात प्रसिध्द झालेला "नंदीची उपाधी बैलाला कशाला" हा अग्रलेख. पक्षाचा उमेदवार उभा राहिला तेव्हा त्यांनी काय द्यावयाचे हा भाग वेगळा. त्यांनी अशा प्रकारचा लेख आमच्या रुमवर पाठविला. परंतु नंदी म्हणजे ते आणि बैल म्हणजे आम्ही, अशा प्रकारे त्यांनी आम्हाला संबोधले. त्याबद्दल आम्हाला कमीपणा वाटला नाही. त्यांनी आम्हाला कोणता लेख पाठविला याबद्दल आम्ही विचार केला नाही व आम्ही पक्षाचा आदेश मान्य केला. आम्ही पक्षाचा आदेश कसा मान्य केला, एवढेच मला याठिकाणी सांगावयाचे आहे. त्यामुळे लोकशाहीमध्ये पक्षाचे हित जोपासले गेले पाहिजे, लोकशाहीमध्ये पक्ष प्रभावी झाला पाहिजे, लोकशाहीमध्ये पक्षाचा विचार मान्य असला पाहिजे. या ठरावाच्या बाबतीत मला अशी सूचना करावयाची आहे ही मतदान पध्दत राज्य सभेच्या व विधान परिषदेच्या निवडणुकीसाठी मर्यादित असू नये. याची व्याप्ती वाढवून ही निवडणूक पध्दत जिल्हा परिषद व नगरपालिकेच्या बाबतही असणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, दुसरी गोष्ट अशी की, मी सहज बसल्या बसल्या विधान परिषद सदस्यांची यादी चाळली. त्यामध्ये एकूण 78 सन्माननीय सदस्यांपैकी 30 आमदार विधानसभेतून निवडून येतात, 22 आमदार स्थानिक स्वराज्य संस्थांमधून निवडून येतात, 7 आमदार पदवीधर मतदारसंघातून निवडून येतात, 7 आमदार शिक्षक मतदारसंघातून निवडून येतात. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या सन्माननीय सदस्यांच्या बाबतीतही आपण विचार करावा. हे काम अवघड आहे, याची मला कल्पना आहे. परंतु याबाबतीत आपण विचार करावा, असे मला वाटते. म्हणून याठिकाणी पक्षाचे अधिकार, पक्षाचे निर्णय आणि पक्ष बळकट राहणे आवश्यक आहे, पक्षाचे विचार प्रभावी राहिले पाहिजेत. थोडेशे आमदार विकले जातात, परंतु त्यामुळे इतर आमदारांकडेही संशयाने पाहिले जाते, हे अतिशय क्लेशकारक आहे. सगळेच आमदार विकले जात नाहीत, परंतु सर्वांनाच एकाच नजरेने समाजात पाहिले जाते, या ठरावाच्या माध्यमातून हा दृष्टीकोन बदलला जाणार आहे, म्हणून या ठरावाला पाठिंबा देऊन मी माझे विचार थांबवितो.

जय हिंद, जय महाराष्ट्र !

-------

..2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

श्री.विनोद तावडे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : माननीय उपसभापती महोदय, याठिकाणी माननीय राज्यमंत्री यांनी जो नियम 106 अन्वये शासकीय ठराव मांडला आहे, त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. आताच ज्या सन्माननीय सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या, त्याच भावना साधारणत: सर्वच सन्माननीय सदस्यांच्या आहेत. त्याचा पुन्हा उच्चार न करता, याबाबतीत मी नक्कीच असे म्हणेन की, हे सर्व होत असेल तर आपल्यामध्ये निर्माण झालेले दोष दुरुस्त करण्याकरिता हे एक चांगल्या प्रकारचे पाऊल आपण या ठरावाच्या माध्यमातून सर्व मिळून टाकत आहोत. आपल्या सिस्टीममध्ये जे दोष निर्माण झाले आहेत, ते दुरुस्त करणारे हे एक पाऊल आहे. परंतु हे पाऊल पुरेसे नाही, असे मला वाटते. आपण यामध्ये म्हटले आहे की, ओपन बॅलट पध्दतीचा स्वीकार व्हावा. ओपन बॅलेट पध्दतीमध्ये आपण जेव्हा मतदान करायला जाऊ तेव्हा ते मत आम्ही कोणाला देत आहोत, ते कोणी तरी बघणार आहे आणि मगच आपण मतदार करणार आहोत. अशा प्रकारची पध्दती आपण स्वीकारत आहोत. मला याठिकाणी एक गोष्ट आठवते की, गुरुकुलमध्ये सर्व प्रकारची विद्या प्राप्त केल्यानंतर शेवटची विद्या म्हणून गुरु शिष्यांची एक अंतिम परीक्षा घ्यायचे, त्यामध्ये शिष्यांना एक कबुतर व सुरी देत व त्यांना सांगायचे की, कोणीही पाहणार नाही अशा ठिकाणी जाऊन तू त्या कबुतराची मान काप.

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे........

तो शिष्य कबुतर आणि सुरी घेऊन दूर जंगलात जातो आणि एका झाडाखाली बसतो. कबुतराला कापतांना आपल्याला कुणी माणूस बघत नाही ना ? याची काळजी घेऊन तो सुरी हातात घेतो, एवढयात त्याला झाडावर बसलेल्या पक्षाचा किलकिलाट ऐकू येतो, तो पक्षांकडे बघतो आणि त्याला असे वाटते की, आपल्याला पक्षी बघत आहेत. म्हणून तो पुन्हा उठतो आणि पुन्हा जंगलाच्या थेट आतमध्ये जातो. घनदाट झाडी, अंधार अशा ठिकाणी आपल्याला कोणी बघणार नाही असे वाटत असतांनाच त्याला रातकिडयांचा आवाज ऐकू येतो. रातकिडे आपल्याला बघतील म्हणून तो जंगलाच्या आणखी आत जातो. ज्या ठिकाणी किडे नाहीत, पक्षी नाहीत, माणसे नाहीत, अंधार आहे, अशा ठिकाणी जातो. आता या ठिकाणी आपल्याला कोणी बघणार नाही म्हणून सुरी घेऊन कबुतराची मान कापणार एवढयात त्याचे लक्ष त्या कबुतराकडे जाते. ते कबुतर त्याच्याकडेच पहात असते. कबुतर झोपल्यानंतर त्याला कापू असा विचार करुन तो कबुतर झोपण्याची वाट पहातो. कबुतर झोपल्यानंतर कोणी बघत नाही म्हणून कबुतराच्या मानेवर सुरी ठेवतो. त्याचवेळी त्याचे स्वत:चे मन त्याला विचारते की, तू जे करतो आहेस ते बरोबर करीत आहेस का ? हा विचार मनात येताच कबुतर आणि सुरी घेऊन तो शिष्य आपल्या गुरुंकडे जातो आणि त्यांना सांगतो की, कुणी बघत नाही असे कुठेच या जगात होत नाही. कारण, आपले मन आपल्याला सतत बघत असते.

सभापती महोदय, मी हे सांगण्याचा प्रयत्न करीत आहे की, आपण ओपन बॅलट पध्दती स्वीकारावयास निघालो आहोत. पण जोपर्यन्त मतदान करणारा काय करीत आहे याकडे त्याचे स्वत:चे मन बघत नसेल तोपर्यन्त ख-या अर्थाने या पध्दतीचा उपयोग होणार नाही. राज्यात आपण हुंडाबंदीचा कायदा आणला, पण अजूनही हुंडा देण्या-घेण्याचा व्यवहार समाजात होतो. हाही एक प्रकारचा हुंडाच आहे. 'चेतक' या घोडयाची समाधी, रायगडावरील कुत्र्याची समाधी आपण पहातो. त्यामुळे मी तसा शब्दप्रयोग करुन प्राण्यांना बदनाम करणार नाही. सन्माननीय सदस्यांनी अशा शब्दप्रयोगाविषयी जी हरकत घेतली त्या हरकतीशी मी सहमत आहे. मतदान करणारा स्थानिक स्वराज्य संस्थेमधील जो मतदार असतो त्याला दोष देत असतांना ज्यावेळी अशा निवडणुकांमध्ये पैसे का घेता ? असे मी त्यांना विचारले त्यावेळी त्यांनी मला जो प्रतिप्रश्न



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.............

विचारला त्याला मी उत्तर देऊ शकलो नाही. त्यांनी मला असा प्रश्न विचारला की, निवडून जाणारा कुठे प्रामाणिक राहणार आहे ? तोही कमावणारच आहेच. मग आम्ही आमचे उखळ पांढरे केले तर आम्हाला का दोष देत आहात ? म्हणून या प्रश्नाच्या उत्तराचा शोध घेणे गरजेचे आहे. केवळ त्यांना दोष देणे हे पुरेसे नाही तर जे त्यांचा आधार घेतात त्यांचे काय ? त्यामुळे ही दोन्ही बाजूची प्रक्रिया आहे, एकाला दोष देऊन भागणार नाही. म्हणूनच या विधेयकाच्या माध्यमातून आपण जो प्रयत्न करीत आहोत तो अपूरा आहे, असे मला स्वत:ला वाटते. राजकीय पक्षाची हतबलता आपण यामधून व्यक्त करीत आहोत. राजकीय सर्वच पक्ष, जरी यावेळी झालेल्या विधानपरिषदेच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाची मते जशीच्या तशी राहिली असली तरी तसे कधी झाले नाही असे नाही, पण राजकीय पक्ष म्हणून आपण आपल्या कायकर्त्यांवरील पकड घट्ट ठेवू शकत नाही, आपल्या विचारधारेशी, ध्येयाशी जोडून ठेवू शकत नाही, ही हतबलता या प्रस्तावाला पाठिंबा देतांना एका राजकीय पक्षाचा सरचिटणीस म्हणून माझ्या मनात येऊन जाते. सन्माननीय श्री.अटलबिहारी वाजपेयी यांनी त्यांच्या पंतप्रधानपदाच्या कार्यकाळात राज्यसभेचे मतदान हात वर करुन केले पाहिजे अशा प्रकारचा प्रस्ताव पारीत केला त्यावेळी बरीच उलटसूलट चर्चा वर्तमानपत्रातून झाली होती, कार्यकर्त्यांमध्ये झाली होती. या प्रस्तावामुळे अनेक अपक्ष आमदार नाराज झाले होते. लोकसभेचे तत्कालीन अध्यक्ष, श्री.पी.ए.संगमा यांनी एक गोष्ट सांगितली होती की, दोन बायका आपआपसात गप्पा मारीत होत्या, माझा नवरा अपक्ष आहे तो नक्की मंत्री होईल, वगैरे. आपणही ही गोष्ट त्यावेळी ऐकली असेल. त्यामुळे हा जरी राजकीय पक्षाच्या सदस्यांना वेसण घालण्याचा प्रकार असला तरी अपक्षांना कशी वेसण घालणार आहात ? हा प्रश्न अनुत्तरीतच राहणार आहे.

यानंतर श्री.बोरले...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे ...........

तो तर बाजार चालूच राहणार आहे. निवडून आल्यानंतर आपण आपल्या पक्षाच्या बांधिलकीचा फॉर्म भरत असतो, त्यामध्ये याचा अंतर्भाव करता आला तर तो करावा. आपण केंद्र सरकारकडे ठराव करुन पाठवितो व तो केंद्राकडून पास करुन आणतो. आताच्या निवडणूकीमध्ये जे काही घडले ते टाळता आले असते. कारण केंद्रातील नेतृत्तवाने सांगितले असते की, ॲडीशनल उमेदवार उभा करु नका. हा ठराव केंद्र सरकारकडे पाठवित असतांना याला केंद्रातील नेतृत्वाची याला मान्यता आहे किंवा नाही ? हा ठराव भारतीय जनता पक्ष, एन.डी.ए. यांच्या विचार करुन व त्या संदर्भात राज्यसभेची निवडणूक विचारात घेऊन आणला का ? एन.डी.ए.ची याला मान्यता आहे कारण ते त्यांनी सक्रीयपणे करुन दाखविले आहे. विधान परिषदेच्या निवडणूकीमध्ये ॲडीशनल उमेदवार उभा करण्यास मान्यता नाही, असे दिसले तर पुढची कोणतीही निवडणूक येण्यापूर्वी केंद्राकडून हे करुन आणावयाचे आहे, असा विचार यामागे असेल.म्हणून मला असे म्हणावयाचे आहे की, आपल्या मनामध्ये आपल्या पक्षाशी बांधिलकी पाहिजे. केवळ ठराव पारित करुन हे होत नसते. सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांना मी सांगू इच्छितो की, कोकण विकासाच्या बाबतीत आपण किती तरी वेळा ठराव पारित केला. परंतु त्याची अंमलबजावणी झाली नाही. केवळ ठराव करुन चालत नाही. त्याची अंमलबजावणी केंद्र सरकारच्या माध्यमातून होण्याची गरत आहे. यासाठी प्लॅन ऑफ ॲक्शन आपल्याला ठरवावी लागेल. मला असे वाटते की, आपण हे करुन घेऊ शकलो तर अशी मागणी करणारे आपले राज्य देशातील पहिले राज्य ठरेल आणि आपण ते करावे, असे मला या ठरावाला पाठिंबा देतांना म्हणावेसे वाटते. एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवितो.

--------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) :सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी विधान परिषद नियम 106 अन्वये शासकीय ठराव आणलेला आहे त्यावर माझे मत मांडण्यासाठी मी उभा आहे. या ठरावावर अनेक सन्माननीय सदस्यांनी भावना व्यक्त केलेल्या आहेत. मी यासंदर्भातील काल परवाचे उदाहरण देतो. नगर शहरातील महापौर पदाच्या निवडणूकीसाठी पीठासीन अधिकारी म्हणून गॅझेट प्रमाणे महापौर बसतात आणि तेच अर्जाची छाननी करतात. छाननीमध्ये अर्ज अवैध ठरविल्यानंतर एकच पात्र उमेदवार राहिला. त्याला महापौर पदी बसविण्यात आले. त्याला सुध्दा शासनाकडून, अधिकारी वर्गाकडून, मंत्र्यांकडून वेगळया पद्धतीने मार्गदर्शन झाले. पुन्हा संध्याकाळी वेगळी निवडणूक झाली आणि दुसरा महापौर निवडून आला. कधी नव्हे तर एकाच महानगरपालिकेमध्ये दोन महापौर एकाच दिवशी निवडून आलेले आहेत. दुर्दैवाची गोष्ट अशी आहे की, अधिका-यांनी सकाळी प्रोसिडींग लिहिले आणि संध्याकाळी सुध्दा प्रोसिडींग लिहिले. सभापती महोदय, अशा प्रकारे लोकशाहीमध्ये घोळ चालू आहे. सन्माननीय सदस्य श्री.प्रमोद नवलकर यांनी सांगितले की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी घटना लिहिली, त्यांना सुध्दा कधी असे वाटले नव्हते की, या देशामध्ये अशा पद्धतीनी कारभार चालेल. सर्व सज्जन माणसे असतील, असे त्यांना वाटले होते. कोणी दुर्जन माणूस असेल असे त्यांना वाटले नव्हते. याचे उदाहरण त्यांनी दिले. आपण हा जो ठराव मांडला तो परिपूर्ण नाही. मंत्री महोदयांना माझी अशी विनंती आहे की, तेवढयापुरती मलमपट्टी नको आहे. हा ठराव का आणला गेला याचे सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी विश्लेषण केले. एकच भस्मासुर घडला, आता तो तुमच्या डोक्यावर पाय ठेवीत आहे. जात्यातील दाणे रडती सुपातील दाणे हसती......

यानंतर श्री.सुंबरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ SBT/ MHM/ श्री. बोरले नंतर --- 14:35

श्री.अरविंद सावंत ....

आज त्याचे स्वागत करता आहात. दाणे तुमच्याकडे आल्यानंतर त्याचे निखारे होऊन तुम्हालाच चटके बसले तेव्हा तुम्ही हे पाऊल उचलले. या ठरावाच्या निमित्ताने मला अतिशय अभिमानाने सांगावेसे वाटते. आताच सन्माननीय श्री.भास्कर जाधव बोलून गेले पक्षशिस्त असली पाहिजे. ती कडवी शिस्त आमच्या पक्षातच आहे. मी स्वत: त्याचा अनुभव घेतला आहे. या सदनामध्ये मी स्थानिक स्वराज्य संस्थेकडून निवडून आलो आहे. पण त्यासाठी कोणाही नगरसेवकाला एक कपदेखील चहा पाजला नाही. केवळ शिवसेना प्रमुखांचा आशीर्वाद मिळाला होता त्या बळावरच मी येथे निवडून आलो. जाती-पातीकडे न पाहणारा असा एकमेव पक्ष म्हणून शिवसेनेचा मला अभिमान वाटतो. तेथे हे आरामात घडत होते आणि आता या ठिकाणी तुम्ही हा ठराव आणत आहात. कारण तुमच्याकडे हे सगळे पोसले गेले होते, ते तुमच्याच अंगावर आले म्हणून. मग हा ठराव केवळ विधान परिषदेसाठीच का ? कोणाची परिषद, कोणाची राज्य सभा ? यासाठी सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.प्रमोद नवलकर यांनी एक चांगला शब्द वापरला आहे. बुद्धीमंतांचे सभागृह. येथे कोणत्याही कायद्याचे ॲनालेसिस केले जाते. येथे विशिष्ट वर्गाची माणसे येण्यासाठी मग राजकारण चालते. येथे विधानसभा सदस्यांकडून उमेदवार पाठविले जातात. मी त्यातही होतो, तरीही मी सांगतो. दुर्दैवाने या सभागृहाची प्रतिष्ठा धुळीस मिळविण्याचे काम तुमच्यातीलच एका सहकाऱ्याने केले आहे आणि म्हणून तुम्हाला हा कायदा आणावा लागत आहे. पण या कायद्याची व्याप्ती वाढविण्याची नितांत गरज आहे. माझी विनंती आहे की, हा ठराव तेवढ्यापुरताच आपण आणू नका. आता नगराध्यक्ष जनतेतून नाही तर नगरसेवकांकडून निवडून जाणार, महापौर देखील नगरसेवकांकडून निवडून दिला जाणार म्हणजे पुन्हा त्यामध्येही बाजार होणार. म्हणूनच या बाबतीत तसेच जिल्हा परिषदेचे अध्यक्ष, पंचायत समित्यांची सभापती इतकेच काय पण सरपंचा पर्यंत याची व्याप्ती वाढविली गेली पाहिजे असे मला वाटते. वाईट एवढ्याच गोष्टीचे वाटते आहे की, खरोखरी आमचे मन स्वच्छ नाही. स्व. प्रमोद महाजन नेहमी त्यांच्या भाषणामध्ये तीन गोष्टींचा उल्लेख करीत असायचे. Are you going to vote to the purse? Are you going to vote to the person? Are you going to vote to the party? यामध्ये पार्टी प्रमुख आहे. पार्टी म्हणून निदेश दिल्यानंतर त्याचे अनुपालन होत नाही म्हणून या गोष्टीकडे लक्ष दिले पाहिजे. मी स्वत: राज्यसभेच्या निवडणुकीमध्ये माझ्या पक्षातर्फे पक्षाचा निवडणूक प्रतिनिधी म्हणून उपस्थित

...FF-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत .....

होतो. त्यावेळी सन्माननीय श्रीमती नजमा हेपतुल्ला या निवडून आल्या, पण त्याही घुसमटत, घुसमटत निवडून आल्या. मी त्यांचेशी या संदर्भात बोलतो. त्यांना म्हटले Have you seen the new Party arising? त्यावर त्यांनी म्हटले Yes, Money Party. तसेच श्री.कलमाडी आणि श्री.दर्डा हे कोठल्याही पक्षाचे नव्हते. पण ते पहिले निवडून आले. श्रीमती नजमा हेपतुल्ला या काँग्रेसकडून उभ्या होत्या पण तरीही त्या घुसमटत निवडून आल्या. जसे आता श्रीमती उषा दराडे यांचे प्रकरण घडले. त्याही वेळी मी निवडणूक प्रतिनिधी म्हणून होतो. सभापती महोदय, मला टिळक-आगरकरांची गोष्ट आठवते. प्रथम स्वातंत्र्य की प्रथम सुधारणा असा त्यांच्यामध्ये प्रश्न होता. आम्हाला स्वातंत्र्य मिळाले पण त्याचा अर्थ दांडके मारल्याशिवाय आम्ही सुधारणार नाही म्हणून मग हा कायदा आणला जात आहे. नाही तरी पक्षांतर बंदीच्या कायद्यामध्ये हे कशासाठी केले ? त्यांना काय पाहिजे होते ? केवळ प्रलोभनामुळेच पक्ष बदलला जातो, इकडून तिकडे उडी मारली जाते. मला पाहिजे सत्ता, मला पाहिजे मंत्रीपद. त्यासाठी काही वेळेस काही जण राजीनामा देऊन निवडणूक लढवून येत असतील तर तेही बरोबर नाही. त्यासाठी देखील यामध्ये बदल करण्याची गरज आहे. कारण शेवटी जनता तुम्हाला पाच वर्षासाठी निवडून देते, ते तुमच्या पक्षाकडे पाहूनच. तेव्हा तुम्हाला राजीनामा द्यायचा असेल तर त्या पाच वर्षानंतर तुम्ही निवडून येऊ शकता. आणि मग त्याने राजीनामा दिल्यानंतर त्या जागेवर माणूस पाठविण्याचे अधिकार तुम्ही त्या पक्ष प्रमुखाला द्या. पक्षाच्या प्रमुखाने त्याच्या जागी दुसरा माणूस पाठविला तर हा होणारा बाजार थांबेल, अन्यथा हा बाजार थांबणार नाही. ..

( यानंतर श्री. सरफरे .... जीजी 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत...

सभापती महोदय, माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख यांच्या निरोप समारंभाच्या वेळी केलेल्या भाषणामध्ये माननीय उप मुख्यमंत्री श्री. आर. आर. पाटील असे म्हणाले होते की, विधान परिषद निवडणुकीचा खर्च ऐकल्यानंतर काळजामध्ये धस्स होते. अशाप्रकारे या लोकशाही प्रक्रियेचे अवमूल्यन होत चालले आहे. त्यावेळी विधानसभेची निवडणूक आपल्याला अतिशय सोपी वाटते. परंतु विधानपरिषदेच्या निवडणुकीमध्ये प्रचंड घोडेबाजार चालतो असे म्हणावे लागते. हाच प्रकार नगराध्यक्ष, महापौर आणि सभापतीच्या निवडणुकीच्यावेळी होत असतो.

सभापती महोदय, माझी शेवटची सूचना अशी आहे की, अपक्षांच्या बाबतीत सुध्दा आपल्याला काहीतरी तरतूद करण्याची आवश्यकता आहे. आपल्याला माहीत आहे की, एका मताने केंद्र सरकार लोकसभेमध्ये पडले आहे. एका अपक्ष आमदाराच्या किंवा खासदाराच्या एका मताची गरज लागली तर त्या मताची किंमत कोटयावधी रुपये होते. म्हणून माझी आपल्याला विनंती आहे की, आपण अपक्षांच्या बाबतीत त्यांच्याकडून ॲफिलेशन आणि ॲटेस्टेशन ताबडतोब लिहून घेतले पाहिजे. आणि त्यांना सुध्दा सांगितले पाहिजे की, ज्या पक्षाला तुम्ही पाठींबा दिला असेल त्या पक्षाचे बंधन तुमच्यावर राहील. तरच या ठरावाला खरा अर्थ प्राप्त होईल. विधानपरिषद आणि राज्यसभा ही श्रीमंतांची होत चालली आहे. आज राज्यसभेमध्ये उद्योगपती कां जातात याचा अर्थ मला कळला नाही? हजारो कोटी रुपयांची उलाढाल करणाऱ्या श्रीमंतांची ही सभा होण्यापेक्षा ती विद्वज्ञांची सभा होणे गरजेचे आहे. ती विद्वज्ञांची व गुणवतांची सभा राहावयाची असेल तर निश्चितपणे या ठरावाला पाठिंबा देतांना हा ठराव अधिक परिपूर्ण करावा अशी माझी विनंती आहे. ज्यावेळी आवश्यकता निर्माण होईल त्यावेळी अशाप्रकारची दुरुस्ती वारंवार करण्यापेक्षा एकदाच आपण परिपूर्ण स्वरुपामध्ये करावी. नाहीतर आज विधानपरिषदेच्या निवडणुकीमध्ये चटका बसला म्हणून आपण हा प्रस्ताव आणला. उद्या नगरपरिषदेच्या आणि जिल्हा परिषदेच्या निवडणुकीमध्ये चटका बसल्यावर पुन्हा प्रस्ताव आणण्यापेक्षा एकदाच परिपूर्ण असा प्रस्ताव करावा अशाप्रकारचे मनोगत व्यक्त करुन माझे भाषण संपवितो.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्री श्री. राजेश टोपे यांनी नियम 106 अन्वये मांडलेल्या प्रस्तावाचे समर्थन करण्यासाठी मी उभी आहे. खरे म्हणजे या शासकीय ठरावाचे अभिनंदन करीत असतांना खंत व्यक्त करावी लागते की, निकोप लोकशाहीच्या रक्षणासाठी अशाप्रकारचा ठराव आणावा लागत आहे ही गोष्ट आपल्याला भूषणावह नाही. याचे कारण आज लोकांमध्ये पक्षनिष्ठा किंवा पक्षामध्ये असलेली विश्वासार्हता राहिलेली नाही, ही बाब लोकशाहीला भूषणावह नाही. निकोप समाज रचनेला आणि विश्वासार्हतेला तडा गेला असल्याचे दिसून येते. मला आपल्याला दुर्दैवाने सांगावेसे वाटते की, विधानपरिषद, राज्यसभेच्या निवडणुकीच्या वेळी प्रत्येक पक्षाला आपापल्या आमदारांना मोठ मोठया हॉटेलमध्ये बंदिस्त ठेवावे लागते. ज्यावेळी आपण समाजामध्ये वावरतो, समाजामध्ये काम करतो त्यावेळी समाजाकडून आम्हाला प्रश्न विचारले जातात. विधानपरिषद हे उच्च सभागृह मानले जाते. या सभागृहाचा सदस्य या नात्याने समाजामध्ये काम करीत असतांना लोक आमच्याकडे अपेक्षेने पाहतात. 15 दिवसापूर्वीची गोष्ट मला आठवते की, मी पुण्याहून मुंबईला येत असतांना टोल नाक्यावर माझी गाडी थांबली होती. सतत सातारा-पुणे प्रवास करीत असल्यामुळे टोल नाक्यावरील कर्मचारी मला चांगले ओळखतात. त्या दिवशी एक कर्मचारी मला म्हणाला की, मॅडम तुमच्याकडे पैसे नव्हते कां? यावेळी तुमची कुठेही वर्णी लागलेली दिसत नाही. त्याच्या बोलण्याचा अर्थ माझ्या वाहन चालकाला समजला नाही.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे (पुढे सुरु...

मी पुढे गेल्यानंतर ड्रायव्हरने सांगितले की, "मॅडम, तो असे असे म्हणत होता. आमच्यासारख्या पक्षाशी निष्ठा असणाऱ्या कार्यकर्त्यांना हे असे ऐकावे लागते. मी एकही पैसा खर्च न करता या सभागृहाचे सदस्य झालेली आहे. आमच्याकडे देखील या दृष्टीकोनातून समाज पहातो. याची आम्हाला लाज वाटते, खंत वाटते. या सभागृहामध्ये असे अनेक सदस्य असे आहेत की ते स्वत:ला निवडून आणण्याकरिता कोट्यावधी रुपये खर्च करतात. मी त्यांना ओळखतही नाही, ते अशा पध्दतीने निवडून आलेले आहेत. त्यांना समाजाच्या प्रश्नाशी काही देणेघेणे नसते, समाजाच्या प्रश्नाशी तळमळ नसते. पैशाच्या जोरावर धनदांडगे या ठिकाणी निवडून येतात. अशा आमदारांना अनेक प्रामाणिक पोलीस अधिकारी असतील त्यांना सलाम ठोकावा लागतो, हा कोठेतरी लोकशाहीच्या दृष्टीने तो अपमान आहे,असे वाटत नाही काय ? मला या ठिकाणी महिला सदस्य या नात्याने सांगावेसे वाटते की, यामध्ये महिला कोठेही नसतात. त्यांना असे वाटत नाही की, आपण मते विकत घेऊन निवडून यावे. खरे म्हणजे विधानसभेचे सदस्य असतील, जिल्हापरिषदेचे सदस्य असतील, नगरपालिकेचे, महानगरपालिकेच्या सदस्यांसाठी देखील हा नियम लागू केला पाहिजे. जेथे लोकप्रतिनिधी स्वत: विकून येतात, तेथेच सदस्यांचे अवमूल्यन होते. ते स्वत:ला अत्यंत कमी लेखतात, हे त्यांच्या गावीही नसते. म्हणून राज्यसभा आणि विधान परिषदेसाठीच अशाप्रकारची शिफारस न करता जिल्हापरिषदेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष असतील, पंचायत समितीचे सभापती, उपसभापती असतील, डायरेक्ट निवडणुकीने नगरपालिकेमध्ये "नगराध्यक्ष" म्हणून निवडणूक होत होती. ही सुध्दा अशा पध्दतीने नगरसेवकांकडून होणार आहे. म्हणजे पुन्हा त्या ठिकाणी खरेदी-विक्री सुरु होणार. त्यामुळे मला असे वाटते् की, या गोष्टीचा विचार झाला पाहिजे. अपक्षांचा मुद्दा सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी माडला. त्याप्रमाणे विधानसभेतील अपक्षांच्यावर देखील गांभीर्याने कोठे तरी नियंत्रण बसेल. तेही स्वत:ला विकून घेणार नाहीत, अशापध्दतीने तरतूद झाली पाहिजे. जो ठराव मांडलेला आहे तो केंद्राकडे शिफारस करुन पाठविणार आहात. फक्त शिफारस करुन थांबून चालणार नाही तर त्याचा पाठपुरावा केला पाहिजे. तरच येणाऱ्या भविष्य काळामध्ये ज्या निवडणुका होतील त्या निवडणुकीमध्ये पैशाचा खेळखंडोबा चालतो,त्याला पायबंद बसेल. आज कोट्यावधी रुपये खर्च करुन विधान परिषद आणि राज्यसभेमध्ये जाता येते. असे समजून स्वत:ला भूषणावह मानतात. यामुळे पक्षनिष्ठा असणाऱ्या अनेक कार्यकर्त्यांवर अन्याय होत असतो. हा अन्याय दूर केला जाईल आणि निवडणुकीमध्ये

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MHM/

श्रीमती कांता नलावडे (पुढे सुरु...

पारदर्शकता राहील, अशी अपेक्षा करुन पुन्हा एकदा या प्रस्तावाचे समर्थन करते आणि माझे भाषण संपविते. जयहिंद, जय महाराष्ट्र.

----

श्री.दिवाकर रावते : माझा पॉईन्ट ऑफ इन्फर्मेशन आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती कांता नलावडे यांनी चेक नाक्यावर घडलेल्या प्रकाराचा उल्लेख केला. काही अडीअडचणी आल्या की,माणूस गंडेदोरे घेतात. मी सांगू इच्छितो की, त्यांनी नारायणाचा जप करावा. म्हणजे सगळे शांत होईल.

**उपसभापती** : नारायणाचा नाही तर नगद नारायणाचा जप करावा.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश निकोसे (नामनियुक्त) : सभापती महोदय मी या ठरावाचे समर्थन करतो. मला एका गोष्टीची आठवण झाली. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर, सभापति महोदय, जब भारत देश आजादी हुआ तो कहीं खुशी मनाई जा रही थी तो कहीं मातम मनाया जा रहा था. कहीं कत्ले-आम हो रहे थें तो कलकत्ता में बम फूट रहे थें. कहीं लूट-पाट चल रही थी तो कहीं तलवारें चल रही थीं. ऐसी हालत में श्री पंडित जवाहरलाल नेहरु, डॉ. राजेन्द्र प्रसाद, श्री वल्लभ भाई पटेल और एनी बेसेंट ये महानुभाव महात्मा गांधी के पास गए और उन्होंने बापू से कहा कि आजादी तो मिल गई है, देश में आतंक का माहौल है लेकिन भारत का संविधान बनाना है, तो भारत का संविधान कौन बनाएगा ? क्या स्वीट्झरलैंड के कानून के पंडितों को बुलाया जाए या चीफ जस्टिस के मातहत कमेटी बनाई जाए या वाईस चांसलर और अन्य क्षेत्रों के विद्वानों की कमेटी बनाई जाए ? तब महात्मा गांधी जी ने कहा कि इस देश का संविधान बाबा साहेब आंबेडकर बनाएंगे. तब श्री पंडित जवाहरलाल नेहरु जी ने कहा कि वे तो आपका विरोध करते है, कांग्रेस का विरोध करते हैं और आपको बनिया कहते है. तब बापू ने कहा कि मैं बनिया हूं. मैंने राउण्ड टेबल कॉंफ्रेस के दौरान डॉ. बाबासाहब आंबडेकर की बात सुनी है. वे विद्वान है. वे कब सोते है, कब खाते-पीते हैं पता नहीं, क्योंकि वे सारे समय लिखते-पढ़ते रहते हैं, चिन्तन करते है. इसलिए श्री बाबासाहब आंबेडकर ही इस देश का संविधान बनाएंगे. मैं इस पर बहस नहीं चाहता हूं.

यानंतर श्री बरवड

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश निकोसे .....

त्यावेळी पंडित जवाहरलाल नेहरु, सरदार वल्लभभाई पटेल, डॉ. राजेंद्र प्रसाद, ॲनी बेझंट असे मोठे नेते होते. त्यावेळी भारताची घटना लिहून झाल्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितले की, या देशाचा कारभार जर भारतीय घटनेप्रमाणे चालणार नसेल तर ही घटना मी जाळून खाक करुन टाकीन, कारण फार मेहनतीने मी ही घटना तयार केलेली आहे. त्यांचे पार्लमेंटमधील भाषण आहे. या घटनेप्रमाणे भारताचा कारभार चालत असताना मध्यंतरीच्या काळात असे दिसून आले की, विधानसभा असो, विधान परिषद असो, राज्यसभा असो, महापालिका असो किंवा स्थानिक स्वराज्य संस्था असो, त्या ठिकाणी सदस्य पाठविण्याचा जो प्रस्ताव येतो किंवा जे तिकीट दिले जाते त्यावेळी भ्रष्टाचार झाल्याच्या बातम्या वर्तमानपत्रातून वाचतो एवढेच नव्हे तर तसे घडत आहे. ज्यावेळेला लोकसभेच्या किंवा विधानसभेच्या निवडणुका येतात त्यावेळी गरीब लोक, खेड्यापाड्यातील लोक उभे राहून मतदान करीत असतात. या देशातील करोडपती, अब्जोपती लोक त्यावेळी घरामध्ये टी.व्ही. पाहात बसतात किंवा मौजमजा करीत असतात. या देशाचा पंतप्रधान निवडण्याचे काम, या राज्याचा मुख्यमंत्री निवडण्याचे काम, या देशातील मंत्री निवडण्यासाठी प्रतिनिधी पाठविण्याचे काम या देशातील गोरगरीब लोक करीत असतात. ही गोष्ट डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या लक्षात आली होती म्हणून त्यांनी एका माणसाला एक मत अशी तरतूद केली आणि या देशाची लोकशाही अबाधित ठेवण्याबाबत सांगितले. मध्यंतरीच्या काळात मात्र असे अजिबात घडले नाही. राज्यसभेच्या निवडणुका आल्या त्यावेळी वर्तमानपत्रात वाचले. पक्षांतर करणाऱ्या सदस्याला 5-5 लाख रुपये, 10-10 लाख रुपये, 45-45 लाख रुपये दिले जात असतील तर महात्मा गांधींनी जे स्वप्न पाहिले, देशाच्या स्वातंत्र्याच्या लढाईमध्ये जे जे लढले, मग स्वातंत्र्यवीर सावरकर असतील, महात्मा गांधी असतील, ज्यांनी ज्यांनी त्यासाठी आपले प्राणार्पण केले, ज्यांनी आपले आयुष्य खर्ची घातले, जे बरबाद झाले, ज्यांनी आपल्या घरावर तुळशीपत्र ठेऊन भारतामध्ये लोकशाही आली पाहिजे यासाठी लढले, ती लढाई बरोबर चालली आहे की, नाही याचा विचार महाराष्ट्र शासनाने केला याबद्दल शासनाला धन्यवाद दिले पाहिजेत. केंद्र सरकारला धन्यवाद दिले पाहिजेत. दोन तीन निवडणुका माझ्या लक्षात आहेत. मी परिश्रम करीत



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM/

श्री. रमेश निकोसे .....

होतो. महापालिका निवडणुकीमध्ये देखील पैशाचे वाटप झाले. नगरपरिषदेमध्ये सुध्दा तसेच झाले. अशाच तऱ्हेने विधान परिषदेमध्ये सदस्य आले. वर्तमानपत्रात बातमी आली आणि लोक असे म्हणावयास लागले की, विधानसभेची निवडणूक लढवलेली बरी पण विधान परिषदेची निवडणूक नको. कारण त्यासाठी फार मेहनत घ्यावी लागते, खूप पैसे खर्च करावे लागतात. राज्यसभेच्या निवडणुकीत देखील असेच व्हावयास लागले. धनदांडगे लोक गोरगरिबांच्या उन्नतीसाठी योजना आखणार आहेत. मी झोपडीमध्ये राहणारा माणूस आहे.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. रमेश निकोसे...)

मी झोपडीमध्ये राहात होतो म्हणून मला तिकीट मिळाले नाही. परंतु मी एक कलावंत आणि लेखक म्हणून महाराष्ट्राच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी आणि माझ्या सहका-यांनी मला नामनियुक्त केल्यामुळे मी याठिकाणी आमदार म्हणून येऊ शकलो. अन्यथा या विधानपरिषदेवर मी कधीच येऊ शकलो नसतो आणि 5-10 वर्षात माझी प्रेतयात्रा निघाली असती आणि नागपूर मधील एक चांगला कार्यकर्ता म्हणून मला श्रध्दांजली देण्यात आली असती. शेवटी एक शेर म्हणून मी माझे भाषण संपवितो.

बाद मरने के मेरे इश्क के चर्चे होंगे
मेरे चाहने वाले, मेरी मय्यत पर आकर रोते होंगे
चढ़ा के फुलों की चादर, वे मेरी मय्यत उठाते होंगे
जलाकर मेरी मय्यत को, वे घर पर लौटकर आते होंगें
समझाकर मेरे बाल-बच्चों को, औरत को समझाते होंगे
वे तो चले गए, तुम रोकर क्या करोगे
बाद मरने के मेरे, तीसरे दिन, पैसों का हिसाब करते होंगे

सभापती महोदय, पैसेवाले आणि श्रीमंत लोक जर लोकशाहीमध्ये कारभार करीत असतील तर गरिबांसाठी असणा-या कल्याणकारी योजना केव्हाच फलद्रूप होणार नाहीत. या शासनाने अतिशय चांगला ठराव आणलेला असून या ठरावाला पाठिंबा देऊन मी माझे भाषण संपवितो.

--



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MHM/ SBT/ पूर्वी श्री. बरवड 14:55

श्री. मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, या प्रस्तावाला पाठिंबा देताना विशेषत: सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांचे मी अशासाठी अभिनंदन करतो की, मी त्यांच्या चेह-याचे अवलोकन करीत होतो. त्याचे कारण त्यांनी अशी व्यथा याठिकाणी मांडली की, आयुष्यभर पक्षाचे कार्यकर्ते एखाद्याला निवडून देण्यासाठी कष्ट करीत असतात, त्याचे बॅनर्स लावत असतात, पोस्टर्स् लावत असतात, घरोघरी जाऊन कार्ड वाटत असतात, कॉर्नर सभा घेत असतात, मतदारांकडे पाच-पाच चार-चार फे-या मारत असतात, आणि असा एखादा आमदार जेव्हा स्वत:च्या निष्ठा विष्ठेसारख्या जागोजागी टाकत असतो त्यावेळी मनाला अतिशय वेदना होत असतात. सभापती महोदय, अपक्षांच्या बद्दल माझेही स्पष्ट मत आहे. काही अपक्ष असतात की, युतीच्या काळात सुध्दा आमच्याकडे मंत्री होते आणि आता यांच्याकडेही मंत्री आहेत. मी याच्यावर व्यक्तिगत टीका करीत नाही. काही वेळेला अपक्ष म्हणून एखादी व्यक्ती निवडणुकीस का उभी राहते तर कुठल्याही पक्षाचे सिध्दांत त्यांना आवडत नाहीत. मला बीजेपी आवडत नाही, कॉंग्रेस आवडत नाही, एनसीपी आवडत नाही, कोणीही आवडत नाही, आणि म्हणून ज्यावेळी मी निवडून जातो त्यावेळी त्याठिकाणी मी कुठल्यातरी पक्षाचा आहे, तुम्ही मला मंत्री करणार आहात का ? गेल्या 15-20 वर्षात महाराष्ट्राच्या राजकारणातले मंत्रिमंडळ पाहिलं तर असे दिसून येते की, काही लोक कुठल्याही पक्षाचे मंत्रिमंडळ असले तरी त्या मंत्रिमंडळात असतात. सभापती महोदय, शासनाच्यावतीने याठिकाणी प्रस्ताव मांडण्यात आला असला तरी जे अपक्ष आहेत ते आपले मत कोणाला दाखवणार ? परवा राज्यसभेसाठी बजाज उभे होते. अपक्षांनी कोणाला मत दाखवले नाही. अपक्षांनी मत दाखवले पाहिजे. कारण ह्या अपक्षांनीच केन्द्रातली अनेक सरकारे पाडली आहेत. आपल्याला विकायला ठेवतात ते. आपले इमान विकत असतात, आपला प्रामाणिकपणा विकत असतात, आणि सन्माननीय सदस्य श्री. नवलकर यांनी सांगितल्याप्रमाणे आपले चारित्र्य विकत असतात, आपली शरम विकत असतात. आपल्याला माहीत आहे की, या देशाचे पंतप्रधान स्वर्गीय नरसिंह रावसाहेब यांनी आपले सरकार वाचविण्यासाठी झारखंडच्या शिबू सोरेन यांचे एक मत शेवटी त्यांनी विकत घेतले, नंतर देशाच्या या माजी पंतप्रधानांना कोर्टाची पायरी चढावी लागली होती खासदारांना फोडले म्हणून. पण ज्याचा उल्लेख आता सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी केला, ज्यावेळी श्री. अटलबिहारी वाजपेयी यांचे सरकार एक

..2..

(श्री. मधुकर चव्हाण...)

मताने पडले त्यावेळी अनेक उद्योगपतींनी येऊन त्यांना असे विचारले की, "बोलिये आपको कौन खासदार चाहिये ?" त्यावेळी माननीय वाजपेयींनी सांगितले की, "आईच्या पोटातून येताना मी काही सत्तेचा ताज डोक्यावर घेऊन जन्माला आलो नाही. त्यामुळे मला जे मिळणार नाही ते मिळणार नाही. पण एक मताने जर माझे सरकार पडणार असेल तर मत विकत घेऊन मी ते वाचवणार नाही. खरे तर अतिशय परिश्रमाने त्यावेळी केंद्रात आम्हाला सत्ता मिळाली होती. 50 वर्षे कॉंग्रेसची सत्ता होती. या देशामध्ये हे ठरुनच गेले होते की, नेहरु घराण्यानेच राज्य करायचे, बाकी कुणी कराचेच नाही. परंतु फार मोठ्या परिश्रमातून, कष्टातून, कार्यकर्त्यांच्या परिश्रमातून त्यावेळी भाजपाला त्याठिकाणी सत्ता मिळाली होती. पण आम्ही मत नाही विकत घेतले. आम्ही पुन्हा निवडणुकीला सामोरे गेलो. म्हणून मला असे वाटते की, अपक्षांचाही उल्लेख याठिकाणी होणे अत्यंत आवश्यक आहे. सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी बरोबर सांगितले की, एखाद्या विरोधी पक्षातील माणसाचे येऊन मत घ्या... काही वेळेला आपल्याच पक्षातले लोक सांगतात, माझं काय ?

नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ MAP/ पूर्वी श्री.शिगम 15:00

श्री.मधुकर चव्हाण........

श्री.तरे यांच्या संदर्भात नगरसेवकांची रायगडमध्ये बैठक घेतली. त्यावेळी एक अपक्ष रेस्टहाऊसच्या बाहेर आले आणि म्हणाले, नगरसेवक म्हणून तरे साहेबांना मत द्यावे असे सांगाल या अपेक्षेने तुमच्या बैठकीत बसलो नाही,. त्याचा नेता किंवा उमेदवार मला इतके लाख देतो. सन्माननीय सदस्य श्री.निकोसे यांना मी सांगू इच्छितो की, आता 1 लाख, 5 लाखाचा जमाना गेला. स्वत:च्या घरावर सोन्याची कौले चढविता येतील आणि आपल्या सात पिढ्या सांभाळता येतील एवढी संपत्ती गोळा होईल एवढे सौदे चालतात. 25 लाख, 40 लाख, 60 लाखापर्यंत व्यवहार होतात. कार्यकर्त्यांनी आपल्याला मोठे केलेले असते. त्यांनी परिश्रम केलेले असतात आणि हे स्वत:ला विकत बसतात. मला वाटते त्याठिकाणी याही गोष्टींचा विचार होणे आवश्यक आहे. पूर्वी लोकप्रतिनिधी हे जनतेच्या सुख-दु:खाचे प्रतिबिंब सभागृहात उमटवत असत. विजय मल्ल्या हे कर्नाटकामधून निवडून आले. एकाही पक्षाचा त्यांना पाठिंबा नव्हता. ते राज्यसभेत काय दिवे लावत असणार? किंगफिशर कंपनीला लायसन्स आणि परमिशन कशी मिळेल यासाठी मंत्र्यांकडे फिरत बसतील. वेगवेगळया प्रकारचे उद्योग काढण्यासाठी खासदारकीचा उपयोग करीत असतील. झोपड्यातील गरीब सकाळी जेवल्यानंतर संध्याकाळी खायला मिळते की नाही याची भ्रांत ज्यांना माहिती असेल असे कार्यकर्ते याठिकाणी आले पाहिजेत. त्यांना जनतेच्या सुख:दुखाचे प्रतिबिंब आपल्या व्यवहारातून, बोलण्यातून, भाषणातून उमटविता आले पाहिजे. राज्यसभेत जे संपत्तीच्या जोरावर निवडून गेले त्यांनी देशाच्या, गरीब समाजाच्या कल्याणाकरीता, समाज सुधारण्यावर, शिक्षणावर एक शब्द राज्यसभेत बोलल्याचे मला आठवत नाही. सामान्य माणूस आपला घाम विकत असतो. परिश्रम विकत असतो आणि जीवन जगत होता. निर्लज्ज लोक आपले मत विकतात, राजकीय सौदोबाजी करीत असतात. प्रामाणिक कार्यकर्त्यांचे काय? प्रामाणिक कार्यकर्ता, त्याला मतदारसंघ नसल्यामुळे त्याला कधीतरी वाटत असते, विधानपरिषदेवर मला पक्ष पाठविल. पक्षाने उभे केले नसले तरी श्री.सतीश प्रधानांची दमछाक झाली. मी जरी काऊंटिंगला नव्हतो तरी तिथे उपस्थित असल्यामुळे मला कळले, 16 व्या फेरीत ते निवडून आले. परवा कॉंग्रेसच्या मुख्यमंत्र्यांना, तुमच्या पक्षाने एकमताने सांगितले होते, पाचवी जागा लढू नका. चौथी जागा लढू नका. केंद्रामध्ये मोगलशाहीत ज्याप्रमाणे सरदारांना आपापसात भांडत ठेवायचे आणि बाकीच्यांनी मजा बघायची त्याप्रमाणे केंद्रातील नेते महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांचा डोंबाऱ्याचा खेळ करतात.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण.........

तुम्ही चौथी सीट उभी केली. तुमच्या पक्षाने सांगितले, मुख्यमंत्र्यांनी सांगितले. तरी देखील तुम्हीच एनसीपी बरोबर सौदा केला. तुम्हाला केंद्रामध्ये खिंडार पाडावयाचे होते. का आणला नाही हा ठराव अगोदर? तुमच्या पक्षाने एकमुखाने केलेला प्रस्ताव कोणीतरी (अहमद पटेल) सत्तेचे दलाल बसलेले असतात ते आणतात म्हणून चौथा उमेदवार उभा करतात आणि स्वत:चे वस्त्रहरण करुन घेतले.............

श्री.सतीश चुतर्वेदी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी जो उल्लेख केलेला ही पध्दत योग्य नाही.

श्री.मधुकर चव्हाण : तुम्ही चौथा उमेदवार उभा केला. आम्ही सांगतो ते बरोबर आहे. या पूर्वी हा ठराव का आणला नाही? तुमचे जळायला लागल्यावर तुम्ही हा ठराव आणला.

**उभसभापती** : या प्रस्तावावर अत्यंत गंभीरपणे चर्चा चालू आहे. कृपया या चर्चेला कोणत्याही प्रकारचे गालबोट लागू नये अशी माझी स्वत:ची सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे. याठिकाणी सभागृहात जे या सभागृहाचे सदस्य नाहीत अशा व्यक्तींचा कोणीही नामोल्लेख करु नये.

श्री.मधुकर चव्हाण : मी स्वत:च ते शब्द मागे घेतो. आपण स्वत: कोणते विधायक वळण देत आहात. स्व.राजीव गांधी यांनी उदात्त हेतूने बिल आणले. एक-दोन माणसे त्याठिकाणी जाऊ शकतात. 1/3 जाऊ शकतात. नंतर होलसेलमध्ये माणसे जाऊ शकली. 15-15, 17-17 माणसे जाऊ शकली. माणसांचे ईमान विकत घेण्याची प्रथा कोणी सुरु केली याचा विचार झाला पाहिजे.

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण ...

त्यामुळे राजकारणातील या पध्दतीच्या संदर्भात विचार करण्याची वेळ आलेली आहे. महाराष्ट्राचे सर्वोच्च आदरणीय नेते श्री. यशवंतराव चव्हाण यांनी सुध्दा अन्य पक्षाच्या गुणवंत माणसांना आपल्यापक्षात घेतले होते उदा. श्री. यशवंतराव मोहिते यांना त्यांनी आपल्या पक्षात घेतले होते. परंतु त्यांनी त्या सदस्यांना काही तरी गाजर दाखवून घेतले नव्हते तर त्या सदस्यांच्या प्रगल्भतेचा त्यांनी उपयोग करुन घेतला होता. म्हणून मला असे वाटते की, या ठिकाणी जो प्रस्ताव आलेला आहे त्यामध्ये तीन गोष्टी असणे आवश्यक आहे. एक तर आपण या अपक्षाचे काय करणार आहात? आपण बाकीच्यावर जशा पध्दतीचे बंधने घालण्याचा विचार करीत आहोत तशा पध्दतीची बंधने आपण अपक्षांवर घालणार आहात काय? जसे आतापर्यंत अनेक प्रस्तावाच्या बाबतीत झाले तशीच परिस्थिती या प्रस्तावावर येता कामा नये असे मला म्हणावयाचे आहे. या ठिकाणी अतिशय चांगला प्रस्ताव शासनाने आणल्यामुळे मी या प्रस्तावाचे मनापासून स्वागत करतो. महाराष्ट्र हे एक सुसंस्कृत राज्य आहे तसेच या ठिकाणचे राजकारण सुध्दा इतर राज्यापेक्षा सुसंस्कृत आहे. हा प्रस्ताव आणण्यासाठी थोडा विलंब झाला परंतु उशिरा का होईना चांगला विचार सुचला ही चांगली बाब आहे. या चांगल्या प्रस्तावाला आपण एकमताने मंजूरी देऊन तो केंद्राकडे पाठविल्यानंतर त्याचा पाठपुरावा करण्याची आवश्यकता आहे. तसेच पुढच्या निवडणूकीपासून अशा प्रकारचे मत विकता येणार नाही, राजकारणातील बेशरमी,निर्लज्जपणा, कोडगेपणा येणार नाही आणि पक्षाच्या पाठीत खंजीर खुपसला जाणार नाही याकडे लक्ष दिले पाहिजे. राजकारणात आता जो घोडेबाजार आहे तो बदं होईल यासाठी लक्ष देण्याची आवश्यकता आहे. अशा पध्दतीने जर निवडणूका झाल्या तर लोकशाहीमध्ये चांगल्या प्रकारची पध्दत सुरु होईल. हा प्रस्ताव एकमताने पास होईल, यासाठी आपण सर्वांनी मदत करावी एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

धन्यवाद.

----------

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. जी.एल. अैनापुरे (पुणे विभाग शिक्षक ) : उपसभापती महोदय, या ठिकाणी माननीय राज्यमंत्री श्री.टोपे साहेबांनी जो प्रस्ताव आणलेला आहे त्या प्रस्तावर माझे विचार आपल्या परवानगीने व्यक्त करतो. या ठिकाणी जो प्रस्ताव आणलेला आहे त्यामध्ये या प्रस्तावाचा हेतु स्पष्ट केला आहे. तरी सुध्दा हा प्रस्ताव आलेला आहे. या प्रस्तावामध्ये प्रामाणिकपणा किती आहे, लोकशाही बद्दल प्रेम किती आहे याबाबतीत थोडी शंका मनात येते. गुप्त मतदान पध्दतीत व्यक्ती स्वातंत्र्यांची प्रतिष्ठा आहे. या प्रतिर्ष्ठेला आपण मुठमाती देत आहोत काय याचा विचार केला पाहिजे. केवळ काही लोकांनी आपली प्रतिष्ठा विकल्यामुळे जगभर प्रसिध्द असलेल्या गुप्तमतदान पध्दतीला तिलांजली दिली जात असेल तर ते चांगल्या लोकशाहीचे लक्षण नव्हे. खरे म्हणजे मला असे वाटते की, हा प्रस्ताव आणण्यामागे आपापल्या पक्ष प्रमुखांची हुकूमशाही अबाधित रहावी यासाठीच हा प्रस्ताव आणलेला आहे असे मला वाटते. परंतु ज्यावेळेस आपण पक्ष चालवितो त्यावेळेस पक्षाने सुध्दा आपली किमान जबाबदारी स्वीकारली पाहिजे. आपल्या पक्षाच्या सदस्यांवर किमान काही तरी संस्कार केले पाहिजेत. त्याच्यावर संस्कार न करता आमदाराचा बॅज छातीला लावून वेळ प्रसंगी आपले इमान विकले तर त्याला नावा ठेवण्याचा अधिकार कुणाला आहे? खरे म्हणजे ज्या लोकशाहीत कमितकमी कायदे असतात ती लोकशाही चांगली परंतु आपल्या लोकशाहीमध्ये सगळयात जास्त कायदे आहेत. व्यक्तीची प्रतिष्ठा ही खरे म्हणजे लोकशाहीचे अधिष्ठान आहे. परंतु यामुळे आपण व्यक्तीची प्रतिष्ठा संपवित आहोत. या ठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी अपक्षांच्या संदर्भात विचार व्यक्त केलेले आहेत परंतु अपक्ष हे सुध्दा पक्षाचेच अपत्य आहे हे विसरता कामा नये. पक्षाने वेगवेगळया पध्दतीने व्यक्तीला हाताळल्यामुळेच अपक्ष निर्माण झाले आहेत.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जी.एल.अैनापुरे...

त्या अपक्ष उमेदवारांना कोणत्या तरी पक्षाचा पाठिंबा असल्याशिवाय वा अन्य कोणाचा मदतीचा हात असल्याशिवाय ते अपक्ष म्हणून निवडून आले आहेत का ? मग पुढे निवडून आल्यावर ते त्यांना पाहिजे तसे उद्योग करतात. कायद्यामध्ये बदल केला म्हणून सर्व काही सुधारते असे नाही. त्यासाठी पूर्वसुरींची वागणूक, पिढ्यानपिढयांचे संस्कार असावे लागतात. सभापती महोदय, विधानपरिषदेच्या होणाऱ्या निवडणुकीमध्ये आतापर्यंत लहानमोठ्या प्रमाणावर व्यवहार चालत होते त्यावेळी त्यास विरोध झाला नाही. परंतु आता या निवडणुकीचे चटके सर्वांना बसायला लागल्यामुळे हा निर्णय घेण्यात आला आहे किंवा कसे अशी शंका वाटते. ज्या उद्देशाने हा ठराव आणलेला आहे तो उद्देश कितपत साध्य होईल हा महत्वाचा प्रश्न आहे. त्याचे कारण असे की, गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेले लोक राजकारणात येत आहेत. पक्षाचे प्रमुख अशा लोकांना तिकीट देऊन निवडून सुध्दा आणून समाजामध्ये प्रतिष्ठा देत आहेत. या गोष्टींमुळे हा ठराव फेल जाण्याची शक्यता आहे. सभापती महोदय, Our Democracy is without Education and Democracy without Education is hypocrisy. आपली लोकशाही निर्बुध्दाची लोकशाही वाटत असेल तर ते लोकशाहीचे ढोंग आहे. सरकारने पॉकेट-पार्टी संस्कृतीवर काही प्रमाणात निर्बंध आणण्याचा प्रयत्न केलेला आहे त्याचे मी स्वागत करतो आणि माझे दोन शब्द पुरे करतो.

--------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : माननीय उपसभापती महोदय, म.वि.प. नियम 106 अन्वये माननीय राज्यमंत्री श्री.राजेश टोपे यांनी जो शासकीय ठराव आणलेला आहे त्याचे समर्थन करण्यासाठी मी उभी आहे.

उपसभापती महोदय, मी जास्त काही बोलणार नाही. फक्त थोडक्यात मद्दे मांडणार आहे. कारण याठिक्‍ाणी अनेक मान्यवर सन्माननीय सदस्यांनी विचारपूर्वक विचार मांडलेले आहेत. विधानसभा सदस्य आणि विधानपरिषद सदस्य यांना सारखेच अधिकार आहेत असे आपण मानतो. इंग्लंडमध्ये "हाऊस ऑफ कॉमन्स" आणि "हाऊस ऑफ लॉर्डस" असे संबोधिले जाते. आपण याठिकाणी "विधानपरिषद" असे नाव दिलेले आहे. मी लोकशाहीच्या विश्लेषणात जाणार नाही. मी मघाशी म्हटल्याप्रमाणे विधानसभा सदस्य आणि विधानपरिषद सदस्य यांना जरी सारखे अधिकार असले तरी विधानसभेचे सदस्य हे लोकांमधून निवडून येत असल्यामुळे लोकांना ते जास्त जवळचे वाटतात. विधानपरिषदेतील आमदार हे विधानसभा सदस्यांच्या माध्यमातून निवडून येत असले तरी विधानसभा सदस्यांनी पक्षाचे आदेश मानणे ही सोपी गोष्ट राहिलेली नाही. विधानसभेकडून अशा आशयाचा ठराव आला त्या विधानसभा सदस्यांचे आणि तेथील नेतृत्वाचे मी मनापासून आभार मानते. निवडणुकीमध्ये मनी पॉवर, मसल पॉवर, माफिया पॉवर आलेली आहे. कदाचित राजकीय अपरिहार्यता म्हणून अशाप्रकारचा ठराव समोर आला आहे. तरी सुध्दा हा एक चांगल्याप्रकारचा ठराव आहे. माझी आपल्यामार्फत मंत्रिमहोदयांना विनंती आहे की, हा ठराव केंद्र सरकारकडे गेल्यानंतर त्याचा पाठपुरावा केला पाहिजे. पुन्हा एकदा या ठरावाचे समर्थन करुन माझे दोन शब्द पुरे करते.

--------------

यानंतर श्री.पुरी....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील (उप मुख्यमंत्री) : सभापती महोदय, लोकप्रतिनिधीत्व अधिनियमात काही सुधारणा करण्याच्या दृष्टीने एक शासकीय ठराव सदनासमोर आला आहे. याठिकाणी दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांच्या भावना ऐकल्यानंतर हा ठराव एकमताने पारित होईल असा माझा विश्वास आहे. काही प्रश्न याठिकाणी उपस्थित करण्यात आले. कोणत्या परिस्थितीमध्ये शासनाला हा शासकीय ठराव उपस्थित करावा लागला, याबाबत मी थोडक्यात ऊहापोह करणार आहे.

सभापती महोदय, काही सन्माननीय सदस्यांनी अशाही भावना व्यक्त केल्या की, परवाच्या झालेल्या निवडणुकीत सगळयाच पक्षांची मते फुटली. परंतु सत्ताधारी पक्षाला कदाचित झळ बसली म्हणून हा ठराव याठिकाणी आणावा लागला. परंतु तशी वस्तुस्थिती नाही. ज्यावेळी निवृत्त होणाऱ्या सन्माननीय सदस्यांसाठी आपण निरोप समारंभ आयोजित केला होता त्यावेळी मी माझ्या भाषणात याचा उल्लेख केला होता व माननीय सभापती महोदयानींही वरुन निदेश वजा सूचना केली होती की, लवकरात लवकर अशा स्वरुपाचा ठराव दोन्ही सदनासमोर आणावा. ज्याप्रमाणे राज्यसभेमध्ये खासदार निवडून जाताना जे बदल करण्यात आले तशाच स्वरुपाचे बदल विधान परिषदेमध्ये निवडून जाताना करण्यात यावेत व उघड मतदान पध्दती सुरु करावी, अशा पध्दतीची सूचना आपणही केली होती. त्याला अनुसरुन, पूर्वी शासनाने दिलेल्या आश्वासनाप्रमाणे व व्यक्त केलेल्या भावनेप्रमाणे हा ठराव या सदनामध्ये येत आहे. ही गोष्ट खरी आहे की, हा ठराव यापूर्वीच याठिकाणी यावयास पाहिजे होता व राज्यसभेच्या बाबतीत जशी दुरुस्ती झाली तशीच दुरुस्ती यामध्ये व्हावयास हवी होती. परंतु देशातील सगळयाच राज्यांमध्ये विधान परिषद सभागृह नसल्यामुळे, म्हणजे काही राज्यांमध्येच विधान परिषद सभागृह असल्यामुळे केंद्र सरकारने अधिनियमात बदल करीत असताना विधान परिषदेतील अधिनियमात बदल करण्याची दखल घेतली नव्हती. आता ती घ्यावी व उघड पध्दतीने विधान परिषदेचे सदस्य निवडून यावेत म्हणून हा ठराव याठिकाणी आणला आहे. सन्माननीय सदस्य श्री.रावते साहेब, हे खरे आहे की, अलिकडच्या काळात परिस्थिती फार बिघडत चालली आहे. या सदनामध्ये येणाऱ्या सदस्यांकडे संशयाने पहावे अशी परिस्थिती दिवसेंदिवस निर्माण होत आहे. काहीवेळा आपली मते कमी असताना विरोधकांची मते खेचून आपली सीट लावावी अशी भूमिका अनेकवेळा काही पक्षाने घेतलेली आहे. अलिकडील





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील.....

राजकारणाची परिस्थिती पाहिली तर भ्रष्टाचार करण्यास संधी मिळत नाही, तोपर्यंत चांगले वागायचे व तोपर्यंत आपण सज्जन म्हणवून घ्यावयाचे. परंतु संधी मिळताच भ्रष्टाचारी बनण्याचा सोयीस्कर मार्ग विविध पक्षांनी अनुसरल्याचे आपल्याला पहावयास मिळते आणि आपणच साव, आपणच साधू, असे समजायचे. हा प्रश्न सध्या बाजूला ठेवू. परंतु काही बिघाड निश्चित निर्माण झाले आहेत, त्याची दखल दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य घेत आहेत, ही आनंदाची बाब आहे असे मी मानतो. कालच्या निवडणुकीत तर विरोधी पक्षाची मते फोडण्यात आली, मित्र पक्षाचीही मते फोडण्यात आली, परंतु ही फोडाफोडी इथेच थांबली नाही तर स्वत:च्या पक्षाचीही मते फोडण्यात आली. कुठे तरी सिस्टीमलाच अशा प्रकारचा आघात बसला. मी निरोप समारंभाच्यावेळी भाषणामध्ये उल्लेख केला होता की, विधानसभेची निवडणूक लढविणे फार सोपे आहे, परंतु विधान परिषदेचे निवडणूक लढविणे फारच अवघड आहे. अशा प्रकारची भावना मी उघडपणे व्यक्त केली होती. मी आणि माननीय खडसे साहेब एकत्रित बसलो असता, योगायोगाने विधान परिषद निवडणूक जिंकलेले आणि हरलेले असे परस्पर लढलेले दोन्ही उमेदवार आमच्यासमोर आले. वर्तमानपत्रामध्ये आलेल्या माहितीवरुन आम्ही त्यांना निधीची विचारणा केली असता, पडलेल्या उमेदवाराने सांगितले की, मी या निवडणुकीत 7 कोटी रुपये खर्च केले. अशाप्रकारे महाराष्ट्र विधान परिषदेचा सदस्य होण्यासाठी 7 कोटी रुपये खर्च करुन एक उमेदवार पराभूत झाला होता.

नंतर श्री.रोझेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील.......

कदाचित आपला गैरसमज असा होईल की, ज्याअर्थी इतका पैसा खर्च करुनही उमेदवार निवडून येत नाही त्याअर्थी लोकांनी प्रामाणिकपणे मतदान केले असावे. पण तसे नाही तर विजयी झालेल्या उमेदवारानेही 8 कोटी रुपये खर्च केले होते. त्यावेळी हे दोघेही उमेदवार समोरासमोर होते. उत्सुकतेपोटी मी त्यांना पुन्हा विचारले की, "इतका पैसा वाटला कुणाला ?" सगळयाच बाबतीत समाजवाद नसतो, समानता नसते, पण मतदारांनी उमेदवारांच्याबाबतीत असमानता दाखविली नव्हती. मतदारांनी दोघांकडूनही पैसे घेतले होते. नाही म्हटले तरी मी थोडा हुषार आहे. मी त्यांना मार्ग सूचविला की, दोघांकडूनही पैसे घेतले असतील आणि एकालाच मत दिले असेल तर नगरपालिकांच्या बैठका केंव्हा आहेत ते बघा, एकएका मतदाराला बोलावून घ्या, आणि पैसे परत देतात का ते बघा. त्यानुसार 1 कोटी रुपये वसूलही झाले. वसूली झाल्यानंतर त्यांनी मला सांगितलेही. त्यानंतर वसूलीच्या प्रगतीबाबत मी उत्सुकतेपोटी त्यांना विचारले तेंव्हा त्यांनी सांगितले की, नगरपालिकांमध्ये गेलो तेंव्हा सगळे नगरसेवक दोघांच्याही अंगावर धावून आले आणि त्यामुळे त्यांनी पुढची वसूली थांबविली. काही कार्यकर्त्यांनी अनुभव सांगितला की, पक्षाकडे मते कमी असतील तर विरोधी पक्षाची मते फोडू फक्त त्यांना काही तरी देण्याची तयारी ठेवावयास हवी. पुन्हा दुस-या दिवशी काही कार्यकर्ते येतात, विरोधी पक्षाच्या लोकांना पैसे देत आहोत, आपल्याही पक्षातील 4 गरीब मतदार आहेत त्यांना मदत दिली तर चांगले होईल, असे सांगतात. मग उमेदवाराला त्या 4 गरीब मतदारांना पैसे द्यावे लागतात. आणि मग आपल्याच पक्षातील एकाला द्यावयाचे व बाकी लोकांना द्यायचे नाहीत म्हणून आपल्या पक्षातील लोकांनाही त्यांचा वाटा द्यावा लागतो. एका नगरपरिषदेमध्ये विधान परिषदेच्या मतदानासाठी मतदार चहापाणी न घेता 3 वाजेपर्यन्त मतदानासाठी गेले नव्हते. जोपर्यन्त पाकिटे मिळत नाहीत तोपर्यन्त मतदानाला जाणार नाही, उमेदवाराने कोणालाच पाकिट दिले नसते तर आम्हीही पाकिट न घेता मतदान केले असते, असे त्यांचे म्हणणे होते. असाच एक प्रसंग माझ्याबाबतीत घडला. काही सदस्यांना त्यांच्या पार्टीने मुंबईत आणून ठेवले होते. हा प्रसंग कालच्या विधानपरिषदेच्या निवडणुकीतील नसून त्यापूर्वीच्या निवडणुकीतील आहे. एक दिवस रात्री 2 वाजता मला फोन आला. "अर्जंट होते म्हणून फोन केला, मी जरी आपल्या पार्टीचा नसलो तरी आपण सर्वांना मदत करता, मलाही मदत करा, माझी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील...........

चूक झाली आहे," असे फोनवरील माणसाने मला सांगितले. "आपली काय चूक झाली आहे, एवढया रात्री माझ्याकडून कसली मदत हवी आहे," अशी विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, "पोलिसांनी डान्सबारवर धाड टाकली आहे, मी एका नगरपालिकेचा नगराध्यक्ष आहे." त्यांची इच्छा होती की, मी पोलिसांना सांगून त्यांना सोडण्याबाबत सूचना द्याव्यात. मलाही असे वाटत होते की, नगराध्यक्षाला अडकविणे योग्य नाही म्हणून मी पोलीस निरीक्षकांना फोन केला, काय परिस्थिती आहे ती विचारली, त्यांना सोडता येईल काय ? अशी विचारणा केली. कारण, नगराध्यक्षांनी मला फोनवर विनंती केली होती की, आपल्याला काय करावयाचे ते करा, माझ्या शहराची अब्रु जाईल, मला यामधून सोडवा. 40 लोक पकडले आहेत, नगराध्यक्षही त्यामध्ये आहेत, त्यामुळे त्यांना कसे सोडू, अशी शंका पोलीस निरीक्षकाने व्यक्त केल्यावर मी त्यांना सांगितले की, त्यांना दरवाजावर उभे करा आणि पळून जाण्यास सांगा. त्याप्रमाणे तसे घडले. त्यानंतर मी पुन्हा पोलिसांना सूचना दिल्या की, इतकेही मोकळे सोडणे बरोबर होणार नाही. त्यांना पकडू नका पण पोलीस त्यांच्या मागे पळू द्या आणि त्याप्रमाणे पोलिसांनी नगराध्यक्षांना 2 किलो मीटर ताणले. त्यानंतर प्रमाणिकपणे ते नगराध्यक्ष मला भेटावयास आले, आभार मानले. त्यांच्या कोपराला लागले होते म्हणून मी त्यांना विचारले की, "पोलिसांनी मारले का ?" तेंव्हा त्यांनी सांगितले की, "नाही, पळतांना मीच पडलो आणि लागले." अशाच एका निवडणुकीत मी विदर्भात गेलो होतो, त्या ठिकाणीही सगळीकडे वाटावाटीचे प्रकार घडले होते. तेथील लोकांचे असे म्हणणे होते की, अजूनही चांगुलपणा शिल्लक आहे.

यानंतर श्री.बोरले...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ KGS/ MAP/ प्रथम श्री.रोझेकर ......... 15:25

श्री.आर.आर.पाटील .........

सर्व उमेदवारांकडून मतदारांनी पैसे घेतले. त्यांनी चांगुलपणा असा दाखविला की, ज्याने जास्त पैसे दिले त्याला एक नंबर दिला, ज्याने त्यापेक्षा कमी पैसे दिले त्याला दोन नंबर दिला आणि ज्याने वरवर पैसे दिले त्याला तिसरा नंबर दिला. अशा प्रकारे अजूनही लोकांमध्ये, मतदारांमध्ये चांगुलपणा शिल्लक आहे, इमान शिल्लक आहे. त्याने कोणालाही नाराज केले नाही. त्याने ज्याच्या त्याच्या किंमतीप्रमाणे मत दिले. हे सर्व सांगण्याचे कारण असे आहे की, असे प्रकार घडत असल्यामुळे चांगला संदेश जात नव्हता. आपण जो प्रश्न उपस्थित केला त्यामध्ये तथ्य आहे. परंतु आता ओपन बॅलट सिस्टीममुळे त्यांचा पैसे घेण्याचा अधिकार गेला आहे. परंतु राजकीय पक्ष उमेदवार निश्चित करतांना पक्षाचे नेते कशा प्रकारचा उमेदवार देतील हाही महत्वाचा प्रश्न आहे. म्हणजे आता पर्यंत सुट्टे द्यावे लागत होते. आता होलसेल द्यावे लागतील काय ? असा प्रश्न निर्माण होऊ शकतो. पैशाच्या जोरावर निवडून येणा-या उमेदवारांचा अजून एक फायदा होईल की, पूर्वी फिरुन पैसे वाटावे लागत होते आता एका ठिकाणी जाऊन उमेदवारी घ्यावी लागेल. आपण कोणतीही सिस्टीम आणली तरी त्यामध्ये दोष राहणार आहेत. परंतु भ्रष्टाचाराचे जे सार्वत्रिकरण होते होते, टीका होत होती ती यामुळे थांबणार आहे. पक्षाकडून उमेदवारी देत असतांना पक्षाला काही उत्तरदायित्वे असतात. निश्चितच व्यक्तीगत पातळीवर विचार करण्यापेक्षा पक्षाच्या नेत्याला चांगला विचार करावा लागेल. कारण अलिकडच्या काळामध्ये दुसरी एक पद्धत आली होती की, या निवडणूकीमध्ये मी मिळवून घेतले नाही आणि पुढच्या वेळी माझा मतदारसंघ राखीव झाला तर मी पुन्हा नगरसेवक होणार नाही, जिल्हापरिषद सदस्य होणार नाही म्हणून आता जे मिळेल ते घेऊन मोकळे व्हावे अशी भावना वाढीस लागली होती. ही सुधारणा जिल्हापरिषदेपुरती नको. नगरपालिकेमध्ये आपण असा निर्णय घेतलेला आहे की, निवडून आलेल्या नगरसेवकांमधून आपण नगराध्यक्ष निवडणार आहोत. आपण डायरेक्ट नगराध्यक्ष निवडणार नाही अशा पद्धतीचा निर्णय सरकार घेणार आहे. हा निर्णय झाला तर उद्या नगरपालिकेमध्ये सुध्दा नगराध्यक्ष पदाचा घोडेबाजार होऊ शकतो. सभापती महोदय, जिल्हापरिषद सभापती निवडत असतांना, जिल्हापरिषद अध्यक्ष निवडत असतांना, पंचायत समितीमध्ये सभापती निवडत असतांना अशा प्रकारची मतदान पद्धत राज्यामध्ये सुरु केली जाईल. कारण स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये, विधानसभेमध्ये असा घोडेबाजार चालू देऊन लोकशाहीचे अवमूल्यन सहन केले जाणार नाही

...2/-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ KGS/ MAP/ प्रथम श्री.रोझेकर ......... 15:25

श्री.आर.आर.पाटील .........

त्यादृष्टीने कायद्यामध्ये योग्य वेळी बदल करण्याची भूमिका घेतली जाईल आणि तसा कायदा विधान सभेमध्ये, विधान परिषदेमध्ये आणला जाईल. चांगल्या भावनेने हा ठराव आणलेला आहे. दोन्ही बाजूच्या सदस्यांना काही प्रमाणात सर्वांनाच झळ पोहोचलेली असतांना सुध्दा सर्व सन्माननीय सदस्य या ठरावाला पाठिंबा देत आहेत. आपण आता घडलेल्या गोष्टी सोडून देऊ. भविष्यात असे प्रकार होऊ नयेत. विद्वत्तेच्या, निष्ठेच्या जोरावर या सभागृहात लोक निवडून आले पाहिजेत. सन्माननीय सदस्य श्री.रमेश निकोसे यांनी सांगितले की, घटनेने खूप चांगला अधिकार देशातील जनतेला दिलेला आहे. टाटा, बिर्ला यांना जो मतदानाचा अधिकार आहे तोच अधिकार नगरपालिकेमध्ये झाडू काम करणा-या महिलेला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी महात्मा गांधीजींच्या विचारातून दिलेला आहे. हा अधिकार मिळाला असला तरी अनेक ठिकाणी गैरप्रकार होत आहेत ही गोष्ट सिद्ध झालेली आहे. काही लोक निवडून आलेले बघितल्यानंतर निवडून येणा-यापेक्षा निवडून देणा-यांची किव कराविशी वाटते. जात बघून, धर्म बघून, चुकीचे निकष लावून लोकप्रतिनिधी निवडून दिले जात आहेत. काही लोकांच्या पाठीमागे पोलिसांनी दिवसा बेडया घेऊन धावले पाहिजे. पण आज ते लोक निवडून येत आहेत. पोलिसांनी बेडया तर सोडाच परंतु त्यांच्या समोर उभे राहून त्यांना सॅल्यूट मारण्याचा प्रसंग येतो ही लोकशाहीतील शोकांतिका आहे. याचे उत्तर सभागृहामध्ये मिळणार नाही. याचा विचार राजकीय पक्षाने केला पाहिजे आणि केवळ सत्तेच्या पाठीमागे लागल्यानंतर जे लोकशिक्षण द्यावयास पाहिजे, लोक जागृती करावयास पाहिजे आणि लोक जागृतीने सामान्य माणसाला योग्य पद्धतीने शिकविण्याची भूमिका योग्य पद्धतीने पार पाडली काय .........

यानंतर श्री.सुंबरे ........

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील .....

याचा जर अंतर्मुख होऊन विचार केला तर प्रत्येकजण कोठे ना कोठे दोषी असल्यामुळेच, गुप्त मतदान पद्धती ही जगातील सर्वश्रेष्ठ पद्धत असली तरी गेल्या 50 वर्षात आम्ही लोकशाहीची कर्तव्ये निष्ठेने पार पाडली नाहीत म्हणूनच लोकशाही पद्धतीमध्ये असे जे दोष निर्माण झालेले आहेत ते दूर करण्यासाठी आपण हा प्रयत्न करीत आहोत. हे तात्विक पणे असले तरी या पद्धतीचा अवलंब आपल्याला आज करावा लागतो आहे. ही जी एक चांगली गोष्ट आहे त्यासाठी सर्वांनीच एकत्र येणे हे मी महाराष्ट्र पुरते तरी योग्य मानतो. आपण असे अनेक ठराव येथे करतो पण दिल्लीला संमतीसाठी ते गेल्यावर धूळ खात पडतात हे आपण पाहतो. परंतु या बाबतीत केंद्र सरकारने अगोदरच राज्यसभेसोठी कायदा केला असल्यामुळे आणि त्याच्याशी सुसंगत भूमिका आपण घेतल्यामुळे याला लौकरच संमती मिळेल असे वाटते आणि सरकार म्हणून देखील यास केंद्राची संमती लौकरात लौकर मिळून याची अमलबजावणी होण्यासाठी दिल्लीमध्ये जो पाठपुरावा करावा लागेल तो केला जाईल. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये देखील अशा पद्धतीचे उघड मतदाना पद्धत येण्याच्या दृष्टीने कायद्यात बदल घडवून आणले जातील आणि ज्या काही अनिष्ट प्रथा वाढीस लागल्या आहेत त्या थांबविल्या जातील. म्हणून मी विनंती करतो की, याच सदनामध्ये मी जे मत व्यक्त केले होते, माननीय सभापतींनी निदेश दिले होते, त्यास अनुसरून हा ठराव आणला आहे तो आपण पारित करावा.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, नगरपालिकांच्या बाबतीत देखील लौकरच या दृष्टीने कायदा आणणार आहात असे जे आपण सांगितले त्याबद्दल धन्यवाद. परंतु कालच्या निवडणुकीमध्ये ज्यांच्यामुळे हे सारे घडले आहे आणि त्यामुळे हा कायद्यातील बदल आणला आहे त्याबद्दल त्यांचेही अभिनंदन करणारा ठराव आपण आणणार का ?

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, कालच्या निवडणुकीमध्ये जे घडले त्यामुळे हा ठराव आणलेला नाही. मागील निरोप समारंभामध्ये, त्यापूर्वी अशा प्रकारचा घोडेबाजार थांबविण्यासाठी असा ठराव आणू असे मी सांगितले होते. त्यामुळे कालच्या घटनेमुळे हा ठराव आणला आहे असा निष्कर्ष आपण काढू नका. असा ठराव आणण्याचे कालच्या निवडणुकीपूर्वीच ठरलेले होते.

ठराव मतास टाकून एकमताने संमत झाला.

..... क्यूक्यू 2 ...

**झुणका भाकर केंद्रासंबंधात औचित्याचा मुद्दा.**

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या सदनामध्ये सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी आणलेल्या लक्षवेधी सूचनेच्या निमित्ताने चर्चा झाली होती त्यावेळेस माननीय मंत्री श्री. सुनील तटकरे हे सभागृहात हजर होते आणि आपणही त्यावेळेस झुणका-भाकर केंद्रांच्या बाबतीत काही निर्देश दिलेले होते. त्याचा पाठपुरावा मी आपणाबरोबर तसेच मंत्री महोदयांबरोब केलेला आहे. असे असतानाही चार दिवसापूर्वी मुंबईतील सर्व झुणका-भाकर केंद्रांना नोटीसा आल्या होत्या. त्याही मी आपल्या निदर्शनास आणल्या होत्या. त्यानंतर मी आपल्याला देखील असे विचारले होते की, आपण दिलेल्या निदेशांच्या विरोधात अशी नोटीस आली तर त्यातून हक्कभंग होऊ शकतो काय ? सभापती महोदय, यातून हक्कभंग होऊ शकतो अशी माझी धारणा झाल्या मुळे मी जिल्हाधिकाऱ्यांना पत्र दिलेले आहे की, अशा प्रकारची कोणतीही कारवाई आपण केल्यास त्यातून हक्कभंग होईल. तसेच पत्र मी महापालिका आयुक्तांना देखील दिलेले आहे आणि सहाय्यक आयुक्तांना त्याची प्रत दिलेली आहे. सभापती महोदय, आपण देखील जिल्हाधिकाऱ्यांशी या संदर्भात बोलता आहात असे मला कळले आहे. तेव्हा माननीय सभापतींच्या निदेशाप्रमाणे तुमची रोजीरोटी कोणी हिसकावून घेत नाही असे ही या झुणका-भाकर केंद्रवाल्यांना सांगितले आहे. ...

( यानंतर श्री. सरफरे .... आरआर 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

आणि त्यानंतर माननीय श्री. तटकरे साहेबांनी सांगितले की, त्यासंबंधीची फाईल माननीय मुख्यमंत्री यांचेकडून आलेली असून ती लवकरच मंत्रिमंडळापुढे ठेवून निर्णय घेतला जाईल. अशी परिस्थिती असतांना आणि यासंबंधी आपले जिल्हाधिकारी यांचेबरोबर बोलणे झाल्यानंतर देखील पहिली नोटीस 48 तासाची दिल्यानंतर आज सकाळी पुन्हा 24 तासाची नोटीस देण्यात आली आहे. आणि 24 तासामध्ये ताबा न दिल्यास महानगरपालिका ताबा घेण्याची कारवाई करील असे नोटीशीमध्ये म्हटले आहे. त्यामुळे या संदर्भात नक्की खुलासा होत नाही. आपण निदेश दिल्यानंतर, आपले स्वत: बोलणे झाल्यानंतर, व त्यासंदर्भात आपण पत्र दिल्यानंतर आणि मंत्रिमहोदयांनी असे काही घडणार नाही असे मला सांगितल्यानंतर सुध्दा आज सकाळी नोटीस दिली गेली. आज मुंबईमध्ये आभाळ कोसळत असल्यामुळे असंख्य मुंबईकरांची जी गैरसोय होत आहे अशावेळी मुंबई नगरी स्वच्छ करणे, पाण्याचा निचरा करणे आणि मुंबईचे जनजीवन पूर्वस्थितीत आणणे हे महानगरपालिकेच्या आयुक्तांचे कर्तव्य असतांना नको ते वाद महानगरपालिकेचे आयुक्त उत्पन्न करीत आहेत आणि या सदनाला आव्हानात्मक भूमिकेमध्ये उभे करीत आहेत. सर्वसामान्य माणसांची रोजी रोटी असलेली झ ुणका भाकर केंद्रे सुरु ठेवण्यासंबंधी आपण दिलेला निर्णय पाळण्याची त्यांना आवश्यकता वाटत नाही.यासंबंधी आपणाकडून मार्गदर्शन व्हावे अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आज ज्या सहाय्यक आयुक्तांनी अशाप्रकारची नोटीस पाठविली आहे त्यांच्याविरुध्द हक्कभंगाची सूचना दिली तरच या प्रश्नाला खरे उत्तर मिळेल. नाहीतर ते जागे होणार नाहीत, ती केवळ मलमपट्टी ठरेल. त्यामुळे आपण आपल्या निर्णयामध्ये तसा उल्लेख करणार नसाल तर आम्ही संबंधितांविरुध्द हक्कभंगाची सूचना देऊ.

**उपसभापती** : यामध्ये महत्वाचा प्रश्न असा की, हा गरीबांच्या रोजीरोटीचा प्रश्न असल्यामुळे त्या प्रश्नाला आपण पहिल्यांदा न्याय देऊ. सभागृहामध्ये मी दिलेल्या निदेशाची संबंधित अधिकाऱ्यांकडून अंमलबजावणी होत नसेल तर आपण संबंधितांविरुध्द हक्कभंगाची सूचना सादर करावी. तो आपला अधिकार आहे, या अधिकाराच्या आड मी येऊ इच्छित नाही. परंतु एक गोष्ट स्पष्ट आहे की, जवळपास अडीच हजार झुणका भाकर केंद्रे चालविली जातात त्यापैकी काही लोक सुप्रिम कोर्टामध्ये जाऊ शकले. आणि काही लोक पैशाअभावी जाऊ शकले नाहीत. त्यामुळे एकाला



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती**...

न्याय मिळाला व दुसऱ्यावर अन्याय झाला असे होऊ नये याकरीता या विषयासंबंधी झालेल्या चर्चेच्यावेळी मी दिलेले निदेश शासनाने तंतोतंत लागू करावेत. आणि अशाप्रकारची नोटीस पुन्हा देण्यात येऊ नये.

श्री. सतीश चतुर्वेदी (वस्त्रोद्योग मंत्री) : सभापती महोदय, होय.

**उपसभापती** : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 4.15 वाजता पुन: भरेल.

(3.38 ते 4.15 मध्यंतर)

-----

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(मध्यंतरानंतर)

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

**औचित्याच्या मुद्याबाबत.**

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, काल जशी पावसाची परिस्थिती होती, तशीच आजही आहे. याबाबत बाहेर काय परिस्थिती आहे, यासंबंधात शासन निवेदन करत नाही. सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांनी सांगितले की, शिवडी येथे कमरेपर्यन्त पाणी आहे. आता जाताना काय परिस्थिती होईल, हे सांगता येत नाही. तेव्हा याबाबत शासनाने निवेदन करायला पाहिजे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय,सन्माननीय पुनर्वसन मंत्री डॉ.पतंगराव कदम यांनी मंत्रालयामध्ये प्रेस कॉन्फरन्स घेतली. ती चॅनेलवाल्यांनी दूरदर्शनवर दाखविली. ती आम्हाला पहायला मिळाली. त्यांनी विधानसभेमध्येही निवेदन केले. परंतु आपल्या सभागृहात अतिवृष्टीच्याबाबतीत निवेदन केलेले नाही.

**उपसभापती** : सन्माननीय राज्यमंत्री डॉ.राजेंद्र शिंगणे हे निवेदन करणार आहेत.

--

**पृ.शी. व मु.शी.**: राज्यातील पाऊस व पूर परिस्थितीच्या संबंधाने माननीय पुनर्वसन राज्यमंत्री डॉ.राजेंद्र शिंगणे यांचे निवेदन.

डॉ.राजेंद्र शिंगणे (पुनर्वसन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्रातील विविध जिल्हे व विभागीय कार्यालयांकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार दिनांक 5-7-2006 ची पावसाबाबतची दैनंदिन माहिती सांगतो.

**गडचिरोली**

सभापती महोदय, गडचिरोली जिल्ह्यात 61.06 मि.मि. इतक्या पावसाची नोंद झाली आहे. 20 कुटुंबांचे स्थलांतर करण्यात आले आहे. श्री.पुरुषोत्तम खेडेकर, मौजे हिरापूर हा इसम पाण्यात वाहून गेला आहे. दिनांक 4-7-2006 रोजी बंद पडलेले सर्व मार्ग आज मोकळे झाले आहेत. तथापि, भामराग तालुक्याशी संपर्क तुटला आहे. जिल्ह्यात पूर परिस्थिती नसून नुकसानीचा कोणताही अहवाल नाही. जीवित व वित्त हानी झाल्याचा अहवाल नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MHM/

डॉ.राजेंद्र शिंगणे (पुढे सुरु....

**<u>सांगली</u>**

सांगली जिल्ह्यात पाऊस सर्वसाधारण असून कृष्णा नदीचया काठावरील एकूण 9 कुटुंबांचे सथलांतर सुरक्षित स्थळी करण्यात आले आहे. धोम, वारणा, कोयना या धरणातील पाण्याचा विसर्ग सर्वसाधारण पातळीवर आहे. यामुळे जिल्ह्यातील नद्यांची पातळी धोक्याच्या पातळीपेक्षा कमी म्हणजेच सर्वसाधारण आहे. यामुळे पूर परिस्थिती नसून नुकसानीचा कोणताही अहवाल नाही. तसेच जीवित व वित्त हानी झाल्याचा अहवाल नाही.

**<u>रत्नागिरी</u>**

रत्नागिरी जिल्ह्यात 126.26 मि.मि. पावसाची नोंद झाली. जीवित व वित्त हानी झाल्याचा अहवाल नाही.

**<u>गोंदिया</u>**

गोंदिया जिल्ह्यात अ अतिवृष्टी झाल्याची नोंद नाही. तसेच पूर परिस्थिती नसून कोणतेही नुकसान झाल्याचा अहवाल नाही. जीवित व वित्त हानी झाल्याचा अहवाल नाही.

**<u>चंद्रपूर</u>**

नागपूर विभागीय कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या अहवालानुसार 5 व्यक्ती नैसर्गिक आपत्तीने मृत झाल्या आहेत, 3 व्यक्ती घरगुती विजेचा धक्का लागून मत झाल्या आहेत. 1 व्यक्ती मासे पकडण्यास केली असता बुडून मृत झाली आहे. या व्यतिरिक्त वित्त हानी झाल्याचा अहवाल नसून जिल्ह्यात पूर परिस्थिती नाही.

**<u>कोल्हापूर</u>**

कोल्हापूर जिल्हयातील 4 तालुक्यातील अतिवृष्टीची नोंद झाली असून, सर्वाधिक पाऊस गगनबावडा येथे 458 मि.मि. नोंदलेला आहे. राधानगरी 181 मि.मि., शाहुवाडी 84 मि.मि. व चंदगड 96 मि.मि. पावसाची नोंद असून शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या राजाराम बंधाऱ्यातील पाण्याने इशारा पातळी ओलांडली आहे. या तलावाची धोक्याची पातळी 43 असून आजची पातळी 40 आहे. शहरात सतर्कतेचा इशारा देण्यात आला असून, जीवित व वित्त हानी होऊ नये म्हणून महसूल अधिकाऱ्यांच्या धोक्याच्या ठिकाणी नेमणुका करण्यात आल्या आहेत. पंचगंगा नदीच्या परिसरात व विसगावच्या परिसरात अतिवृष्टी झाल्याने पाण्याची पातळी केव्हाही वाढू शकते. तथापि सध्या पंचगंगा नदीची पूर परिस्थिती नियंत्रणाखाली आहे.

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. राजेंद्र शिंगणे ......

शिरोळ व हातकणंगले तालुक्यात पूरपरिस्थिती उद्‌भवल्यास संपर्क तुटू नये म्हणून 5 बोटी तैनात करण्यात आल्या आहेत. आजचे पर्जन्यमान सर्वसाधारण आहे.

**सातारा**

सातारा जिल्ह्यात 2 व्यक्ती पुराच्या पाण्यात वाहून गेल्या. त्यापैकी 1 पुरुष व 1 बारा वर्षाची मुलगी आहे.

**जळगाव**

जळगाव जिल्ह्यात सर्व तालुक्यात अतिवृष्टी आहे. जळगाव-240 मि.मी., धरणगाव-83 मि.मी., एरंडोल - 218 मि.मी., यावल - 215 मि.मी. चोपडा - 322 मि.मी. असा पाऊस झालेला आहे. चोपडा शहरामध्ये पाणी भरले आहे. 5 व्यक्ती मृत आहेत. 50 म्हशी वाहून गेल्या आहेत. तापी नदीवरील हातनूर धरणाचे एक लाख सी.पू.एस.सी. पाणी सोडले आहे. आजूबाजूच्या गावांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. संपूर्ण जळगाव जिल्ह्यामध्ये 291 मि.मी. पावसाची नोंद झाली. चोपडा तालुक्यात कुटुंबाचे स्थलांतर करण्याची प्रक्रिया सुरु असून तेथे होमगार्डची कुमक पाठविली आहे. चोपडा येथे एअरफोर्स तसेच रेस्क्यू टीमची मदत आणि 2 बोटी पाठविण्यात येत आहेत. धरणगावमध्ये 1 महिला ठार झाली.

**सिंधुदुर्ग**

सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये गेल्या 24 तासात पडलेला पाऊस 70.5 मि.मी. तसेच सर्वात जास्त पाऊस वैभववाडी येथे 230 मि.मी. पडलेला आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात कोणीही मृत नाही.

सावंतवाडी येथे पोलीस वसाहतीत झाडे पडल्याने 4 घरांचे नुकसान झाले. नुकसानीची रक्कम 47,500 रुपये आहे. जिल्ह्यात 1 घराचे पूर्णत: नुकसान, 20 घरांचे अंशत: नुकसान तसेच 5 गोठ्यांचे नुकसान असे एकूण नुकसान 1,17,570 रुपयांचे झाले आहे. जिल्ह्यात एकूण झालेले नुकसान 2,25,670 रुपयांचे आहे. जनावरांचे नुकसान यामध्ये मोठ्या 1 मोठ्या जनावराचे नुकसान झाले आहे. जिल्ह्यात आज सकाळपासून हलक्या स्वरुपाचा पाऊस आहे. कोठेही पूर परिस्थिती नाही. कुटुंबाचे स्थलांतर करावे लागले अशी परिस्थिती नाही.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP

डॉ. राजेंद्र शिंगणे .....

**ठाणे**

ठाणे जिल्ह्याचा सरासरी पाऊस 120 मि.मी. आहे. ठाणे येथे 181 मि.मी., वसई येथे सर्वात जास्त म्हणजे 234 मि.मी. पाऊस पडलेला आहे. जिल्ह्यात कोठेही पूरपरिस्थिती नाही तसेच जीवित व वित्तहानी नाही. वसई तालुक्यात 2 घरांचे अंशत: नुकसान झाले आहे. सर्व वाहतूक सुरळीत सुरु आहे.

**मुंबई शहर व उपनगर**

मुबई शहरामध्ये 213 मि.मी. आणि मुबई उपनगरामध्ये 231 मि.मी. पाऊस झाला. काल सायंकाळपासून मुंबई शहर व उपनगरात पाऊस थांबलेला होता. पुन्हा आज सकाळपासून मध्यम स्वरुपाचा पाऊस पडत आहे. मिठी नदी भरुन वाहात आहे. मध्य व पश्चिम रेल्वे सुरु आहे. मिलन सबवे येथे पाणी भरलेले आहे. मुंबईत पुढील ठिकाणी पाणी भरले आहे. मालाड सबवे, सरदार हॉटेल काळाचौकी, आंबेडकर रोड, राठोड मार्ग, माझगाव, हिंदमाता, डी.ए.रोड, अमुलक हायस्कूल, वडाळा, किडवई रोड, सायन रोड नंबर-24, मंदाळा चित्ता कॅंप, चेंबूर, के.एन.रोड दहिसर, दहिसर सबवे, नॅशनल कॉलेज एस.व्ही.रोड, ठाकूर कॉलेज, कांदिवली वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, दौलतनगर, बोरीवली.

**रिलायन्स एनर्जी**

यांच्या 7 सबस्टेशनचा विद्युत पुरवठा बंद केलेला आहे. त्यापैकी अंधेरी (प)- लिंक रोड येथील 3 सबस्टेशन व गोरेगाव (पू) येथील 4 सबस्टेशन हे बंद आहेत. अंधेरी हे व्यापारी क्षेत्र आहे तर गोरेगाव येथे 3 सबस्टेशनचे निवासी क्षेत्र आहे व 1 औद्योगिक क्षेत्र आहे. लगतच्या क्षेत्रात थोडे पाणी भरलेले असल्याने वीज पुरवठा बंद केला आहे.

**औरंगाबाद विभाग**

औरंगाबाद विभागातील औरंगाबाद जिल्ह्यात 7 तालुक्यात, परभणी जिल्ह्यातील 1 तालुका, हिंगोली जिल्ह्यातील 3 तालुक्यात व नांदेड जिल्ह्यातील 6 तालुक्यात अतिवृष्टी म्हणजे 65 मि.मी. पेक्षा जास्त पर्जन्यमान नोंदण्यात आलेले आहे. या अतिवृष्टीत औरंगाबाद जिल्ह्यातील सिल्लोड तालुक्यातील 1 इसम ओढ्यात वाहून मरण पावला आहे. सदरची अतिवृष्टी ही चालू मान्सूनमध्ये

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP

डॉ. राजेंद्र शिंगणे ....

पहिल्यांदाच होत असल्यामुळे विशेष वित्तहानी झाली नाही. तथापि नदी व ओढ्याकाठील जमीन वाहून गेल्याचे प्रकार काही ठिकाणी घडले आहेत. त्यांचे सर्वेक्षण सुरु करण्यात आले आहेत. जिल्हानिहाय अतिवृष्टी झालेली माहिती खाली दर्शविल्याप्रमणे आहे. याशिवाय या विभागातील खालील जिल्ह्यात त्यांचेसमोर दर्शविल्याप्रमाणे पर्जन्यमान झालेले आहे. बीड-17.6 मि.मी., लातूर-19.3 मि.मी. उस्मानाबाद 7.6 मि.मी., जालना-45.9 मि.मी.

**औरंगाबाद-85.0 मि.मी.**

सिल्लोड-66.4 मि.मी., फुलउंबरी-77.3 मी.मी., सोयगाव-71.5 मि.मी., वैजापूर-94.9 मि.मी., गंगापूर-96.6 मि.मी. कन्नड-113.8 मि.मी., खुलताबाद-129.0 मि.मी..

**परभणी-44.5 मि.मी.**

पूर्णा-87.2 मि.मी.

**हिंगोली- 68.1 मि.मी.**

बसमत-85.2 मि.मी., कळमनुरी-69.0 मि.मी., औंढा-91.0 मि.मी.

**नांदेड-56.7 मि.मी.**

बिलोली-90.0 मि.मी., उमरी-69.0 मि.मी., किनवट-84.0 मि.मी., हिमायतनगर-79.0 मि.मी. माहूर- 93.0 मि.मी. धर्माबाद-80.0 मि.मी.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MHM/ (पूर्वी श्री. बरवड) 16:25

(डॉ. राजेंद्र शिंगणे....)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## अमरावती

अमरावती विभागातील अमरावती जिल्ह्यातील 5 तालुक्यात, अकोला जिल्ह्यातील 5 तालुक्यात, यवतमाळ जिल्ह्यातील 7 तालुक्यात व बुलढाणा जिल्ह्यातील 8 तालुक्यात अतिवृष्टी झालेली आहे. या विभागात पर्जन्यास नुकतीच सुरुवात झालेली असून प्राणहानी झालेली नाही. मात्र अमरावती जिल्ह्यात 1 महिला व 1 मुलगा वाहून जाऊन मृत्यूमुखी पडले आहेत. तसेच बुलढाणा जिल्हयात 1 व्यक्ती व वाशिम जिल्हयात 1 व्यक्ती वाहून गेली आहे. म्हणजेच अमरावती विभागात एकूण 4 व्यक्ती मृत्या झाल्या आहेत. या शिवाय विभागातील जनजीवनावर काही परिणाम झाला असला तरी सध्या पाऊस थांबलेला असल्याने जनजीवन पूर्वपदावर येत आहे. या विभागातील अतिवृष्टी झालेल्या तालुक्यांची जिल्हानिहाय माहिती खालीलप्रमाणे आहे.

## अमरावती

अमरावती - 71.6.मिमी., चांदूर रेल्वे 123.0 मिमी, धामणगाव रेल्वे 104.0 मिमी, वरुड 173.0 मिमी, चिखलदरा 82.4 मिमी.

## अकोला

अकोला 101.0 मिमी, बार्शी टाकळी 66.0 मिमी, आकोट 78.0 मिमी, तेल्हारा 84.0 मिमी, बाळापूर 130.0 मिमी.

## यवतमाळ

बाभूळगाव 72.0 मिमी, कळंब 104.0 मिमी, केळापूर 73.0 मिमी, घाटंजी 85.0 मिमी, राळेगाव 203.0 मिमी, वणी 110.0 मिमी, मारेगाव 115.0 मिमी.

## बुलढाणा

बुलढाणा 70.0 मिमी, मलकापूर 111.0 मिमी, नांदूरा 105.0 मिमी, मोताळा 115.0 मिमी, खामगाव 198.0 मिमी, शेगाव 147.0 मिमी, जळगाव जामोद 86.0 मिमी, संग्रामपूर 190.0 मिमि.

याप्रमाणे महाराष्ट्रातील जिल्ह्यांची पावसाची आजची सर्वसाधारण परिस्थिती आहे.

श्री. जयंत प्र.पाटील : माननीय उपसभापती महोदय, मला या निवेदनाच्या अनुषंगाने शासनाला सूचना करावयाची आहे. मागील वर्षाच्या अनुभव असा आहे की, पूर परिस्थितीचा फटका बसल्यानंतर ब-याच अवधीने नुकसान भरपाई संदर्भात सर्वेक्षण आणि पंचनामे केले जातात आणि

..2..

(श्री. जयंत प्र. पाटील...)

त्यानंतर त्याबाबत याठिकाणी चर्चा होते. आता झालेल्या अतिवृष्टीमुळे जे जे काही नुकसान झालेले आहे, जी प्राणहानी वा वित्तहानी झालेली आहे त्याचे ताबडतोब पंचनामे करुन घेण्यासंबंधीचे आदेश महसूल खात्याने संबंधितांना दिले पाहिजेत.

डॉ. राजेंद्र शिंगणे : ज्या ज्या ठिकाणी वित्तहानी, प्राणहानी, शेतीचे नुकसान अथवा अन्य कोणत्याही प्रकारचे नुकसान झालेले असेल तर त्याबाबतचे पंचनामे ताबडतोबीने करुन त्याची माहिती शासनाला देण्याचा सूचना सर्व जिल्हाधिका-यांना आणि आयुक्तांना दिलेल्या आहेत.

--

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभागृहाच्या कामकाजाबाबत**

**उपसभापती** : आता मी सभागृहापुढील कामकाजाचा क्रम सांगतो. आता प्रथम औचित्याचे मुद्दे त्यानंतर लक्षवेधी सूचना, विशेष उल्लेख, विधेयके आणि त्यानंतर विरोधी पक्षनेत्यांचा प्रस्ताव घेण्यात येईल. याबाबत कोणाला काही सूचना करावयाच्या आहेत काय ?

श्री. पांडुरंग फुंडकर : विधेयके नंतर घ्यावीत.

**उपसभापती** : विधेयके आज घ्यावी लागतील. आता औचित्याचे मुद्दे घेण्यात येतील.

---

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>औचित्याचा मुद्दा</u>**

श्री. रामनाथ मोते : माननीय उपसभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अंध व अपंगांच्या प्रश्नाकडे या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाचे लक्ष वेधित आहे.

महाराष्ट्रामध्ये अंध आणि अपंगासाठी अनेक शाळा कार्यरत आहेत. या शाळांतून अंध आणि अपंग विद्यार्थी शिक्षण घेतात. Person with Disability Protection of Right and Full Participation Act, 1995 या केन्द्र शासनाच्या ॲक्ट मधील सेक्शन 2(3) नुसार " a person with disability" ची व्याख्या दिलेली आहे. त्यामध्ये अपंगत्वाची मर्यादा 40 टक्के दिलेली आहे.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते........

शासनाने मात्र अंध अपंगांच्या शाळांमध्ये ही अपंगत्वाची अट किमान मर्यादा 40 टक्क्यावरुन 60 टक्के केली असल्याने अनेक विद्यार्थी अंध व अपंग असूनही त्यांना अंध व अपंगांच्या शाळांमध्ये प्रवेश दिला जात नाही. त्यामुळे हे सगळे विद्यार्थी शिक्षणापासून वंचित आहेत. सभापती महोदय, हा विषय 3-4 वर्षापूर्वी या सदनामध्ये चर्चेला आला होता. तत्कालीन सभापती महोदयांनी शासनाला आदेश दिले होते की, 1995 च्या ॲक्टमध्ये तरतूद आहे 40 टक्के, तीच लागू करावी. आजही महाराष्ट्रामध्ये 60 टक्के अपंगत्व असेल तरच प्रवेश दिला जातो. त्यामुळे अनेक विद्यार्थी शिक्षणापासून वंचित आहेत. म्हणून या औचित्याच्या माध्यमातून मी सामाजिक न्याय विभागाचे या गोष्टीकडे लक्ष वेधू इच्छितो आणि आपल्याला या माध्यमातून नम्र विनंती करतो की, आपणही सामाजिक न्याय विभागाला निदेश द्यावेत.

----------

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, राज्यात सध्या पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. परिणामी मुंबईला होणारा भाजीपाल्याचा पुरवठा होत नसल्याने मुंबईत भाजीपाल्याची तीव्र टंचाई निर्माण होऊन भाजीपाल्याचे भाव वाढले आहेत. त्यामुळे सामान्य लोकांना प्रचंड महागाईला सामोरे जावे लागत आहे. शासनाने गोरगरीब जनतेला या महागाईपासून वाचविण्यासाठी उपाययोजना करण्याची नितांत आवश्यकता आहे. तसेच या अतिवृष्टीने ठिकठिकाणी पाणी साचून त्याचे दुष्परिणाम होण्याचे म्हणजे अनेक प्रकारच्या रोगाला आमंत्रण मिळणार आहे. उदा.लॅप्टोस्पायरोसिस, मलेरिया, डायरिया अशा महामारीसारख्या रोगाची नागरिकांना झळ पोहोचण्याची शक्यता निर्माण झाल्याने याकडे शासनाचे लक्ष वेधून तातडीने उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. यासाठी या अत्यंत महत्वाच्या सार्वजनिक बाबीविषयी मी औचित्याचा मुद्दा सादर करीत आहे.

----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी : सभापती महोदय, मी सर्वप्रथम मंत्रीमहोदय डॉ.राजेंद्र शिंगणे यांचे आभार मानतो. ते माझा मुद्दा ऐकण्यासाठी सभागृहात थांबले आहेत. मुंबईत पाऊस पडला, मिठी नदीचे कुठे काही झाले की मिडिया आणि सभागृहाचे त्याकडे लक्ष जाते. परंतु जून महिन्यामध्ये बीड, संभाजीनगर आणि लातूर या मराठवाडयातील तीन जिल्हयांमध्ये वीज पडून 75 पेक्षा जास्त व्यक्ती मृत्युमुखी पडल्या. एका वीज पडून मृत्यू पावलेल्या इसमाच्या पत्नीला जिल्हाधिकारी कार्यालयात हेलपाटे घालताना पाहून माझ्या डोळयात पाणी आले. वर्षानुवर्षे अशी वीज पडून माणसे मरतात. या कारणामुळे मनुष्यहानी होऊ नये यादृष्टीने उपाय करणे शक्य आहे. मी याबाबत तज्ञ लोकांशी चर्चा केली. त्यांचे म्हणणे आहे की, हे अवघड नाही. परदेशात देखील विजा पडतात, परंतु मनुष्यहानी होत नाही. यामुळे होणारी मनुष्यहानी टाळणे अशक्य नाही. एका गावामध्ये 500 मीटर अंतराच्या सहाय्याने ऊंच भाग पाहून वीज कॅच करणारी यंत्रणा ठेवली तर मनुष्यहानी टाळता येऊ शकेल. शहरामध्ये वीज पडून माणसे मेली नाहीत, गोरगरीब शेतामध्ये जाणारे कामगार मेले ही वस्तुस्थिती आहे. हे तांत्रिकदृष्टया थांबविणे शक्य आहे. यासाठी शासनाला फार मोठा खर्च येणार नाही हे मी गांभीर्याने सांगू इच्छितो. हे करण्याची संपूर्ण जबाबदारी तेथील इंजिनिअरिंग कॉलेज घ्यायला तयार आहे. त्यासाठी सरकारने समिती नेमावी आणि सरकारने कारवाई करावी अशी मी अपेक्षा करतो.

-------

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती संजीवनी रायकर : उपसभापती महोदय, आताच अपंग विद्यार्थ्यांच्या संदर्भात प्रश्न उपस्थित करण्यात आला होता त्यामुळे यासंदर्भात मला असे म्हणावयाचे आहे की, अपंग शाळेतील शिक्षकांना मार्च, एप्रिल आणि मे महिन्याचे पगार मिळाले नव्हते परंतु मी संबंधितांना भेटून हे पगार त्यांना देण्यास भाग पाडले परंतु आता पुन्हा या शिक्षकांना दोन महिन्यापासून पगार मिळालेले नाहीत. व्यवसाय शिकविणा-या शिक्षकांना दोन महिन्यापासून पगार मिळालेले नाहीत, एमसीव्हीसीच्या शिक्षकांनाही तीन महिन्यापासून पगार मिळालेले नाहीत. एक तर आपण शिक्षकांचे पगार वेळेवर करीत नाही व वरुन त्यांना अजून दुसरे काम सांगतात हे काही बरोबर नाही. त्यामुळे शिक्षकांचे पगार वेळेवर मिळावेत अशी विनंती आहे.

-------------

## लक्षवेधी सूचना क्र. 1 व 2 संबंधी

**उपसभापती** : आजच्या कामकाज पत्रिकेतील लक्षेवधी सूचना क्रमांक 1 व लक्षेवधी सूचना क्रमांक 2 पुढे ढकलण्यात आलेली आहे. आता लक्षवेधी सूचना क्रमाक 3 घेण्यात येईल.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मुंबईतील एकूण 10 गिरण्या विकण्याचा राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाने घेतलेला निर्णय

**मु. शी** : मुंबईतील एकूण 10 गिरण्या विकण्याचा राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाने घेतलेला निर्णय यासंबंधी सर्वश्री गुरुनाथ कुलकर्णी, जितेंद्र आव्हाड, विनायकराव मेटे, श्रीमती मंदा म्हात्रे, प्रा. फौजीया खान, श्री. वसंतराव चव्हाण वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सन्माननीय कामगार मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" मुंबईतील दिग्विजय टेक्सटाईल, स्वदेशी मिल, हिंदुस्थान मिल, इंडिया युनायटेड नं 2,3 व 4, न्यू हिंद केसरी मिल, कोहिनूर नं 1, अपोलो मिल, भारत टेक्सटाईल मिल व जाम मिल अशा एकूण 10 गिरण्या विकण्याचा राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाने नुकताच घेतलेला निर्णय, या गिरण्या विकण्यास राज्य शासनाने संमती द्यावी अशी विनंती जून 2006 मध्ये शासनाकडे करणे, एका पाठोपाठ एक अशा गिरण्या विकण्याचा सुरु असलेला डाव व त्याला राज्य शासनाची मिळत असलेली साथ, गिरणी कामगारांचे कोट्यवधी रुपये येणे असूनसुध्दा त्यांना त्यांच्या हक्काची रक्कम न मिळणे, परिणामी त्यांच्यात पसरलेला तीव्र असंतोष, गिरण्यांच्या जमिनी विकून येणाऱ्या निधीतून आधी कामगारांची देणी देण्याची नितांत आवश्यकता, शासनाने जमीन विक्रीस परवानगी देताना कामगारांची देय असलेली रक्कम आधी देण्याची शिफारस करुनच जमीन विक्रीला परवानगी देण्याची आवश्यकता, यावर शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना."

श्री. गणेश नाईक ( कामगारमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

--------

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : उपसभापती महोदय, राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाने ज्या गिरण्या बंद केल्या आणि ज्या गिरण्या विक्रीस काढल्या आहेत परंतु असे असतांना गिरणीमध्ये काम करणा-या कामगारांची देणी अद्यापपर्यंत दिली गेली नाही त्यामुळेच या ठिकाणी ही लक्षवेधी सूचना मांडण्यात आलेली आहे. या गिरण्या बंद झाल्यानंतर त्यांची जमीन विकण्याची त्यांना परवानगी दिल्यानंतर सुध्दा या ठिकाणच्या कामगारांची देणी दिली गेली नाही. त्यामुळे नॅशनल टेक्सटाईल कार्पोरेशनने या गिरणी मालकांना जमीन विकण्याची परवानगी कशी काय दिलेली आहे? गिरण्यामध्ये काम करणा-या गिरणी कामगांराना देणी देण्याच्या संदर्भात शासनाची भूमिका काय आहे? लक्षवेधी सूचनेमध्ये म्हटले आहे की, एप्रिल, 2005 मध्येक मा. उच्च न्यायालयाने पर्यावरणवादी संघटनेने दाखल केलेल्या जनहित याचिकेमध्ये अंतरीम निर्णय देऊन जमिनीच्या विकासास स्थगिती दिली होती. तद्नंतर सदर याचिकेवर दि. 17.10.2005 रोजी अंतिम निर्णय देऊन नगर विकास विभागाने जमिनीच्या विकासाबाबत जारी केलेली सुधारीत विकास नियंत्रण नियमावली रद्दबातल केली व त्यांनतर सदरचे प्रकरण सर्वोच्च न्यायालयामध्ये अपिलात गेल्यानंतर मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. 7.3.2006 रोजी शासनाची सुधारित विकास नियंत्रण नियमावली वैध ठरविली आहे. न्यायालयीन प्रक्रियेमुळे एप्रिल 2005 ते मार्च 2006 या कालावधीत जमिनीच्या विकासाची बाब न्यायप्रविष्ट असल्यामुळे प्रलंबित होती. त्यामुळे मला असे विचारावयाचे आहे की, असे असतांनाही कामगारांना अजूनपर्यंत देणी मिळालेली नाही. काही प्रकरणे हाय कोर्टात गेलेंली आहेत, लिक्वीडेटर नेमलेले आहेत, त्यांच्याकडे पैसे सुध्दा उपलब्ध आहेत त्यामुळे कामगांरांची देणी देण्याच्या संदर्भात शासनाचे काय धोरण आहे?

श्री. गणेश नाईक : उपसभापती महोदय, मुंबईतील एकंदर 61 गिरण्यांपैकी 35 गिरण्या खाजगी आहेत, 25 गिरण्या राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाच्या आहेत, व एक गिरणी महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळाची आहे. एनटीसीकडे असणा-या 25 गिरण्यांपैकी 15 गिरण्या बंद पडलेल्या आहेत व 10 गिरण्या सुरु आहेत व 15 गिरण्यांमधील कामगांराची सर्व देणी देण्यात आलेली आहे. तसेच 35 खाजगी गिरण्यांपैकी 23 गिरण्यांमधील कामगांराची संपूर्ण देणी देण्यात आलेली असून 5 गिरण्यांची देणी अंशत: देण्यात आली असून खटाव आणि श्रीनिवास या 2 गिरण्यांची देणी

....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गणेश नाईक .....

देण्यात आलेली नाही. त्यामुळे या ठिकाणच्या कामगारांना देणी देण्याच्या संदर्भात खात्याच्या अधिका-यांना सांगितले आहे खटाव मिलचे एआयएफआर प्रकरण 26.12.2005 पासून पुर्नविचारासाठी बीआयएफआर कडे पाठविण्यात आले असल्यामुळे गिरणी विकण्याची परवानगी मिळालेली आहे व त्यामुळे कामगारांना देणी देण्याचा मार्ग मोकळा होईल. तसेच श्रीनिवास गिरणीचे प्रकरण प्रलंबित असून श्री. लोढा व हिरानंदानी या दोन बिल्डरांमुळे हे प्रकरण कोर्टात गेलेले आहे.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गणेश नाईक....

बंद पडलेल्या गिरण्यांच्या कामगारांची देणी देण्यासाठी आमची यंत्रणा कायम कार्यरत आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, ज्या कामगारांची देणी देण्यात आलेली नाही त्यांची देणी देण्यासाठी आमचा विभाग कार्यरत आहे. मला मंत्रिमहोदयांना विचारावयाचे आहे की, तुमचे संपूर्ण कामगार आयुक्तालय नेमके काय काम करते ? आज कामगार देशोधडीला लागलेला आहे. त्यांची देणी देण्यात आलेली नाही. खटाव मिलच्या बाबतीत बोलावयाचे झाले तर हायकोर्टाने आदेश देऊनही पैसे वसूल झालेले नाहीत अशी असहाय्यता का निर्माण झालेली आहे ?

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, मी मघाशी सांगितल्याप्रमाणे 35 खाजगी गिरण्यांपैकी 30 गिरण्यां बंद आहेत. त्यातील 23 गिरण्यांतील कामगारांची पूर्ण देणी देण्यात आलेली आहेत.. 5 गिरण्यांतील कामगारांची अंशत: देणी देण्यात आलेली आहे. खटाव मिल आणि श्रीनिवास मिल या दोन मिलमधील गिरण्यांची देणी द्यावयाची आहेत. खटाव मिलचे प्रकरण AIFR मध्ये होते ते BIFR मध्ये आणण्यात आले आहे. जर मालकाला कामगारांची देणी देता येत नसेल तर मिल दुसऱ्या कोणाला तरी विकून कामगारांचे पैसे द्यावेत अशी परिस्थिती निर्माण करावी अशी परिस्थिती आता लवकरच येणार आहे. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांना मी सांगू इच्छितो की, एका कालखंडात कामगारांची देणी देण्यात आली नव्हती, परंतु आता परिस्थिती बदलली आहे. मी स्वत: कामगार मंत्री म्हणून मिलच्या मालकांची आणि शासकीय अधिकाऱ्यांची बैठक घेऊन कामगारांची देणी देण्याचा प्रयत्न केलेला आहे. खटाव मिल आणि श्रीनिवास मिलबाबत दोन वर्षापूर्वी जी परिस्थिती होती ती आता सुधारली आहे. लोढा आणि हिरानंदानी यांच्यातील प्रकरण हायकोर्टात प्रलंबित आहे. खटाव मिलचे मालक जर तयार असतील तर हे प्रकरण एक्स्पीडाईट करु. तेव्हा हे प्रकरण चार-पाच महिन्यांत मिटू शकेल. तसेच श्रीनिवास मिलचे प्रकरण देखील लवकरच संपेल.

-----------

**उपसभापती** : आजच्या कामकाजपत्रिकेतील चौथ्या क्रमांकावरील लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात आली आहे. आता मी पुढील लक्षवेधी पुकारीत आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : क्राय संघटनेने कुपोषित 11 मुलांना राजावाडी रुग्णालयामध्ये दाखल केल्यामुळे महानगरपालिकेत उडालेली खळबळ

**मु. शी.** : क्राय संघटनेने कुपोषित 11 मुलांना राजावाडी रुग्णालयामध्ये दाखल केल्यामुळे महानगरपालिकेत उडालेली खळबळ यासंबंधी सर्वश्री संजय दत्त, गोविंदराव आदिक, धनाजी साठे, सुधाकर गणगणे, प्रतापसिंह मोहिते-पाटील, विनोद तावडे, श्रीमती कांता नलावडे, सर्वश्री नितीन गडकरी, रामनाथ मोते, सागर मेघे, पांडुरंग फुंडकर, प्रा.शरद पाटील, श्री.जयंत पाटील, डॉ.दीपक सावंत, श्री.विलास अवचट, डॉ.नीलम गोऱ्हे, सर्वश्री सुरेश जेथलिया, अनिल परब, मधुकर सरपोतदार, अरविंद सावंत, गुरुनाथ कुलकर्णी, विनायकराव मेटे,श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री नवनाथ आव्हाड, राजेंद्र जैन, प्रा.फौजिया खान, सर्वश्री जितेंद्र आव्हाड, लक्ष्मण जगताप, सदाशिवराव पोळ, सय्यद मुझफ्फर हुसेन ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. संजय दत्त ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदय,मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" मुंबई शहरात दिनांक 10 जून 2006 रोजी वा त्या सुमारास राजावाडी रुग्णालयामध्ये कुपोषित 11 मुलांना क्राय या संघटनेच्या कार्यकर्त्यांनी दाखल केल्यानंतर महापालिकेत उडालेली खळबळ, ही मुले कुपोषणामुळे कमालीची अशक्त असणे,पायात कोणतीही ताकद नसल्याने धड उभीही राहू न शकणे, भांडूपच्या शामनगर, गोविंदनगर, भवानीनगर आणि चामुंडानगर या चार झ ोपडपट्टयांमध्ये क्रायने पाहणी केल्यानंतर 218 लहान मुले अशक्त असल्याचे आढळून येणे, त्यापैकी 135 मुले कुपोषित असल्याचे आढळून येणे, 11 मुलांची प्रकृती ढासळू लागल्याने त्यांना तातडीने राजावाडी इस्पितळात दाखल केल्यानंतर महापालिकेत आणि जनतेत उडलेली खळबळ आणि पसरलेले चिंतेचे वातावरण, शासनाच्या आडमुठ्या धोरणामुळे जनतेत पसलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना व याबाबत शासनाची प्रतिक्रिया"

..3..

श्री.हर्षवर्धन पाटील ( महिला व बालकल्याण मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

....4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, मुंबईसाख्या प्रगतशील आंतरराष्ट्रीय शहरामध्ये असे प्रकार होऊ शकतात याबद्दल आम्हा सर्वांना खरोखर लाज वाटावी अशी गोष्ट आहे. माझे फक्त दोन स्पेसिफीक प्रश्न आहेत.

यानंतर श्री.पुरी...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त....

भांडूप (पूर्व) येथील चांमुडा नगर आणि भवानी नगर वस्त्यांमध्ये 218 बालकांपैकी 134 बालके म्हणजे 54 टक्के बालके कुपोषित असल्याचे "क्राय" संस्थेला सर्व्हेक्षणामध्ये आढळून आले आहे, हे खरे आहे काय ? त्यापैकी 22 बालके कुपोषित असून ती तिसऱ्या व चौथ्या श्रेणीमध्ये असल्याचे आरोग्य विभागाला कळविले होते. आरोग्य विभागाने दखल न घेतल्याने 9 जून रोजी या मुलांना अत्यंत सिरिअस अवस्थेत राजावाडी रुग्णालयात दाखल करण्यात आले, हे खरे आहे काय ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, जी बालके रुग्णालयामध्ये दाखल झाली होती, त्या बालकांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली होती. अनेक कारणांनी ती बालके आजारी असल्यामुळे किंवा त्यातील काही बालकांना हायजनिक कंडिशनमध्ये त्याठिकाणी स्लम असल्यामुळे त्या वातावरणामध्ये ती बालके आरोग्य सुविधेमुळे व इतर आजारामुळे रुग्णालयात दाखल झाली होती. ही गोष्ट खरी आहे की, सर्वच बालकांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली होती. आता त्या सर्व बालकांना डिसचार्ज देण्यात आला आहे. आता रुग्णालयामध्ये एकही बालक नाही. क्राय संस्थेच्या रिपोर्टप्रमाणे आमची छाननी सुरु आहे. मुंबई शहरासारख्या शहरामध्ये अशी संख्या वाढणे, ही अतिशय खेदजनक बाब आहे. म्हणून सरकारच्या वतीने मुंबई शहरातील कुपोषणाच्या संदर्भात लवकरच सर्व्हे करुन या प्रश्नाकडे लक्ष देऊ सर्वच आमदारांना आणि विशेष करुन मुंबई महापालिका आणि आरोग्य विभाग या सर्वांना एकत्रित करुन हा कुपोषणाचा प्रश्न गांभीर्याने सोडविण्याच्या दृष्टीने सरकारच्या वतीने विशेष प्रयत्न चालू आहेत.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, आताच माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, याबाबतीत सर्व्हेक्षण चालू असून अजून ते संपले नाही. त्यामुळे हे सर्व्हेक्षण किती दिवसांत पूर्ण होईल ? दुसरे असे की, मुंबई महापालिकेच्या प्रत्येक विभागामध्ये हेल्थ पोस्ट आणि डिस्पेंसरीज असून त्या कार्यान्वित नाहीत. तसेच, मुलांसाठी वजन काटे, उंचीचे चार्ट उपलब्ध नाहीत. त्यामुळे त्याठिकाणी कुपोषण आहे की नाही, याबाबत मनात शंका निर्माण होते. त्यामुळे आपण या हेल्थ पोस्ट कार्यान्वित करणार का ? व या सर्व सुविधा आपण त्याठिकाणी तात्काळ उपलब्ध करुन देणार का ?

..2....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, हेल्थ पोस्टबाबत मी परवाच महापालिकेच्या आयुक्तांशी चर्चा केली आहे, त्यामुळे तातडीने ती व्यवस्था करण्यात येईल. तसेच, वजन काटे, उंचीचे चार्ट, मेडिकल रेकॉर्ड या सर्व वस्तु खरेदी करण्यासाठी आम्ही मान्यता दिलेली आहे. या सर्व वस्तू तात्काळ अंगणवाडयांना उपलब्ध करुन देण्यात येतील. सर्व्हेक्षण हे एकाच विभागाच्या मार्फत होईल अशातला भाग नाही. त्यामुळे याबाबतीत एकत्रितपणे मुंबई महापालिका, आरोग्य विभाग, महिला व बालविकास विभाग आणि आयसीडीएस विभाग यांना एकत्रित करुन यामध्ये रिअल पिक्चर काय आहे, खऱ्या अर्थाने कुपोषणाची किती संख्या आहे, याबाबतची माहिती घेण्यात येईल. विशेषत: भांडूप (पूर्व) व (पश्चिम), मानखूर्द विभागामध्ये स्लमचा ऐरिया भरपूर आहे, त्याठिकाणी बरेच कुपोषण आढळून आले आहे. त्यामुळे याबाबतचे सर्व्हेक्षण पूर्ण करुन त्यावर कायमस्वरुपी उपाययोजना करण्याच्या दृष्टीने सरकारचे धोरण आहे.

श्रीमती सुधा जोशी : सभापती महोदय, भांडूप येथील शाम नगर, चामुंडा नगर, गोविंद नगर या झोपडपट्टयामध्ये 750 कुटुंबे राहत असून त्याठिकाणी ते अतिशय हलाकिचे जीवन जगत आहेत. त्यांना कामधंदा नसल्यामुळे, त्यांची पोट भरण्याचीही सोय नाही. त्याठिकाणी मुलांना सकस आहर मिळत नाही. सध्या ते पोटही भरु शकत नाहीत, अशी परिस्थिती आहे. त्यामुळे ते मुळात कुपोषित आहेत, म्हणून ते आजारी आहेत असे मंत्रिमहोदयांना वाटते का ?

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी.........

तसेच उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, उर्वरित 5 मुले ही 6 वर्षाखालील असल्यामुळे त्यांना अंगणवाडीचा लाभ देण्यात येत आहे. माझा असा प्रश्न आहे की, ही सर्व मुले 3 वर्षे, 1 वर्षे अशा वयोमानाची असल्यामुळे ती अंगणवाडयांमध्ये जातात काय ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, भांडुप परिसरातील ज्या बालकांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते त्यांच्या पालकांनाही विविध प्रकारचे आजार होते, अशी माहिती समोर आली आहे. ज्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते त्यामध्ये ज्योत्स्ना मयेकर, 2 वर्षे, 3 महिने, क्षयरोगग्रस्त, गणेश मयेकर, 3 महिने, जन्मत: वजन कमी होते, अल्पशा डिंगळे, पायावर उपचार सुरु होते, बादल सरोज, 3 महिने, अतिसारग्रस्त, सुरेश तांबे, जुलाब अशा प्रकारे या मुलांची माहिती आहे व ही सर्व मुले अंगणवाडीमध्ये जात आहेत.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, आदिवासी क्षेत्रातील आदिवासी बालकांच्या मुलांचे कुपोषण ही अत्यंत दुर्देवी प्रकारची बाब आज मुंबईसारख्या महानगरामध्ये उद्‌भवत आहे, ही केवळ गंभीर नाही तर चिंताजनक बाब आहे. शासनाने उत्तरामध्ये चामुंडानगर, शाम नगर, गोविंद नगर, भवानी नगर या भागातील ज्या झोपडपट्टया आहेत त्या अनधिकृत झोपडपट्टया असून पिण्याचे पाणी आणि इतर मूलभुत सुविधा उपलब्ध नसल्यामुळे रहिवाश्यांना विविध आजार होत आहेत, असे नमूद केले आहे. म्हणूनच झोपडपट्टयांमध्ये नागरी सुविधा उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत. हे न झ ााल्यामुळे तेथील लोक केवळ आजारीच पडत आहेत असे नाही तर कुपोषण वाढत चालले आहे. हे दूर करण्यासाठी अशा प्रकारच्या झोपडपट्टयांमध्ये नागरी सुविधा देऊन कुपोषणाचे प्रकार थांबविता येतील काय ? या दृष्टीकोनातून मुंबई महानगरपालिकेच्या स्तरावर कोणती उपाययोजना करण्यात येणार आहे ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी ज्या भागातील प्रश्न उपस्थित केला त्या भागात मी स्वत: जाऊन आलो आहे. त्या ठिकाणी सॉल्ट वॉटर आहे. ज्या विभागात हा प्रकार घडला आहे तो अनडिक्लेअर्ड स्लम आहे. महापालिका आयुक्तांशी चर्चा केली असता त्यांनी असे सांगितले की, पिण्याच्या पाण्याची जोडणी, स्ट्रीट लाईट या ठिकाणी देता येत नाही. अनडिक्लेअर्ड स्लम असतांनाही त्या ठिकाणी शासनाने अंगणवाडया सुरु केलेल्या आहेत.

..2.......

श्री.हर्षवर्धन पाटील..........

यासंदर्भात उच्च न्यायालयानेही काही निर्देश दिलेले आहेत. अनडिक्लेअर्ड स्लममध्ये कोणत्याही सुविधा पुरविता येत नाहीत. त्यामुळे याचा विचार न करता शासनाने या ठिकाणी अंगणवाडया सुरु करण्याचा निर्णय घेतला आणि त्याचबरोबर मुंबई शहरासाठी 1092 अंगणवाडया स्लम विभागात सुरु करण्याचे ठरविले आहे.

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, कुपोषणाचा विषय समोर आल्यानंतर सर्व बालकांच्या प्रकृतीकडे लक्ष केंद्रीत करण्यात आले, हे योग्यच आहे. भांडुप, मानखूर्द येथील परिसराशी माझा निकटचा संबंध आहे. रेशन दुकानांसंबंधी कृती समिती सातत्याने याकडे लक्ष वेधत आहे. डिक्लेअर्ड किंवा अनडिक्लेअर्ड स्लममधील रेशनिंग दुकानात धान्य वेळेवर उपलब्ध होत नाही. माता कुपोषित राहिल्यामुळे बालके कुपोषित असतात, ही वस्तुस्थिती आहे.

यानंतर श्री.बोरले...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे ..........

म्हणून आपण महिला बालकल्याण अधिका-यांमार्फत त्या वसत्यांमध्ये रेशन वेळेवर मिळण्याबाबत योग्य ती पावले उचलली आहेत काय ?

श्री.हर्षवर्धन पाटील : ज्यावेळी आम्ही भांडूप परिसरामध्ये पाहणी केली त्यावेळी 2 रेशन दुकानदारांकडून या कामामध्ये हलगर्जीपणा झाल्याचे दिसून आले. म्हणून आम्ही त्यांच्या दुकानाचे परवाने रद्द केले आणि पर्यायी दुसरी दुकाने उपलब्ध करुन दिली. अन्न व औषध प्रशासन विभागाला धान्य सप्लाय करण्यास सांगितले आहे. महिला बचत गटाकडे आपण काम देत आहोत. त्यांना रेशन दुकानातून कमी दराने गहू आणि तांदूळ उपलब्ध करुन देण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>**विशेष उल्लेख**</u>.

**पृ. शी.** : राज्यात होणा-या अतिवृष्टीमुळे डोंगराच्या दरडी कोसळण्याच्या घटना टाळण्यासाठी व उतारावर राहणा-या जनतेच्या घरांना संरक्षण देण्याबाबत करावयाची उपाययोजना.

**मु. शी.** : राज्यात होणा-या अतिवृष्टीमुळे डोंगराच्या दरडी कोसळण्याच्या घटना टाळण्यासाठी व उतारावर राहणा-या जनतेच्या घरांना संरक्षण देण्याबाबत करावयाची उपाययोजना याबाबत श्री.संजय दत्त, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□य सदस्य श्री.संजय दत्त यां□ ए□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.संजय दत्त ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : महोदय, मी पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

राज्यात होणा-या अतिवृष्टीमुळे डोंगराच्या दरडी कोसळण्याच्या अनेक घटना दरवर्षी घडतात. परिणामी अपघात होतात. अनेक लोक जायबंदी होतात. काही लोक मृत्यूमुखी पडले आहेत. याही वर्षी अतिवृष्टीमुळे मुंबई, ठाणे जिल्हयासह राज्यात अनेक ठिकाणी विशेष करुन कोकण, घाटावर दरडी कोसळण्याचे प्रकार घडत आहेत. आपदग्रस्तांना आवश्यक ती मदत देण्याबरोबरच डोंगर उतारावर राहणा-या जनतेच्या घरांना दरडीपासून संरक्षण देण्याबाबत आवश्यक त्या उपाययोजना आखणे गरजेचे आहे. जेणे करुन मोठया प्रमाणावर होणारी जीवित हानी आणि वित्तहानी टाळू शकेल. शासनाने अशी स्थळे शोधून तेथे अशा उपाययोजना करण्याबाबत सार्वजनिक हिताच्यादृष्टिने अत्यंत महत्वाच्या या मुद्दयाबाबत मला सभागृहात विशेष उल्लेख उपस्थित करण्याची परवानगी देण्यात यावी.

----------

...3/-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी**. : सन 1994 च्या महाराष्ट्र विद्यापीठ कायद्यातील विभाग-19 मध्ये सुधारणा सुचविल्यानुसार ग्रंथपाल व ग्रंथालय शास्त्र ही दोन वेगळी पदे निर्माण केल्याबाबत.

**मु. शी**. : सन 1994 च्या महाराष्ट्र विद्यापीठ कायद्यातील विभाग-19 मध्ये सुधारणा सुचविल्यानुसार ग्रंथपाल व ग्रंथालय शास्त्र ही दोन वेगळी पदे निर्माण केल्याबाबत श्रीमती संजीवनी रायकर वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□य सदस्य श्रीमती संजीवनी रायकर यां□ ए□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्रीमती संजीवनी रायकर (मुंबई शिक्षक) : महोदय, मी पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडते.

सन 1994 च्या महाराष्ट्र विद्यापीठ कायद्यातील विभाग-19 मध्ये सुधारणा सुचविल्यानुसार ग्रंथपाल व ग्रंथालय शास्त्र विषयाचे प्राध्यापक अशी दोन वेगळी पदे निर्माण केली आहेत. आज ग्रंथालय व ग्रंथालय शास्त्र विभाग ग्रंथपालाच्या अधिपत्याखाली आहेत या 2 पूरक विभागाची विभागणी केल्यामुळे काही महत्वाचे प्रश्न उद्भवतील :-

1) महाराष्ट्रातील 12 विद्यापीठांतून ग्रंथालय शास्त्र विभाग प्रमुख (जो आज ग्रंथपाल आहे) असे वेगळे पद निर्माण झाल्याने शासनावर अतिरिक्त वेतनाचा भार पडेल. आज प्राध्यापक वेतन श्रेणीतील प्राध्यापकाला 25 ते 30 हजार रुपये वेतन मिळते.

2) या विभागात कारकून व शिपाई असा वेगळा कर्मचारी वर्ग नसतो. ग्रंथालयातील हे कर्मचारी विभागाच्या कामासाठी देण्यात येतात. कारण विद्यार्थी संख्या 50 असते. (बि.लिब् 40, एम.लिब् 10) या पदाच्या विभागणीमुळे ग्रंथालय शास्त्र विभागाच्या इतर पदांवरही नेमणुका कराव्या लागतील. त्यामुळे शासनावर अतिरिक्त भार पडेल.

3) ग्रंथालय शास्त्र हे प्रत्यक्ष कामाशी निगडीत प्रॅक्टीस ओरिएंटेड शास्त्र असल्याने या विभागणीमुळे ग्रंथालय शास्त्राच शिक्षण व प्रत्यक्ष काम यातील आंतरसंबंध नष्ट होतील. ग्रंथालय व ग्रंथालय शास्त्र विभाग एकमेकांना पूरक विभाग आहेत. म्हणून ते एकाच व्यक्तीच्या म्हणजेच ग्रंथपालाच्या हाताखाली असणे योग्य आहे. विद्यापीठ ग्रंथपालांना आज प्राध्यापक श्रेणी मिळते याशिवाय अधिक पदे निर्माण करणे शासनाच्या दृष्टीने गैरसोयीचे ठरु शकते याचा शासनाने विचार करावा.

--------

यानंतर श्री.सुंबरे .........

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : उल्हास नदी पात्राजवळ (जि.ठाणे) गोविंदवाडी, जयभीम क्रांतीनगर व गणेशघाट येथील 450 पूरग्रस्त कुटुंबांचे पुनर्वसन मौजे कचोरे, (ता.कल्याण) या गावाजवळील वन विभागाच्या भूखंड सर्व्हे नं.30, 38 व 39 मधील जागेत विनाविलंब करण्याबाबत.

**मु.शी.** : उल्हास नदी पात्राजवळ (जि.ठाणे) गोविंदवाडी, जयभीम क्रांतीनगर व गणेशघाट येथील 450 पूरग्रस्त कुटुंबांचे पुनर्वसन मौजे कचोरे, (ता.कल्याण) या गावाजवळील वन विभागाच्या भूखंड सर्व्हे नं.30, 38 व 39 मधील जागेत विनाविलंब करण्याबाबत प्रा.जोगेंद्र कवाडे, वि.प.स. यांनी दिलेली 'विशेष उल्लेख'ची सूचना.

----

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी 'विशेष उल्लेख'ची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

प्रा. जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने 'विशेष उल्लेख' द्वारे एका सार्वजनिक व महत्त्वाच्या बाबीकडे शासनाचे लक्ष वेधू इच्छितो.

" उल्हासनगर शहराजवळील उल्हास नदीच्या पात्राजवळ गोविंदवाडी, जयभीम क्रांतीनगर, व गणेशघाट या झोपडपट्टीमध्ये असलेल्या वसाहती नदीपात्रालगत आहेत. मागील 40-50 वर्षांपासून नसलेल्या या वसाहती आहेत आणि जवळपास 450 कुटुंबे त्या ठिकाणी वास्तव्याला आहेत. या वसाहतींमध्ये दलित, आदिवासी, ओबीसी, अल्पसंख्यांक समाजाची तसेच श्रमजीवी गरीब जनता वास्तव्य करीत आहे. दरवर्षी उल्हास नदीला येणाऱ्या पुरामुळे या समस्त परिवारांची जीवित व वित्त हानी होत असते. मागील वर्षी 26 जुलै ला आलेल्या पुरामुळे या सर्व कुटुंबांची अत्यंत दयनीय अवस्था झाली होती. या झोपडपट्टी वसाहतींचे पुनर्वसन व्हावे याकरिता मागील 5 वर्षांपासून पिपल्स रिपब्लिकन पक्षातर्फे मोर्चे, धरणे, उपोषण आदी मार्गांनी आंदोलने करण्यात येऊन जिल्हा प्रशासन व शासन दरबारी निवेदने, विनंती अर्ज करण्यात आले आहेत. पण अद्याप पर्यंत त्यांच्या पुनर्वसनाबाबत कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. या सर्व 450 कुटुंबांचे पुनर्वसन त्याच परिसरातील सर्व्हे नं. 36, 38 व 39 या जमिनीवर करण्यासाठी आपण शासनाला निर्देश द्यावेत ही विनंती आहे. उल्हासनगर मधील 855 अनधिकृत इमारतींना कायम ठेवण्यासाठी विशेष कायदा करून अधिकृत करण्यात आले. त्याचप्रमाणे या झोपडपट्टी वसाहतीकडे 'विशेष बाब' म्हणून पुनर्वसन करण्यासाठी त्वरित कारवाई करून अनुकंपा दर्शवावी अशी मी आपल्यामार्फत शासनाला विनंती करतो. " धन्यवाद.

***

..... 3बी 2 ..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : रायगड जिल्ह्यातील मुरूड येथील राज्य परिवहन महामंडळाचे आगार सुरू राहण्याबाबत.

**मु.शी.** : रायगड जिल्ह्यातील मुरूड येथील राज्य परिवहन महामंडळाचे आगार सुरू राहण्याबाबत श्री.जयंत प्र.पाटील, वि.प.स. यांची विशेष उल्लेखाची सूचना.

-----

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र. पाटील यांनी विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे, त्यांनी ती मांडावी.

श्री. जयंत प्र. पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या गोष्टीकडे या 'विशेष उल्लेख' द्वारे शासनाचे लक्ष वेधू इच्छितो.

रायगड जिल्ह्यातील मुरूड आगार होण्यासाठी शहरातील स्थानिक शेतकऱ्यांनी आपल्या दुपिकी जमिनी कमी किंमतीमध्ये महामंडळाला दिल्या होत्या. राज्य परिवहन महामंडळाची सुविधा सर्वसामान्य नागरिकांसाठी उपलब्ध होईल याच भावनेतून शेतकऱ्यांनी हा त्याग केला होता. मात्र आता हे परिवहन आगार बंद करण्याचा घाट राज्य परिवहन महामंडळाने घातला आहे.

मुरूड-जंजिरा हे पर्यटन स्थळ आहे. वर्षाकाठी येथे हजारो पर्यटक येत असतात. पर्यटनामध्ये वाढ व्हावी यासाठी नगरपालिका पर्यटन महोत्सवासारख्या उपक्रमांचेही आयोजन करीत असते. असंख्य पर्यटक हे राज्य परिवहन महामंडळावरच अवलंबून असतात. त्यामुळे मुरूडचे परिवहन आगार बंद झाले तर त्याचा परिणाम पर्यटकांच्या संख्येवर होणार आहे.

रायगड जिल्ह्यामध्ये सर्वाधिक उत्पन्न मिळवून देणारे परिवहन आगार म्हणून मुरूड परिवहन आगार ओळखले जाते. शिवाय या परिवहन आगाराचा दुरूस्ती खर्चही अत्यंत कमी आहे. असे असतानाही राज्यातील जी 25 परिवहन आगारे बंद करण्यात येणार आहेत, त्यामध्ये मुरूड आगाराचा समावेश करण्यात येत आहे.

परिवहन महामंडळाने आपला हेका सोडला नाही तर रस्त्यावर उतरून जनआंदोलन छेडण्यास आम्ही मागेपुढे पाहणार नाही असा थेट इशाराही येथील जनतेने दिला आहे. तरी शासनाने याबाबत योग्य तो निर्णय घेऊन भविष्यात जनआंदोलनाची परिस्थिती निर्माण होणार नाही यासाठी शासनाचे लक्ष वेधण्यासाठी मी हा विशेष उल्लेख करीत आहे.

***

..... 3बी 3 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : महानगरपालिका व नगरपरिषदा (सुधारणा) विधेयक,2006.

**L .C. BILL NO.XVI OF 2006.**

**(A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT, THE BOMBAY PROVINCIAL MUNICIPAL CORPORATIONS ACT, 1949, THE CITY OF NAGPUR CORPORATION ACT, 1948 AND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.)**

श्री. राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2006 चे वि.प.वि. क्रमांक 16 - मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम 1948 आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक, मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि.प.वि. क्रमांक 16 मांडतो.

**उपसभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

***

( यानंतर श्री. सरफरे .... 3सी 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: महानगरपालिका (दुसरी सुधारणा) विधेयक

**L. C. BILL NO. XXVIII OF 2004.**

**(A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT, THE BOMBAY PROVINCIAL MUNICIPAL CORPORATIONS ACT, 1949 AND THE CITY OF NAGPUR CORPORATION ACT, 1948.)**

श्री. राजेश टोपे (नगर विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2004 चे वि.प.वि. क्रमांक 28 मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949 आणि नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, 1948 यात आणखी सुधारणा करण्याकरीता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, महाराष्ट्रातील महानगरपालिकेच्या कायद्यामध्ये सुधारणा करण्याच्या अनुषंगाने मला सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, उल्हासनगर महानगरपालिकेच्या क्षेत्रातील अनधिकृत बांधकामे अधिकृत करण्यासंबंधी हायकोर्टामध्ये निकाल देण्यात आला. त्यावेळी माननीय उच्च न्यायालयाने निकाल देतांना राज्य शासनाने नेमलेल्या नंदलाल समितीच्या अहवालातील एका शिफारशीचा उल्लेख केला. गैरवर्तन करणाऱ्या सदस्यांना अपात्र करण्याकरिता त्वरीत कायदा करावा ही शिफारस माननीय उच्च न्यायालयाने तत्वत: मान्य करुन तशाप्रकारचा कायदा करावा अशाप्रकारची सूचना राज्य शासनाला केली होती. सभापती महोदय, ही गोष्ट स्पष्ट आहे की,....

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, सभागृहाच्या कामकाजाच्या नोंदीमध्ये चुकीची नोंद होऊ नये याकरिता मी आपल्या लक्षात ही बाब आणून देतो की, राज्य शासनाने कायदा आणण्यास आपला विरोध नाही. परंतु हायकोर्टाने निदेश दिल्यानंतर या सभागृहामध्ये कायदा व्हायला लागला तर ते बरोबर होईल असे मला वाटत नाही. कायदा कशाप्रकारे बनवावा यासंबंधी माननीय उच्च न्यायालय जर निर्णय देऊ लागले तर या सभागृहाचे सार्वभौमत्व जाईल असे मला वाटते. तेव्हा मंत्रिमहोदयांनी माननीय उच्च न्यायालयाने सूचना दिल्या म्हणून आम्ही हा कायदा



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील...

आणत आहोत अशाप्रकारचा उल्लेख करु नये. माननीय उच्च न्यायालयाच्या सूचनेप्रमाणे जर आपण कायदा करावयास लागलो तर यापुढे माननीय उच्च न्यायालयाच्या सूचनेप्रमाणे या सभागृहाचे कामकाज चालेल. आणि म्हणून ही बाब योग्य होणार नाही असे मला वाटते. महानगरपालिकेच्या कायद्यासंदर्भात अधिकारवाणीने बोलणारा मी सदस्य नाही. त्यासंबंधी या सभागृहातील अनेक ज्येष्ठ माननीय सदस्य बोलतील. परंतु मला ही गोष्ट खटकत असल्यामुळे मंत्रिमहोदयांनी उल्लेख केलेले ते वाक्य वगळण्यात यावे, त्याची नोंद सभागृहाच्या इतिवृत्तामध्ये नसावी असे मला वाटते.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, हे विधेयक सभागृहापुढे मांडीत असतांना ते मांडण्याची आवश्यकता निर्माण कां झाली, या बाबतचा संदर्भ मी दिला तर त्याचा चुकीचा अर्थ लावण्याची गरज नाही. माननीय उच्च न्यायालयाने जो निर्णय दिला आहे त्याचा संदर्भ मी याठिकाणी व्यक्त केला आहे...

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. आजकाल असे व्हावयास लागले आहे की, माननीय उच्च न्यायालयाने सांगितले म्हणून आम्ही कायद्यामध्ये परिवर्तन करीत आहोत असे शासनाचे म्हणणे आहे. याठिकाणी आम्हाला काय वाटते याला महत्व नाही. त्यांनी सूर धरल्यानंतर आपण नाचायला सुरुवात करावयाची ही या राज्यकर्त्यांची शोकांतिका आहे. यांची स्वतःची बुध्दिमत्ता नाही, स्वतःचा अभ्यास नाही, अनुभव नाही,स्वतःला काय करावयास पाहिजे हे कळत नाही. प्रत्येक जण उठतो तो हायकोर्टामध्ये जातो, आणि हायकोर्टाने आदेश दिल्यानंतर तो आदेश घेऊन तुम्ही नाचायला लागता. या राज्यामध्ये बुध्दिमत्ता आहे की नाही? या राज्यातील मंत्री आणि राज्यमंत्री अशापध्दतीने काम करीत आहेत याला काही अर्थ नाही. या सभागृहामध्ये हायकोर्टाचा उल्लेख करु नका तर "शासनाला असे वाटते" म्हणून आपण उल्लेख करा, व तसे रेकॉर्डवर येऊ द्या.

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. गुरुनाथ कुलकर्णी)**

श्री. राजेश टोपे : सभागृहाची जर तशी इच्छा असेल तर....

(गोंधळ)

श्री. मधुकर सरपोतदार : सभागृहाच्या इच्छेचा प्रश्न नाही, ती परंपरा आहे...



श्री.राजेश टोपे : मी हायकोर्टाचे मत काय आहे ते सांगितले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : मंत्रिमहोदय आपण विधेयक मांडीत असतांना माननीय उच्च न्यायालयाने निकालपत्रामध्ये जरी सूचना केल्या असल्या तरी हे शासन स्वत:च्या अधिकारामध्ये हे विधेयक आणीत आहे अशाप्रकारे मर्यादित स्वरुपामध्ये आपण स्पष्टीकरण करुन सांगावे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण केलेल्या सूचनेविषयी मला बोलावयाचे आहे. माननीय राज्यमंत्र्यांना हे विधेयक मांडीत असतांना तसे सदनाला सांगावे लागेल...

(यानंतर श्री. किल्लेदार)

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/ पूर्वी श्री.सरफरे... 17:10

श्री.दिवाकर रावते (पुढे सुरु...

यामध्ये डिस कॉलीफिकेशन ऑफ कौन्सिलर्स हा विषय आहे. त्यांना डिस कॉलिफिकेशन कसे करावे, केंव्हा करावे, या संदर्भात विधेयक आणलेले आहे. असे काय घडले की,या संबंधीचे प्रकरण कोर्टात गेले आणि कोर्टाला सूचना कराविशी वाटली ? त्यानंतर कोणती परिस्थिती निर्माण झाली, का निर्माण झाली की जेणे करुन यासंबंधात कायद्यामध्ये सुधारणा कराविशी वाटली, याबाबतचे विवेचन निवेदनामध्ये करावे लागेल. कोर्टाची मानसिकता पूर्वीच्या निर्णयाबाबत काय होती ? आणि आता काय आहे ? महानगरपालिकेमध्ये निवडून आलेले नगरसेवकांना अधिकार दिलेले आहेत. कायदा करताना आयुक्तांना अधिकार दिलेले आहेत. आज सक्षम अशाप्रकारचा कायदा अकोला महानगरपालिकेमध्ये वापरतात. अशी कार्यक्षमता नगरसेवकांमध्ये असताना, असे काय घडले की, कोर्टामध्ये जावे लागले आणि कोर्टाला आपल्याला सूचना कराविशी वाटली. कंकरन्स लिस्टप्रमाणे आपल्याला कायदा करण्याचा अधिकार आहे. असे असताना कोर्टाच्या निर्णयानुसार हे विधेयक आपल्याला का आणावे लागले ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, मला असे वाटते की, मी भाष्य करत असताना असे म्हणत नाही की, फक्त हायकोर्टाने मत व्यक्त केल्यानंतर हा कायदा आणावा लागला, अशातला भाग नाही. परंतु त्या ठिकाणी गैर वर्तणुकीचे, लज्जास्पद वर्तणुकीचे प्रकार अधिकाधिक महानगरपालिका आणि नगरपालिकेमध्ये होतात, हे चित्र आपल्याला पहायला, ऐकायला मिळते. नगरपालिकांमध्ये नगरसेवकांनी अधिकाऱ्यांना शिवीगाळ, मारहाण केलेली आहे. काही वर्षापूर्वी औरंगाबाद येथे महिला महापौर त्यांच्या खुर्चीत बसलेल्या असतांना नगरसेवकांनी त्यांना शिविगाळ केली. त्यानंतर त्यांना रडू कोसळले. अशा अनेक घटना घडलेल्या आहेत. या लोकप्रतिनिधी म्हणून आपल्याला शोभा देणाऱ्या गोष्टी नाहीत. नगरपालिका अधिनियम राज्यातील 227 नगरपालिकांना लागू आहे. या विधेयकामध्ये नगरसेवकांना अनर्ह करण्याचा अधिकार आहे. आज महानगरपालिकेच्या संबंधाने तीन अधिनियम आहेत. एक म्हणजे मुंबई महानगरपालिका, मुंबई प्रांतिक महानगरपालिका आणि नागपूर प्रांतिक महानगरपालिका असे तीन अधिनियम आहेत. असे असूनही अशाप्रकारच्या घटना घडतात, त्याला पायबंद घालण्यासाठी अधिनियमामध्ये तरतूद नाही. म्हणून ही तरतूद करणे शासनाला आवश्यक वाटले, म्हणून आज हा प्रस्ताव आणलेला आहे. या ठिकाणी अशी तरतूद केलेली आहे की, अशाप्रकारच्या घटना धडल्यानंतर शासनाला त्या नगरसेवकांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर अनर्ह करण्याचा अधिकार आहे. अशापध्दतीची उचित

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/

श्री.राजेश टोपे (पुढे सुरु....

कारवाई करता येईल, अशी तरतूद या विधेयकामध्ये आणलेली आहे. म्हणून आजच्या परिस्थितीमध्ये लोकप्रतिनिधींनी कसे वागावे ? या संबंधाने केंद्राकडे ठरावाच्या माध्यमातून आपणव शिफारस केलेली आहे. लोकप्रतिनिधी कसे असावेत ? याबाबत अनेक सन्माननीय सदस्यांनी या भाषणे करुन आपले विचार व्यक्त केलेले आहेत. मला वाटते, या विधेकाच्याबाबत सभागृहाचे दुमत असण्याचे कारण नाही. लोकप्रतिनिधींची वर्तणूक कशी असावी ? अधिकाऱ्यांशी, त्यांच्या सहकार्यांशी वर्तणूक कशी असावी ? महापौरांच्याबाबतीतील वर्तणूक कशी असावी ? या गोष्टींवर प्रकाश टाकणे गरजेचे आहे म्हणून अशाप्रकारचा प्रस्ताव शासनाने विधेयकाच्या माध्यमातून आणलेला आहे.

प्रश्न प्रस्तुत झाला.

यानंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलास अवचट ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सन 2004 चे वि. प. वि. क्रमांक 28 वर माझे मनोगत व्यक्त करण्यापूर्वी माझी माननीय मंत्रिमहोदयांना विनंती आहे. महाराष्ट्रामध्ये महानगरपालिकांच्या बाबतीत तीन वेगवेगळे कायदे आहेत. एक मुंबई महानगरपालिका अधिनियम, दुसरा मुंबई प्रांतिक महानगरपालिका महानगरपालिका अधिनियम आणि तिसरा नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम असे तीन वेगवेगळे कायदे आहेत. प्रत्येक वेळी सुधारणा आणल्यानंतर या तीनही कायद्यांमध्ये सुधारणा करण्याचे सोपस्कार करावे लागतात. आता आपण एकविसाव्या शतकामध्ये आहोत. महानगरपालिकांचे हे तीनही कायदे एकत्र केले तर निश्चितपणे शासनालाही ते योग्य होईल आणि आम्हालाही त्याबाबत वाच्यता करणे सोपे होईल.

सभापती महोदय, आज आमच्यासमोर जे विधेयक आणलेले आहे ते विधेयक लोकशाहीवर घाला घालणारे आहे असे मला वाटते. या ठिकाणी विधेयकाचा उद्देश सांगत असताना माननीय मंत्रिमहोदयांनी नेमके काय उद्दिष्ट आहे हे सांगितलेले आहे. परंतु या ठिकाणी प्रश्न तत्वाचा आहे. या तीनही महानगरपालिकांच्या कायद्यामध्ये तरतूद असताना शासन हे काम आपल्याकडे ओढवून घेत आहे. याची मिमांसा जी दिलेली आहे ती आम्हाला न पटण्यासारखी आहे. या बिलाच्या उद्देश व कारणांमध्ये असे म्हटले आहे की, "पालिका सदस्य, त्यांची कर्तव्ये पार पाडताना गैरवर्तणूक केल्याबद्दल किंवा लज्जास्पद वर्तणूक केल्याबद्दल दोषी ठरल्याच्या घटना वाढत आहेत." सभापती महोदय, याबाबत शासनाला एकदम साक्षात्कार झालेला नाही हे मान्य आहे परंतु आपल्याकडे किती महानगरपालिकांच्या बाबतीत, किती नगरपालिकांच्या बाबतीत, किती नगरपरिषदांच्या बाबतीत तक्रारी आल्या ? अशा प्रकारे नगरसेवकांचे वर्तन असेल तर त्याबाबतीत त्या ठिकाणी आयुक्त असताना हे काम आपल्याकडे घेण्याचे कारण काय ? त्या ठिकाणी महापालिका आयुक्त सक्षम आहेत. कायद्यामध्ये तरतूद केलेली असताना आपल्याकडे हे अधिकार घेण्याचे कारण काय ? आपण या बिलामध्ये असे म्हटले आहे की, "ज्या प्रकरणात, राज्य शासनाने पोट-कलम (1) अन्वये आदेश दिला आहे, अशा प्रत्येक प्रकरणामध्ये, अशा पालिका सदस्यास राज्य शासनाने आदेश काढून निरर्हतेपासून मुक्त केले नसेल तर, अशा आदेशाच्या दिनांकापासून पाच वर्षाच्या कालावधीसाठी पालिका सदस्य म्हणून राहण्यास किंवा पालिका सदस्य होण्यास किंवा इतर एखाद्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ KGS/

श्री. विलास अवचट .....

स्थानिक प्राधिकरणाचा परिषद सदस्य किंवा सदस्य होण्यास निरर्ह असेल आणि अशा निरर्हतेपासून मुक्त करणारा आदेश काढण्याचा अधिकार राज्य शासनास, याव्दारे, देण्यात येत आहे." आपल्याकडे काय आधिकार देण्यात आले आहेत ? मुळात आपल्या खात्याला कमी काम नाही. कामाचे विकेंद्रिकरण केल्यानंतर महापालिकेच्या आयुक्तांमार्फत त्या ठिकाणी काम करतो. या विधेयकामध्ये गैरवर्तणूक आणि लज्जास्पद वर्तणूक असा उल्लेख केलेला आहे. याची नक्की व्याख्या काय आहे ? आपण संभाजीनगरच्या बाबतीत सांगितले. नक्की गैरवर्तणूक म्हणजे कोणती वर्तणूक याची व्याख्या करणे आवश्यक आहे. शेवटी आपण असे म्हटले आहे की, "जिल्हा न्यायाधीशांकडे त्याचा निर्देश करता येईल." म्हणजे अंतिमत: आपण हे जिल्हा न्यायालयाकडे देत आहात. माननीय मंत्रिमहोदयांनी न्यायालयाचा संदर्भ वाचून दाखविला. शेवटी आपण या सभागृहामध्ये कायदा बनवतो आणि कायद्याची अंमलबजावणी होते की नाही, त्यामध्ये काही कमी पडत असेल तर ते पाहणे हे न्यायालयाचे काम आहे. न्यायालय कायदा करीत नाही. आपण बनविलेल्या कायद्याची अंमलबजावणी न्यायालयाने करावयाची असते. माननीय मंत्रिमहोदयांनी जो संदर्भ दिला त्याचा याच्याशी काय संबंध आहे ? याचे स्पष्टीकरण होण्याची आवश्यकता आहे. मला एक विनंती करावयाची आहे. हे अधिकार महापालिकेकडून काढून घेऊन ते शासनाकडे आणल्यानंतर तेवढे सोपस्कार होतील काय ? यामध्ये आपण आपले काम वाढवित आहात. नगरसेवकांच्या गैरवर्तणुकीसंबंधी तसेच लज्जास्पद वर्तणुकीसंबंधी संपूर्ण अहवाल घ्यावा. सभागृहातील तीनचतुर्थांश सदस्यांचे मत झाले असेल तर तसा ठराव पारित होणार आहे. याबाबत स्पष्टीकरण होणे आवश्यक आहे.

------

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MAP/ KGS/ पूर्वी श्री. बरवड 17:20

श्री. श्रीकांत जोशी (औरंगाबाद विभाग पदवीधर) : माननीय तालिका सभापती महोदय, सन 2004 चे वि.प.वि. क्रमांक 28 - महाराष्ट्र महानगरपालिका (दुसरी सुधारणा) विधेयक याठिकाणी विचारार्थ मांडण्यात आलेले आहे. या विधेयकाच्या बाबतीत मला असे वाटते की, या विधेयकाचा उद्देश वरवर चांगला वाटत असला तरी अशा पध्दतीने हे विधेयक पारित करणे म्हणजे लोकशाहीच्या गळयाला नख लावण्यासारखे आहे. तालिका सभापती महोदय, पिपल रिप्रेझेण्टेटीव्ह ॲक्ट मध्ये एखाद्याचे सदस्यत्व रद्द करणे हा फौजदारी स्वरुपाचा गुन्हा असल्याचे नमूद केलेले आहे. एखादी व्यक्ती जोपर्यन्त गुन्हा करीत नाही तोपर्यन्त तिचे सदस्यत्व रद्द होत नाही. त्यामुळे सदस्यत्व रद्द करण्याचे हे विधेयक ज्या पध्दतीने आणलेले आहे त्यावरुन रोगा पेक्षा इलाज महाभयंकर असल्याचे मला वाटते. त्यामुळे हे विधेयक परत घ्यावे अशी मी मागणी करीत आहे. याचे कारण असे की, एखादी व्यक्ती दोषी असल्याचे जोपर्यन्त सिध्द होत नाही तोपर्यन्त त्याच्यावर कोणतीही कारवाई करता येत नाही, जनादेशाचा अनादर करुन कोणत्याही सदस्याला बहुमताच्या जोरावर घरी बसविणे इष्ट ठरणार नाही. या विधेयकामध्ये असे म्हटलेले आहे की, .."3/4 बहुमाताने महानगरपालिका, नगरपालिका किंवा राज्य शासनाला वाटले तर..." अशी एक कल्पना करा की. एखादा प्रामाणिक नगरसेवक महानगरपालिकेमध्ये काम करीत असेल आणि त्यामुळे काही मतभेद निर्माण होत असतील तर अशा मतभेदांमुळे आणि बहुमताच्या जोराने त्या सदस्याला काढणे योग्य आहे काय ? बहुमताच्या जोरावर अशा सदस्याला घरी बसविण्याचे काम या विधेयकाच्या माध्यमातून आपण करीत आहात. गैरवर्तणूक म्हणजे काय हे ठरविण्याचेही काही निकष ठरलेले आहेत. गैरवर्तणुकीची केस कोणाकडे दाखल केली पाहिजे, त्या केसचा निकाल किती दिवसात लागला पाहिजे, ॲपिलेट ॲथॉरिटी कोणती असेल, ह्या बाबी प्रथम ठरविणे आवश्यक आहे. गैरवर्तणूक म्हणजे काय, याची प्रथम व्याख्या केली पाहिजे. आता सभागृहामध्ये माननीय सदस्य काही वेळा रागाने, त्वेषाने आपल्या भावना मांडत असतात. समजा जर मी एखाद्या प्रश्नासंबंधी माननीय मंत्री महोदयांना रागारागाने बोललो किंवा काही चार अपशब्द माझ्या तोंडातून अनावधानाने आणि भावनेच्या भरात निघाले तर ती गैरवर्तणूक ठरेल काय ? म्हणून मोटीव्ह काय आहे हे प्रथम लक्षात घेतले पाहिजे. एखाद्याने रागाच्या भरात, भावनेच्या भरात काही वक्तव्य केले तर ती गैरवर्तणूक ठरेल की नाही हे ठरविले पाहिजे. हे विधेयक याठिकाणी मांडत असताना गैरवर्तणुकीसंबंधीची व्याख्या केलेली नाही हे मला शासनाच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे.

...2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. श्रीकांत जोशी...)

एखाद्या व्यक्तीचे काही प्रिन्सिपल्स किंवा इमोशन्स असू शकतात. उदा. शिवाजी महाराजांचा पुतळा कुठे उभारावा याबाबत याठिकाणी रणकंदन होऊ शकते, त्याबाबतीत वाद होऊ शकतात. हे सर्व होत असताना त्यामागील मोटीव्ह काय आहे हे प्रथम लक्षात घेतले पाहिजे. डीपी रोडवरील अतिक्रमणे न हटविण्यासंबंधी काही मंडळींनी पैसे घेतलेले असतील आणि ती अतिक्रमणे हटविण्यासंबंधी एखादा सदस्य आग्रही असेल तर तो आडवा येतो म्हणून त्याला काढले जाईल.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MAP/ KGS/ 17:25

श्री.श्रीकांत जोशी....

होते कसे? अतिक्रमणे तोडायचे नाटक होते. मिठी नदीचे उदाहरण आपल्यासमोर आहे. आज अतिक्रमणे काढली, पुन्हा नव्याने ती अस्तित्वात आली. म्हणून पॉलिटिकल मोटिव्हेशनने होत असेल तर त्याला लोकप्रतिनिधी म्हणून मी कडाडून विरोध करणार आहे. अशा प्रकारचा कायदा करुन लोकशाहीचा गळा घोटण्याची ताकद शासनाला आपल्याकडे घेता येणार नाही. गैरवर्तणूकीमध्ये अतिक्रमण हटविण्याबद्दलची प्रोसेस कोणत्याही नगरपालिकेने डिफाईन केलेली नाही. मध्यंतरी भारतीय जनता पक्षाच्या नगरसेवकाचे सदस्यत्व पुणे महानगरपालिकेच्या आयुक्तांनी रद्द केले, त्याला नंतर कोर्टाने स्टे दिला. अशा प्रकारे अतिक्रमणे हटविणे हे जितके घातक आहे तसेच त्यासाठी कोणतीही सायंटिफिक प्रोसेस नसून त्या माध्यमातून पैसा उकळणे ही सुध्दा घातक गोष्ट आहे. शेजाऱ्याचे अतिक्रमण काढले जाते, माझे काढले जात नाही. माझे रिलेशन चांगले असतात. मग त्याच दिवशी कोणता तरी सण येतो. म्हणून गैरवर्तणुकीसंबंधी व्याख्या स्पष्ट केली पाहिजे. हे केल्यानंतर 3/4 बहुमत आहे की नाही हा मुद्दा कशासाठी? एखाद्या नगरसेवकाने दमदाटी केली, पिस्तूल काढले, तशा पध्दतीचा इशारा एखाद्या अधिकाऱ्याला द्यायला लागला, त्याच्या मागे पाशवी बहुमत आहे म्हणून त्याला सोडून देणार का? ती केस चालवावी लागेल. भले त्याच्यामागे अधिकारी असेल, अशा प्रकारची ॲक्शन नगरसेवकाने घेतली, माझ्यामागे 3/4 बहुमत आहे म्हणून मी काहीही करु शकतो म्हणून एक तर तो राज्य शासनाकडे पाहिल किंवा 3/4 बहुमत हे दोन्ही त्याच्या बाजुने असेल तर त्याला वाटेल तसा नंगानाच करायला ही मुभा आहे. गैरवर्तणूक म्हणता मग ती कोणीही केलेली असो त्याला कडक शिक्षा केली पाहिजे आणि त्याचे डिसक्वालिफिकेशन झाले पाहिजे. Whether he holds the majority or whether he belongs to the Ruling Party? Whether he is engaged in misconduct and if there is a breach of Constitution, in that case, action must be taken against that Councillor. त्याने जर खरोखर गैरवर्तणूक केली असेल, स्वत:च्या लाभासाठी केली असेल तर तो कोणीही असला तरी त्याच्याविरुध्द ॲक्शन झाली पाहिजे, ते करणे खरोखर गरजेचे आहे. ते केले नाही. 3/4 पालिका सदस्य या अटीची खरी गरज का आहे हे सुध्दा सांगितले पाहिजे. फार तर सिम्पल मेजॉरिटीपर्यंत आणा असे माझे मत आहे हे मी सांगू इच्छितो. त्याचबरोबर राज्य सरकारकडे तुम्ही डायरेक्ट अधिकार घेतले, त्याची प्रोसेस

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी.........

डिफाईन केली नाही, राज्य सरकारची प्रोसिजर काय? तुम्ही म्हणाल, नियम करु. हे नियम विधिमंडळासमोर आले पाहिजेत. ते विधिमंडळाने मंजूर केले पाहिजेत. एखादा नियम करताना त्याचे पुढचे मिनिट्स आणि कोडिंग करावे लागते, ते विधिमंडळाच्या मान्यतेने करावे लागतात. नाही तर तो कायदा कायद्याच्या परिभाषेत टिकू शकत नाही. राज्य सरकारकडे अधिकार घेण्याचे काय कारण आहे? आज बऱ्याच नगरपालिकांमध्ये गोंधळ चालला आहे. राज्य सरकार हतबल होत आहे. राज्य सरकारने जेवढे लक्ष द्यावयास पाहिजे तेवढे नगरविकास विभाग लक्ष देत नाही. अधिकारांचे विकेंद्रीकरण केलेले नाही ही वस्तुस्थिती आहे. आज नगरविकास विभागाची परिस्थिती पाहिली तर नगरविकास विभाग कित्येक वर्षांपासून मुख्यमंत्र्यांकडे आहे. अगदी तुटपुंजे, किरकोळ अधिकार नगरविकास राज्यमंत्र्यांना दिलेले असतात. टाऊन प्लॅनिंग विभाग महाराष्ट्राचा आहे. आपल्याला कल्पना आहे, या विभागाची काय परिस्थिती आहे. मराठवाड्यातील 52 नगरपालिकापैकी 37 नगरपालिकांचे हद्दवाढीचे प्रस्ताव धूळ खात पडले आहेत. टाऊन प्लॅनिंग विभाग सडलेल्या अवस्थेत आहे. मी परवा जिल्हाधिकाऱ्यांकडे विचारणा केली, तुम्ही नगरपालिका क्षेत्रात किती नवीन प्रपोजल्सना परमिशन्स दिल्या? मोजक्या दिल्या असतील तर एवढी बांधकामे कशी झाली? महसूल आणि नगरविकास विभागामध्ये समन्वय नाही ही वस्तुस्थिती आहे. आपल्याला आश्चर्य वाटेल, मी ज्या शहरात राहतो, ज्या शहराशी आपले नाते आहे, तेथे 2.5 लाख लोक अनधिकृत वस्त्यांमध्ये राहतात. 2001 चा आपण कायदा केला. 2001 नंतर 40 हजार घरे अनधिकृतपणे उभी राहिली आहेत. संपूर्ण संभाजीनगरमध्ये 10 सुध्दा ले-आऊट झालेले नाहीत.

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी ....

Where is the Urban Development Department? Where is the Revenue Department? माननीय मुख्यमंत्र्यांकडे 50 डिपार्टमेंट असल्यामुळे त्यांना कोठे काय चालले आहे हे समजत नाही. हे सरकार अगोदरच ओझ्याने वाकलेले आहे त्यामुळे हे सरकार कसा काय न्याय देणार ? जर महारापौरांची निवडणूक असेल तर त्याच्या चार दिवस अगोदर विशिष्ट माणसाला डिसक्वालीफाय केले पाहिजे आणि असे जर झाले नाही तर त्याचे परिणाम वेगळया पध्दतीने उमटण्याची शक्यता आहे. जर तुम्ही आमच्या बाजूला येणार नसाल तर आम्ही तुम्हाला घरी बसवू असे होता कामा नये. असे जर झाले तर नगरविकास खात्याची ती फार मोठी चूक ठरु शकेल. तसेच त्याचे दर महिन्याला टाईमटेबल करुन वेळेमध्येच कंपलीट हिअरींग संपले पाहिजे तसेच 15 दिवसाच्या आत राज्य सरकारचे हिअरींग संपले पाहिजे यासंदर्भात नियम करण्याची आवश्यकता आहे. स्थानिक स्वराज्य संस्थामधील डिसक्वालीफिकेशनला जर लोकशाहीमध्ये राजकीय स्वरुप देणार असाल तर हळू हळू स्थानिक स्वराज्य संस्था संपविण्याचे काम तुम्ही करीत आहात हे सिध्द होईल. Are we have matured Democracy? in local bodies. The answer to the above question is, "No." आता आपण प्रगल्भ लोकशाहीकडे वाटचाल करीत आहेत. आज सकाळच्या वेळेस माननीय सदस्य श्री. प्रमोद नवलकर साहेबांनी सकाळच्या प्रस्तावाला खेद व्यक्त करुन पाठिंबा दिलेला आहे. खरे म्हणजे प्रगल्भ लोकशाही ही स्थानिक स्वराज्य संस्थामधूनच वर येत असते. आमदार- खासदार हे काही डायरेक्ट आकाशातून येत नसतात. त्यामुळे ख-या अर्थाने स्थानिक स्वराज्य संस्थातूनच प्रगल्भ अशी लोकशाही येऊ शकते. त्यामुळे हे आणण्यामध्ये शासनाला घाईगडबड करण्याची आवश्यकता नाही असे मला वाटते. Disqualification is Criminal Procedure. यामध्ये सीआरपीसीच्या संदर्भात तज्ञांचा सल्ला घेऊन त्यावर विचार करण्याची आवश्यकता आहे. तसेच गैरवर्तणूकीच्या संदर्भातील डेफिनेशन सुध्दा क्लिअर करण्याची आवश्यकता आहे. The procedure should also be laid down. Monthly basis,निकाली लागले पाहिजे. If he faces the disqualification; and whether he holds the majority; or if he belongs to the Ruling Party and if he does not belongs to a Ruling Party, if any misconduct is there from him then he should be disqualified.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी ....

अशा पध्दतीने व्यवस्था केली पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त करतो. या ठिकाणी खरे म्हणजे एकंदर तीन मुद्दे आहेत. एक सरकारचे अधिकार, दोन- भ्रष्टाचार आणि तीन-गैरवर्तनुकीची डेफिनेशन या तिन्ही गोष्टी क्लिअर करुन मगच हे बील आणावे एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

----------

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, एका सक्षम खात्याला आणि आपणच नक्की केलेल्या अधिकारात आयएएस असलेल्या दर्जाच्या अधिका-याच्या कर्तुत्वाच्या शक्तीला आव्हान देण्याकरिता तसेच त्याची कर्तुत्वशक्ती नगण्य ठरविण्याचा कायदा आपण या ठिकाणी आणला आहे. महापालिका कायद्यामध्ये ज्या तरतुदी आहेत त्या सक्षम आहेत. महापालिकेच्या कायद्याच्या तरतुदी सक्षम असतांना सुध्दा सरकारला असे का वाटले ? यासंदर्भात माननीय मंत्रीमहोदयांनी आपल्या स्पष्टीकरणात म्हटले होते की, सरकारची अक्कल कोर्टापुढे गहाण पडलेली आहे त्यांनी सूचना केल्या आणि खात्याकडे त्या आल्यात. परंतु सभापती महोदय, कोर्टात कोण गेले होते? हेअरींग काय झाले? कशाच्या संदर्भात निर्णय झाला ? कोणत्या केसच्या संदर्भात निर्णय लागला ? परंतु कोर्टाने जो काही निर्णय दिला तो निर्णय देत असतांना कोर्टाने ज्या सूचना केल्या त्या सूचनामधील मतीतार्थ काय हे आम्हाला विषद करुन सांगा. कोर्टाने निर्णय दिला असे सांगून कोर्टाच्या नावाचा वापर होत असेल तर ते योग्य नाही.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

हा विषय सभागृहात येऊ नये म्हणून आपण तो टाळला. सभापती महोदय, आपण कायद्याचे पदवीधर आहात. यापूर्वी या कायद्यामध्ये दोनवेळा सुधारणा झालेल्या आहेत. मुंबई महानगरपालिका अधिनियम, मूळ कायद्याच्या कलम 16 हे डिस्क्वॉलिफिकेशन बाबत आहे. मंत्रिमहोदयांनी यासंदर्भातील डिटेल्स सांगितले पाहिजे. मुंबई महानगरपालिकेच्या सन 1888 च्या कायद्यामध्ये सुधारणा झाली. त्या सुधारणेमध्ये 1 (बी) हे कलम समाविष्ट करण्यात आले. त्यामध्ये "कास्ट सर्टीफिकेटबाबत" विषय आहे. आपण ही सुधारणा स्वीकारल्यानंतर एस.सी. आणि एस.टी प्रवर्गासाठी जागेचे आरक्षण आले. मग या राखीव जागांचा फायदा घेण्यासाठी आणि कोणत्याही परिस्थितीत सत्ता मिळवावयाची अशा निर्धारात असलेले बोके जातीचे खोटे दाखले आणून राखीव जागांवर निवडून आले. परंतु नंतर ज्यावेळी नगरसेवकांच्या जातीच्या दाखल्यांची तपासणी करण्यात आली त्यावेळी हजारो नगरसेवक डिसक्वॉलिफाय झाले.

(अडथळा )

मी जातीच्या दाखल्यावर कधीही डिसक्वॉलिफाय होणार नाही. मला याठिकाणी माननीय मंत्रिमहोदयांस सांगावयाचे आहे की, गेल्या पाच वर्षात खोट्या जातीच्या प्रमाणपत्रावर निवडून आलेल्या नगरसेवकांची यादी त्यांनी पटलावर ठेवावी. मग ते नगरसेवक कोणत्याही पक्षाचे असोत. आपण कायदा केला पण कायदा मोडणारे अनेकजण असतात. मला माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांच्या भाषेत बोलता येत नाही. आपण महात्मा गांधी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, शाहू महाराज यांचा महाराष्ट्र म्हणवितो, पण या पुरोगामी महाराष्ट्रात ज्यांनी कायद्याचे वस्त्रहरण केले त्यांच्या बाबतीत कोणती कारवाई करण्यात आली ? जे निवडणुकांमध्ये खोट्या जातीच्या प्रमाणपत्रावर निवडून आले आणि नंतर त्यांना डिसक्वॉलिफाय केले. परंतु ज्यांनी समाजाला फसविले, मतदारांना फसविले, खोट्या जातीच्या प्रमाणपत्रावर सत्ता लुटण्याचा प्रयत्न केला, ज्यांनी त्या राखीव जातीच्या सक्षम उमेदवाराचे नुकसान केले, त्यांची संधी गमाविली, ज्यांनी निवडून येऊन त्या कालावधीत पदाचा उपभोग घेतला अशा किती जणांना जेलमध्ये पाठविण्यात आले ?

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

यासंबंधीची माहिती मंत्रिमहोदयांनी दिली तर मला निश्चितच आनंद होईल. डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा जोतिबा फुले, शाहू महाराज यांचा प्रचंड अभिमान असणाऱ्यांनी त्यांचा घोर अपमान केलेला आहे. सरकारचे धोरण काय आहे ते सांगणे ही सरकारची जबाबदारी नाही काय ?

यानंतर श्री.पुरी......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

जे करावयास पाहिजे ते आपण करीत नाही, नको ते उपद्व्याप करण्यासाठी आपण हे अशा प्रकारचे कायदे करीत आहात. या सुधारणेमध्ये आणखी एक जी सुधारणा आली आहे, ती चांगली आहे. निवडून आलेले नगरसेवक ज्याठिकाणी बांधकाम होत असेल त्याठिकाणी जाऊन बेकायदेशीरपणे त्यामध्ये हस्तक्षेप करत असतील, अधिकाऱ्यांना अडवत असतील तर He is liable for disqualification. त्यांचे नगरसेवक पद रद्द करण्याच्या कारवाईस ते पात्र ठरतात व तशी कारवाई आयुक्त तातडीने करु शकतात, अशी यामध्ये सुधारणा आहे, हे फार चांगले आहे. कोणी तरी वजनदार आमदाराच्या, मंत्र्याच्या मदतीने किंवा शासनाच्या मदतीने जर कोणी शासकीय अधिकाऱ्यांवर दबाव आणून असे करत असेल तर त्याबाबतीत आपण निर्बंध आणत आहात, हे चांगले आहे. ग्रामपंचायतीपर्यंत चांगले निर्बंध आहेत. आपले जर काही स्थानिक स्वराज्य संस्थेचे देणे बाकी असेल तर आपल्याला निवडणुकीला उभे राहता येत नाही. He is bouind to disqualify. त्यानंतर सुधारणेमध्ये आणखी निर्बंध आले. एखाद्या नगरसेवकाने बेकायदेशीर बांधकाम केले असेल व ते उघडकीस आले असेल तर ताबडतोब त्यांनी घरी जावयाचे, असा निर्बंध आहे. चांगले कायदे राबवत असताना आयुक्त किती सक्षम आहेत, हे आपल्याला दिसून येईल. आपण श्री.रोकडे या चांगल्या अधिकाऱ्यास अकोला येथे पाठविले. कारण, आपल्याला ते नकोसे होते. आज अशा सक्षम, चांगल्या, जबरदस्त अधिकाऱ्याची मुंबईला गरज असताना आपण त्यांना तिकडे पाठविले. मुंबईतील माफियांना आवरण्याची, बेधडक कारवाई करण्याची, माफियांच्या छातीवर बसून त्यांना उद्ध्वस्त करण्याची, परप्रांतीयांना पळवून लावण्याची, भूखंड माफियांना आवरण्याची तसेच आताच माननीय पंतप्रधानांनी मुंबई महापालिकेच्या बाबतीत जो अंगुलीनिर्देश केला त्या माफियांना सरळ करण्याची ताकद असणाऱ्या श्री.रोकडे या अधिकाऱ्यास आपण तिकडे पाठविले, हे योग्य नाही. तो अधिकारी केवळ नावडता होता म्हणून, स्वच्छ कारभाराचा होता म्हणून, कोणासही मोजत नव्हता म्हणून, आपले काम सरळमार्गाने करत होता म्हणून आपण त्यांना तिकडे पाठवले. श्री.खैरनार यांच्यापेक्षाही 10 पटीने चांगला हा अधिकारी आहे. अशा श्री.रोकडे या अधिकाऱ्यास आपण साईड पोस्टींग देऊन अकोला महापालिकेत पाठविले, हे योग्य नाही. ते त्याठिकाणी येऊन कौतुक करावे असे काम करीत आहेत. त्यांनी त्याठिकाणी आल्या आल्या 20

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

नगरसेवकांना धारेवर धरुन नोटीसा दिल्या. नगरसेवकांनी 6 इंच जरी बेकायदेशीर काम केले असेल तर त्यास जबाबदार धरुन डिस्कॉलिफाय केले. ज्या ज्या नगरसेवकाने गेल्या 2-5 वर्षामध्ये बेकायदेशीररित्या नगरसेवक पदाचा वापर करुन समित्यामध्ये, स्थायी समित्यांमध्ये किंवा आणखी कुठल्या समित्यांमध्ये बेकायदेशीररित्या बांधकाम केले असेल वा तसे ठराव केले असतील तर अशा 20 नगरसेवकांना त्यांनी नोटीसा दिल्या. Then why he should not be disqualified?

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते........

महानगरपालिका झाली, बेकायदेशीर बिल काढले, 1 आत्महत्या झाली, त्याची नोंद त्या अधिका-यांनी घेतली जी आपल्या कुणालाही घेता येत नव्हती. सभापती महोदय, मी हे का सांगतो आहे ? सक्षम अधिकारी असेल तर हा कायदा ताकदीने वापरण्याची क्षमता असू शकते त्यामुळे कायद्यात दुरुस्ती आणण्याची गरज काय आहे ? असा माझा प्रश्न आहे. संभाजीनगर नगरपालिकेमध्ये कुठल्यातरी प्रकरणावरुन वादावादी होते, महिला नगराध्यक्ष आहेत. पुरुष निगरगट्ट असू शकतात परंतु भगिनींच्या डोळयामध्ये अश्रु येऊ शकतात. अकोट नगरपरिषदेमध्ये महिला नगराध्यक्षांचा कॅाग्रेसच्या उपनगराध्यक्षांनी सर्वांसमोर विनयभंग केल्यानंतर सुध्दा त्यांना शिक्षा होऊ शकत नाही. आंदोलने झाली, मोर्चा निघाला, पोलीस केसही झाली, मी स्वत: त्या ठिकाणी गेलो, जिल्हाधिका-यांशी बोललो, त्यांना विनंती केली. नगराध्यक्षांची मागणी काय होती ? नगराध्यक्ष आणि उपनगराध्यक्ष यांच्या बसण्याची व्यवस्था एकाच दालनात आणि एकाच टेबलवर करण्यात आली होती, सतत वाद होतात, नगराध्यक्ष महिला आहेत, उपनगराध्यक्षांना काय कारभार करावयाचा असेल तो त्यांनी करावा, परंतु स्वतंत्र दालन द्या, अशा प्रकारची मागणी होती. म्हणून उपनगराध्यक्षांना स्वतंत्र दालन तयार करुन देण्यात आले. परंतु, तो उद्दाम उपनगराध्यक्ष अजूनही जुने दालन सोडण्यास तयार नाही. जिल्हाधिका-यांनी त्यांना विनंती केली, परंतु ते ऐकत नाहीत. सन्माननीय मंत्रीमहोदयांनी याच सभागृहाच्या लॅाबीमधून दूरध्वनी केला, मी त्यांना धन्यवाद देईन, ते मराठवाडयातील आहेत, ते सक्षम मंत्री म्हणून मी त्यांना ओळखतो, त्यांनी जिल्हाधिका-यांना आदेश दिले परंतु त्यांचेही आदेश मानले गेले नाहीत. आजही आमचे नेते आमच्यासाठी काही करु शकत नाहीत, आमचा पक्ष, आमचे शासन, आमचे मंत्री आमच्यासाठी काही करु शकत नाही अशा मानसिक अवस्थेमध्ये त्या महिला नगराध्यक्ष काम करीत आहेत. ते कशा पध्दतीने काम करीत असतील याची मला कल्पना नाही कारण माझ्यामध्ये त्यांच्याकडे विचारणा करण्याची हिंमत राहिलेली नाही. विधानपरिषदेमध्ये आम्ही प्रश्न उपस्थित करतो, प्रश्न उपस्थित केल्यानंतर, शब्द दिल्यानंतर, या प्रश्नाची तातडी कळत नसेल तर हे शासन तुम्ही कोणासाठी राबवित आहात ? असा प्रश्न निर्माण होतो. दोन दिवसांनंतर दोन मंत्र्यांकरिता मी बांगडया घेऊन येणार आहे, सन्माननीय सदस्या, डॅा.नीलम गो-हे यांनी हिरव्या बांगडया देते असे सांगितले

..2..........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...........

आहे, निर्णय घेता येत नसल्याने सभापतींनी निर्देश देऊनही जर पालन होत नसेल तर त्यांना नपुसक मंत्री म्हणून जाहीर करुन त्यांना या सभागृहात बांगडया देणार आहे.

**तालिका सभापती (श्री.गुरुनाथ कुलकर्णी)** : 'नपुसक' हा शब्द कामकाजातून काढून टाकावा.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, हा शब्द आपण जर काढणार असाल तर मग मी त्यांना तृतीयपंथी म्हणू काय ? असे असेल तर मला तुम्ही पर्यायी शब्द सूचवावा. ना पुरुष, ना बाई अशा पध्दतीने वागणा-यांना काय म्हणावे ?

श्रीमती सुधा जोशी : सभापती महोदय, बांगडयांबद्दल सन्माननीय सदस्यांनी जे वक्तव्य केले आहे त्यामुळे बांगडयांचा अपमान झाला आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, अंधश्रध्देसंदर्भात जे विधेयक सभागृहात येणार आहे त्याची मी वाट पहातो आहे. हे विधेयक बांगडयावगैरे काही मानत नाही. मला बांगडयांबद्दल निश्चित आदर आहे कारण तो महिलांचा अलंकार आहे.

यानंतर श्री.बोरले..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.........

ज्यावेळी अंधश्रद्धा विधेयक सभागृहामध्ये येईल त्यावेळी ही अंधश्रद्धा आहे असे म्हणणारे तुम्ही याला कसे उत्तर देणार आहात याची मी वाट पाहणार आहे. सभापती महोदय, कोणता शब्द वापरावयाचा तो आपण नंतर वापरु. परंतु मला हे कळत नाही की, जे कायदे आहेत त्या कायद्याने सक्षमपणे काम करणारे समोर असतांना अकोल्याच्या जिल्हाधिका-यांना माननीय मंत्री महोदयांनी सांगून सध्दा काम होत नाही. सभापती महोदय, आपल्याला व्यवस्थित मार्गदर्शन ठरु शकेल अशी तरतूद या कायद्याच्या कलम 18 मध्ये आहे. मुंबई महानगरपालिका अधिनियम, 1949 च्या कलम 18 मध्ये असे म्हटलेले आहे की, "Whenever it is alleged that any Councillor has become disqualified for office for reasons aforesaid, and such Councillor does not admit the allegation,or whenever any Councillor is himself in doubt whether or not he has become disqualifed for office, such Councillor or any other Councillor may, and the Commissioner, at the request of the Corporation shall apply to the Chief Judge of Small Cause Court; and the said Chief Judge, after making such inquiry as he deems necessary... " Here the wording is: as he deems necessary." अशी आहे. Furtgher it is stated that: ...." shall determine whether or not such Councillor has become disqualified for being a Councillor, and his decision shall be final." अशी तरतूद असतांना, ताकदीने हा कायदा पूर्वी तयार केलेला असतांना गैरवागणूक कशाला म्हणतात याची व्याख्या यामध्ये असण्याची शक्यता आहे. ती व्याख्या रिपिट व्हावयास पाहिजे. परंतु मी त्याच्या खोलामध्ये जात नाही. माझा प्रश्न असा आहे की, आपण या विधेयकाच्या 18-1 अ (3) मध्ये असे म्हटलेले आहे की, "ज्या प्रकरणात, राज्य शासनाने पोट-कलम (1) अन्वये आदेश दिला आहे. अशा प्रत्येक प्रकरणामध्ये, अशा पालिका सदस्यास राज्य शासनाने आदेश काढून निरर्हतेपासून मुक्त केले नसेल तर, अशा आदेशाच्या दिनांकापासून पाच वर्षांच्या कालावधीसाठी, पालिका सदस्य म्हणून राहण्यास किंवा पालिका सदस्य होण्यास किंवा इतर एखाद्या स्थानिक प्राधिकरणाचा परिषद सदस्य किंवा सदस्य होण्यास निरर्ह असेल आणि असा

...2/-



श्री.दिवाकर रावते.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निरर्हतेपासून मुक्त करणारा आदेश काढण्याचा अधिकार राज्य शासनास याद्वारे देण्यात येत आहे." ही सुधारण या कायद्यामध्ये आहे. ते अधिकार आपण घेत आहात. मंत्री महोदय सांगतील की, मला आता फाईल बघण्यास वेळ नाही. मग ती फाईल तशीच पडून राहणार आणि सरकारच्या मर्जीवर त्याचे क्वॉलिफिकेशन, डिसक्वॉलिफिकेशन ठरणार. कौन्सिलरचे भविष्य मंत्रालयामध्ये ठरणार आहे. आज हा अधिकार आपल्याला नाही. श्री.भास्कर जाधव व श्री.अनंत तरे यांच्या निवडणुकीच्या वेळी उरण भागातील नगरपालिकेमध्ये काय घडले......

यानंतर श्री.सुंबरे ......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते ....

तुम्हाला ते आठवत असणार. तेथील 18 नगरसेवकांना निवडणुकीमध्ये मतदान करण्यास अपात्र ठरविण्यासाठी डिस्क्वालिफाय केले आणि ती फाईल पुढे मंत्रालयामध्ये पाठविली गेली. मंत्री त्यावर स्टे द्यायला लागले. मी त्यांना म्हटले की, त्यांना हा अधिकारच नाही. त्यांनी तसे करू द्यात, आपण त्याला आव्हान देऊ. त्या नगरसेवकांना प्रथमत: डिस्क्वालिफाय केले आणि नंतर असे करणे चुकीचे आहे असे सांगितले आणि मग त्यावर स्टे दिला. तो स्टे उठविण्यासाठी फाईल मंत्रालयात आली. पण तो अधिकार आताच्या या विधेयकाने त्यांना मिळणार आहे. तो अधिकार तेव्हा त्यांना नव्हता. त्या नगरपालिकेमध्ये 15 नगरसेवक शिवसेनेचे होते आणि त्यांची मते कमी करावयाची होती म्हणून हे सारे खेळ केले जात होते. तेव्हा हे अधिकार शासनाने आपल्या हातामध्ये घेतल्यानंतर आता येथे सन्माननीय सदस्य श्री.जोशी यांनी म्हटल्याप्रमाणे संपूर्ण महाराष्ट्रातील नगरपालिका, महापालिका आणि त्यातील नगरसेवकांचे भवितव्य हे शासनाच्या, मंत्र्यांच्या हामाध्ये राहणार आहे. दोन तृतियांश मताने सदस्य निवडून आल्यानंतर विरोधी पक्षाचा आवाज दाबण्यासाठी हे अधिकार सरकारकडे येणार आहेत. अशा प्रकारे विचित्र अशी लोकशाहीची विटंबना करणारा, लोकशाहीचा गळा घोटणारा, जनतेने निवडून दिलल्या नगरसेवकांच्या अधिकारावर गदा आणणारा हा कायदा या सदनामध्ये आलेला आहे. आता मंत्री महोदयांनी सांगितले की, कोणी कोर्टामध्ये गेले आहे तर यामध्ये कोण कशासाठी कोर्टामध्ये गेले होते, त्यावर जजमेंट कोर्टाने काय दिले आहे ही माहिती देखील मग सदनापुढे येऊ द्यात. दुसरे असे की, कोर्टाला या बाबतीत जी काही आपली जबाबदारी पार पाडावयाची आहे ती पाडू द्यात. तेव्हा अशा प्रकारचा कायदा व्हावा आणि लोकशाहीचा गळा घोटावा असे अधिकार एखाद्या अधिकाऱ्याच्या किंवा मंत्र्याच्या हातामध्ये असावेत असे मला वाटत नाही म्हणून मी याला पूर्णपणे विरोध दर्शवितो. धन्यवाद.

****

...... 3एम 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 आणि नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम 1948 यात आणखी सुधारणा करण्यासाठी सन 2004 चे वि.प.वि.क्रमांक 28 या सदनामध्ये विचारार्थ आणि पारित करण्यासाठी आणले आहे त्याचे समर्थन तर मी करणारच आहे. परंतु ते करीत असतानाच अनेक शंका, मुद्दे सन्माननीय सदस्यांनी जे येथे उपस्थित केले आहेत त्यांच्याकडे लक्ष वेधणे आवश्यक आहे असे मला वाटते. पालिका सदस्याकडून त्यांची कर्तव्ये पार पाडताना गैरवर्तणूक वा लज्जास्पद वर्तणूक केली असेल तर त्याबद्दल त्यांचे सदस्यत्व रद्द करण्या संबंधातील सुधारण या विधेयकातून आणलेली आहे. खरे पाहिले तर या दोन गोष्टींचा खुलासा होणे आवश्यक आहे. सदस्यांची गैरवर्तणूक आणि लज्जास्पद वर्तणूक यांची व्याख्या होणे आवश्यक आहे. या पूर्वीच्या उपलब्ध कायद्यांमध्ये याची जी तरतूद आहे, नगरपालिकेमध्ये, महाराष्ट्र नगर परिषदांमध्ये, नगर पंचायतीमध्ये तसेच औद्योगिक नगरी कायदा 1965 मध्ये कलम 42 च्या धर्तीवर सर्व महापालिका अधिनियमासंबंधात तरतूद करण्यासाठी हे विधेयक आपण आणलेले आह. एक महत्त्वाची गोष्ट अशी आहे की, या विधेयकाच्या माध्यमातून जो कायदा तयार होणार आहे त्यामुळे सत्तेचे विकेंद्रीकरण होण्याऐवजी केंद्रीकरण होण्याची भीती व्यक्त केली गेली आहे त्यामुळे त्याचा विचार करण्याची गरज आहे. जेथे ॲब्सोल्यूट मेजॉरिटी आलेली आहे, एकूण सदस्यांपैकी तीन चतुर्थांश सदस्यांनी पाठिंबा दिला असेल तर महापालिकेच्या शिफारशी वरून, अशा पालिका सदस्यास आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल त्या तारखेपासून पदावरून काढून टाकण्यात येईल असे या परिशिष्टामध्ये सांगण्यात आले आहे. ...

( यानंतर श्री. सरफरे .... 3एन 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे...

त्या ठिकाणी एखाद्या पक्षाचे निर्विवाद बहुमत असेल आणि तो सदस्य विरोधी पक्षामधील असेल किंवा स्वपक्षामधील एखादा नावडता, मर्जी नसलेला सदस्य असेल तर त्याच्याविरुध्द देखील आकसाने कारवाई होण्याची शक्यता आहे. ही भीती व्यक्त करणे मी माझे कर्तव्य समजतो. माझ्या अनेक मित्रांनी त्यासंबंधीचा उल्लेख केला आहे. मी त्यासंबंधी अधिक स्पष्टपणे उल्लेख केला आहे. आणि म्हणून ही बाब लक्षात घेणे आवश्यक आहे. एखादा सदस्य अपात्र झाल्यानंतर महापालिका राज्य शासनाकडे त्या सदस्यास अपात्र करण्यासंबंधी शिफारस करील आणि त्या शासनाला अपात्र करावयाचे की नाही यावर राज्य शासन विचार करील. महानगपालिकेमध्ये ज्या पक्षाची सत्ता असेल आणि राज्य शासनामध्ये देखील त्याच पक्षाची सत्ता असेल तर तो सदस्य निश्चितपणे अपात्र होईल. त्याच्या बाबतीत साधक बाधक विचार केला जाईल की नाही हा महत्वाचा प्रश्न आहे. त्यामुळे राज्य शासनाने एकदा सदस्यास अपात्र केल्यानंतर तो सदस्य हायकोर्टामध्ये धाव घेऊन न्याय मागू शकतो त्याबाबत आपण काय करणार आहात? आणि म्हणून हायकोर्टाने सूचना केली म्हणून अशाप्रकारचे विधेयक आणले जाणार असेल तर ती बाब उचित नाही. शेवटी ज्या सदस्यांचे सदस्यत्व महानगरपालिकेने रद्द केले असेल आणि राज्य सरकारने त्यावर शिक्कामोर्तब केले असेल आणि त्यावेळी त्या सदस्याला आपल्यावर अन्याय झाला आहे असे वाटत असेल तर तो हायकोर्टामध्ये धाव घेण्यासारखी परिस्थिती यामध्ये निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही. त्यामुळे ही अत्यंत गंभीर अशी बाब आहे. माननीय सदस्य श्री. श्रीकांत जोशी यांनी याठिकाणी मुद्दा उपस्थित केला आहे. मी 25 जूनला औरंगाबाद येथे गेलो होतो. औरंगाबाद महानगरपालिकेचे महापौर अत्यंत सजग आहेत. औरंगाबाद शहराचे सौंदर्यीकरण करणे, राष्ट्रीय पातळीवर हे शहर पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी ज्या काही सुधारणा करता येतील त्या करण्यासाठी ते प्रयत्नशील असतात. त्यामुळे अतिक्रमण हटवितांना प्रसंगी लोकांचा रोष सहन करुन देखील ते अतिक्रमणे हटवितात. स्वत: जातीने उपस्थित राहून आपल्या देखरेखीखाली अतिक्रमणे हटविण्याची मोहीम त्यांनी हाती घेतली आहे. परंतु त्याठिकाणी असे झाले आहे की, अदालत रोडहून क्रांतीनगरकडे एक रस्ता जातो. त्याठिकाणी महानगरपालिकेने एका बाजूची चार ते पाच दुकांनांची अतिक्रमणे हटविली. परंतु दुसऱ्या बाजूकडील 20 ते 25 दुकानांची लाईन तशीच ठेवली आहे. अशाप्रकारचा पंक्तीप्रपंच, भेदभाव अतिक्रमणे हटविण्याच्या बाबतीत महानगरपालिका करीत असेल आणि त्यामध्ये लोकप्रतिनिधी अडथळा आणीत असेल, हस्तक्षेप करीत असेल, न्याय मागत असेल



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे...

तर त्याला देखील आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले जाण्याची शक्यता आहे. एका बाजूला रस्त्याच्या डावीकडील अतिक्रमण काढल्यानंतर उजव्या बाजूचे अतिक्रमण तसेच कायम ठेवले आहे...

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, माझ्या नावाचा उल्लेख झाला असल्यामुळे मी सांगू इच्छितो की, तेथील लोकांनी स्वत: अतिक्रमण काढून टाकले आहे.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, मी त्याठिकाणी जे घडले आहे ते याठिकाणी सांगत आहे. महानगरपालिकेने बुलडोझर लावून एका बाजूकडील अतिक्रमणे हटविण्याची मोहीम राबविली परंतु दुसऱ्या बाजूकडील अतिक्रमणे तशीच ठेवली आहेत. अशाप्रकारचा भेदभाव महानगरपालिका कां करीत आहे? अशाप्रकारे एखाद्या सदस्याने महानगरपालिकेच्या प्रशासनाला जाब विचारला तर महानगरपालिकेच्या कामकाजामध्ये हस्तक्षेप केला म्हणून महानगरपालिकेकडून त्याचे सदस्यत्व रद्द केले जाण्याची शक्यता आहे, अशाप्रकारची शंका निर्माण झाली आहे. एकीकडे सत्तेचे केंद्रीकरण होत असतांना तिचे विकेंद्रीकरण झाले पाहिजे अशाप्रकारचे सरकारचे धोरण आहे. असे असतांना या विधेयकाच्या माध्यमातून आपण एकाधिकारशाहीकडे वाटचाल तर करीत नाही ना? अशाप्रकारची भीती व्यक्त करण्यात आली आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे (पुढे सुरु...

या गोष्टींचा साधकबाधक विचार करुन, योग्य प्रकारची दखल घेऊन कायद्यामध्ये तरतूद करण्यात आली तर मला वाटते हा कायदा परिपूर्ण होईल. या कायद्याला समर्थन देत असताना, माझ्या सूचनांचा विचार करावा अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/

श्री.भास्कर जाधव (रायगड तथा रत्नागिरी तथा सिंधूदूर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, महाराष्ट्र महानगरपालिका (दुसरी सुधारणा) विधेयक 2004 हे शासनाने आणलेले आहे, त्याचे स्वागत करण्याकरिता मी उभा आहे. या विधेयकाचे स्वागत करत असताना काही गोष्टी नमूद करणे आवश्यक आहे. काही संभाव्य गोष्टी वाटतात, काही गोष्टींची शंका वाटते त्या बोलणे आवयक आहेत. सभापती महोदय, या अगोदर सन्माननीय सदस्यांनी तीन-तीन कायदे अस्तित्वात असताना शासनाला अशाप्रकारचे बील आणण्याची नक्की काय आवश्यकता वाटली ? अशाप्रकारचा प्रश्न उपस्थित केला. हा प्रश्न उपस्थित करत असताना, आपण लोकप्रतिनिधी म्हणून समाजामध्ये, लोकांमध्ये वावरत असतो. समाजातील जनतेच्या लोकप्रतिनिधींकडून जास्तीत जास्त अपेक्षा असतात. लोकप्रतिनिधींवर जास्तीत जास्त भिस्त असते. कोणत्याही प्रकारची गोष्ट असेल, अडचण दूर करावयाची असेल तर लोकप्रतिनिधींना याबाबत विचारले जाते. लोकप्रतिनिधींनी काही मदत केली नाही तर काम का झाले नाही ? दरड कोसळली तर त्याबाबतची कामे का झाली नाहीत,मदत का पोहोचली नाही ? अशाप्रकारचा प्रश्न लोकप्रतिनिधींना विचारला जातो. याचा अर्थ असा आहे की, सर्वच अडचणीचे प्रश्न लोकप्रतिनिधींना सोडवावे लागतात. समाजाकडून तशाप्रकारची अपेक्षा असताना लोकप्रतिनिधींना अधिकार किती आहे? हे पाहिले पाहिजे. आज लोकप्रतिनिधी म्हणून 100 टक्के लोकांच्या अपेक्षा आहेत. या दृष्टीने धोरण ठरवावे लागेल. लेजिस्लेचर आणि एक्झीक्युटिव्ह अशा वेगवेगळ्या बॉडीज आहेत. कार्यकारी अधिकार लोकप्रतिनिधींना नाहीत तर शासनाला आहेत. याला जबाबदार हे प्रशासन असते. प्रशासची 80 टक्के जबाबदारी असते आणि 20 टक्के जबाबदारी ही लोकप्रतिनिधींची असते. अशा पार्श्वभूमीवर लोकांचे समाधान करण्याकरिता, आपल्याला ज्यांनी निवडून दिले, त्यांना न्याय देण्यासाठी, त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी लोकप्रतिनिधींनी आग्रही व्हावे, आक्रमक होऊन प्रशासनाच्या विरोधामध्ये उभे रहावे लागते.

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री.विलास अवचट)**

कधी कधी प्रशासनाच्या विरुध्द उभे रहावे लागते. परवाच एक नगरमध्ये घटना घडली. एकाच अधिकाऱ्यांनी दोन लोकप्रतिनिधींना "महापौर" म्हणून निवडले. निवडणूक अधिकाऱ्यांनी दोन महापौर निवडले. अशाप्रकारच्या जिल्हा परिषदेमध्ये आणि महानगरपालिकेमध्ये अधिकारी दोन-दोन निर्णय घेतात, अशाप्रकारच्या घटना घडलेल्या आहेत. ज्यांच्यावर अन्याय झाला असे वाटते, त्यांचा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/

श्री.भास्कर जाधव (पुढे सुरु...

अपमान झाला, म्हणून ते आक्रमक झाले आणि त्यांच्याकडून कळत न कळत आक्रस्ताळपणाने अशी चूक घडली तर अधिकाऱ्यांशी गैरवर्तन केले,शासकीय कामामध्ये हस्तक्षेप केला, अशाप्रकारचा आक्षेप घेऊन लोकप्रतिनिधींना अडचणीत आणण्याचे काम केले जाते. हे आपण सगळेजण अनुभवतो आहोत. अशावेळेला लोकप्रतिनिधी म्हणून आपले स्वत:चे अधिकार वाढविण्याऐवजी ते आपण कमी करतो आहोत, सीमित करत आहोत.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव ....

आपण आपले अधिकार, आपले हक्क, आपली मान दिवसेंदिवस अधिकाऱ्यांच्या हातामध्ये देत आहोत. अधिकाऱ्यांचा अवमान झाला, अधिकाऱ्यांना गैरवर्तणूक दिली असा उल्लेख बिलामध्ये करुन लोकप्रतिनिधींना अनर्ह करता येते. आपण सगळ्या बाबतीत लोकप्रतिनिधींकडून अपेक्षा व्यक्त करतो. पावसामुळे खड्डे पडले तर उद्या लोक अधिकाऱ्यांच्या घरावर मोर्चा घेऊन जाणार नाहीत तर ते लोकप्रतिनिधींच्या घरावर मोर्चा घेऊन जाणार. वर्तमानपत्रातून लोकप्रतिनिधींच्या बाबतीत जबरदस्त टीका होते. अनेक बाबतीत लोकप्रतिनिधींना जबाबदार धरले जाते. अशा वेळी एखाद्या लोकप्रतिनिधीने जर लोकांना न्याय देण्याकरिता, त्या प्रश्नाची सोडवणूक करण्याकरिता, अन्यायाच्या विरोधात आवाज उठविला आणि थोडाफार आक्रस्ताळेपणा केला तर त्यांना आपण या कायद्यामध्ये अडकवून त्यांचे सदस्यत्व घालविणार काय ? याचा विचार या बिलामध्ये करण्याची आवश्यकता आहे. आपण तीनचतुर्थांश सदस्यांच्या मेजॉरिटीचा विषय यामध्ये घेतला आहे तो विषय फायदेशीर आहे. तो विषय नुकसानीचा नाही. किमान तीनचतुर्थांश सदस्य एकत्रित येतील अशी शक्यता फार कमी असते. म्हणजे किमान तीनचतुर्थांश सदस्यांचा जो विचार आहे तो आशादायक वाटतो. माझी शासनाला या बिलाच्या माध्यमातून विनंती आहे. सत्ताधारी पक्षाचा सदस्य म्हणून या बिलाला पाठिंबा देत असताना माननीय मंत्रिमहोदयांना अशी विनंती करणार आहे की, या बिलामुळे कळत नकळत आपण आपल्यावरच काही ओढवून तर घेत नाही ना ? आज आपण सत्तेमध्ये असल्यानंतर आपलेच लोक काही गटबाजी करतील आणि कुरघोडी करतील आणि न्याय द्या म्हणून दोन्ही बाजूचे लोक आपल्या मानेवर बसतील. म्हणजे या बिलाचा दुरुपयोग आपण आपल्यासाठीच तर करुन घेत नाही ना अशी शंका वाटते. या बिलामध्ये फायदे कमी आणि अडचणीच जास्त दिसतात. मी सत्तारुढ पक्षाचा सदस्य असलो तरी हे बिल मंजूर होत असताना यामध्ये अडचणीच जास्त वाटतात. म्हणून माननीय मंत्रिमहोदयांना विनंती आहे की, हे बिल आणण्याच्या पाठीमागे आपला हेतू निश्चिपणे चांगला असेल पण तो हेतू पूर्णपणे या ठिकाणी विशद झाल्याचे दिसत नाही. सन्माननीय सदस्य श्री. श्रीकांत जोशी यांनी गैरवर्तणूक आणि लज्जास्पद वर्तणूक याबाबतीत व्याख्या करण्यास सांगितले. आपण जसा शब्दप्रयोग करणार, जशी आपण जीभ वळवू त्याचा दुरुपयोग होणार असेल तर त्याचा त्रास एकाच पक्षाला नाही तर सर्व पक्षांना होणार

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM/

श्री. भास्कर जाधव .....

आहे. अशा प्रकारचा कायदा करीत असताना हा कायदा लोकप्रतिनिधींना अडचणीचा ठरणार नाही याचा प्रामुख्याने विचार करण्याची आवश्यकता आहे. कारण सगळ्याच संस्था आपल्याला जबाबदार धरतात. वर्तमानपत्रे, न्यायालये आपल्याला जबाबदार धरतात. प्रशासन आपल्याला जबाबदार धरणार. लोकप्रतिनिधींनाच 100 टक्के अधिकार आहेत अशा पध्दतीने आरोपीच्या पिंजऱ्यात आपल्याला उभे करु शकतात. आपण जनतेला उत्तरदायी ठरतो. या कायद्यामुळे अडचण होण्याची शक्यता आहे. आज आयुक्तांकडे अधिकार असताना आयुक्तांनी अन्याय केला तर त्याची दाद शासनाकडे मागता येते. आता सरळसरळ शासनाकडे अधिकार आल्यानंतर पुढे कदाचित अन्याय झालेल्या माणसाचे म्हणणे आपण ऐकून घेणार असलो तरी ज्याच्यावर अन्याय झाला असेल त्याने दाद कोठे मागावयाची ? पुन्हा हा प्रश्न कोर्टात जाणार. पुन्हा सगळे अधिकार कोर्टाकडे जाणार. याचाही विचार करण्याची आवश्यकता आहे. शासनाने तो विचार या बिलामध्ये केला असेल असे गृहीत धरतो. माननीय मंत्रिमहोदय आपल्या उत्तराच्या भाषणामध्ये त्याबाबत सांगतील अशी अपेक्षा व्यक्त करुन, या बिलाला पाठिंबा देऊन मी माझे भाषण संपवितो.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM/

श्री. मधुकर चव्हाण ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, पहिल्यांदा मी एक गोष्ट सांगू इच्छितो की, या ठिकाणी आमचे मित्र सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव हे सूंभ जळाला पण पीळ कायम आहे अशा अविर्भावात बोलले. अशा पध्दतीने त्यांनी भाषण केले. या ठिकाणी ते पोटतिडिकीने बोलले. त्यांच्या बोलण्यातील विरोधाभास मला कळू शकला नाही. त्यांनी या बिलातील एकही चांगली गोष्ट सांगितली नाही. त्यांनी यातील सगळे धोके सांगितलेले आहेत. म्हणजे एखाद्याला म्हणावयाचे की, तू चोर आहेस, तुझ्या हातात सुरा आहे, तू मला मारणार आहेस तरी सुध्दा मी तुझे स्वागत करतो, तुला जेवायला बसवतो असे सांगण्यासारखे आहे. मी या ठिकाणी आठवण करुन देतो की, श्री. रामराव आदिक उपमुख्यमंत्री असताना श्री. वसंतदादा पाटील हे मुख्यमंत्री होते. इंग्रजांनी महापालिकेचा अतिशय चांगला कायदा केला आहे. परप्रांतियांनी सुध्दा महापालिकेच्या कायद्यामध्ये बरखास्तीचे कलम ठेवलेले नव्हते. शंभर वर्षाच्या काळामध्ये, या मुंबई महापालिकेच्या काळामध्ये, संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या काळामध्ये मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे असा प्रस्ताव केला गेला.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. मधुकर चव्हाण पुढे सुरु...)

संयुक्त महाराष्ट्राच्या विरोधात असलेले स्व. मोरारजी देसाई हे त्यावेळी मुंबई राज्याचे मुख्यमंत्री होते. तरी सुध्दा तो प्रस्ताव बेकायदेशीर ठरविण्याची हिंमत त्यांनी दाखविली नाही. याचे कारण असे की, ब्रिटीशांनी सर्वंकष असा कायदा केलेला होता. कारण It is related to civic services. स्थानिक स्वराज्य संस्थांना जास्तीत जास्त अधिकार दिले गेले पाहिजेत, लोकशाही पर्कोलेट होऊन ग्रामपंचायती पर्यन्त सर्वाधिकार दिले गेले पाहिजेत, त्यांच्या अधिकारावर अंकुश ठेवू नये असे आपण म्हणत असतो. ग्रामपंचायतीला फायनान्शियल अधिकार देण्यासंबंधीचे बिल केन्द्रामध्ये मांडण्यात येणार आहे. अशा वेळी अशा प्रकारचा कायदा करुन आपण लोकप्रतिनिधींचा गळा घोटण्याचे काम करीत आहोत. 1994मध्ये मुंबई महानगरपालिकेमध्ये विरोधकांचे राज्य होते, ते पुनश्च येऊ नये म्हणून ती महानगरपालिका आपण बरखास्त केली. महानगरपालिका बरखास्त करण्याचे अधिकार शासनाने आपल्याकडे घेतले. त्यानंतर महानगरपालिकेने किंवा स्थायी समितीने केलेले कोणतेही प्रस्ताव जनहिताच्या नावाखाली रद्द करण्याचे अधिकार शासनाने स्वत:कडे घेतले. शासनाने जेव्हा महानगरपालिकेचे प्रस्ताव रद्द केले त्यावेळी हे प्रस्ताव मुंबईच्या व्यापक जनहितासाठी रद्द करण्यात येत आहेत, असे सांगण्याची हिंमत या शासनाने एकदाही दाखविली नाही. महानगरपालिकेने केलेली रिझर्व्हेशन्स नगरविकास विभागाने आदेश काढून रद्द केलेली आहेत. सन्माननीय सदस्य श्री. श्रीकांत जोशी यांनी सांगितल्या प्रमाणे गैरवर्तणुकीची कोणतीही व्याख्या केलेली नाही. समजा एखाद्या विभागामध्ये पाणी आले नाही म्हणून उपस्थित केलेल्या चर्चेच्या वेळी एखाद्या सदस्याने रागारागाने टेबलावरील कामकाजासंबंधीचे कागद फाडून फेकून दिले किंवा एखादे पुस्तक भिरकावले तर ते गैरवर्तन होईल आणि त्याबाबतीत त्याला डिस्क्वालिफाय केले जाईल. एखाद्या सदस्याच्या तोंडून अनावधानाने अपशब्द उच्चारले गेले तर ते देखील गैरवर्तन होईल. लोकशाहीने दिलेले अधिकार संकुचित करणारा हा कायदा आहे. लज्जास्पद याचा अर्थ काय ? माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेसाहेबांनी सांगितल्याप्रमाणे ज्यांनी कलेक्टरचे ऐकले नाही, ज्याने नैतिकता ठेवली नाही, ज्याने स्त्री-सुलभ लाज ठेवली नाही, त्याला तुम्ही डिस्क्वालिफाय केले नाही. म्हणजे विरोधकांचा आवाज दाबण्यासाठी आपल्याला पाहिजे तेव्हा अधिकार घ्यावयाचे, हे योग्य नाही. या विधेयकामध्ये

..2..

(श्री. मधुकर चव्हाण...)

"वाजवी संधी दिली जाईल" असे म्हटलेले आहे. याचा अर्थ काय ? याठिकाणी खाजगी विद्यापीठाचे विधेयक आले होते त्यावेळी त्यामध्ये 15 दिवस, 1 महिना असे बारकावे सांगितलेले होते. त्या विधेयकाला विरोध झाला ही बाब वेगळी. ज्या सदस्याला लोकांनी निवडून दिलेले आहे त्याने मंत्रालयामधील डेस्क ऑफीसरच्या पुढे जाऊन बसायचे आणि मग त्या ऑफिसरने आज वेळ नाही, फाईल आलेली नाही असे रुबाबात त्याला सांगायचे, हे योग्य वाटत नाही. शासनाने मोठ्या मनाने हे विधेयक मागे घ्यावे अशी माझी शासनाला विनंती आहे. हे विधेयक मंजूर झाले तर या शासनाच्या हातामध्ये राक्षसी अधिकार येतील. एखाद्या क्षुल्लक कारणावरुन कोणत्याही नगरसेवकाचे सदस्यत्व रद्द केले जाईल. या नगरविकास खात्याने नगरपरिषदामध्ये कधी डायरेक्ट तर कधी इनडायरेक्ट नगराध्यक्ष निवडून देण्यासंबंधीचे आदेश काढले. आपल्या मर्जी आणि सोयीनुसार निरंकुश सत्ता आपल्या हातामध्ये राहाण्याच्या दृष्टीने कायदे करणे म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्थांचा गळा घोटण्यासारखे आहे. महानगरपालिका आणि नगरपालिकांमध्ये लोकांच्या सोयीसुविधाच्या प्रश्नावर जास्त चर्चा होते. अशा वेळी जरा काही बोलले गेले तर लोकप्रतिनिधीला जबाबदार धरले जाईल.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण.....

आणि अशा वेळेला जर त्या सभागृहात मग ती नगरपालिका असेल, नगरपरिषद असेल, महानगरपालिका असेल, एखाद्या ठरावाच्या वेळेला किंवा प्रस्तावाच्या वेळेला तो जर काही बोलला किंवा मघाशी उल्लेख केल्याप्रमाणे कागदपत्रे जर भिरकावली तर गैरवर्तणूक होईल. तुम्ही डिफाईन करणार नाही, कायद्याच्या चौकटीत बसविणार नाही आणि लोकांनी निवडून दिलेला, लोकशाहीच्या माध्यमातून निवडून आलेला एखादा लोकप्रतिनिधी, त्याला एका लेखणीच्या फटकाऱ्यानिशी तुम्ही डिसक्वालिफाय करणार, मला वाटते हे लोकशाहीच्या विरोधात, लोकशाही परंपरेच्या विरोधात आहे. म्हणून अतिशय मोठया मनाने हा कायदा शासनाने परत घ्यावा आणि अधिकार द्यायचेच असतील तर महापौरांना द्यावेत. तेथील पीठासीन अधिकाऱ्याला दिले जावेत. सभापती महोदय, या सभागृहात एखादी गैरवर्तणूक केली तर तुम्ही 2-3 दिवस बाहेर काढू शकता. मर्यादा म्हणजे एखाद्या शिक्षकाला वर्गात विद्यार्थ्याने गैरवर्तणूक केली तर दोन तास बाहेर उभे करता येते. परंतु लगेच विद्यार्थ्याला डिसक्वालिफाय करुन शाळेतून काढून टाकत नाही. काही वेळेला महापालिका सभागृहाचे असे दृश्य आपण बघतो की,आपल्याला लाज वाटावी. त्यासाठी बिल आणलेले नाही. विरोधकांचा गळा घोटण्यासाठी, महापालिका आपल्या ताब्यात आणण्यासाठी बिल आणलेले आहे. 10-20 वर्षात मुंबई महापालिकेच्या कायद्यातील वेगवेगळी कलमे इतक्या निर्दयपणे बदलण्यात आली, मुंबईच्या जनतेने निवडून दिलेल्या नगरसेवकांना काहीही अधिकार राहणार नाही. श्री.कृपाशंकर सिंह टी.व्ही.वर सांगतात की, मुंबई महापालिकेमध्ये शिवसेना-भारतीय जनता पक्षाचे राज्य आहे, त्यामुळे पुराला तेच जबाबदार आहेत. काय नगरसेवकांना अधिकार आहेत? एकमताने एखादा प्रस्ताव पास केला तर अंमलबजावणी करण्याचे पूर्ण अधिकार तेथील आयएसएस अधिकारी नेमलेले आहेत त्यांना दिलेले असतात. एकमताने जनहिताचा निर्णय घेतला असेल तर त्याची अंमलबजावणी करण्याचे अधिकार आयएएस अधिकाऱ्यांना आणि दोष मात्र टी.व्ही.वर उभे राहून शिवसेना-भारतीय जनता पक्षाच्या नगरसेवकांना दिला जातो. म्हणून जनतेने निवडून दिलेल्या महानगरपालिकेचा गळा घोटण्याचा अधिकार आपल्याला नाही. म्हणून हा लोकशाहीचा गळा घोटणारा कायदा आहे. तो शासनाने मागे घ्यावा अशी माझी विनंती आहे.

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



05-07-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) 3R.2

SGB/ MHM/ SBT/ पूर्वी श्री.शिगम 18:20

श्री.अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, अतिशय लोकशाहीच्या मुळावर घाव घालणारा कायदा किंवा वायदा की आणखी काही सौदा सभागृहात माननीय मंत्रीमहोदयांनी मांडला आहे. सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव बोलत असताना त्यांना कल्पना नव्हती. प्रत्यक्ष काय घडले हे मी अगोदर सांगतो म्हणजे काय वाट लावली ते ताबडतोब कळेल. अहमदनगर महानगरपालिकेच्या महापौर पदाची निवडणूक आणि निवडणुकीसाठी जे राजपत्र निघाले, गॅझेट निघाले त्याप्रमाणे पीठासीन अधिकारी हे महापौर असतात. त्या पीठासीन अधिकाऱ्यांनी सर्व निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण करायची असते. छाननी करण्याचे अधिकार पीठासीन अधिकाऱ्यांचे, निवडणूक घेण्याचे अधिकार पीठासीन अधिकाऱ्यांचे, निकाल जाहीर करण्याचे अधिकार पीठासीन अधिकाऱ्यांचे. म्हणून पीठासीन अधिकारी या नात्याने महापौरांनी तेथे आलेले सगळे अर्ज पाहिले. त्या अर्जांची छाननी करताना 6 अर्ज होते. 4 सदस्यांनी सांगितले की, हे अर्ज आमचे नाहीत, आमची स्वाक्षरी नाही. म्हणून ते अर्ज रद्दबातल ठरले. उर्वरित 2 अर्जापैकी एका अर्जावर अनेक नगरसेवकांनी आक्षेप घेतला. या अर्जावर खोटी माहिती आहे. नंदलाल समितीच्या अहवालाप्रमाणे अशी खोटी माहिती सादर केली हे कळल्यानंतर जी कलमे नमूद केलेली आहेत त्याप्रमाणे कारवाई करता येते. त्या क्षणी जर त्याचा पुरावा सादर केला गेला तर तो अर्ज रद्दबातल ठरविता येतो. याचे उदाहरण म्हणून कल्याण-डोंबिवली महापालिकेचे आहे. नगरसेवक पदासाठी दोन उमेदवार होते, त्या दोन्हीही महिला होत्या. एक महिलेने व्यवसाय म्हणून गृहिणी नमूद केले व दुसरी सेवेत होती. गृहिणी असलेल्या महिलेने आक्षेप घेतला की, ही नोकरीत आहे. तिला अधिकाऱ्यांनी विचारले, नोकरीचा राजीनामा दिला का? तिने राजीनामा दिल्याचे पत्र दाखविले. राजीनामा मंजूर झाला का? राजीनामा मंजूर झाला नाही म्हणून अपात्र ठरविले आणि एकमेव उमेदवार शिल्लक राहिला. तोच प्रकार अहमदनगर महापालिकेत झाला. पीठासीन अधिकाऱ्यांनी एक अर्ज अवैध ठरविल्यानंतर एकच अर्ज वैध ठरला. म्हणून तिने महापौर पद जिंकल्याचे घोषित करण्यात आले.

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ....

सभापती महोदय, पुढे असे झाले की, सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांनी महापौरांच्या आसनाला गराडा घातला. एवढेच नाही तर महापौरांची खुर्चीही फेकून दिली. अशा प्रकारे खुर्ची फेकून देणे हे गैरवर्तन होत नाही का? निवडून आलेले महापौर सभागृहात आल्यानंतर त्यांना आसनावर बसू दिले गेले नाही. शेवटी त्यांना प्लॅस्टिकच्या खुर्चीवर बसावे लागले. महापौर सभागृहात आल्यानंतरही गोंधळ सुरुच होता. नवीन महापौरांनी उपमहापौरांची निवडणूक घ्यावयाची असते म्हणून त्यांनी कामकाजाला सुरुवात केली. कामकाजाला सुरुवात केल्यानंतरही गोंधळ सुरुच होता. त्यानंतर सभा स्थगित झाली. दुर्दैवाने निर्वाचन अधिकारी नसल्यामुळे त्या ठिकाणी एक प्रशासकीय अधिकारी (उपआयुक्त) हे उपस्थित होते. या सभेचे प्रोसिडींगही झालेले आहे. सभा स्थगित झ ााल्यानंतरही त्या ठिकाणी प्रशासकीय अधिकारी बसून होते. त्यानंतर दुस-या पक्षाने पुन्हा सभा घेतली, त्यामध्ये महापौरांची पुन्हा निवड करण्यात आली आणि निवडलेल्या महापौरांनी उपमहापौरांना शपथ दिली. यावेळीही प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते व त्या सभेचेही प्रोसिडींग तयार करण्यात आले. आता हे प्रकरण कोर्टात जाईल. निवडणूकीत प्रशासकीय अधिका-यांना कोणतेही अधिकार नाही. सारे अधिकार पीठासीन अधिका-याकडे म्हणजे महापौरांकडे असतात. हे प्रकरण अहमदनगरमध्ये घडलेले आहे. सायंकाळी ज्या महापौरांची वेगळी बैठक घेऊन निवड करण्यात आली त्यांनी निवडणूकीच्या अर्जावार आपली मालमत्तेची माहिती सादर करतांना आपणाकडे फक्त 50 एकर जमीन असल्याचे शपथ पत्रात सांगितले होते. ही माहिती खोटी असल्याचा दावा अन्य नगरसेवकांनी लेखी सादर करुन त्याचे पुरावे सादर केले. या उमेदवाराच्या नावावर 500 ते 600 एकर जमीन असल्याचा पुरावा दिला तसेच त्यांच्यावर अनेक प्रकारचे गुन्हे केल्याचे पुरावे सादर करण्यात आले. याबाबतीत त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी म्हणून सरकारकडे शिफारस करण्यात आली होती. परंतु ही फाईल शासनाकडे कित्येक दिवसापासून धूळ खात पडलेली आहे. या केसच्या संदर्भात कोर्टाने संबंधितांविरुध्द कारवाई करण्यास सांगितले. परंतु तसे झाले नाही. उलट ही निवडणूक पीठासीन अधिका-यांच्या अनुपस्थित पार पडली म्हणून ती बेकायदेशीर ठरते. या बिलातील क्लॉजेस पाहिले तर प्रश्न येतो की, गैरवर्तणूक करणे, लज्जास्पद वर्तन करणे यासंदर्भात कारवाई होणे आवश्यक आहे. परंतु

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ....

विधान परिषदेच्या निवडणूकीत सुध्दा काय झालेले आहे याची आपल्या सर्वांना माहिती आहे. आता निर्वाचित झालेल्या एका सदस्यांवर अनेक प्रकारचे गुन्हे असतांना त्याला निवडून देण्यात आले. आता अशी परिस्थिती आली आहे की, उमेदवारावर 302 चा गुन्हा असेल तर त्याला विधानपरिषदेवर निवडून दिले जाते आणि 307 चा गुन्हा असेल तर नगराध्यक्ष, महापौर पदी निवडून दिले जात आहे. ज्या उमेदवारावर 302 चा गुन्हा होता अशा उमेदवाराला सत्ताधारी पक्षानेच निवडून दिलेले आहे. हे सरकार शाहू-फुले-आंबेडकरांचे नाव घेते आणि गुन्हेगार असणा-या उमेदवाराला विधानपरिषदेत निवडून पाठविते असे या शासनाचे कर्तुत्व आहे. महापौराच्या निवडणुकीत महापालिकेच्या अधिका-यांनी प्रोटोकॉल पाळला नाही. बेकायदेशीर काम करणे, बेकायदेशीर कामाला प्रोत्साहन देणे यासाठी अडवायला गेले तर नगरसेवक डिसक्वालीफाय केले जाते.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत.....

उमेदवाराला किती मुले असावीत याबाबत देखील कायदा करण्यात आलेला आहे. आता आपण नवीन कायदा आणत आहोत. कलम 13-1 अ मध्ये म्हटले आहे की, " जर कोणताही पालिका सदस्य, पालिका सदस्य म्हणून असलेल्या त्याच्या चालू पदावधीमध्ये किंवा चालू पदावधीच्या लगतपूर्वीच्या पदावधीमध्ये पालिका सदस्य म्हणून त्याची कर्तव्ये बजावत असताना, कोणत्याही गैरवर्तणुकीबद्दल किंवा कोणत्याही लज्जास्पद वर्तणुकीबद्दल दोषी ठरला असेल तर, राज्य शासनास, स्वत:हून किंवा महानगरपालिकेच्या शिफारशीवरुन, त्या सदस्यास पदावरुन दूर करता येईल." लगतच्या पदावधीमध्ये म्हणजे नेमक्या कोणत्या कालावधीत हे स्पष्ट झाले पाहिजे. तसेच शासन किंवा महानगरपालिकेच्या शिफारशीवरुन सदस्यास दूर करता येईल म्हणजे याबाबतीतही संदिग्धता ठेवण्यात आलेली आहे. कलम 13 1 (ब) मध्ये म्हटले आहे की, "जर कोणातही पालिका सदस्य, पालिका सदस्य या नात्याने आपली कर्तव्ये पार पाडण्यास असमर्थ झाला आहे. असे राज्य शासनाचे मत असेल तर, राज्य शासनास, एकूण पालिका सदस्यांपैकी कमीत कमी तीन-चतुर्थांश पालिका सदस्यांनी मत देऊन पाठिंबा दिलेल्या महानगरपालिकेच्या शिफारशीवरुन त्या पालिका सदस्याला दूर करता येईल." याठिकाणी एकूण पालिका सदस्यांपैकी कमीत कमी तीन-चतुर्थांश बहुमत असे जरी म्हटले तरी एकूण सदस्यांच्या तीन-चतुर्थांश की, उपस्थित असलेल्या सदस्यांच्या तीन-चतुर्थांश बहुमत याबाबत स्पष्टता झाली पाहिजे. परंतु तसे स्पष्टपणे सांगण्यात आलेले नाही.

सभापती महोदय, गैरवर्तणूक आणि लज्जास्पद वर्तणूक याबाबत निर्णय घ्यावयाचा असेल तर प्रथम कशाला गैरवर्तणूक म्हणावयाचे आणि कशाला लज्जास्पद वर्तणूक म्हणावयाचे याची व्याख्या निश्चित केली पाहिजे. जसे सभागृहात कोणते शब्द संसदीय आहेत आणि कोणते शब्द असंसदीय आहेत याची लिस्ट करण्यात आलेली आहे त्याप्रमाणे याबाबतीत निर्णय झाला पाहिजे.

सभापती महोदय, कलम 15 मध्ये असे म्हटले आहे की, "(2) पोट कलम (1) च्या प्रयोजनार्थ कोणत्याही पालिका सदस्यास दूर करण्याची शिफारस करणारा कोणताही ठराव महानगरनपालिकेकडून आणि पदावरुन दूर करण्याचा कोणताही आदेश राज्य शासनाकडून, तो

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत.....

ठराव किंवा आदेश, ज्या कोणत्याही पालिका सदस्याशी संबंधित असेल त्यास, अशी शिफारस किंवा यथास्थित, आदेश का काढण्यात येऊ नये याचे कारण दर्शविण्याची वाजवी संधी देण्यात आल्याखेरीज, संमत करण्यात येणार नाही." या कलमामध्ये सुध्दा "वाजवी" हा शब्द व्हेग ठेवण्यात आला आहे. वाजवी संधी म्हणजे काय ? पालिका सदस्याने 15 दिवसांत उत्तर दिले पाहिजे किंवा कसे हे स्पष्ट झाले पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सांगितल्याप्रमाणे झुणका भाकर केंद्रासाठी प्रथम सुरुवातीला 48 तासात पत्र देण्यात यावे असे सांगण्यात आले परंतु नंतर 24 तासाची संधी देण्यात येत आहे असे सांगितले. एकीकडे घटनेच्या कलम 73 मध्ये दुरुस्ती करावयाची आणि पंचायती राज व ग्रामसभेला सर्वाधिकार, आर्थिक अधिकार देण्याचा विचार करावयाचा तर दुसरीकडे ज्यांच्याकडे अधिकार आहेत त्यांचे अधिकार काढून घ्यावयाचे हे योग्य नाही.

सभापती महोदय, कलम 13 च्या पोटकलम (3) मध्ये असे म्हटलेले आहे की, "ज्या प्रकरणात, राज्य शासनाने पोटकलम (1) अन्वये आदेश दिला आहे, अशा प्रत्येक प्रकरणामध्ये अशा पालिका सदस्यास राज्य शासनाने आदेश काढून निरर्हतेपासून मुक्त केले नसेल तर अशा आदेशाच्या दिनांकापासून पाच वर्षाच्या कालावधीसाठी पालिका सदस्य म्हणून राहण्यास किंवा पालिका सदस्य होण्यास किंवा इतर एखाद्या स्थानिक प्राधिकरणाचा परिषद सदस्य किंवा सदस्य होण्यास निरर्ह असेल आणि असा निरर्हतेपासून मुक्त करणारा आदेश काढण्याचा अधिकार राज्य शासनास, याद्वारे देण्यात येत आहे." सभापती महोदय, आता महानगरपालिकेची निवडणूक आहे. जर उद्या एखाद्या पालिका सदस्यावर दुसऱ्या किंवा तिसऱ्या वर्षात कारवाई झाली आणि पुढच्या पाच वर्षाच्या कालावधीसाठी पालिका सदस्य म्हणून राहण्यास किंवा सदस्य होण्यास प्रतिबंध झाला तर तो पुढे कोर्टात जाईल परंतु त्याचा जो मानसिक छळ होईल, जी सामाजिक अवहेलना होईल त्यास कोण जबाबदार असेल ? या विधेयकामध्ये काही बाबी संदिग्ध ठेवण्यात आलेल्या आहेत, त्यामुळे पळवाटा निघतात आणि कोणावरही अंकुश ठेवता येत नाही.

यानंतर श्री.पुरी....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत...

बिलामध्ये पुढे असेही म्हटले आहे की, "या कलमान्वये पालिका सदस्याला काढून टाकण्याबाबत आणि निरर्ह ठरविण्याबाबत कोणतीही शंका किंवा विवाद उद्‌भवल्यास, अशा पालिका सदस्यास, आणि महानगरपालिकेच्या विनंतीवरुन आयुक्तास, न्यायाधीशाकडे त्याचा निर्देश (reference) करता येईल," याचा अर्थ असा निघतो की, जेव्हा पालिका सदस्यांस नगरपालिकेकडून न्याय मिळाला नसेल तेव्हा त्या सदस्यांनी कोर्टाकडून न्याय घ्यावयाचा. आपला उद्देश चांगला असेल, परंतु आपण या बिलाच्या माध्यमातून उद्देश सफल करण्याच्या दृष्टीने जो मार्ग अवलंबिला आहे, तो अत्यंत गैर आहे. सुरुवातीस बोलताना आपण कोर्टाच्या आदेशाबाबत सांगितले. हे ज्युडिशीअरीचे ॲक्टीव्हीझम आहे. नंदलाल समितीच्या अहवालाची अंमलबजावणी सरकार करते, इथपर्यंत ठीक आहे. परंतु कायदा करा अशा प्रकारचे निर्देश कोर्ट कसे देते ? How can judiciary dictate the temrs to enact a law. सकाळी माननीय आर.आर.पाटील साहेबांनी ठरावाच्या निमित्ताने पळवाट काढली. परंतु या कायद्याचा गैरवापर अधिक होईल, त्यामुळे याबाबत काळजी घेणे आवश्यक आहे. म्हणून मला असे वाटते की, याठिकाणी पदावधीच्या कालावधीचे, पूर्व पदावधीच्या कालावधीचे विश्लेषण होणे आवश्यक आहे. याबाबतीत उत्तर देताना माननीय मंत्रिमहोदयांनी आपल्या सद्‌सद्‌विवेकबुध्दीला आव्हान देऊन उत्तर द्यावे व हा कायदा परिपूर्ण करुन पुन्हा याठिकाणी आणतो, असे सदनाला सांगावे. यामध्ये वाईट काही नाही. मला गैरकृत्याच्या बाबतीत, लांच्छनास्पद बाबतीत पाठिंबा द्यावयाचा नाही, परंतु त्यावर कारवाई होण्याच्या दृष्टीने आपण आपल्याकडे अधिकार घेत आहात, त्यामुळे आम्हाला वाईट वाटते. म्हणून मी या बिलाला विरोध करतो व माननीय मंत्रिमहोदयांनी हे बिल मागे घ्यावे व परत सुधारुन हे बिल याठिकाणी आणावे. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

जय हिंद, जय महाराष्ट्र !

-----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्र) : सभापती महोदय, या बिलावरील दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांची मते मी ऐकली. त्यानुषंगाने मला असे वाटते की, जरुर गैरवर्तणूक आणि लांच्छनास्पद या शब्दांची व्याख्या या सभागृहाला अपेक्षित आहे. त्याच बरोबर शासनाकडे असलेल्या अधिकाराबाबतीत गैरवापर होऊ शकतो, असे बऱ्याच लोकांना वाटते. याठिकाणी शासन कुठलेही असो. परंतु त्याबाबतीत गैरवापर होऊ शकतो, अशा प्रकारचा आशय या सभागृहामध्ये दोन्ही बाजूकडून आला. शासन अशा प्रकारचे अधिकार अनेकदा डेलिगेट करण्याचा प्रयत्न करीत असते व तसे अधिकार विभागीय आयुक्तांना देत असते. याबाबतीत प्रशासनाच्या माध्यमातून शासन एखादे परिपत्रक काढून आदेश देऊ शकते. याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी अनेक मुद्दे उपस्थित करुन संशयाचे स्वरुप निर्माण केले. या सर्व गोष्टी लक्षात घेऊन मी अशा निष्कर्षाप्रत आलो आहे की, हे विधेयक जॉईंट कमिटीकडे पाठवण्याच्या दृष्टीने उद्या प्रस्ताव आणून त्या समितीवर विधानसभेचे काही सन्माननीय सदस्य व विधान परिषदेतील काही सन्माननीय सदस्य घेता येतील.

नंतर श्री.रोझेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे........

अशा प्रकारे लज्जास्पद आणि गैरवर्तन अशा बाबी घडत आहेत. यास पायबंद घातला गेला पाहिजे. या बिलाला विरोध करीत असतांना विरोधी पक्षाकडून यासंदर्भात काही सोलुशन सांगितले गेले असते तर बरे झाले असते. अशा प्रकारच्या ज्या घटना घडतात त्यांची यादी माझ्याकडे आहे. काही सन्माननीय सदस्यांनी विचारले की, अशा घटना कुठे घडल्या ? अशा अनेक घटना घडल्या आहेत ज्या अशोभनीय आहेत. अशा प्रकारच्या अशोभनीय घटना घडल्या तर कायद्यामध्ये त्यांना प्रतिबंध करण्यासाठी तरतूद नाही. सन्माननीय सदस्य, श्री.दिवाकर रावते यांनी असा उल्लेख केला की, मुंबई महानगरपालिका कायद्याच्या कलम 18 मध्ये अशा प्रकारची तरतूद आहे. परंतु, ही तरतूद, ज्या क्लॉजसाठी आपण दुरुस्ती करीत आहोत त्यासाठी नाही. आणि म्हणून ही सुधारणा आपण या माध्यमातून करीत आहोत. हा विषय फार महत्वाचा आहे. या विषयावर सांगोपांग चर्चा होऊन कोणत्याही त्रुटी राहू नये म्हणून हे बिल परत घेऊन संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठविण्याचा शासनाचा विचार आहे. हे विधेयक संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठविण्याबाबतचा प्रस्ताव उद्या सभागृहात आणण्यात येईल.

**तालिका सभापती (श्री.विलास अवचट)** : या ठिकाणी मंत्रीमहोदयांनी विनंती केली आहे की, सदर विधेयक दोन्ही सभागृहातील सदस्यांच्या संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठविण्याचा विचार आहे. त्यामुळे या विधेयकावरील चर्चा मी या ठिकाणी थांबवितो.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, ही चर्चा या ठिकाणी थांबवावी, असा प्रस्ताव मंत्रीमहोदयांकडून आला पाहिजे. सन्माननीय मंत्रीमहोदयांनी तसे सांगावे की, ही चर्चा या ठिकाणी थांबवावी, नवीन प्रस्ताव सभागृहात आणीत आहोत, त्यानंतर निर्णय घ्यावा.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, मी अगोदरच सांगितले की, उद्या हा प्रस्ताव आणीत आहोत त्यामुळे आता या ठिकाणी चर्चा आवश्यक नाही.

**तालिका सभापती** : या विधेयकावरील चर्चा आता थांबविण्यात येत आहे.

----------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2...........

**पृ.शी.**: मुंबई महानगरपालिका (सुधारणा) विधेयक

**L .A. BILL NO.XV OF 2006.**

**(A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT.)**

श्री.राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि.स.वि.क्रमांक 15-मुंबई महानगरपालिका अधिनियमात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो..

**तालिका सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.राजेश टोपे : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि.स.वि.क्र.15 - मुंबई महानगरपालिका अधिनियमात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, अतिशय मोजक्या शब्दात या विधेयकासंदर्भात मी बोलणार आहे. मुंबई महानगरपालिकेकडून प्रस्ताव आलेला आहे. हा प्रस्ताव यासाठी पाठविला आहे की, अलिकडे आपण पाहतो की, रुपयाचे अवमुल्यन झालेले आहे. सन 1989 साली जी सुधारणा झाली त्यामध्ये दंडात्मक कार्यवाहीची तरतूद या अधिनियमामध्ये होती. समजा एखाद्याने बेस्टच्या बसमधून प्रवास केला आणि प्रवास करीत असतांना तिकिट काढले नाही तर त्यास 10 रुपयांचा दंड होत होता.

यानंतर श्री.बोरले.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे ..........

आपण जर बसमध्ये विना तिकीट प्रवास केला तर 10 रुपये दंड आकारला जात होता. परंतु त्याचा परिणाम जाणवत नव्हता. म्हणून दंडाची आकारणी 10 पटीने वाढवावी अशा पद्धतीचा प्रस्ताव मुंबई महानगरपालिकेच्यावतीने आलेला आहे. अशा विविध बाबींबद्दल दंडात्मक फेरबदल करण्यात आलेला आहे त्याची यादी मोठी आहे. अशा प्रकारे देय असलेल्या भाडयाच्या रक्कमेमध्ये 10 पट वाढ सूचविण्यात आलेली आहे, एवढीच या विधेयकाद्वारे दुरुस्ती करण्यात येत आहे. सभागृहाने हे विधेयक मंजूर करावे अशी माझी विनंती आहे.

प्रश्न प्रस्तुत झाला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, दंड वाढविण्याच्या संदर्भात मुंबई महानगरपालिका कायद्यामध्ये कलम 149, 150, 152, 191 इत्यादी कलमे आहेत. बसमध्ये विना तिकीट प्रवास केला तर आता 10 पटीने दंड वाढविण्याबाबतचा कायदा येणार आहे. मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, अनेक अशा बाबी आहेत की त्याबद्दलही आपल्याला अशा प्रकारची तरतूद करण्याबाबत विचार करावा लागेल. हा कायदा तयार झाला त्यावेळी मुंबई हे बेट होते. दादाभाई नौरोजींच्या काळामध्ये 15 ते 20 लाखाच्यावर मुंबईची लोकसंख्या नव्हती. त्यावेळी कंदील लावले जात होते. त्यानंतर गॅसचे दिवे आले. मुंबईसाठी हा कायदा करण्यात आला होता. या कायद्यामध्ये दंड आकारणीसंदर्भात उल्लेख केलेला आहे. आता मुंबईमध्ये पावसाळयात पाणी तुंबलेले आहे, नाले भरलेले आहेत. हा विषय मिठी नदीच्या चर्चेच्या वेळी येईल. मुंबईमध्ये नैसर्गिक नाले होते. ते नाले खाजगी जमिनीवरुन जात असत. कायद्याने खाजगी जमीन मालकाला त्याच्या जागेचा पूर्ण वापर करण्याचा अधिकार असल्यामुळे त्या मालकाला त्या जागेतून जाणा-या नाल्यावर बांधकाम करावयाचे असेल तर किती चार्ज आकारावयाचा याबाबतची तरतूद होती. परंतु या विधेयकामध्ये कलम 229 मध्ये असे म्हटलेले आहे की, "कलम 227 किंवा 228 यानुसार जी तरतूद केली असेल तिला अनुसरुन असेल ते सोडून एरवी महानगरपालिकेच्या नाल्या वगैरेंशी इतर नाल्या न जोडणे." व पुढे कलम 229 (अ) पोट कलम (1) मध्ये असे म्हटले आहे की, "परवानगीवाचून कोणत्याही नाल्यावर इमारती वगैरे न उभारणे." याबाबत मला असे म्हणवयाचे आहे की, नाल्याच्याबाबतीत जी तरतूद करण्यात आलेली आहे त्याचा आपल्याला अभ्यास करावा लागेल. खाजगी जागेतून नाला जात असेल तर तो नैसर्गिक स्वरुपामध्येच राहिला पाहिजे, याबाबतची काळजी घेणे आवश्यक आहे. त्यामध्ये जमीन मालकाने बांधकाम करतांना कोणताही बदल करता कामा नये हे पाहणे जरुरीचे आहे. कारण मूळ नाल्याचे चित्र जेव्हा आपण बघतो तेव्हा असे दिसून येते की, इमारत उभी करीत असतांना जमीन मालकाने त्या नाल्याचे 70 टक्के स्वरुप भराव टाकल्यामुळे बदललेले असते. म्हणून या विधेयकामधील कलम 231, 232, 233 या कलमांचा पूर्णपणे अभ्यास करावा आणि त्याप्रमाणे कायद्यामध्ये सुधारणा करावी. जेणे करुन भविष्यात मुंबई शहरामधील नाले भराव टाकून बुजविले जाता कामा नये. मुंबईची आजची परिस्थिती पाहता भविष्यामध्ये अशा प्रकारच्या समस्या वाढण्याची शक्यता आहे.

...3/-



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ SBT/ MHM/ प्रथम श्री.रोझेकर ..... 18:45

श्री.दिवाकर रावते .........

मुंबईमधील मूळ नाल्यांचे सॅटॅलाईटद्वारे चित्र काढलेले आहे. परंतु आजची परिस्थिती अशी आहे की, त्या नाल्यांमध्ये 70 टक्के भराव टाकून तेथे इमारती उभ्या राहिलेल्या आहेत. त्या इमारती हा कायदा अस्तित्वात असतांनाच उभ्या राहिलेल्या आहेत. पाणी वाहून जाण्यासाठी नवीन वहिवाट निर्माण करावी. तसेच, यासंदर्भात नाला, ड्रेनेज, कचरा-कुंडया याचाही अभ्यास करावा व त्यानंतर कायद्यामध्ये सुधरणा करावी. जेणेकरुन भविष्यामध्ये मुंबई शहरातील नाले बुजविले जाता कामा नयेत.

यानंतर श्री.सुंबरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते ....

कोणत्याही कारणांनी नाले बुजले जाता कामा नयेत अशी मी सूचना करतो आणि आपण उशीर झालेला असला तरी हे करणे आवश्यक होते. आता आपण करीत असलेला बदल हा पूर्णपणे योग्य आहे असे मी म्हणणार नाही, किंबहुना यातील काही तरतुदी जास्त असल्या पाहिजेत. उदाहरणार्थ, रस्त्यावर कचरा टाकणे यावर प्रतिबंध या कायद्याने केला पाहिजे. 1987 मध्ये हा कायदा करताना जी संयुक्त समिती नेमली गेली होती तिचे प्रोसिडींग आपल्या लायब्ररीमध्ये आह, ते मी वाचले होते. त्यावेळेस मी आणि श्री.रामदास नायक असे आम्ही दोघेजण संयुक्त समितीच्या माध्यमातून हा पूर्ण कायदा कसा बनला, त्याचे प्रारूप कसे होते वगैरे सगळे काही आम्ही वाचले आहे. हा कायदा बनवित असताना किती दूरदृष्टीने तो बनविला गेला आहे हे त्यातून दिसून येते. त्यावेळी कायदे बनविणारे कसे द्रष्टे होते हेही कळते. कारण या मुंबईमध्ये इमारती उभ्या राहिल्या, त्यामध्ये त्यावेळी ब्लॉक सिस्टीम नव्हती, तर चाळ सिस्टीम होती. तेव्हा मुंबईमध्ये चाळी उभ्या राहतील. तेहा मुंबई औद्योगिकीकरण अधिक होते, गिरण्या होत्या. त्यामुळे ज्या चाळी या मुंबईत उभ्या राहतील त्यांची देखभाल कशी करावी, त्याची व्यवस्था कशी असावी हे त्यात सांगितले आहे. त्यात प्रत्येक चाळ मालकाने आपल्या चाळीला नियमितपणे रंगरंगोटी केली पाहिजे, दुरूस्ती केली पाहिजे हेही सांगितलेले आहे. आता काळ बदलला आहे. कन्स्ट्रक्शन इंजिनिअरींगचे नॉलेज बदलले आहे त्याप्रमाणे यामध्ये देखील बदल झाला पाहिजे. खास करून मुंबईच्या मल:निस्सारण, वॉटर लाईन्स या बाबतीत अधिक लक्ष दिले गेले पाहिजे. आज गिरगावमध्ये पाण्याची लाईन आपण करूच शकत नाही अशी स्थिती आहे. शेवटी तेथे आहे त्याच लाईनमध्ये आतून ट्रीटमेंट करण्याचा प्रयत्न झाला होता आणि सभापती महोदय, आपण त्यावेळी तेथे होता त्यामुळे आपणास त्याची अधिक माहिती आहे., पुढे त्याचे काय झाले याची मला माहिती नाही. पण आज मुंबईमध्ये, विशेष करून जुन्या मुंबईमध्ये नवीन पाण्याची लाईन टाकता येत नाही. मल:निस्सारणाच्या बाबतीतही तेच आहे. म्हणून या सगळ्या मल:निस्सारणाच्या लाईन्स, जलवाहिन्या आणि स्ट्रॉंग वॉटर, पावसाळ्यातील पाण्याच्या निचरा होणे वगैरे संदर्भात या कायद्याचा पूर्ण अभ्यास करून, आतापर्यंत आलेल्या संकटांची सांगड घालून योग्य अशा सुधारणा या कायद्यात केल्या तर ज्याप्रमाणे यापूर्वीच्या द्रष्ट्यांनी पुढील 100 वर्षांचा विचार करून कायदा आपल्याकडे दिला आहे त्याप्रमाणे आपणही पुढील 100 वर्षांचा विचार करून एक चांगल्या प्रकारचा कायदा करू शकतो असे मला वाटते एवढे सांगून मी थांबतो. धन्यवाद.

****

..... 3एक्स 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2006 चे वि.स.वि. क्रमांक 15 आता आपल्यासमोर चर्चेसाठी आणि पारित करण्यासाठी आलेले आहे. या विधेयकातील मजकूर मी वाचला आहे, थोडासा तपासला आहे. सन्माननीय सदस्य श्री.रावले यांनी या ठिकाणी या विधेयकाच्या संदर्भात ज्या सूचना केल्या आहेत त्या खरोखरी विधायक आहे, पूरक आहेत. तसे पाहिले तर हा कायदाच मुंबई शहराच्या दृष्टीने आऊट डेटेड झालेला आहे. मुंबई शहर हे शंभर-सव्वाशे वर्षापूर्वी कसे होते, 50 वर्षापूर्वी कसे होते आणि आज हे शहर कसे आहे याचा विचार केल्यास त्यावेळच्या आणि आताच्या मुंबई शहरामध्ये जमीन अस्मानाचे अंतर आहे. उदाहरणार्थ, मुंबईत वाढलेली झोपडपट्टी, शहरातील सिवरेज व्यवस्था, शहरातील चाळींची, इमारतींची अवस्था यामध्ये खूप मोठा फरक पडलेला आहे. अनेक वसाहती अशा आहेत की, तेथील सिवरेज पद्धतीत सांडपाणी बाहेरच वाहते आणि ते जमिनीत मुरते. परंतु तरीही त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणात त्यासाठीचे चार्जेस वसूल केले जातात. म्हणून माझी या निमित्ताने विनंती आहे की, या सगळ्या कायद्याचा चांगला अभ्यास व्हावा. त्यासाठी एक समिती नेमली जावी आणि त्या समितीच्या माध्यमातून या कायद्याचा पूर्ण अभ्यास करून मुंबईची आजची जी सद्य:स्थिती आहे, नाल्यांवर इमारती उभ्या राहिल्या आहेत, नदी-नाल्यांच्या काठावर इमारती उभ्या राहिल्या आहेत. मिठी नदीच्या काठावर मोठ्या प्रमाणात अनधिकृत वसाहती उभ्या राहिल्या आणि आज शेवटी त्यांना तेथून हटवून पर्यायी जागा दिल्या जात आहेत आणि त्यासाठी आपण 2000 साल पर्यंत गेलात. तेव्हा मुंबई महापालिकेने जास्त कार्यक्षमतेने काम करावे, मग तेथे कोणाची सत्ता आहे हा प्रश्न गौण आहे. कारण आज आमची सत्ता असेल तर उद्या कोणाची असेल हे काही सांगता येणार नाही. पण कोणाचीही सत्ता तेथे येवो, तेथील नगरसेवकांना जास्त सक्षमतेने काम करण्यास मिळावे या दृष्टीने या संपूर्ण कायद्याचा पूर्णार्थाने अभ्यास होऊन त्यात सुधारणा होण्याची आवश्यकता आहे. ...

( यानंतर श्री. सरफरे ..... 3वाय 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार...

आज ही परिस्थिती आहे तर 100 वर्षानंतर या मुंबई शहराची काय स्थिती होणार आहे? पुढील दहा वर्षानंतर या मुंबई शहरामध्ये झोपडी दिसणार नाही, सर्वत्र टॉवर संस्कृती येणार आहे. मुंबईमध्ये गरीब माणसाला राहावयास जागा मिळणार नाही अशाप्रकारचे वातावरण मुंबईमध्ये निर्माण होत आहे. यावर आपण अभ्यास करण्याची आवश्यकता आहे. केवळ पैसे वाढवून काही साध्य होणार नाही. आपण याठिकाणी दहा पटीने चार्जेस वाढविले आहेत. हा केवळ उपचार केला आहे, तो उपाय नाही. आणि म्हणून उपचार करुन पेशंट सुधारेल यावर माझा विश्वास नाही. त्यावर उपाय करण्यासाठी शासनाने सखोल अभ्यास करावा. त्याकरीता या संदर्भात नवीन परिपूर्ण कायदा आणावा अशी यानिमित्ताने सूचना करतो.

सभापती महोदय, या कायद्यामागील जो उद्देश सांगितला आहे त्यावर खूप बोलण्यासारखे असले तरी मी अधिक भाष्य करीत नाही. प्रत्येक गोष्ट याठिकाणी दाखवून बोलावयाचे म्हटले तर त्याचा काहीही उपयोग होत नाही. मघाशी विधेयकावर बोलण्याची आणि त्या अनुषंगाने काही उदाहरणे देण्याची माझी इच्छा होती. परंतु आपण ते विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याच्या विचारात असल्यामुळे ते विधेयक ज्यावेळी पुन्हा या सभागृहामध्ये मांडण्यात येईल त्यावेळी त्यावर माझे विचार व्यक्त करीन. या विधेयकामध्ये आपण 10 पटीवरुन 100 पटीपर्यंत दंडाची रक्कम वाढविण्याचा निर्णय घेतला आहे. अशाप्रकारे चार्जेस वाढवून हा प्रश्न मिटणार नाही. आज मुंबईमधील बी.ई.एस.टी. चा प्रवाशी तिकिट घेतल्याशिवाय प्रवास करीत नाही. परंतु काही वशिलेबहाद्दर असतील, जे बी.ई.एस.टी. च्या कर्मचाऱ्यांचे मित्र-मैत्रिणी असतील असे लोक तिकिट न घेता बसमधून प्रवास करुन उतरुन जात असतील तर त्यांना कुणी दंड करावयाचा? बी.ई.एस.टी. मुंबईमध्ये चालली पाहिजे. संपूर्ण हिंदुस्थानामध्ये मुंबईमधील बी.ई.एस.टी. ही एकमेव ट्रान्सपोर्ट कंपनी आहे. ती अतिशय कार्यक्षमतेने काम करीत आहे. त्यांचा आदर्श समोर ठेवून अनेक कंपन्या काम करीत आहेत. त्या दृष्टीकोनातून या कंपनीला धोका उत्पन्न होणार नाही याची काळजी घेण्याची आवश्यकता आहे. आज नवीन तरतुदीप्रमाणे बी.ई.एस.टी. उपक्रमामधील विद्युत विभागाला होणारा फायदा परिवहन विभागासाठी वापरता येत नाही. त्यामुळे त्यांनी निरनिराळया प्रकारचे मार्ग शोधून उत्पन्न वाढविण्याची आवश्यकता आहे. दिवसें दिवस खर्च वाढत चालला आहे, आणि उत्पन्नाची साधने कमी होत चालली आहेत हे सत्य आहे. आणि म्हणून मुंबई शहराची परिस्थिती पाहिली तर महाराष्ट्र सरकारने मुंबई शहराकडे पूर्ण लक्ष देऊन मुंबई शहरामध्ये



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार...

सुधारणा करण्याचे ठरविले नाही तर मुंबई शहराचे भवितव्य चांगले नाही एवढेच या निमित्ताने सांगतो.आज आपण या खात्याचे राज्यमंत्री आहात म्हणून बोलत नाही तर यापूर्वी देखील बोललो होतो की, कुणीही मुख्यमंत्री आले की, त्यांच्याकडे नगरविकास खाते असते. पूर्वी मुख्यमंत्र्यांकडे गृह खाते असायचे. त्यामुळे आता गृह खाते नसले तरी नगरविकास खाते असते. हे खाते स्वत:कडे घेण्याची कारणे वेगवेगळी असली तरी त्यावर मी भाष्य करु इच्छित नाही.परंतु या कारणांमुळे मुंबई शहराला धोका निर्माण होत आहे हे याठिकाणी नमूद केले पाहिजे. याकरीता या कायद्यामध्ये परिवर्तन आणून हा कायदा अधिक सक्षम केल्यास मुबई शहराचे आरोग्य सुधारेल एवढी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

धन्यवाद.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मुंबई महानगरपालिका अधिनियमामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधानसभेने संमत केलेले विधेयक क्रमांक 15 सभागृहामध्ये मांडण्यात आले आहे त्याचे मी स्वागत करीत आहे. मुंबई महानगराच्या परिस्थितीत सुधारणा करण्यासाठी, मुंबई महानगरपालिका जास्तीत जास्त सक्षम करण्यासाठी हे विधेयक आणले आहे ते निश्चितपणे स्वागतार्ह आहे. माननीय ज्येष्ठ सदस्य श्री. सरपोतदार दादांनी याठिकाणी महत्वाचे मुद्दे सांगितले. मुंबईमधील बी.ई.एस.टी. ची सेवा ही देशामधील अतिशय उत्कृष्ट सेवा आहे. या बस वाहतुकीमधून विनातिकिट प्रवास करणारे अपवादात्मक असे लोक असतात.परंतु अशाप्रकारचा प्रमाद करण्याचा प्रयत्न जर कुणी केला तर त्याला योग्य प्रकारे दंड करण्याची तरतूद या कायद्यामध्ये केली आहे, ही तरतूद निश्चितपणे योग्य आहे. जेणेकरुन बी.ई.एस.टी. चा कारभार कार्यक्षम होण्यासाठी, त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी मदत होईल असे मला वाटते. आपण याठिकाणी दिलेल्या शास्तीमध्ये अनेक प्रकारच्या कलमांसहीत यादी दिलेली आहे. त्यामध्ये कलम 191-अ, पोट कलम (3) मध्ये "कुत्र्याच्या मालकाने किंवा तो ज्याच्या ताब्यात असेल अशा व्यक्तीने विवरणपत्र सादर करणे" आवश्यक केले आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ MAP/ SBT/ KGS/ पूर्वी श्री.सरफरे... 19:00

प्रा.जोगेंद्र कवाडे (पुढे सुरु...

पण त्यासाठी विवरण पत्र सादर केले तर ती मंडळी धनवान असतात, बंगल्यामध्ये रहाणारी असतात, थ्री स्टार, फाईव्ह स्टार हॉटेलमध्ये जाणारी असतात. त्यांना 100 रुपये, 25 रुपये दंड म्हणजे काही नाही, ते सहज भरतील, परंतु विवरण पत्र सादर करणार नाहीत. अशी परिस्थिती निर्माण होऊ नये. कलम 233, पोट-कलम (1) मध्ये नालीचा वापर मर्यादित करण्यासंबंधीचा निदेश किंवा वेगळी नाली बांधण्यास फर्मावण्यासंबंधीची नोटीस देण्याबाबतची तरतूद आहे. मिठी नदीच्या नाल्यावर अतिक्रमण झाल्यानंतर काय झाले, हे आपण मागच्या वर्षी पाहिलेले आहे. अशा पध्दतीने 50 रुपये लादण्यात येईल असा किमान दंड आणि दोनशे पन्नास रुपये दंड लावता येईल, अशी तरतूद केलेली आहे. परंतु त्या ठिकाणची अतिक्रमणे हटविण्याच्यादृष्टीने तरतूद केली असती तर बरे झाले असते. त्यानंतर कलम 329-अ, पोट-कलम (1) मध्ये धोक्याच्या जागा दुरुस्त करण्यास, सुरक्षित करण्यास किंवा त्यास कुंपण घालण्यास फर्मावणे अशाप्रकारची तरतूद केलेली आहे. अनेक बिल्डर्स हे मोठया प्रमाणात टॉवर्स उभे करत असतांना पाण्याची सोय व्हावी म्हणून टाक्या बांधतात. पण त्या ठिकाणी जी सुरक्षितता असायला पाहिजे ती नसल्यामुळे अनेक लहान लहान मुले त्या टाक्यामध्ये पडून मृत्यू पावलेली आहेत. या टाक्या सुरक्षित ठेवल्या नाहीत, त्याबाबतची त्यांनी जबाबदारी पार पाडली नाही तर केवळ 250 रुपये किंवा 50 रुपये दंडाची तरतूद ही पुरेशी नाही. त्याबाबतही योग्य तो विचार करावा. त्यानंतर कलम 316 पोट-कलम (1) मध्ये "सार्वजनिक सडकांवर जनावरे बांधण्यास मनाई करण्याबाबतची तरतूद आहे. त्यासाठी दंडाची तरतूद केलेली आहे. मुंबई उपनगरातील गोरेगाव आणि बोरीवली या ठिकाणी मोठयाप्रमाणावर म्हशी रस्त्याच्या कडेला बांधलेल्या असतात. त्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होऊन अनेकवेळा अपघात झालेले आहेत.. यासाठी दंडाची तरतूद केली असली तरी तो दंड कोणी भरणार नाही. यादृष्टीने काही विचार व्हावा. मुंबई महानगरी हे जगाच्या नकाशावर उत्कृष्ट शहर म्हणून नोंद व्हावी त्या दृष्टीने प्रयत्न करणे गरजेचे आहे. या दृष्टीने हे विधेयक आाणलेले आहे त्याला समर्थन देऊन माझे दोन शब्द संपवितो. धन्यवाद.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ MAP/ SBT/ KGS/

श्री.राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य रावते साहेब,सन्माननीय सदस्य श्री.सरपोतदार साहेब आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त केले. कलम 471 आणि 472 या दोन कलमाच्या माध्यमातून ज्या काही दंडात्मक तरतुदी आहेत, त्यामध्ये वाढ करण्यासाठी या कायद्यामध्ये दुरुस्ती सुचविलेली आहे. दंडात्मक वाढ ही पाच पटीने सुचविलेली आहे. बेस्टच्या बसमध्ये विना तिकिट प्रवास करणाऱ्या प्रवाशांना देय प्रवास भाड्याच्या दहा पट वाढ करुन दंड आकारण्याचे सुचविलेले आहे. यामुळे यापुढे विना तिकिट प्रवास करणाऱ्या प्रवाशांना जरब बसेल, या उद्देशाने मूळ अधिनियमामध्ये सुधारणा सुचविलेली आहे. आता रुपयाचे मूल्यांकन झालेले आहे, सध्याची जी दंडात्मक तरतूद आहे ती कमी असल्याने विना तिकिट प्रवास करणाऱ्या प्रवाशाला जरब बसत नव्हती म्हणून त्यामध्ये वाढ केलेली आहे. कलम 390 अन्वये कारखाना वगैरे स्थापन करण्यासाठी दिलेली लेखी परवानगी रद्द केल्यानंतर कारखान्याचे कामकाज इत्यादि चालू ठेवण्यास किंवा पुन्हा सुरु करण्यास मनाई केलेली होती त्यामध्ये 1 हजार ते 5 हजार रुपयापर्यन्त दंडात्मक तरतूद केलेली आहे. हा दंड पाच पटीने केलेला आहे, ही तरतूद आता परिणामकारक होणार आहे. त्यानंतर कलम 395, पोट कलम (1) मध्ये रासायनिक द्रव्यांनी पाणी वगैरे दुषित करण्यास मनाई, याबाबत उल्लंघन केल्यास एक हजार ते पाच हजारापर्यंत दंडाची तरतूद केलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.रावते साहेबांनी सिव्हरेज लाईच्या बाबत मुद्दा उपस्थित करुन त्याबाबतची तरतूद केली नसल्याचे आणि बदलत्या परिस्थितीनुसार कायद्यामध्ये दुरुस्ती होण्याची आवश्यकता असल्याचे मतही व्यक्त केले. तसेच कायदा सक्षम असावा, अशाप्रकारचे मत सन्माननीय सदस्य श्री.सरपोतदार साहेबांनी अपेक्षा व्यक्त केली. मी या निमित्ताने सांगू इच्छितो की, तीनही महानगरपालिकांचे मिळून मॉडेल लॉ करता येईल काय याबाबतचा अभ्यास चालू आहे.

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे ....

आणि त्यादृष्टीकोनातून केंद्र शासनाने जो मॉडेल लॉ पाठविलेला आहे त्याचा अभ्यास करुन लवकरात लवकर निर्णय घेण्याच्या दृष्टीने विचार करीत आहोत. त्यामुळे सभागृहाने या विधेयकाला मान्यता द्यावी अशी मी सभागृहाला विनंती करतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती (श्री. विलास अवचट )** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 4 ( दोन्ही सम्मिलित ) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. राजेश टोपे : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि.स.वि. क्र. 15 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : सन 2006 चे वि. स. वि. क्रमांक 15 संमत झाले आहे.

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या गुरुवार, दिनांक रोजी सकाळी 10.30 वाजता पुन्हा भरेल. उद्या सकाळी 10.30 ते दुपारी 1.00 वाजेपर्यंत नियम 260 अन्वये असलेल्या प्रस्तावावर चर्चा होईल. त्यानंतर सभागृहाची नियमित बैठक दुपारी 1.15 वाजता भरेल. आजच्या अर्धा-तास चर्चा सोमवार, दिनांक 10 जुलै, 2006 रोजी घेण्यात येतील.

( सभागृहाची बैठक सायंकाळी 7 वाजून 7 मिनिटांनी गुरुवार, दिनांक
6 जुलै, 2006 च्या सकाळी 10.30 वाजेपर्यंत स्थगित झाली )

---------

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही